# शब्द रुची

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या
लॉस एंजेलिस अधिवेशनानिमित्त
संगीत–चित्रपट विशेषांक

अतिथी संपादक
अवधूत गुप्ते

जुलै–ऑगस्ट २०१५ ● मूल्य १०० रु.
पृष्ठसंख्या १२४




सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र शासन
मॅग्नेटिक महाराष्ट्र
• ७०,१०८ मिलियन यु. एस. डॉलर्स ची परदेशी गुंतवणूक, महाराष्ट्र राज्याचा देशात परदेशी गुंतवणूकीमध्ये प्रथम क्रमांक, एप्रिल २००० पासून एकूण परदेशी गुंतवणुकीच्या १/३ हिस्सा महाराष्ट्रामध्ये
• नाशिक, शेंद्रा, धुळे, दिघी-जागतिक दर्जाची उत्तम पर्यावरणपूरक शहरे
• तळेगाव, पुणे येथे अनेक सुविधायुक्त लॉजिस्टिक पार्क शेंद्रा, औरंगाबाद येथे आंतरराष्ट्रीय कन्व्हेक्शन व प्रदर्शन सेंटर
• संपूर्ण राज्यात संतुलित औद्योगिक विकास
• ऑनलाईन एक खिडकी कार्यपद्धती
• एकूण पाणी पुरवठा क्षमता २,३३९ द.ल.घ.मी.
• ५,७२५ कि.मी. हून अधिक लांबीचे रस्ते
• औद्योगिकीकरणासोबत पर्यावरण रक्षणाला विशेष प्राधान्य
• २०१३-१८ च्या नवीन औद्योगिक धोरणानुसार निर्मिती क्षेत्रातील वाढीचा दर १३ टक्के असून क्षेत्राचा हिस्सा एकूण उत्पन्नाच्या २८ टक्के असावा त्यातून २० लक्ष नोकऱ्यांची निर्मिती, १९ अब्ज युएस डॉलरची परदेशी गुंतवणुक आकर्षित व्हावी असे अपेक्षित
• सुक्ष्म-लघु-मध्यम उद्योग (MSME) निर्यातीच्या अटींनुसार १ बिलियन यु. एस. डॉलर्सची (रुपये ५४८४ कोटी) निर्यात
• जपानी गुंतवणूकदारांसाठी ५०० एकरांचा परिसर आरक्षित
• भारतातील सर्वोत्कृष्ठ आय.टी.पार्क, हिंजवडी, पुणे
• भारतातील सर्वात मोठा जेम्स आणि ज्वेलरी पार्क, सीप्झ, मुंबई
• १,५५,६७६ एकर जमिनीवर २४० औद्योगिक वसाहतींची निर्मिती
राज्याच्या संतुलीत औद्योगिक विकासामुळे राज्याचे दरडोई उत्पन्न सर्वात जास्त १,७४७/-
राज्याच्या ५० वर्षे नियोजनबध्द औद्योगिक प्रगतीमुळे राज्याचा मानवी विकास निर्देशांक ०.५७२ एवढा
राज्याच्या औद्योगिक प्रगतीमुळेच राज्याचा GDP १४.१०%
MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION
// उद्यमात् सकल समृध्दिः //
MIDC
मुख्यालय :
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
'उद्योग सारथी' महाकाली केव्ह मार्ग, अंधेरी (पू), मुंबई - ४०० ०९३
मुख्य कार्यालय :
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
४ (ए), १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर कॉम्प्लेक्स
आय कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ०९३
महाराष्ट्र राज्य : प्रभावी मूलभूत सुविधा, वेगवान प्रगतीसाठी
Website : www.maharashtra.gov.in
Website : www.midcindia.org

महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
# जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी

- सुरेश भट

- **मराठी भाषा विभाग**

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये 'मराठी भाषा विभाग' असा स्वतंत्र प्रशासकीय विभाग निर्माण करण्यात आला.

अधिक माहितीसाठी
https://marathibhasha.maharashtra.gov.in

- **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ**

मराठी भाषा, साहित्य, इतिहास, सांस्कृतिक व कला या क्षेत्रामध्ये महाराष्ट्रास लाभलेला वारसा जतन/संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने या मंडळाची स्थापना केली.

अधिक माहितीसाठी
https://msblc.maharashtra.gov.in

- **महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ**

ज्ञानकोशाच्या संपादन व प्रकाशन कार्यासाठी महाराष्ट्र शासनाने या मंडळाची स्थापना केली.

अधिक माहितीसाठी
Http://www.vishwakosh.org.in

- **भाषा संचालनालय**

शासन व्यवहारात मराठीचा अधिकाधिक वापर करण्यासंबंधीच्या धोरणांची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने शासकीय कार्यालये, मंडळे, महामंडळे, जिल्हापरिषदा इ.कार्यालयांची तपासणी करणे व त्यांना मार्गदर्शन करण्या करिता 'भाषा संचालनालयाची' स्थापना करण्यात आली.

अधिक माहितीसाठी
http://bhasha.maharashtra.gov.in

- **राज्य मराठी विकास संस्था**

मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने 'राज्य मराठी विकास संस्थेची' स्थापना केली.

अधिक माहितीसाठी
Http://rmvs.maharashtra.gov.in

**'ग्रंथाली', 'शब्द रुची', विशेषांक प्रकाशनास**

***महाराष्ट्र शासनातर्फे हार्दिक शुभेच्छा...***

| देवेंद्र फडणवीस | विनोद तावडे |
| --- | --- |
| मुख्यमंत्री | मंत्री, मराठी भाषा विभाग |

मराठी भाषा विभाग, मंत्रालय मुंबई



Marching towards the 100th year
SINCE 1917
NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
Where your convenience is always in our mind...
Loans at affordable Rate of Interest
Attractive schemes for Students
Internet Banking
Mobile Banking
Forex
Unique Saving schemes for Women
NRE / NRO / FCNR Accounts
Special Saving schemes for Senior Citizens
International VISA Debit Card
Attractive Deposit Schemes
Contact Us: +91 22 2860 2000 | customercare@nkgsb-bank.com | www.nkgsb-bank.com
Regd. Office: Laxmi Sadan, 361, V. P. Road, Girgaum, Mumbai - 400004, India


त्वरा करा! गृह कर्ज
कमी ईएमआय वर
₹878* दर लाखासाठी
कमी व्याजदर
10 %* दरसाल
कमाल कालावधी 30 वर्षे*
कर्ज मंजुरी फक्त 5 दिवसात*
इजी टेकओवर*
*अटी लागू
जास्त प्रमाणात कर्ज, ज्यावर कमाल मर्यादा नाही • तात्काळ मंजुरीसाठी खास शाखा
युनियन बँक ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
Union Bank of India
Good people to bank with
भारतीय बँकिंग कोड आणि मानक बोर्डाचे सदस्य
Member of Banking Codes & Standards Board of India
हेल्पलाइन नंबर : 1800 208 2244 / 1800 222 244 (टोल फ्री) । 080 2530 0175 (शुल्क लागू)
+9180 2530 2510 (एनआरआय साठी) । www.unionbankofindia.co.in
pointart.mobi वरुन "PointART" मोबाइल ॲप्प डाउनलोड करा
ॲप्प उघडा आणि ही वरील जाहिरात कॅप्चर करा
गृह कर्जा विषयी अधिक माहिती मिळवा
स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


Gyan Ki Udaan
Ab Bharose Ke Sang
DENA VIDYA LAXMI*
Education Loan Scheme
For studies in India and Abroad
For regular curriculum
DENA VOCATIONAL*
Education Loan Scheme
For Vocational
and Skill Development Courses
Loans for Graduation, Post Graduation, Phd & Professional Courses in India & Professional Courses offered by reputed Universities Abroad.
Loan Amount
Upto ₹ 10 lacs for studies in India
Upto ₹ 20 lac or more for studies abroad
Repayment
For loans upto ₹ 7.50 lacs - 10 years
For loans above ₹ 7.50 lacs - 15 years
Loans for Vocational / Skill Development Courses run or supported by GOI or NSDC, SSM, SSC and courses approved by SLBC / SLCC.
Loan amount Maximum upto ₹ 1,50,000/-
Repayment - 2 years to 7 years
Govt interest subsidy scheme for Economically Weaker Sections (EWS), whose parental income upto ₹ 4.50 lacs p.a.
For more details, please contact your nearest branch.
www.denabank.com
देना बैंक
DENA BANK
(A Government of India Enterprise)
Trusted Family Bank
Dena Hai To Bharosa Hai
APPLY ONLINE
*Conditions apply

LN TRAVELS

One stop shop for all Tourism related Services. We specialize in personal services suitable to needs and preferences of our clients. Over last **6** years, our satisfied client base spans from small and big Families, to Honeymooners to Sinior Citizen Groups.

## Call On Us For **2015 Winter Conducted Tour** Options

**Himachal | Kerala | Rajasthan | Karnataka | Kashmir |**
**Gujrath | Costal Karnataka | Kokan | Goa.......**

**Singapore | Malaysia | Bangkok | Pattaya | Dubai | Switzerland........**

- **Family, Group, Honeymoom,Adventures tour Packages**
- **Air Tickets- Domestic & International**
- **Visa - Thailand,U.S.A, U.K, Singapore, Malaysia, U.A.E, Switzerland......**
- **Forex assistance**
- **Travel Insurance**
- **Passport**



*Unique Opportunity For Aspiring Entrepreneurs*

# Travel & Tourism Course

**Domestic Info | International Info | Tour Plan | Tour Costing | Hotel Booking**
**Domestic/International Air Ticketing | Railway Ticketing | I.A.T.A Geography**
**Visa/Passport | Forex | Travel Insurance**

**★★★★★★ Franchise Available ★★★★★★**



**You can start up your own travel agency or find a decent Job**

Office Address-Madhushanti Apartment, Opp Tejas Hall Lane, Tejas Co- Operative housing society, Kothrud, Pune **411038**
**Off Land Line- 020 32317871 Mob No +91 7304791999, +91 8983833457**
**Mail ID- lntravelspune@gmail.com, sales.lntravels@outlook.com, Website- www.lntravels.com**

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची ४१ ॥ग्रंथाली॥

लॉस एंजेलिस अधिवेशन विशेषांक
जुलै–ऑगस्ट २०१५, वर्ष तिसरे
अंक चौथा, मूल्य १०० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
अतिथी संपादक : अवधूत गुप्ते
संपादन साहाय्य व मांडणी : आल्हाद गोडबोले
मुखपृष्ठ : पुंडलिक वझे

**कार्यालयीन संपर्क**
कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे
granthaliruchee@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप
granthaliad@gmail.com

केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.
वार्षिक वर्गणी १५० रुपये
डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता :
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे मासिक व्यासपीठासमान आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र, त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था वा तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

## संपादकीय...



'ग्रंथाली' म्हटलं की मला बाबांबरोबर 'बीज' Advertising मध्ये काम करतानाचे दिवस आठवतात. तोपर्यंत मला वाचनाची आवड नव्हती अशातला भाग नाही. पण, त्यादरम्यानच सुदेश हिंगलासपूरकर, रामनाथ आंबेरकर, पद्मभूषण देशपांडे आदी चळवळीच्या सक्रीय कार्यकर्त्यांशी ओळखी झाल्या आणि मीसुद्धा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कट्ट्यावर लगडलेला दिसू लागलो. 'काय वाचावं' हे संस्कार ह्या कट्ट्यानेच माझ्यावर केले. पुढे, अर्थात काळाच्या ओघात कट्टे बदलत राहिले, पुस्तकांची जागा वाद्यांनी घेतली, पण 'ग्रंथाली'वरचं प्रेम कमी झालं नाही. बीएमएमच्या निमित्तानं असा अंक काढावा ही कल्पना घेऊन जेव्हा पद्मभूषण देशपांडे आणि सुदेशजी माझ्या ऑफिसला आले, तेव्हा हे प्रेम व्यक्त करायची संधी आयतीच चालून आली असं मला वाटलं. विषयसुद्धा 'मराठी कलासृष्टी' म्हटल्यावर हातातलाच होता.

पण, मग वाटलं की या विषयाला 'आजची मराठी कलासृष्टी' असं बदलून त्याची रुंदी थोडी कमी करावी. जेणेकरून जो अंक तयार होईल, तो 'आजच्या' मराठी कलासृष्टीची कल्पना देणारं एक छान चित्र असेल. म्हणूनच तो संग्राह्य असेल. ज्या लोकांनी यात लिहिलंय त्यांची मतं अनुभवसंपन्न होता होता काही काळांनी बदलतीलही, पण आज ती काय होती, हे मात्र कायमस्वरूपी उपलब्ध राहील. ह्या सगळ्या लेखांतून आलेल्या संदर्भातून दिसणाऱ्या मराठी कलासृष्टीमधील प्रत्येक गोष्ट, ध्वनिमुद्रणातील–चित्रीकरणातील तांत्रिक बाबी, कला लोकांपर्यंत पोहोचवण्याची बदलती माध्यमं, कॉपीराइटसच्या वाटण्या, प्रत्येकासमोरील आव्हानं वगैरे अनेक गोष्टी

आजवर बदलत आल्या आहेत आणि बदलत राहतील. पण म्हणूनच आजच्या घडीला हे सगळं कसं दिसत होतं, ह्याचं एक उत्तम शब्दचित्र म्हणून हा अंक तयार करण्याचं आम्ही ठरवलं.

काम खूप होतं, पण सगळ्यांनीच खूप मेहनत घेतली. विशाखा टिकले, धनंजय कुलकर्णी, गणेश आचवल, शब्दगंधा कुलकर्णी, अस्मिता पांडे, राधिका कुंटे, दिलीप ठाकूर, श्रीराम खाडिलकर, प्रभा कुकडे ह्या सर्व मुलाखतकारांनी मला अभिप्रेत असलेला ऐवज संबंधित मान्यवरांकडून व्यवस्थित काढून घेतला, यासाठी मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे. या क्षेत्रात प्रत्येकजण किती व्यग्र असतो, याची कल्पना मला आहे. पण, त्यातूनही त्यांनी चर्चेसाठी वेळ दिला, काहींनी तर स्वत:च हाती लेखणी घेतली, त्यांचा सर्वांचाच मी मनापासून ऋणी आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे 'ग्रंथाली' आणि 'शब्द रुची'च्या संपूर्ण टीमचे शतश: आभार, ज्यांनी मला एवढ्या मोठ्या विशेषांकाचा अतिथी संपादक म्हणून काम करण्याचा मान दिला.

माझी खात्री आहे, हा अंक वाचायला म्हणून हाती घेतल्यावर तुम्ही तो पूर्ण केल्याशिवाय खाली ठेवूच शकणार नाही. नंतरही तो तुमच्या संग्रहात जपून ठेवा. आणखी वीस वर्षांनी जेव्हा परत तो वाचाल, तेव्हा आपले लहानपणीचे फोटो परत पाहतानाचा आनंद तो तुम्हाला देईल, अशी माझी खात्री आहे.

धन्यवाद!

आपला

**अवधूत गुप्ते**



**'ग्रंथाली'**ने आपली चाळिशी नुकतीच पूर्ण केली. त्यानिमित्त गेले वर्षभर 'शब्द रुची'चे विशेषांक अतिथी संपादकांच्या हाती सोपवून प्रसिद्ध केले गेले. स्त्री विशेषांक (नीरजा), पर्यावरण विशेषांक (शुभदा पटवर्धन), सोशल नेटवर्किंग (अरुण जोशी), अक्षर पर्यटन विशेषांक (आल्हाद गोडबोले), भाषा आणि साहित्य विशेषांक (वीणा सानेकर), आरोग्य विशेषांक (डॉ. प्रेमानंद रामाणी), आर्थिक विशेषांक (विनायक कुळकर्णी), राजकीय विशेषांक (प्रवीण बर्दापूरकर).

दर दोन वर्षांनी होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला 'ग्रंथाली' १९८३ पासून पुस्तके घेऊन जात असते. या अधिवेशनात सहभागी होण्याचे 'ग्रंथाली'ची हे बारावी खेप आहे. त्यानिमित्त 'शब्द रुची' मासिकाचा हा विशेषांक प्रसिद्ध होत आहे. या वर्षी लॉस एंजेलिस येथे होणाऱ्या अधिवेशनात अवधूत गुप्तेंचे खास सादरीकरण आहे. ते निमित्त साधूनच अवधूत गुप्ते यांना अतिथी संपादक म्हणून 'बदलता मराठी सिनेमा आणि संगीत' या विषयावर विशेषांक करण्याची विनंती केली.

अधिवेशनानिमित्त 'ग्रंथाली' दरवर्षी अमेरिकेतील लेखकांची पुस्तकेही आवर्जून प्रकाशित करत असते. यावर्षी विद्या हर्डीकर-सप्रे (मांजरफन), विद्या हर्डीकर-सप्रे आणि अशोक सप्रे (अमेरिकन मराठी : जन मन अधिवेशन), डॉ. लतिका भानुशाली आणि डॉ. गजानन सबनीस (कोलाज : अमेरिकेच्या अंतरंगाचा) ही पुस्तके प्रकाशित होत आहेत. या अधिवेशनाचा मुहूर्त साधूनच आपल्या खास ॲपद्वारे 'ग्रंथाली' यापुढे मराठी साहित्य डिजिटल स्वरूपात प्रकाशित करणार आहे.

या अंकाच्या संपादन व मांडणीसाठी आल्हाद गोडबोले तसेच मुखपृष्ठासाठी पुंडलिक वझे यांनी मोलाचे सहकार्य केले. चंद्रशेखर सानेकर यांनी लेखवाचनाची जबाबदारी आनंदाने घेतली, त्याबद्दल आभार.

या अंकास एमआयडीसी, दादासाहेब फाळके फिल्मसिटी, राज्यभाषा विकास संस्था यांचे आर्थिक सहाय्य लाभले, त्यांचेही आभार.

**– सुदेश हिंगलासपूरकर**

## विभाग पहिला – मराठी संगीत


- मराठी संगीत : 'म्हणजे प्रश्नच नाही!' / ११
  **कौशल श्री. इनामदार**
- कवितेत लपलेली चाल / १९
  **सलील कुलकर्णी**
- मराठमोळ्या गीतांना हिंदीचा साज / २७
  **विशाखा टिकले पंडित**
- तुझी-माझी जोडी / ३०
  **अश्विनी सहस्रबुद्धे**
- एक सिनेमा अनेक संगीतकार / ३४
- सूर राहू दे रे
  **राधिका कुंटे**
- 'ऐका दाजिबा'ची दहा वर्षं / ४४
  **वैशाली सामंत**
- भारतीय संगीतात महिलांचे स्थान / ५०
  **शरद विचारे**
- फ्युजन संगीताला पर्याय नाही! / ६४
  **जसराज जोशी**
- मराठी मैफल रंगे जीतूराजसंगे / ७२
- जुन्या नव्याचा योग्य मेळ साधणं आवश्यक / ७४
  **'आरजे' गणेश आचवल**
- मराठी संगीताची डिजिटल स्पेस / ७९
  **वैभव वझे**


## विभाग दुसरा – मराठी चित्रपट


- बदललेला मराठी चित्रपट आणि बरेच काही... / ८१
  **दिलीप ठाकूर**
- मेकअप इज आर्ट ऑफ इल्यूजन / ८५
  **विक्रम गायकवाड**
- सुंदर दिसण्याची व्याख्या बदलली / ८८
  **पौर्णिमा ओक**
- ...नाचतो आम्ही तालात / ९१
- वेगळ्या वाटेवरचा मराठी चित्रपट / ९४
  **दिलीप ठाकूर**
- प्लॅनिंग फिट तर सिनेमा हिट / ९७
- जनसंपर्क वितरण, जाहिरात / १००


## मनोगते


स्ट्रगल अपेक्षांचा / ५४
**ऋषिकेश रानडे**
टिकटिक वाजते मनात / ५५
**सायली पंकज**
स्ट्रगल नव्हे, साधना / ५६
**मंगेश बोरगावकर**
संगीत हेच ध्येय / ५७
**उर्मिला धनगर**
यश टिकवणे महत्त्वाचे / ५८
**आदर्श शिंदे**
घरापासून दूर येण्याचा स्ट्रगल / ५९
**कीर्ती किल्लेदार**
रोजच परीक्षा / ६०
**आर्या आंबेकर**
बहुश्रुतता महत्त्वाची / ६१
**अनिरुद्ध जोशी**
अडचण हीच संधी / ६२
**सावनी रवींद्र**
सातत्याने अभ्यास हवा / ६३
**आनंदी जोशी**
'श्वास' नंतर चित्र बदललंय / १०४
**सुबोध भावे**
आशय नेहमीच संपन्न / १०५
**मुक्ता बर्वे**
मराठीत सिक्वलचा ट्रेंड / १०६
**स्वप्निल जोशी**
मराठी चित्रपटांचे पण रिमेक बनत आहेत / १०७
**केतकी माटेगावकर**
प्रयोगशील दिग्दर्शकांची नवी फळी / १०८
**मकरंद अनासपुरे**
सिनेमाचा विषय हाच हिरो / १०९
**वीणा जामकर**
मागणी तसा पुरवठा / ११०
**प्रथमेश परब**

**ग्रंथपाने** – ११२ ते ११६
मैत्रेय प्रकाशन, मौज प्रकाशन, लोकवाङ्मय प्रकाशन, रोहन प्रकाशन, पद्मगंधा प्रकाशन
**ग्रंथाली ग्रंथपाने – ११८ ते १२१**

# मराठी संगीत : ‘...म्हणजे प्रश्नच नाही!’

**कौशल श्री. इनामदार**

एका प्रसिद्ध इंग्रजी चित्रपटाच्या एका तितक्याच प्रसिद्ध गाण्याची सुरुवात आहे –

Let's start at the very beginning; a very good place to start!

साधं, सोपं, आणि समर्पक! पण या लेखाला सुरुवात करत असताना या गीताच्या तत्त्वज्ञानावर फारसं अवलंबून राहण्यात तथ्य नाही हे मला उमगलं. कारण काळातला जो बिंदू आपण एखाद्या घटनाक्रमाची सुरुवात म्हणून गृहीत धरतो, जसजसा आपला त्या घटनाक्रमावर विचार होण्यास सुरुवात होते, तसतसं आपल्या लक्षात येतं की, काळाचा हा बिंदू आणखी आणखी मागे जाऊ लागतोय! या निमित्तानं मी असाही विचार करून पाहिला की, एक इतिहासकार इतिहासामधल्या एखाद्या घटनाक्रमाच्या सुरुवातीचा बिंदू कसा निश्चित करत असेल?

तर खूप विचाराअंती असं ठरवलं की, आपण संगीताचा ऐतिहासिक आलेख मांडण्याच्या भानगडीतच पडायचं नाही! कारण ती आपली पात्रता नाही आणि आपण आजच्या संगीतविश्वाचेच एक घटक असल्यामुळे आपल्याला तटस्थपणे तो इतिहास बघताही येणार नाही. पण नेमक्या याच कारणामुळे आजच्या आणि कालच्या संगीतविश्वाकडे (विशेषत: मराठी संगीतविश्वाकडे) पाहण्याची एक वेगळी नजर आपल्याकडे आहे, हेही माझ्या लक्षात आलं. एका संगीतकाराच्या भिंगातून मराठी संगीताचं हे बदलतं रूप कसं दिसतं याचं हे वर्णन आहे.

मी संगीतबद्ध केलेल्या अशोक बागवेंच्या एका गीतामधले शब्द आहेत–

‘आठवण तुझी सारखी, निघे काजव्यांची पालखी’



**हा लेख माझ्या इम्प्रेशन्सच्या काजव्यांची पालखी आहे असं म्हणायला हरकत नाही. एक मात्र स्पष्ट करायला हवं – जसं मराठी भावसंगीताचं हे विश्व झपाट्यानं बदलतंय, हे संगीत ऐकणारा श्रोता बदलतोय, तसं या संगीतकाराचं भिंगही बदलतंय! दहा वर्षांपूर्वी ज्या मतांवर मी ठाम होतो, आता मला त्या मतांबद्दल विशेष आत्मीयता वाटत नाही, त्यातल्या काही मतांची लाजही वाटते! किंबहुना मी बांधलेल्या चालींची संख्या जशी वाढू लागली, तशी मी बाळगलेली मतं गळून पडू लागली!**



हा लेखही माझ्या इम्प्रेशन्सच्या काजव्यांची पालखी आहे असं म्हणायला हरकत नाही. एक मात्र स्पष्ट करायला हवं – जसं मराठी भावसंगीताचं हे विश्व झपाट्यानं बदलतंय, हे संगीत ऐकणारा श्रोता बदलतोय, तसं या संगीतकाराचं भिंगही बदलतंय! दहा वर्षांपूर्वी ज्या मतांवर मी ठाम होतो, आता मला त्या मतांबद्दल विशेष आत्मीयता वाटत नाही, त्यातल्या काही मतांची लाजही वाटते! किंबहुना मी बांधलेल्या चालींची संख्या जशी वाढू लागली, तशी मी बाळगलेली मतं गळून पडू लागली!

**नवं संगीत, जुनं संगीत**

मला कळू लागल्यापासून नवं संगीत आणि जुनं संगीत हे दोन तट मी कायमच पाहत आलोय. मी शाळेत असताना 'नव्या संगीताच्या' या तटावर फारशी गर्दी नसायची. 'मला जुनंच संगीत आवडतं!' 'जुनं ते सोनं!' या अर्थाची वाक्यं वारंवार कानांवर पडायची. त्यामुळे असेल कदाचित, पण मीही बराच काळ या सोनेरी तटावर रेंगाळलो. जुनी गाणी, जुने चित्रपट यात रमून जायचो. कधीकधी आपलं आयुष्य ईस्टमनकलरपेक्षा कृष्ण–धवल किंवा सेपिया टोन असतं तर किती चांगलं झालं असतं असं वाटायचं. जसाजसा काळ पुढे सरकत राहिला आणि मी मोठा होत गेलो, तसं आजूबाजूचं जगही मोठं होऊ लागलं. मग हे संगीत ऐकताना आणि चित्रपट पाहताना वाटू लागलं की, हे सगळं छान आहे, पण यात माझ्या आजच्या आयुष्यावर काहीच भाष्य नाही. आणि मग आपसूकच पैलतटावरचे गूढरम्य प्रदेश मला खुणावू लागले. तिथे काही आपलं सापडेल असं वाटू लागलं. या प्रवासावर जाताना जुनं संगीत शिदोरीत होतंच, पण नव्याचा शोध घेतला पाहिजे ही आत्म्याची गरज बनली होती.

**तंत्रज्ञानामधले बदल**

मी संगीतकार होऊ पाहत होतो, तेव्हाच ध्वनिमुद्रणाच्या तंत्रामध्ये अतिशय झपाट्यानं बदल होऊ लागले. हे बदल इतके आमूलाग्र होते की, हा काळ या तंत्रज्ञानाच्या जीवनामध्ये एक नवं युग घेऊन आला. माझ्या आजोबांनी १९३२ साली जेव्हा 'अयोध्येचा राजा' या चित्रपटासाठी व्हायोलिन वाजवलं त्यावेळी अभिनेता हाच गायक असायचा आणि वादक चित्रपटाच्या सेटवरच झाडाझुडपात लपून वाद्य वाजवायचे. चित्रपटाची गाणी चित्रिकरणाबरोबर थेट फिल्मवरच ध्वनिमुद्रित केली जायची. ७८ आर.पी.एम.च्या तबकड्याही याच काळात भारतामध्ये मूळ धरू लागल्या होत्या. मग चित्रपट ध्वनिमुद्रणाच्या क्षेत्रात पहिली क्रांती झाली आणि प्लेबॅक (पार्श्वगायन) तंत्रज्ञान जन्माला आलं. न गाणाऱ्या अभिनेत्यांनी–अभिनेत्रींनी सुटकेचे निःश्वास सोडले आणि अभिनय न करणारे गायक–गायिका कंबर कसून सज्ज झाले. मग ध्वनिमुद्रण आणि चित्रिकरण वेगवेगळं होऊ लागलं. तरीही तोवर गायक–वादक एकत्र एका माइकवर ध्वनिमुद्रण करायचे. हे ध्वनिमुद्रण 'मोनो' असायचं – म्हणजे एकाच चॅनलमधून ऐकू यायचं. १९६०च्या दशकामध्ये मॅग्नेटिक टेपचा ध्वनिमुद्रणासाठी सर्रास वापर होऊ लागला आणि पुढच्या दोन दशकांमध्ये हळूहळू तंत्रज्ञान बदलू लागलं. ४–ट्रॅक स्टिरियोफोनिक ध्वनिमुद्रण, हाय–फिडेलिटी साउंड, तबकड्यांच्या जागी कॅसेट्सचा वाढता वापर यांनी ध्वनिमुद्रणाच्या पद्धतीमध्ये आणि वेगामध्येसुद्धा फरक पडू लागला. ४–ट्रॅकचे आठ ट्रॅक झाले आणि ध्वनिमुद्रण संस्कृतीत आता हा फरक दिसू लागला. खूप तालमी, गायक–वादकांनी एकत्र येऊन काम करणं, एकाच वेळी संपूर्ण गाणं ध्वनिमुद्रित होणं असे अनेक प्रकार लोप पावले आणि एक नवीन संस्कृती जन्माला आली. आपल्या सोयीनं गायक, वादक ध्वनिमुद्रणाला येऊ लागले. कित्येक वेळा एखाद्या युगुलगीतामध्ये गायक त्याचा भाग आधी गाऊन जाई आणि मग गायिका येऊन तिचा भाग ध्वनिमुद्रित करी, असं सर्रास होऊ लागलं. जुन्या संस्कृतीत वाढलेले कलाकार म्हणू लागले की, हे म्हणजे नवरा–नवरी हनीमूनसाठी वेगवेगळं जाण्यासारखी परिस्थिती होती!

साधारण याच काळामध्ये मी पहिल्यांदा एका ध्वनिमुद्रण स्टुडिओमध्ये पाय ठेवला आणि तिथल्या वातावरणात खेचला गेलो. झालेल्या बदलांबद्दल जुन्या लोकांमध्ये नाराजीचा सूर आणि नवीन लोकांमध्ये कुतूहल असं वातावरण असतानाच एक असा शब्द वारंवार कानी पडू लागला, ज्या शब्दामुळे गेल्या तीन दशकांमध्ये

**मी पहिल्यांदा एका ध्वनिमुद्रण स्टुडिओमध्ये पाय ठेवला आणि तिथल्या वातावरणात खेचला गेलो. झालेल्या बदलांबद्दल जुन्या लोकांमध्ये नाराजीचा सूर आणि नवीन लोकांमध्ये कुतूहल असं वातावरण असतानाच एक असा शब्द वारंवार कानी पडू लागला, ज्या शब्दामुळे गेल्या तीन दशकांमध्ये जितके बदल झाले नव्हते तितके पुढच्या पाच वर्षांत होणार होते. हा शब्द होता – 'डिजिटल!' या 'डिजिटल'ची त्सुनामी येऊ घातली होती नेमका त्याच वेळी मी या किनारपट्टीवर उभा होतो.**

जितके बदल झाले नव्हते तितके पुढच्या पाच वर्षांत होणार होते. हा शब्द होता – 'डिजिटल!' या 'डिजिटल'ची त्सुनामी येऊ घातली होती नेमका त्याच वेळी मी या किनारपट्टीवर उभा होतो.

आता 'डिजिटल' हा शब्द मी नेमका कुठे ऐकला हे मलाही आठवत नाही, पण माझं पहिलं ध्वनिमुद्रण मी ॲनालॉग पद्धतीनं मॅग्नेटिक टेपवर केल्याचं मला चांगलंच स्मरतंय. मॅग्नेटिक टेपवर एक 'हिस्स' आवाज यायचा. 'कालयवन' किंवा 'गोदो'प्रमाणे या 'डिजिटल' तंत्रज्ञानाच्या अनेक कथा आमच्या कानावर आल्या होत्या. 'डिजिटल' माध्यमामध्ये ही 'हिस्स' अजिबात ऐकू येत नाही. ध्वनिमुद्रण स्वच्छ आणि स्पष्ट होतं. टेप जाऊन आता सीडीचंच राज्य येणार अशा अनेक गोष्टी रोज कानावर यायच्या. पुढच्या पाच वर्षांमध्ये हे कालयवन आणि गोदो घरातलेच एक सदस्य होऊन गेले! ॲनालॉग तंत्रज्ञान जवळजवळ पूर्णतः लोप पावलं आणि डिजिटल तंत्रज्ञान स्वत:लाच मागे टाकत भरधाव पुढे जाऊ लागलं. पु.लं.चा सच्चा मुंबईकर जसा फोर्टमधल्या ब्रिटिशांनी बांधलेल्या इमारती पाहून हळहळतो आणि 'साहेबा'ची त्याला मनापासून आठवण येते, तसेच काही बुजुर्ग गायक–वादक नवीन तंत्रज्ञानामधल्या 'हिस्स'च्या उणिवेपायी हळहळू लागले. काही कलाकारांनी हा संस्कृतीमधला बदल न सहन होऊन या क्षेत्रापासून संन्यास घेतला. काहीजण नव्याला दोष देत, नाकं मुरडत काम करत राहिले. तर काहींनी हा बदल हसतमुखानं कबूल करत या नवीन ध्वनिमुद्रण योजनेत आपलं बस्तान बसवलं.

आता मी विचार केला की वाटतं, मी अशा एका वळणावर या क्षेत्रात पाऊल ठेवलं की, मला दोन्हीकडची विश्वं पाहायला, अनुभवायला मिळाली. एका विश्वाची पूर्ण माहिती झाल्यावर, पण त्यामध्ये रेंगाळण्या–रमण्याआधीच मी दुसऱ्या विश्वात खेचला गेलो, हे तसं माझ्या पथ्यावरच पडलं. कक्षा रुंदावल्या, आभाळ मोकळं झालं, पण मुळं जमिनीत कुठवर रुतलीयेत याचीही कल्पना आली. डिजिटल टेपच्या जागी संगणकाच्या हार्ड–डिस्क आल्या, ८ ट्रॅकचे २५६ ट्रॅक झाले. पूर्वीच्या भल्यामोठ्या, वजनदार, बोजड मॅग्नेटिक टेपची जागा खिशात मावणाऱ्या पेन ड्राइव्हनं घेतली; हा बदलही बघितला, पण हे सगळं नसतानासुद्धा अप्रतिम संगीत होतंच होतं आणि तंत्रज्ञान हे साध्य नसून साधन आहे, याचंही भान केवळ या वळणावर या क्षेत्रात पाऊल ठेवल्यामुळे मला राहिलं, असा मला आतून विश्वास आहे.

**बदलता कालखंड**

'अयोध्येचा राजा' या पहिल्या बोलपटापासूनच मराठी चित्रपट संगीताला आपलं असं स्थान मिळालं. 'अयोध्येचा राजा'मधलं संगीत नाट्यसंगीताच्या जवळ जाणारं होतं. पण केशवराव भोळे, दादा चांदेकर, वसंत देसाई, मास्तर कृष्णराव यांनी सिनेसंगीताला आपली अशी एक ओळख दिली. एकीकडे जी.एन. जोशी, जे. एल. रानडे, गजाननराव वाटवे यांनी भावगीत लोकप्रिय केलं. 'सांगत्ये ऐका'पासून चित्रपटांमध्ये लावण्यांच्या रूपानं लोकसंगीतानं आपला मुक्त वावर सुरू केला. सुधीर फडके यांनी 'भावगीत', तर राम कदम यांनी 'लावणी' हे गीतप्रकार मराठी चित्रपटसंगीतामध्ये खऱ्या अर्थाने रुजवले. जोडीला आनंदघन, वसंत पवार, वसंत प्रभू, दत्ता डावजेकर यांच्यासारखे संगीतकार उत्तमोत्तम रचना सादर करत होते. ग.दि. माडगूळकर आणि जगदीश खेबूडकरांबरोबर शान्ताबाई शेळके यांनी चित्रपटगीतांना आपल्या शब्दसंपत्तीनं श्रीमंत केलं.

सुरुवातीच्या काळामध्ये हिंदी आणि मराठी चित्रपटांच्या निर्मितीमूल्यांमध्ये फार 'ऑब्वियस' असा फरक नव्हता. पण माझ्या लहानपणापर्यंत या दोन भाषांतील निर्मितीमूल्यांमध्ये फरक पडत गेला होता आणि ही दरी आता चांगलीच रुंद झाली होती.

निर्मितीमूल्य कमी झाल्याचा फटका जसा चित्रपट व्यवसायाला बसला, तसाच तो चित्रपटसंगीतालाही बसला. दादा कोंडके सोडले तर फार यशस्वी निर्माते मराठीत दिसायचं कमी होऊ लागलं. दादा कोंडकेंच्या चित्रपटांचं संगीत सुरुवातीला राम कदम आणि नंतर राम–लक्ष्मण यांनी दिलं. दादा कोंडकेंच्या चित्रपटामधली गाणी सवंगता आणि लोकप्रियतेची पुसटशी सीमारेषा ओलांडून हळूहळू अश्लीलतेकडे झुकू लागली आणि तिथपासूनच चित्रपटसंगीताला



**कक्षा रुंदावल्या, आभाळ मोकळं झालं, पण मुळं जमिनीत कुठवर रुतलीयेत याचीही कल्पना आली. डिजिटल टेपच्या जागी संगणकाच्या हार्ड–डिस्क आल्या, ८ ट्रॅकचे २५६ ट्रॅक झाले. पूर्वीच्या भल्यामोठ्या, वजनदार, बोजड मॅग्नेटिक टेपची जागा खिशात मावणाऱ्या पेन ड्राइव्हनं घेतली; हा बदलही बघितला, पण हे सगळं नसतानासुद्धा अप्रतिम संगीत होतंच होतं आणि तंत्रज्ञान हे साध्य नसून साधन आहे, याचंही भान केवळ या वळणावर या क्षेत्रात पाऊल ठेवल्यामुळे मला राहिलं, असा मला आतून विश्वास आहे.**



भास्कर चंदावरकर



हृदयनाथ मंगेशकर

अवकळा येण्यास सुरुवात झाली असं माझं संगीतकार म्हणून मत आहे. साहित्यिकांचा चित्रपट व्यवसायाशी संबंध सुटत गेला आणि एकाही गीतकाराला आपली छाप पाडता आली नाही. यात आशेचा किरण म्हणजे हृदयनाथ मंगेशकर, भास्कर चंदावरकर यांनी संगीत दिलेल्या काही चित्रपटांमधली गाणी हाच होता. 'जैत रे जैत', 'सिंहासन', 'सामना', 'उंबरठा' या जब्बार पटेलांच्या सर्व चित्रपटांमध्ये संगीत ही जमेची बाजू ठरली यात शंका नाही. आता एकीकडे हृदयनाथ मंगेशकर, भास्कर चंदावरकर आणि एकीकडे राम–लक्ष्मण तर मध्ये अनिल–अरुण आणि विश्वनाथ मोरे हे संगीतकार चित्रपटसंगीताच्या क्षितिजावर दिसू लागले होते. प्रथम अनिल–अरुण या जोडगोळीने आणि मग अरुण पौडवाल आणि अनिल मोहिले यांनी स्वतंत्रपणे मराठी चित्रपटसंगीताला चालू हिंदी चित्रपटसंगीताचा बाज बहाल केला.

या काळानंतर मराठी चित्रपटांमध्ये विनोदी चित्रपट, तसंच कौटुंबिक मेलोड्रामांची लाट आली आणि चित्रपटांचा दर्जा पार ढासळला. याची झळ चित्रपटसंगीताला बसल्याशिवाय राहणार नाही, हे उघडच होतं. तरी या काळामध्ये आनंद मोडक, अरुण पौडवाल आणि नंतर अशोक पत्की हे संगीतकार चांगल्या रचना चित्रपटांद्वारे देत होते.

रेडिओमुळे मात्र अनेक संगीतकार लोकांसमोर आले आणि त्यांनी भावगीताची परंपरा पुढे नेली. यशवंत देव, दशरथ पुजारी, श्रीनिवास खळे, कमलाकर भागवत, प्रभाकर पंडित यांच्यासारखे संगीतकार मंगेश पाडगांवकर, रमेश अणावकर, शंकर वैद्य यांच्या रचना चित्रपट या माध्यमाशिवाय केवळ श्राव्य मार्गानं रसिकांसमोर पोचवण्यात यशस्वी होत होते. १९७२ साली टीव्ही मुंबईत आणि मग लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात आला आणि रेडिओ नावाचं एक महत्त्वाचं दालन भावसंगीतासाठी एक प्रभावी माध्यम म्हणून जवळजवळ संपुष्टात आलं.

१९७२ पासूनचा काळ हा फक्त मराठी भावसंगीताचाच नाही तर हिंदी सिनेसंगीताचासुद्धा ग्राफ खाली आणणारा ठरला. नवं मराठी भावसंगीत या कठीण काळामध्ये व्हेंटिलेटरवर जगवण्याचं काम काही प्रमाणात दूरदर्शननं 'शब्दांच्या पलिकडले'सारख्या कार्यक्रमांतून केलं. मला श्रीधर फडके, केदार पंडित यांनी सादर केलेले 'शब्दांच्या पलिकडले'चे काही अप्रतिम कार्यक्रम आठवताहेत.

तोपर्यंत मराठी श्रोतृवर्गाला 'नॉस्टॅल्जिया' नावाच्या एका आजारानं ग्रासलं होतं! (नॉस्टॅल्जियावर होमियोपथीमध्ये उपचार आहे, असंही मी ऐकलं आहे!) आता या आजाराची गंमत अशी आहे, की यामुळे बरंच वाटतं, आणि याचे सगळे दुष्परिणाम हळूहळू पुढच्या पिढ्यांमधे दिसू लागतात! जुन्या गाण्यांचे कार्यक्रम या काळात फोफावले. मराठी ऑर्केस्ट्रांना तोबा गर्दी होऊ लागली. मंतरलेल्या 'चैत्रबनात', 'स्मरणयात्रा', 'मेंदीच्या पानावर' यांसारख्या जुन्या गाण्यांवर आधारित कार्यक्रमांनी अवघं मराठी संगीतविश्व व्यापून टाकलं. या कार्यक्रमांचा दर्जा उत्तम असायचा, सुमार असायचा किंवा यामध्ये कुठेही असला तरी यांच्यामध्ये एक गोष्ट समान असायची – हे सगळे कार्यक्रम 'नॉस्टॅल्जिया' निर्माण करणारे होते. गजाननराव वाटवेंनीसुद्धा भावगीतांचे कार्यक्रम तुडुंब गर्दीसमोर केले आहेत हे आम्ही ऐकून होतो, पण एक विसरून चालणार नाही की, वाटवे यांनी आपली नवनिर्मिती लोकांसमोर ठेवली होती. ते जुन्या गाण्यांचे कार्यक्रम करत राहिले नाहीत. नवनिर्मिती करण्यासाठी जसा कलाकार उत्तम असावा लागतो, तसंच ती पचवण्यासाठी श्रोताही प्रगल्भ असावा लागतो.

मधल्या काळात मराठी भावसंगीतामधले मैलाचे दगड ठरले अशा दोन ध्वनिमुद्रिका होत्या. यात पहिली श्रीधर फडके यांची 'ऋतु

**१९७२ पासूनचा काळ हा फक्त मराठी भावसंगीताचाच नाही तर हिंदी सिनेसंगीताचासुद्धा ग्राफ खाली आणणारा ठरला. नवं मराठी भावसंगीत या कठीण काळामध्ये व्हेंटिलेटरवर जगवण्याचं काम काही प्रमाणात दूरदर्शननं 'शब्दांच्या पलिकडले'सारख्या कार्यक्रमांतून केलं. मला श्रीधर फडके, केदार पंडित यांनी सादर केलेले 'शब्दांच्या पलिकडले'चे काही अप्रतिम कार्यक्रम आठवताहेत.**

हिरवा' आणि दुसरी मिलिंद इंगळे यांची 'गारवा'. श्रीधर फडके यांची 'ऋतु हिरवा' ही अनेक कारणांसाठी अद्वितीय अशी ध्वनिमुद्रिका ठरली. बाबूजींचे सुपुत्र आणि आशा भोसले या कॉम्बिनेशनलाच दाद द्यावी अशी ही संगीतकार-गायिकेची जोडी होती. यात शान्ताबाई शेळके, बा. भ. बोरकर यांच्यासारख्या बुजुर्ग कवींच्या लेखणीतून आलेली गीतं तर होतीच, शिवाय जोडीला सौमित्र आणि नितीन आखवे यांच्यासारखे नव्या दमाचे गीतकारही होते. 'माझिया मना, जरा थांब ना... तुझे धावणे अन् मला वेदना' किंवा 'फुलले रे क्षण माझे...' या शब्दांना ओल्या मातीचा वास होता, आणि चाली भावगीतांच्या परंपरेतल्या असूनही श्रीधर फडकेंचं सांगीतिक व्यक्तिमत्त्व सुधीर फडकेंपेक्षा वेगळं होतं हे या ध्वनिमुद्रिकेनं सिद्ध केलं.

त्यानंतर काही वर्षांच्या शांततेनंतर प्रकाशित झालेली मिलिंद इंगळे यांची 'गारवा' ही ध्वनिमुद्रिका लोकप्रियतेच्या झोतात आली. 'गारवा' हा अल्बम गीत आणि संगीताच्या बाबतीत अजिबातच पोक्त नव्हता. या अल्बमनं मराठी भावसंगीताला एक तरुण चेहरा दिला. सौमित्रच्या गीतांप्रमाणेच याला मिलिंद इंगळेचा मुलायम आणि तरल आवाजही कारणीभूत ठरला.

नवीन गाणी रुजायची असतील तर कुठल्यातरी एका माध्यमानं या गीतांना सातत्यानं लोकांच्या नजरेसमोर ठेवण्याची गरज असते. पूर्वी ते काम रेडिओ करत असे. पण तेही दालन नव्या संगीतासाठी जवळजवळ बंद झाल्यामुळे, नवीन संगीतकारांची कोंडी झाली. अनेक गुणी संगीतकारांनी केलेलं उत्कृष्ट काम त्यामुळे मोठ्या प्रमाणात रसिकांसमोर येऊ शकलं नाही. उदाहरणार्थ, भास्कर चंदावरकर, आनंद मोडक, किंवा देवदत्त साबळे हे उत्तम आणि प्रयोगशील संगीतकार असून देखील म्हणावी तशी समाजानं त्यांची दखल घेतली नाही. देवदत्त साबळे यांची दहा गाणी सांगा असं म्हटलं तर कुणालाही चटकन आठवणं शक्य नाही, हे दुर्दैवी आहे. नुसतेच संगीतकार नव्हे तर अतिशय गुणी गायकही या काळाचे बळी ठरले. रवींद्र साठे यांची सांगीतिक कारकीर्द साधारण माझ्या जन्मापासूनच सुरू आहे, पण रवींद्र साठे







यांच्यासारख्या लोकप्रिय कलाकाराचीसुद्धा आपल्याला चुटकीसरशी २० गाणी आठवणंही अतिशय कठीण आहे. तीन तपं चाललेल्या कारकिर्दीसाठी २० गाणी – ही आकडेमोडच एकूण मराठी संगीताची दुरवस्था आपल्याला सांगून जाते.

पण नॉस्टॅल्जियानं ग्रासलेल्या या काळातच काही संगीतकार आपली वाट शोधू पाहत होते. काळ बदलला होता... बदलतही होता... बदलत्या काळाचं प्रतिबिंब आपल्या कलेत उतरावं, आपल्या व्यवस्थेमधले बदल कलेमधून जाणून घ्यावेत, या विचारांनी प्रेरित होऊन अनेक संगीतकार, गायक, गीतकार जमेल तसं आणि जमेल त्या व्यासपीठावरून या बदलत्या काळाचा ठाव घेत होते.

**बदलत्या पिढीचं बदलतं संगीत**

तंत्रज्ञान जसं झपाट्यानं बदलत गेलं, तसं मराठी संगीतामध्येसुद्धा गेल्या दहा वर्षांमध्ये आमूलाग्र बदल झाले. 'ऋतु हिरवा'पर्यंत प्रामुख्यानं भावगीत हे गजाननराव वाटवे, सुधीर फडके यांनी तयार केलेल्या मार्गावरच चालत राहिलं. क्वचितप्रसंगी हिंदी सिनेसंगीत आणि लोकसंगीताच्या प्रभावाखाली येऊन याच मार्गातून एखादी पायवाट तयार व्हायची, पण ती पुन्हा या राजमार्गाला येऊन मिळायची. तसं 'ऋतु हिरवा'च्या आधी हृदयनाथ मंगेशकरांनी मराठी भावगीताच्या रचनेला पहिला धक्का दिला आणि वेस्टर्न संगीतातल्या हार्मनीचा आणि रागदारीवर आधारित सुगम संगीताचा अचूक समन्वय साधला. 'गारवा'पासून मराठी संगीतामध्ये एक 'कॉस्मोपॉलिटन' संस्कृती झळकू लागली. मग जसं जसं ध्वनिमुद्रण

**मधल्या काळात मराठी भावसंगीतामधले मैलाचे दगड ठरले अशा दोन ध्वनिमुद्रिका होत्या. यात पहिली श्रीधर फडके यांची 'ऋतु हिरवा' आणि दुसरी मिलिंद इंगळे यांची 'गारवा'. श्रीधर फडके यांची 'ऋतु हिरवा' ही अनेक कारणांसाठी अद्वितीय अशी ध्वनिमुद्रिका ठरली. बाबूजींचे सुपुत्र आणि आशा भोसले या कॉम्बिनेशनलाच दाद द्यावी अशी ही संगीतकार-गायिकेची जोडी होती. यात शान्ताबाई शेळके, बा. भ. बोरकर यांच्यासारख्या बुजुर्ग कवींच्या लेखणीतून आलेली गीतं तर होतीच, शिवाय जोडीला सौमित्र आणि नितीन आखवे यांच्यासारखे नव्या दमाचे गीतकारही होते.**



अजय-अतुल

संगणकावर होऊ लागलं आणि महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले, तसं मराठी संगीत - चालीच्या पातळीवर नसलं तरी संगीतनियोजनाच्या पातळीवर- अधिकाधिक 'ग्लोबल' होऊ लागलं. तंत्रज्ञान सगळ्यांना उपलब्ध होऊ लागलं आणि त्यामध्ये असलेल्या शक्यता संगीतकार पडताळून पाहू लागले. काही वेळा या शक्यता पडताळून पाहण्यातच ते इतके गर्क व्हायचे की, काही प्रमाणात चालीकडे आणि रचनेकडे त्यांचं जरा दुर्लक्ष तरी व्हायचं किंवा संगीताची रचना जास्तीतजास्त सोपी आणि ढोबळ करण्याकडे त्यांचा कल होऊ लागला.

**आता उजाडेल...**

१९९५ साली मी माझ्या रचनांचा 'अमृताचा वसा' हा कार्यक्रम करायचा ठरवलं, तेव्हा अनेक हितचिंतकांनी मला धोक्याचा इशारा दिला. संपूर्ण नवीन रचना आपला श्रोतृवर्ग स्वीकारणारच नाही असं आग्रहानं (आणि काहीजणांनी अभिमानानं!) मला ठासून सांगितलं. 'लोकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावं असं मला वाटत असेल तर मी दोन-तीन जुन्या गाण्यांमध्ये एखादं माझं गाणं घुसवावं' अशी कळकळीची सूचना या हितचिंतकांनी मला केली.

अर्थातच माझ्या हितचिंतकांचं म्हणणं फार मनावर न घेता, मी पुढे सरसावून हा कार्यक्रम केलाच. कारण जनतेची नसली तरी माझ्या रचना सादर करणं ही माझी गरज होती. माझ्या दृष्टीनं 'अमृताचा वसा' हा कार्यक्रम परंपरेशी ओळख करून घेण्याचा माझा आणि माझ्या काही मित्रांचा प्रामाणिक प्रयत्न होता. या कार्यक्रमात माझ्या आधीच्या पिढ्यांच्या कवींच्या रचना मी नव्यानं संगीतबद्ध केल्या होत्या. बालकवी ते बोरकर ते महानोर, भा. रा. तांबे ते कुसुमाग्रज ते शान्ताबाई शेळके, मर्ढेकर ते ग्रेस, केशवसुत ते विंदा करंदीकर, नारायण सुर्वे, गोविंदाग्रज ते प्र. के. अत्रे (केशवकुमार), पु. शि. रेगे ते इंदिरा संत ते आरती प्रभू, अशा अनेक बुजुर्ग कवींच्या कवितांना मी संगीत दिलं आणि या कार्यक्रमांतून सादर केलं. याची मूळ प्रेरणा फक्त 'काहीतरी नवीन' करणं हा उन्माद नव्हता, तर परंपरा आजच्या भाषेत समजून घेण्याचा एक डोळस प्रयत्न होता.

मायकल नोव्हॅक, या अमेरिकन तत्त्ववेत्त्यानं म्हटलंय- Tradition lives because young people come along, who catch its romance and add new glories to it. थोडं याच अर्थाचं भाष्य संगीतज्ञ आणि गायक विचारवंत, पं. सत्यशील देशपांडे यांनी 'कले'वर केलंय. ते म्हणतात- परंपरेचं पुनर्निर्माण म्हणजे कला! थोडक्यात परंपरा टिकायची असेल अथवा पुढे जायची असेल तर त्या परंपरेत काहीतरी नवीन होणं गरजेचं आहे. 'अमृताचा वसा' हा कार्यक्रम करताकरता लक्षात येऊ लागलं की, काही रसिकांचीसुद्धा आपल्यासारखीच गरज आहे. हे चेहरे कार्यक्रमांना वारंवार दिसू लागले आणि त्यांच्याबरोबर काही नवे चेहरेही दिसू लागले.

'अमृताचा वसा'च्या अगोदर मिलिंद जोशी या संगीतकारानं १९९३ साली 'कवितेचं गाणं' या कार्यक्रमातून अशाच नवीन रचना सादर केल्या होत्या. याच कार्यक्रमाने मिलिंदला स्वत:ची ओळख दिली. ही ओळख मिलिंद जुन्या गाण्यांचे कार्यक्रम करत राहिला असता तर खचितच मिळाली नसती.

पुण्यामध्ये राहुल रानडे, केदार पंडित यांसारखे माझ्या अगोदरपासून सातत्यानं काम करणारे काही संगीतकार होतेच. पण 'स्वप्नात आला राणीचा बाग' ही अप्रतिम बालगीतांची ध्वनिमुद्रिका श्रोत्यांपुढे आणून डॉ. सलील कुलकर्णी यानंही नव्याच्या शोधात असलेल्या रसिकांचं लक्ष वेधून घेतलं. पुण्यातल्याच संदीप खरेनं 'दिवस असे की' या ध्वनिमुद्रिकेमधून तरुणांच्या हृदयाचा ठाव घेतला. साध्या, तरन्नूमसारख्या चाली, पण आवाजात आर्तता असणाऱ्या संदीपचे शब्द तरुणांना भावले... आपलेसे वाटले. 'शुक्रतारा, मंदवारा' हे कितीही अप्रतिम असलं तरी - 'मन तळ्यात, मळ्यात' हे त्यांना आपल्या आयुष्याशी जास्त जवळून निगडित आहे असं वाटू लागलं. पुढे संदीप आणि सलीलनं एकत्र येऊन 'आयुष्यावर बोलू काही' हा कार्यक्रम सादर केला आणि मराठीमध्ये कित्येक वर्षं निद्रिस्त असलेल्या 'पॉप कल्चर'ला जागं केलं.

याच दरम्यान पुण्याचेच अजय-अतुल हे भाऊ मुंबईत आले आणि त्यांनी

**१९७२ पासूनचा काळ हा फक्त मराठी भावसंगीताचाच नाही तर हिंदी सिनेसंगीताचासुद्धा ग्राफ खाली आणणारा ठरला. नवं मराठी भावसंगीत या कठीण काळामध्ये व्हेंटिलेटरवर जगवण्याचं काम काही प्रमाणात दूरदर्शननं 'शब्दांच्या पलिकडले'सारख्या कार्यक्रमांतून केलं. मला श्रीधर फडके, केदार पंडित यांनी सादर केलेले 'शब्दांच्या पलिकडले'चे काही अप्रतिम कार्यक्रम आठवताहेत.**

चित्रपटनिर्मितीच्या ढासळलेल्या मूल्यांना न जुमानता मराठी संगीतामध्ये तरी चांगली निर्मितीमूल्यं वापरावी या एका ध्यासानं संगीतनिर्मिती केली आणि रसिकांच्या एकूण निर्मितीमूल्यांबद्दलच्या अपेक्षा उंचावून ठेवल्या. आता इतर सगळ्या संगीतकारांना तो स्तर गाठणं अपरिहार्य झालं. अजय-अतुल यांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पारंपरिक संगीताचा नव्या रूपात वापर. 'पाश्चिमात्य' म्हणजे 'आधुनिक' नव्हे हे सत्य अजय-अतुलना लवकरच समजलं आणि त्यांनी 'आधुनिक मराठी'चा एक बाज त्यांच्या संगीतामधून निर्माण केला.

चंद्रशेखर सानेकरच्या गझलांना चाली लावतालावता एक दिवस अचानक अवधूत गुप्तेला 'दाजिबा' आणि 'मधुबाला' सापडले आणि मराठी संगीताचा इतर जगाशी असलेल्या संबंधाचा तो त्याच्या संगीतातून शोध घेऊ लागला. खऱ्या अर्थानं 'रिमिक्स' या संगीतप्रकाराचा मराठीमध्ये अवधूतनं शोध घेतला असं मला वाटतं. 'आयुष्य हे कांदे-पोहे' हे गंभीर गीत अवधूतनं रॉक म्युझिकचा योग्य वापर करून वेगळ्याच तऱ्हेनं मांडलं, ही अवधूतची मराठीच्या बाहेरच्या जगाला कवेत घेण्याची अदा आहे असं मला वाटतं.

लोकप्रियतेच्या झोतात काय चाललं आहे ते आपल्याला दिसतंच, पण काही लोक शांतपणे नव्या गोष्टींचा शोध घेत प्रयोग करतच राहतात. यात एक ठळक नाव जे माझ्या डोळ्यांपुढे येतं ते मिथिलेश पाटणकर या संगीतकाराचं. वयाच्या तेराव्या वर्षी स्वतः संगीत दिलेल्या भावगीतांची पहिली ध्वनिमुद्रिका काढणारा मिथिलेश एक अष्टपैलू संगीतकार आहे. अनेक वाद्यं तो लीलया हाताळतो, काव्याची त्याला चांगली जाण आहे, अनेक वेगवेगळे प्रयोग तो आपल्या संगीताद्वारे करत असतो.

काही वर्षांपूर्वी मुंबईच्या दादर-माटुंगा कल्चरल सेंटरमध्ये पहिलं संगीतकार संमेलन भरवण्यात आलं त्यात फक्त मुंबईमधूनच जवळजवळ ५५ संगीतकार आले होते. मी तो आकडा पाहून थक्क झालो होतो. यात अनेक संगीतकारांनी उत्तम रचना सादर केल्या. नीलेश मोहरीर, मंदार आपटे, मनोज देसाई, विनय राजवाडे अशा अनेक संगीतकारांनी आपली छाप पाडली.

माझ्या या सगळ्या समकालीन संगीतकारांचं संगीत मी ऐकत असतो. कधी ते मला आवडतं, कधी आवडत नाही... कधी पटतं, कधी पटत नाही. हे चांगलं आहे – हे वाईट आहे, असं जुन्या पिढीच्या काही संगीतकारांइतकं सहज मतप्रदर्शन मी करू शकत नाही कारण हे सगळेच संगीतकार कार्यक्षम आहेत आणि संगीत ही कला चैतन्यमय आहे. यात खरा गुण हा 'सातत्य' आहे आणि तो काळच ठरवतो. पण या सगळ्या कलाकारांचं आणि त्यांच्या निर्मितीचं योग्य आणि न्याय्य मूल्यमापन वेळोवेळी होणं गरजेचं आहे. नेमकं हेच मूल्यमापन आमच्या आधीच्या पिढीच्या लोकांचं झालं नाही आणि म्हणून मराठी संगीत एक संस्कृती म्हणून आणि एक व्यवसाय म्हणून मागे पडला असं माझं स्पष्ट मत आहे.

**...म्हणजे प्रश्नच नाही!**

'तुम्ही संगीतामधले असाल तर' या वाक्यातला विनोद तुमच्या चटकन् लक्षात येईल. या वाक्यातला विनोद म्हणजे याची निरर्थकता आहे. निदान संगीतामध्ये...'म्हणजे प्रश्नच नाही!' हे तीन शब्द आपल्याला फार महाग पडलेत असं मला नेहमी वाटतं, नव्हे जाणवतं!

लताबाई ...म्हणजे प्रश्नच नाही!
बाबूजी ...म्हणजे प्रश्नच नाही!
श्रीनिवास खळे ...म्हणजे प्रश्नच नाही!
भीमसेनजी ...म्हणजे प्रश्नच नाही!

या 'प्रश्नच नाही!' सिंड्रोममुळे आपण चांगल्या कलाकारांचं योग्य मूल्यमापन आणि त्यांच्या कलाकृतींची न्याय्य समीक्षा करण्याचं नेहमीच टाळत आलो आहोत असं मला अतिशय प्रकर्षाने जाणवतं. यात अडचण अशी होते की सगळ्याच गायिका लता मंगेशकर होण्याचा प्रयत्न करतात, कारण लता मंगेशकर म्हणजे प्रश्नच नाही!! आणि योग्य, तटस्थपणे मूल्यमापन न केल्यामुळे लता मंगेशकर होताही येत नाही ही दुसरी शोकांतिका.

टीव्हीवरच्या अनेक रिॲलिटी शोंमध्ये परीक्षक 'लताबाईंनी ती हरकत कशी घेतली होती'... किंवा 'एकदा आशाताईंकडून हे गाणं ऐकल्यानंतर कुणाच्याच तोंडून ते आवडू शकत नाही, पण तुमच्यापरीनं तुम्ही ते छान गायलात!'



लता मंगेशकर

**'प्रश्नच नाही!' सिंड्रोममुळे आपण चांगल्या कलाकारांचं योग्य मूल्यमापन आणि त्यांच्या कलाकृतींची न्याय्य समीक्षा करण्याचं नेहमीच टाळत आलो आहोत असं मला अतिशय प्रकर्षाने जाणवतं. यात अडचण अशी होते की सगळ्याच गायिका लता मंगेशकर होण्याचा प्रयत्न करतात, कारण लता मंगेशकर म्हणजे प्रश्नच नाही!! आणि योग्य, तटस्थपणे मूल्यमापन न केल्यामुळे लता मंगेशकर होताही येत नाही ही दुसरी शोकांतिका.**

अशी वाक्यं स्पर्धकांना काहीशा बेजबाबदारपणे ऐकवलेली आपल्याला आढळतात. आणि अर्थात तिथेही जुन्या गाण्यांचा सुकाळ असतो हे नव्यानं सांगायला नकोच!

पण परिस्थिती बदलते आहे. कारण काळ बदलतो आहे. तरुण पिढीवर ताशेरे ओढताना ही तरुण पिढी आणि यांचं संगीत हवेत जन्माला आलं नाही, हे जर मागच्या पिढीच्या काही मातब्बर संगीतकारांनी ध्यानात ठेवलं तर आमच्यासारख्या नव्या कलाकारांना पोरकं वाटणार नाही. याच्या नेमके उलट अनुभवही येतात. यशवंत देव आणि पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या कलासक्त संगीतकारांनी अनेक तरुणांचं गाणं मुद्दाम ऐकून त्यांना प्रोत्साहन दिल्याचे अनेक दाखले आहेत. यामुळे उत्साह वाढतो आणि प्रतिकूल परिस्थितीत काम करण्यासाठी बळ मिळतं. मला आजची मराठी संगीताची परिस्थिती आशादायकच वाटते. नव्या संवेदनक्षमतेचे चित्रपट आता मराठीत पाहायला मिळत आहेत. ही संवेदनशीलता चित्रपटसंगीतामध्येही झिरपायला वेळ लागणार नाही, किंबहुना ती झिरपतेच आहे. लोक एकत्र येऊन काम करत आहेत. प्रत्येकाला आपापला ध्रुवतारा गवसतोय. काळ कठीण असला तरी मनोबल वाढलेलं आहे, उमेद वाढलेली आहे. तंत्रज्ञानावरही आता पुरेसं भाळून झालंय आणि आता संगीतकारांना नवी क्षितिजं दिसू लागलेली आहेत.

ही सगळी परिस्थिती इतकी चैतन्यमय आहे की, माझ्यासारख्या संगीतकाराला थोडं गोंधळल्यासारखं होणं साहजिक आहे. कारण वर म्हटल्याप्रमाणे या परिस्थितीबरोबर माझं भिंगही बदलतंय! कधीकधी वाटतं, आपण गोलगोल फिरून पुन्हा पुन्हा तिथेच येतोय की काय. पण नंतर जाणीव होते की, ज्या वाटेवर आपण आहोत ती गोलाकार नसून, गोल गोल फिरल्याचा भास झाला तरी उंची मात्र वाढतेय आणि जास्त जास्त क्षेत्रफळ आपल्या नजरेच्या टप्प्यात येत आहे.

सगळंच बदलतंय हे जिवंतपणाचं लक्षण आहे. त्यामुळे बदलतंय... म्हणजे प्रश्नच नाही!

**– कौशल श्री. इनामदार**

ksinamdar@gmail.com

**मला आजची मराठी संगीताची परिस्थिती आशादायकच वाटते. नव्या संवेदनक्षमतेचे चित्रपट आता मराठीत पाहायला मिळत आहेत. ही संवेदनशीलता चित्रपटसंगीतामध्येही झिरपायला वेळ लागणार नाही, किंबहुना ती झिरपतेच आहे. लोक एकत्र येऊन काम करत आहेत. प्रत्येकाला आपापला ध्रुवतारा गवसतोय.**

॥ग्रंथाली॥

## आनंदयात्री – मोहन गोरे




प्राक्तन आणि प्रयत्न हे द्वंद्व फार फार प्राचीन आहे; त्याचं रामायण असतं, तसंच महाभारतही असतं! कुठं वनवास तर कुठं लक्षागृह असतं. प्रारब्धाची पायवाट ज्याची त्याची असते. ती जशी पायवाट असते तशी ती वाटचालही असते. प्राक्तन असो की प्रारब्ध, प्रयत्नांचं प्रारूप प्रसन्न असेल तर जय–पराजयाची चिंताच नसते. चिंतामणी कितीही काल्पनिक असला तरी कायापालटात त्याचं व्यंजन पराकाष्ठानं सिद्ध करता येतं, या गोष्टीची ही वर्तमान कथा आहे. मोहन आणि संमोहन यांची ही जादू आहे!

कष्टातून कळसाकडं कसं जाता येतं, ते या कहाणीतून उलगडत जातं. आयुष्याचा आलेख अधोरेखित करणारं हे लेखन सहृदयतेनं सुगंधित झालेलं आहे. आयुष्यातली छोटी छोटी पर्व पर्वणीच्या पायथ्यापासून उंच शिखरापर्यंत नेऊन सोडतात. त्याचाही हा जागतिक नकाशा आहे. बारीक–सारीक गोष्टीतूनही मोठमोठ्या आकलनाची इंद्रधनुष्यं उभी राहतात. सूर्योदयाचं सोनं करून दाखवणारा हा संसार सर्वार्थानं समाधानी आहे. गरिबीपासून गौरवापर्यंतचा हा प्रवास कमालीचा करुणामय आणि कमालीचा कणखर आहे.

हे आत्मचरित्र नाही आणि आत्मकथनही नाही; आहे ते फक्त आत्मचिंतन! अडचणीतून आनंदाकडं घेऊन जाणाऱ्या संवेदनांचा हा दृष्टांत आहे!

**– फ.मुं. शिंदे**

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

# कवितेत लपलेली चाल

**सलील कुलकर्णी**

**श**ब्दांवर सुरांइतकंच माझं प्रेम आहे. गद्य असो किंवा पद्य, मला ते वाचायलाच खूप आवडतं. त्यामुळे कविता आधी वाचली जाते ती संगीतकार म्हणून नव्हे तर वाचक म्हणून. मग त्यातली एखादी कविता संगीतकार म्हणून भावते आणि त्याला स्वरांचा साज चढतो.

मुळात कविता वृत्तात असणं हा काही चाल लावण्याचा निकष नाही, असं मला वाटतं. म्हणजे वृत्तात असलेली प्रत्येक कविता ही चाल लावण्यासाठी असतेच असं नाही. कधीकधी मुक्तछंदालाही चाल लावावीशी वाटते. कारण त्यात तुम्हाला गोष्ट सापडते आणि वृत्ताच्या पलीकडेही सगळं सुंदर होऊन जातं.

'लहरती वाऱ्यांचे नि:श्वास
मिसळले त्यात कळीचे श्वास
हे श्वास कुणाचे?
माझे की तुझे?'

सुधीर मोघ्यांची ही कविता मुक्तछंद असूनही करावीशी वाटली ती यामुळेच!

काही कविता संगीताच्या खूप अलीकडच्याच असतात. त्या संगीतापर्यंत (Music) पोचतच नाहीत असंही असतं आणि काही इतक्या पलीकडच्या असतात ज्याला तुम्ही चाल लावून किंवा सुरांनी उगीच डायल्युट कराल असं वाटतं. त्याची धारच वेगळी असते.

कुसुमाग्रजांची एक कविता आहे – 'मातीवर चढणे एक नवा थर अंती' – ही कविता अप्रतिम मीटरमध्ये आहे.

'पाहून हसू ये तुमचे ताजमहाल
अन् गर्व किती तो काल काय जिंकाल?
शेकडो ताजही जिथे शोभले काल
ती प्रचंड नगरे आज आमुच्या पोटी
मातीवर चढणे...'

इतका मस्त साऊंड आहे याला, अनुप्रास आहे, सगळं आहे; तरी त्या कवीचा विचार इतका प्रभावी (strong) आहे की त्या कवितेला चाल लावून, सूर लावून मी तो 'पातळ' करेन असं मला वाटतं अनेकदा.

काही कविता अशा असतात की ज्यात वृत्त छान पाळलेलं असतं, पण ती कविता मला टू डायमेंनशनल वाटते. तिला खोली नसते – 'साऊंड'ची. अप्रतिम कविता असते; पण साऊंड शोधायला गेलो तर तो आहे का?

विंदांची एक कविता आहे –

'उंची न अपुली वाढते फारशी वाटून हेवा
श्रेय ज्याचे त्यास द्यावे एवढे लक्षात ठेवा'

ही एक अप्रतिम कविता आहे, मीटरमध्ये आहे, सगळं आहे. विंदा म्हटल्यावर 'मीटर' हा काही आपण बोलायचा विषय नव्हे. पण या कवितेला चाल लावण्यापेक्षा ती मला

**गद्य असो किंवा पद्य, मला ते वाचायलाच खूप आवडतं. त्यामुळे कविता आधी वाचली जाते ती संगीतकार म्हणून नव्हे तर वाचक म्हणून. मग त्यातली एखादी कविता संगीतकार म्हणून भावते आणि त्याला स्वरांचा साज चढतो.**



**दोन माणसं हात जोडून शेजारी उभी आहेत असं कविता आणि संगीत नसतं. त्या दोन व्यक्तींचा मिळून एक तिसराच माणूस होतो याला composition म्हणतात. म्हणजे one plus one two cannot be a song, one plus one; eleven is a song.**

वाचायलाच जास्त आवडेल. कारण तिच्यात गाण्याचा म्हणून जो 'साऊंड' आहे तो नाहीये. आता चालीत बसवायचीच म्हटली तर ती बसेलच; पण हा निकष (criteria) नसावा.

मग माझा क्रायटेरिया काय असतो किंवा असावा, तर जिथे कागदापलीकडे मला त्या कवितेत काहीतरी दिसतं – म्हणजे त्या कागदावरच्या अक्षरांपलीकडे काही गवसतं तिथे ती 'चाल' लावावी. ते काही कवितेचं Musical Translation नसतं.

मला आठवतंय, १९९९ साली माझा पहिला अल्बम 'तरीही वसंत फुलतो' प्रसिद्ध झाला होता. सुधीर मोघ्यांच्या कविता होत्या. त्या अल्बमचं प्रकाशन झालं होतं डॉ. लागूंच्या हस्ते. दोनच वाक्यं ते बोलले. ते म्हणाले होते की, अनेकदा मी गाणी ऐकतो तेव्हा त्या कवितेचा आणि सुरांचा संकर झालेला असतो; पण या मुलाचा प्रयत्न संगम करण्याचा दिसतोय. कारण त्याला कविता कळलेली दिसतेय.

दोन माणसं हात जोडून शेजारी उभी आहेत असं कविता आणि संगीत नसतं. त्या दोन व्यक्तींचा मिळून एक तिसराच माणूस होतो याला composition म्हणतात. म्हणजे one plus one two cannot be a song, one plus one; eleven is a song.

मी जी काही सातशे-साडेसातशे गाणी केली आहेत- बालगीतांपासून चित्रपटांच्या गाण्यांपर्यंत – जी मला पाठ आहेत. याचं कारण असं आहे I have such a strong affair with those poems in that particular period की, त्यातली मी कंपोझ न केलेली कडवीही मला पाठ असतातच. आणि तसं असायला हवं. कारण




तुम्ही नुसतं एक process म्हणून चाल लावलेली नसते. तुम्ही त्या कवितेच्या इतके जास्त प्रेमात असता की तुम्ही त्या कवितेला घेऊन नाचत असता. त्यावेळी सतत तुमच्यासोबत ती कविता असते. तुम्ही एकदा compose केलं की तुमची नाळ तुटते नि मग ते गाणं लोकांचं होतं. मात्र मधल्या काळात तुम्ही त्या कवितेच्या इतके सोबत असता की ती पाठ व्हायलाच हवी असं मला तरी वाटतं.

बालकविता या अनेकदा वृत्तातल्या असतात, छंदातल्या असतात; पण त्यांच्यात तिसरी मिती सापडत नाही. तिसरी मिती जोपर्यंत सापडत नाही तोपर्यंत त्याला चाल लावून काही मजा येईल असं मला वाटत नाही. किंवा आपण तिला पुढे नेतोय असं वाटत नाही; पण असं सारखं वाटतं की, आपण तिच्या शेजारी जाऊन उभं राहतो आणि संख्या वाढवतो फक्त – एकाचे दोन करतो – कविता आणि संगीत! तसं न होता ते एक नवीन प्रॉडक्ट झालं पाहिजे – दोघांचं मिळून. अगदी त्या कवीलाही वाटलं पाहिजे, 'माझी ही कविता तू अगदी वेगळीच केलीस.' मग कदाचित असं होऊ शकतं की, ते ९५% वेळा उत्तम वाटेल. किंवा काहीवेळा असंही होऊ शकतं की तो म्हणेल मी हे इंटरप्रीटच केलं नव्हतं. पण तरीही त्याच्यात बदल झालेला असेल हे नक्की.

मग संगीतकाराचं जे contribution असेल ते त्याचं नुसतं Musical Translation होऊ नये. म्हणजे 'दूर तो पास मी..' यात नुसतं चालीत 'दूऽऽऽऽर तोऽऽऽ ' करून उपयोग नाही, ते शब्दातून मला दिसतंच आहे. पण ते स्वरातून काही वेगळं दिसेल का हे शोधता आलं पाहिजे. म्हणजे माझं असं म्हणणं आहे, की कागदापलीकडची अक्षरं दिसायला हवीत. प्रत्येक स्वरात त्या अक्षराचा आकार असतो. म्हणजे 'तव नयनांचे दल हलले गं..' यातला जो 'गं' आहे तो कागदावर एवढासाच आहे; पण चालीत त्या 'गं'मध्ये सगळी मजा आहे. आणि तो 'गं' तेवढा सापडला म्हणून ती मजा आहे. पुस्तकात दिसतांना एकच 'गं' दिसतो; पण त्या 'गं'ची खोली, त्याचा नाद आणि ज्या डोळ्यांकरता तो म्हटलाय असे डोळे, हे सगळं तुमच्या डोळ्यांसमोर येतं तेव्हा तुम्हाला 'तव नयनांचे...' आवडतं किंवा

‘अजून उजाडत नाही गं
दशकांमागून सरली दशके
अन् शतकांच्या गाथा गं
ना वाटांचा मोह सुटेना
अन् मोहाच्या वाटा गं’

यात ‘अजून’ मधला ‘जू’ कागदावर दीर्घ आहे पण तो अतिदीर्घ ‘जू’ असायला हवा हे कधी कळतं, तर जेव्हा त्या कागदाच्या पलीकडे तो ‘अजून’मधला काळ दिसायला लागतो. त्या ‘अजून’मध्ये काही दिवस, काही महिने, काही वर्षं नाहीत; तर काही युगं आहेत.

आता ‘अग्गोबाई ढग्गोबाई’ हा एवढाच साऊंड आहे, पण यातला ‘ई’ अतिदीर्घ होतो आणि तो मुलांच्या सायकॉलॉजीशी संबंधित आहे. मग ते ‘आईऽऽऽऽऽ’ , 'दाऽऽऽऽदाऽऽ' अशी हाक मारणं असो – तो ‘साऊंड’!! मुलांना तो ‘साऊंड’ सगळ्यात आधी पकडतो; कविता नाही!

‘बालगीत’ हा माझ्या आस्थेचा आणि अभ्यासाचा विषय आहे. केतकी माटेगावकर साडेतीन वर्षांची होती तेव्हा तिनं माझं एक गाणं गायलं होतं.

‘अबबबब बबबब केवढा फणस आई
आजोबांचं पोटसुद्धा एवढं मोठ्ठं नाही’

तिला मज्जा त्या ‘अबबबब..’ म्हणण्यात आली होती! त्या वयाची मुलगी गाताना जेव्हा enjoy करते तेव्हा त्या वयाची मुलं ऐकताना enjoy करणारच!! त्यामुळे तो ‘साऊंड’ सापडणं आवश्यक आहे.

कवितेच्या जास्तीत जास्त पोटात शिरता आलं पाहिजे संगीतकाराला. माझ्या तत्त्वाच्या चौकटीत किंवा माझ्या फॅन्टसीमध्ये मी त्या कवितेला बसवण्यापेक्षा कवितेच्या घरात मला किती फिरता येईल, कवितेचा किती कानाकोपरा बघता येईल मला, नुसतं translation न करता त्याचे अर्थ शोधून काढून effectively त्या कवितेला कसं नटवता येईल हे सगळं शोधता आलं पाहिजे. तसं झालं तर वेगळंच काहीतरी एक दिसून जातं. 'अरे! असं नव्हतंच वाटलं मला, असं कधी त्यात असेल असं!’ हे जाणवायला हवं.

भावगीत, नाट्यगीत किंवा कुठल्याही प्रकारात त्या अक्षरांच्या अकार, इकार, उकारासोबत सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ‘पॉझेस’! कवितेत चाल लपलेली असते. ती शोधण्यासाठी नुसती कविता कळूनही चालत नाही, तर ती भाषाही कळायला लागते. अनेकदा चालीतून स्वल्पविराम, उद्‌गारचिन्हं, प्रश्नचिन्हंही दाखवावी लागतात. ते गाणं ऐकायलाही मजा येते आणि करायलाही! –

‘पाऊस, पाणी, प्रकाश, वारा, पक्षी, सागर, सरिता
परमेशाच्या प्राणामधल्या जिवंत साऱ्या कविता’
–

यातले स्वल्पविराम चालीत येतात ते त्या पॉझेसमधून!

कुठल्या कवितेत ताल आहे किंवा कुठल्या कवितेला तालाची गरज नाहीए हे सुद्धा जाणवणं महत्त्वाचं आहे. मी केलेलं आर्या आंबेकरच्या अल्बममधलं एक गाणं आहे –

‘सजण दारी उभा काय आता करू
घर कधी आवरू, मज कधी सावरू’

हे मला तालात बसवावंसंच वाटलं नाही कारण ती नायिका इतकी विचारांच्या धुंदीत आहे की, तालात बसवलं असतं तर ते बाळबोध झालं असतं. कधीकधी ताल एखादं गाणं बाळबोधही करतो, तर कधी त्यात अडकवतो. अरुणाताई ढेरेंशी मी हे बोललो. त्या म्हणाल्या, ‘बरोबर आहे. तुझा विचार योग्य दिशेने चाललाय.’ आपण ज्याची प्रचंड भक्ती करतो (irrespective of everything) अशी व्यक्ती जर म्हणत असेल की, ‘तू मला भेट’; पण अपेक्षाच नसते की ती भेटेल आणि अचानक जर खरंच त्या व्यक्तीचा निरोप आला की मी भेटते किंवा भेटतो, तर काय लगबग होईल? माझी तयारी असेल आध्यात्मिक, वैचारिक, की त्या व्यक्तीच्या डोळ्यांत डोळे घालून मी बोलू शकेन? एवढी



**कवितेच्या जास्तीत जास्त पोटात शिरता आलं पाहिजे संगीतकाराला. माझ्या तत्त्वाच्या चौकटीत किंवा माझ्या फॅन्टसीमध्ये मी त्या कवितेला बसवण्यापेक्षा कवितेच्या घरात मला किती फिरता येईल, कवितेचा किती कानाकोपरा बघता येईल मला, नुसतं translation न करता त्याचे अर्थ शोधून काढून effectively त्या कवितेला कसं नटवता येईल हे सगळं शोधता आलं पाहिजे.**



**मला नेहमी वाटतं, प्रत्येक कवितेचा तुम्ही जितका नि जसा विचार करता तसा इतर नाही करणार; पण तुम्ही त्यांच्या मनाच्या पाण्यात दगड मारताच, तरंग उमटतातच! त्यामुळे रेनकोटवरून पाणी जसं वाहून जातं तसं मात्र तुमचं गाणं नाही जाऊ शकत. ते रेंगाळतंच त्यांच्या मनात!**

माझी तयारी नसताना आता मी काय करू?

आता हे नुसतं प्रेमगीत नाही तर त्यामध्ये प्रचंड स्पिरिच्युअल थॉट प्रोसेस आहे. मला हे गाणं करताना दीदींच्या अल्बमच्या प्रोसेसच्या खूप जवळचं वाटलं. लहानपणी मी कायम म्हणायचो की माझं स्वप्न काय तर लता मंगेशकरांनी आपलं गाणं गावं. पण जेव्हा त्यांच्यासमोर रिहर्सलला बसलो तेव्हा मला कळलं की, खरंच ज्या व्यक्तीला मदनमोहन किंवा जयदेवसाहेब यांनी गाणी, चाली शिकवल्या त्या व्यक्तीच्या समोर बसून, डोळ्यांत डोळे घालून चाली शिकवण्याची माझी पात्रता आहे का? एक्झॅक्टली हाच विचार!! भेटणार तर आहोत पण भेटीची हुरहूर राहण्यातच खरी मजा आहे.

'आता विसाव्याचे क्षण'च्या प्रकाशनाला पं. हृदयनाथजी इतकं सुंदर बोलले – ''हा यातला 'आता' चाळीस वर्षांनी मला असा परत दिसला. चाळीस वर्षांपूर्वी हा 'आता' मला दिसला होता 'आता विश्वात्मके देवे'च्या वेळी. तो 'आता' कसाय तर मी आता सगळं पाहिलंय. ज्ञानेश्वरांनी सांगितलं, मी सगळ्यांची सुखदुःखं पाहिली, सगळ्या मानवी मनाचा विचार केला. आता जाताजाता मी सांगतोय 'आता विश्वात्मके देवे....'. हे शेवटचं आहे म्हणून तो 'आता' नि चाल भैरवीत झाली असावी. त्यानंतर तो 'ॲप्ट आता' आता मला सापडला तो यांच्या गाण्यात!''

मला नेहमी वाटतं, प्रत्येक कवितेचा तुम्ही जितका नि जसा विचार करता तसा इतर नाही करणार; पण तुम्ही त्यांच्या मनाच्या पाण्यात दगड मारताच, तरंग उमटतातच! त्यामुळे रेनकोटवरून पाणी जसं वाहून जातं तसं मात्र तुमचं गाणं नाही जाऊ शकत. ते रेंगाळतंच त्यांच्या मनात!

Analytical चाल खूप वेळा कवितेला apt वाटते पण ती तुमचं रंजन नाही करत, तुम्हाला मजा नाही देत, तुम्ही enjoy करत नाही, परत ती ऐकावीशी वाटत नाही. म्हणजे ठरवून केलेलं भाषण आणि उत्स्फूर्त भाषण यात फरक असतो तसा. उत्स्फूर्त भाषण करणाऱ्यानंही अभ्यास केलेलाच असतो; पण त्या क्षणाला तो अभ्यासपूर्ण मुद्दे न मांडता विचार मांडतो. गाण्यातही मुद्दे मांडायला गेलं की गाणं बिनसतं. म्हणून मला नेहमी वाटतं Moment you start analyising you loose the fun in the composition. अभ्यासपूर्ण मनानं केलेल्या चाली या वर्कशॉपमधे बऱ्या वाटतात पण कार्यक्रमात रंगत नाहीत. मला नेहमी असं वाटतं की, कविता तुमच्या चालीतून रंगली पाहिजे. त्यासाठी त्या कवितेवर प्रेम करता यायला हवं. मुलांचे कसे लाड करतो, त्यांना नटवतो, सजवतो तसं त्या कवितेला नटवायला हवं. तिथे ॲनलिसीस करून नाही चालणार, तिथे फक्त तुमचं प्रेम असायला हवं. ते जे संगीतकाराचं कवितेवर कोसळणं आहे ते खूप आवश्यक असतं. कवितेत संध्याकाळ आहे म्हणून मी पुरिया किंवा मारवा वापरू का? दुपार आहे म्हणून चाल शुद्ध सारंग किंवा मधुकंसात करू का? हे ग्रामर कळणं आणि गाता येणं, चाली करणं यात प्रचंड फरक आहे. तुमच्या डोक्यातल्या चालीत तुम्ही कविता शोधत राहता तो फार डेंजरस प्रकार आहे.



## 'पद्मगंधा'ची दर्जेदार प्रकाशने

**उर्दू शायरीचा कोहिनूर मराठीत प्रथमच त्याच्या सर्व पैलूंसह**
गालिबच्या मूळ उर्दू गझला, शेर यांचा मराठी अर्थ
व त्यावरील आस्वादक आणि अभ्यासपूर्ण भाष्य.



### गालिबचे उर्दू काव्यविश्व
**अर्थ आणि भाष्य**
डॉ. अक्षयकुमार काळे
**मूळ किंमत** ₹ ५३० | **सवलतीत** ₹ ४२५

संगीताचार्य अल्लाउद्दिन खाँ यांची कन्या आणि शिष्या,
पं. रविशंकर यांची पहिली पत्नी, सूरवाद्य प्राणवंत करणाऱ्या
पहिल्या महिला कलाकार अन्नपूर्णा यांचेविषयीचे पहिले पुस्तक.

### अन्नपूर्णा
स्वपनकुमार बंद्योपाध्याय
अनुवाद : डॉ. अपर्णा झा




**मूळ किंमत** ₹ १७० | **सवलतीत** ₹ १३५

ध्वनिमुद्रिकांच्या एका संग्राहकाचे अनुभव
वादक, गायक, संगीतकार, तंत्रज्ञ आणि संग्राहकांच्या
प्रयत्नांना दाद देणारे पुस्तक



### ध्वनिमुद्रिकांच्या दुनियेत
जयंत राळेरासकर
**मूळ किंमत** ₹ १६० | **सवलतीत** ₹ १३०

अशा कलाकृती शतकात क्वचितच होतात
हिंदीमधील बहुचर्चित व लोकप्रिय अशा कवितासंग्रहाचा अनुवाद
राधा आणि कन्हैया ह्या प्रेमीयुगलांच्या बहुपेडी नात्याचा शोध

### कनुप्रिया
धर्मवीर भारती
अनुवाद : शरद 'रेशमेय'




**मूळ किंमत** ₹ ८० | **सवलतीत** ₹ ६५

लष्कर सेवेत जाणाऱ्यांसाठी मार्गदर्शक
लष्कर अधिकारी व सैनिक होण्याचे स्वप्न
पाहणाऱ्यांना दिशादर्शक.



### लष्करातील सेवासंधी
मेजर डॉ. शाम खरात
**मूळ किंमत** ₹ १७० | **सवलतीत** ₹ १३५

उग्रवाद्यांनी फुलपाखरांच्या अभ्यासकाचे अपहरण केल्यानंतर
जीवन आणि मृत्यू, अंधार आणि गूढता यामधल्या रहस्यमय
८१ दिवसांचे आत्मकथन.

### पोखिला
विलास बर्डेकर
शब्दांकन : अरविंद आपटे




**मूळ किंमत** ₹ २४० | **सवलतीत** ₹ १९०

**प्रामाणिक, सत्य आणि संपूर्णपणे विश्वासार्ह**
एका गेशाचे आत्मकथन

### गेशा ऑफ गिओन
मिनेको इवासाकी
अनुवाद : अनुराधा पुनर्वसु
**मूळ किंमत** ₹ २६० | **सवलतीत** ₹ २३०

गेशा ऑफ गिओन



**पद्मगंधा प्रकाशन**
१९६६, तारा-भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०
फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९१७६ E-mail : p.padmagandha@gmail.com

म्हणजे रूपकमध्ये एक फ्रेझ आहे तुमच्याकडे आणि मग तुम्ही पुस्तकं उलगडत जाता, रूपकमधलं गाणं मिळतंय का पाहू शोधता, त्यात कविता बसवता. एखाद्यावेळी ते चांगलं गाणं होईल; पण प्रत्येकवेळी होईलच असं नाही. त्यापेक्षा मग चालीवर चक्क लिहून घ्यावं कवीकडून, ज्याला साऊंडही कळतो नि कविताही उत्तम कळते.

'माझ्या कानी बाई वाजे अलगूज
सांगू जाता तुज गूज सांगताहे ...'

यात मला शब्द मिळाले 'बाई वाजे अलगूज'. पण मी चाल करताना केलं 'माझ्या कानी बाई, बाई वाजे अलगूज'. आता हा दुसरा 'बाई' शब्द कागदावर नाही, मग कुठून आला? त्या राधेचं भान हरपणं, वेडपिसं होणं, मैत्रिणीला ते सांगणं – यातून तो आलाय. तो चालीची गरज म्हणून आलेला नाही. त्या 'बाई' शब्दाच्या पुनरुक्तीमुळे त्या कवितेतला मूड अजून गडद झाला. 'सुखाने असा जीव कासावीस होतो'मधलं कासावीस होणं अधिक ठळक झालं. किंबहुना त्यासाठीच तो दुसरा 'बाई' शब्द आला.

'त्याची बाई मज सोडवेना ओढ' – यातला 'बाई' शब्द स्वरांनी इतका नटवलाय कारण तिचं ते गुंतणं, वेडं होणं, हा त्या शब्दांमधला जो ओलावा आहे तो चालीतून दिसला पाहिजे म्हणून ते नटवणं आहे.

आता ही सगळी उदाहरणं अशाच कवींची आहेत की, ज्यांच्या कवितेत साऊंडही असतो, नादही असतो. मग अनेकांना असं वाटतं की ठराविक कवींची कविताच संगीतकारांना का attract करते? त्याचं कारणच हे असतं की, तुम्हाला त्या कागदापलीकडची अक्षरं दिसतातच. तुम्हाला एकदा ती नजर आली की मग तुम्हाला त्यात फार शोधावं लागत नाही. बोरकर, ना.घ. देशपांडे, आरती प्रभू, महानोर यांच्या कवितेत कागदावर वेगवेगळं असं काही दिसत जातं, त्यात एक नाद असतो. कविता तुम्हाला सांगत असते, फक्त तुम्हाला खूप नीटपणे ते ऐकावं लागतं आणि म्हणून तेवढा वेळही द्यावा लागतो.

'चतुरंग'तर्फे माझा आणि संदीपचा सत्कार होता. खूप छान संकल्पना होती की, प्रा. राम शेवाळकरांनी संदीपला आणि पं. यशवंत देवांनी मला पत्र लिहिलं होतं. देवसरांनी फार छान लिहिलं होतं, 'तुझा प्रयत्न मला त्या कॅटेगिरीतला दिसतो जे लोक ठिपके काढून

**ठराविक कवींची कविताच संगीतकारांना का attract करते? त्याचं कारणच हे असतं की, तुम्हाला त्या कागदापलीकडची अक्षरं दिसतातच. तुम्हाला एकदा ती नजर आली की मग तुम्हाला त्यात फार शोधावं लागत नाही. बोरकर, ना.घ. देशपांडे, आरती प्रभू, महानोर यांच्या कवितेत कागदावर वेगवेगळं असं काही दिसत जातं, त्यात एक नाद असतो. कविता तुम्हाला सांगत असते, फक्त तुम्हाला खूप नीटपणे ते ऐकावं लागतं.**


ग्रंथाली

**कॅम्पफायर**

**वसंत वसंत लिमये**




**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

गेल्या चव्वेचाळीस वर्षांत सह्याद्री, हिमालय, युरोप आणि इतर अनेक ठिकाणी केलेल्या स्वच्छंद भटकंतीतील थरारक, रमणीय आणि चटका लावून जाणारे अनुभव... गिरीभ्रमण, गिर्यारोहण आणि लहान मुलांसाठी घेतलेली परिसर्ग शिक्षण शिबिरे, यांत भेटलेली अनेक माणसे... सामान्य भासणाऱ्या अनेक मोठ्या माणसांची महानता तर सामान्य माणसांत भेटलेले मोठेपण उलगडणारे अकल्पित क्षण... यावर विविध ठिकाणी प्रसिद्ध झालेल्या लेखांचे हे संकलन.

रांगोळी काढत नाहीत. तर ते रांगोळी फेकतात आणि खूप दिवसांनी मागे वळून पाहतात, त्याचं चित्र झालेलं असतं.'

माझे अनेक संगीतकार मित्र मला म्हणतात की, मला जरा चांगल्या कविता शोधून देशील का? चांगल्या कविता म्हणजे चाल लावण्यासाठी उत्तम कविता अशा नसतातच. तुम्हालाच त्या एक दिवस जाणवतात. तोवर त्या कवितेपर्यंत पोचण्याचा प्रवास किंवा शिक्षण सुरू असतं असं म्हणूया. आरती प्रभूंची एक कविता अनेक वर्षं मला पाठ आहे.

'कधी माझी कधी त्याची साऊली
रेंगाळे माझिया चोरट्या पाऊली'

पण मला कधीही त्यात काही दिसलं नाही. अनेक वर्षांनी मी तिथे पोचलो तेव्हा inspire झालो मी, मला ती जाणवली, मग मी ती केली. म्हणजे एखाद्या कवितेपर्यंत पोचण्याचं माझं वर्तुळ छोटं होतं. ते जसजसं मोठं होत होईल तशी मला कविता कळायला लागेल. आजूबाजूच्या चांगल्या कविता दिसायला लागतील. 'मित्रा' चित्रपटाला नॅशनल ॲवॉर्ड मिळालं. त्यात केलेलं गाणं आहे. संदीपनं लिहिल्यालिहिल्या दाखवलेली कविता मला कित्येक वर्षं पाठ आहे.

'उदासीत या कोणता रंग आहे
तुला ठाव नाही, मला ठाव आहे'

अगदी रवी जाधवसकट सगळ्यांचं म्हणणं आहे की, हे गाणं सिनेमात सुरू झालं की, एक प्रकारचा ताण सुरू होतो, इतकं ते गाणं का सगळ्यांना आवडतं? कारण खूप वर्षं ती कविता मी बाळगून होतो मनात. जसे आनंदाचे, प्रेमाचे, सुखाचे, दुःखाचे रंग असतात, तसे उदासीचेही असतात. पण ते कळायला आयुष्य तिथवर यावं लागलं. पण जेव्हा ती कविता कळली की, हा जो रंग आहे कवितेतला तो ना डिप्रेशनचा आहे, ना दुःखाचा; तो Helplessness चा आहे, अगतिकतेचा आहे, जी अगतिकता संपूर्ण चित्रपटात आहे. ही कविता चित्रपटात घ्यायचा काही विचार केला नव्हता. डेक्सटॉपवर रवीनं पाठवलेलं स्क्रिप्ट मी वाचलं. ते वाचून संपवलं आणि तानपुरा नाही, पेटी नाही; पाचव्या मिनिटाला रेकॉर्ड करून रवीला पाठवलं. आणि त्याचा मला फोन आला, 'खूप सुंदर आहे हे!' ती जी घुसमट मला त्या स्क्रिप्टमध्ये जाणवली त्याचं ते गाणं होतं. गुलजारसाहेबही म्हणाले, 'उदासीका रंग ये जो बात आपने कही और गायी हैं, बहुत सुंदर!'

जसा कवितेतला साऊंड शोधावा, कागदावर लिहिलेली आणि पलीकडची अक्षरं शोधावीत, तशी कवितेत न सांगितलेली गोष्ट शोधावी. सांगितलेली गोष्ट तर शोधायलाच पाहिजे; पण कवितेत न सांगितलेली गोष्ट आहे का, जी कवीच्या मनात असेल; जी त्यानं आपल्यावर सोडून दिली की बघा, शोधता येतेय का? ती शोधूया का? कवितेतली चित्रं शोधता येताहेत का?

'अताशा असे हे मला काय होते
कुण्या काळचे पाणी डोळ्यात येते'

माझ्या डोळ्यांसमोर नेहमी एक Black White visual असतं की नाना पाटेकर, सतीश पुळेकर किंवा नसिरूद्दीन शहासारखं कुणीतरी आहे. बाहेर नुसता पाऊस पडतोय आणि हा शून्यात पाहतोय. तो रडत नाहीये. डोळ्यांच्या काठाशी दिसतंय पाणी; पण दिसायलाच हवं असंही नाही. त्याला ज्या काही राहून गेलेल्या गोष्टी आहेत त्या आठवताहेत. 'यार ऐसा होना चाहिए था। अब तो वक़्त निकल गया..!' – ते 'कुण्या काळचे पाणी...' आता हे व्हिज्युअल डोळ्यांसमोर येईल तेव्हाच ते गाणं चांगलं होईल.

कवितेला चाल देताना कवितेत इतक्या वाटा शोधाव्या लागतात – अक्षरांच्या, साऊंडच्या, नादाच्या, अर्थाच्या, कवितेतली चित्रं, रंगसुद्धा! कुणी म्हटलंय आठवत नाही; पण 'मोगरा फुलला'मधला जो मोगरा आहे ना तितका पांढरा रंग कुणीच पाहिला नाहीये. तो फुललेला मोगरा फक्त ज्ञानेश्वरांनी पाहिलाय. आता कितीही कल्पना केली तरी तो पांढरा रंग आपल्या डोळ्यांसमोर येतच नाही. पण हे नुसतं कळणंसुद्धा मज्जा आहे! 'सजण दारी उभा...', 'माझ्या कानी बाई...' यात मला 'निळा' रंग दिसतो कृष्णाचा. बोरकरांची एक 'निळा' नावाची कविता आहे –

'मोरपिसाच्या डोळ्याचा एक मखमली निळा
इंद्रनिळातला गोड एक राजबिंडा निळा
विसावल्या सागराचा एक ओलसर निळा
आकाशाच्या घुमटाचा एक गोलसर निळा'

इतके 'निळे' आहेत; पण ते गाणं गाताना मला



**जसा कवितेतला साऊंड शोधावा, कागदावर लिहिलेली आणि पलीकडची अक्षरं शोधावीत, तशी कवितेत न सांगितलेली गोष्ट शोधावी. सांगितलेली गोष्ट तर शोधायलाच पाहिजे; पण कवितेत न सांगितलेली गोष्ट आहे का, जी कवीच्या मनात असेल; जी त्यानं आपल्यावर सोडून दिली की बघा, शोधता येतेय का? ती शोधूया का? कवितेतली चित्रं शोधता येताहेत का?**

**अरुणाताई ढेरे म्हणाल्या होत्या, ‘बाहेरून लोक दगड मारू शकतील तुला; पण तुझ्या मनाच्या आतल्या तळ्यात कोण दगड टाकणार? ते छान आहे. त्यासाठी कुणी certificate देण्याची गरज नाही.’ मी आवाहन करतो सगळ्यांनाच, की जे मूलभूत, क्लासिक गोष्टींना पकडून आहेत, त्यांनी ते पकडूनच ठेवावं. ते कुणी काढून घेणार नाही तुमच्याकडून. हा आनंद इतरांना न कळणारा आहे. त्या ग्रहावर फक्त तुम्ही आहात – so enjoy it! इतरांना तुम्ही त्या आनंदापर्यंत आणून ठेवू शकता; पण तो ज्याचा त्यालाच समजून घ्यावा लागतो!**

तो मोरपिसाच्या डोळ्याचा निळा रंगच दिसतो. मग ते –

देखावे ते डोळा दिसे बाई निळे
सोज्ज्वळे कोवळे वाचे वानिता नये
माझ्या मनी बाई वाजे अलगुज…’

‘दिसे बाई निळा’ म्हणताना कृष्णाच्या मोरपिसाचा निळा रंग चालीत येतोय का ते महत्त्वाचं! ते चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभं राहतं, तेव्हा ते इतरांसमोर राहतंच!

‘अग्गोबाई…’ गाताना ती एवढ्या गालांची एक नकटी मुलगी डोळ्यांसमोर यायलाच हवी. ‘दूर देशी गेला बाबा…’ इतकी वर्षं लोकांना आवडतंच आहे. ‘दूर..’ गायल्या गायल्या टाळ्यांचा कडकडाट होतो. मग ते जळगाव असो की सॅन होजे. का होतो? कारण माझ्या डोळ्यांसमोरचं व्हिज्युअल होतं की, मी आणि माझी बहीण वाट पाहतोय आईची. आता त्याची माझी इंटेन्सिटी जेव्हा गाण्यात शंभर टक्के असते तेव्हा लोकांपर्यंत ते जाणारच. पण ती असायला पाहिजे.

काही गाण्यांत आपण आपली गोष्ट शोधू शकतो, हेही त्या कवीचं, संगीतकाराचं यश आहे. कारण तसं त्यानं तुम्हाला सुचवलंय. तुमची भावना मांडायला प्लॅटफॉर्म दिलाय नि तो अलिप्त झालाय. हे त्या कवीचं किंवा संगीतकाराचं महत्त्व आहे आणि कसबही!

आणि म्हणूनच, कवितेसोबत आपण कवीचाही अभ्यास केला पाहिजे असं मला वाटतं. आरती प्रभूंच्या गाण्यातल्या ओळी आहेत–

‘अन् मीठपाणी काजळाच्या मागे
विझे माझा पीळ त्याचे झाले धागे
वाळू घातलेले माझे पांघरूण
कैसे ओढू त्याचे मावळले ऊन’

‘अन् मीठपाणी…’ कळेल; पण ’वाळू घातलेले माझे पांघरूण…’ कुठून आलं! ते कोकणातलं कुडाळजवळच्या घराचं अंगण, ती दोरी – त्याचं व्हिज्युअल काही कॉटवर माणूस पडलाय नुसतं पांघरूण ओढून हे नाही, तर ते ऊन, ती सावली माझ्या आयुष्याची आहे जी तुझ्या प्रत्येक गोष्टीवर अवलंबून आहे. हे अवलंबून असणं त्यांना दाखवायचंय. त्यामुळे तो माणूस कुठला यानं हा शोध सुरू राहतो. दुसऱ्याला समजावून सांगण्याआधी ते समजून घेण्याची स्वत:लाच एवढी मजा येते. ती सगळ्यात मोठी आहे.

आणखी एक म्हणजे कवीला सुचलेली एक चाल असते! तशी चाल संगीतकारही त्या गाण्याला देऊ शकणार नाही. कारण ती कवितेबरोबर आलेली चाल असते. संदीपची ‘दिवस असे की कोणी माझा नाही…’ यात कुठेही कोमल सूर नाही, मायनर कॉर्ड नाही. ‘तटस्थ, त्रयस्थ…’ – याची मजा वेगळीच आहे!

लोक कलाकाराकडून काय काढून घेऊ शकतील? मी सगळ्या कवी, संगीतकारांना प्रेमानं सांगू इच्छितो, की कसलंच प्रेशर घ्यायचं कारण नाही. लोक गाणी ऐकतील का? कार्यक्रमाला येतील का? आताच्या ट्रेंडमध्ये माझी गाणी चालतील का? कविता वाचतील का? या सगळ्यापेक्षा तुम्हाला ती कविता वाचताना किंवा चाल करताना मजा येतेय ना हे महत्त्वाचं. त्याला कुणीच हात लावू शकत नाही. Untouchable Joy आहे हा. जो देवानं तुम्हाला दिलाय. ही तुमची super speciality कुणीही हिरावून घेऊ शकत नाही. अरुणाताई ढेरे म्हणाल्या होत्या, ‘बाहेरून लोक दगड मारू शकतील तुला; पण तुझ्या मनाच्या आतल्या तळ्यात कोण दगड टाकणार? ते छान आहे. त्यासाठी कुणी certificate देण्याची गरज नाही.’ मी आवाहन करतो सगळ्यांनाच, की जे मूलभूत, क्लासिक गोष्टींना पकडून आहेत, त्यांनी ते पकडूनच ठेवावं. ते कुणी काढून घेणार नाही तुमच्याकडून. हा आनंद इतरांना न कळणारा आहे. त्या ग्रहावर फक्त तुम्ही आहात – so enjoy it! इतरांना तुम्ही त्या आनंदापर्यंत आणून ठेवू शकता; पण तो ज्याचा त्यालाच समजून घ्यावा लागतो!

तुम्ही कवितेत शोधाल त्या गोष्टी तुम्हाला सापडतील; पण तुम्ही सारखं चार पावलं पुढे जाऊन त्या कवितेच्या घराचा कानाकोपरा शोधताय का? कविता तुम्हाला खूप काही सांगतेय; तिच्या डोळ्यांत तुम्हाला खूप काही सापडेल…. बघायला हवं!

**– डॉ. सलील कुलकर्णी**
saleelk@gmail.com

# मराठमोळ्या गीतांना हिंदीचा साज

**विशाखा टिकले पंडित**

**अलिकडे मराठी गाण्यांमध्ये हिंदी शब्दांचा वापर जास्त प्रमाणात होताना दिसतोय. एकीकडे मराठी भाषेची समृद्धी जगासमोर मांडताना गाण्यांमध्ये मात्र हिंदीचा किंवा इंग्रजीचा वापर आवश्यक आहे का? समाजातील बदलांचा परिणाम संगीत सृष्टीवरदेखील पडतोय का? मराठी गाण्यांमधले हिंदी, इंग्रजी शब्द हे भाषेवरील अतिक्रमण आहे का? अशा अनेक प्रश्नांवर बोलतायत, या क्षेत्रातील नामवंत..**

मराठी सिनेसृष्टीत अलिकडे नवनवे प्रयोग केले जात आहेत, यातील काही हिट प्रयोगाचे ट्रेंड बनलेत. यापैकी एक म्हणजे मराठी गाण्यांमध्ये हिंदी शब्द किंवा संपूर्ण हिंदी गाणंच सिनेमात वापलं जाण्याचं प्रमाण वाढतंय. मराठी संगीताची परंपरा लक्षात घेता अगदी अलिकडच्या काळापर्यंत काही अपवाद वगळता मराठी सिनेमातील गाणी ही मराठमोळीच असायची. अलिकडे मात्र मराठी गाण्यांमध्ये हिंदी शब्दांचा वापर जास्त प्रमाणात होताना दिसतोय. एकीकडे मराठी भाषेची समृद्धी जगासमोर मांडताना गाण्यांमध्ये मात्र हिंदीचा किंवा इंग्रजीचा वापर आवश्यक आहे का? समाजातील बदलांचा परिणाम संगीत सृष्टीवरदेखील पडतोय का? मराठी गाण्यांमधले हिंदी, इंग्रजी शब्द हे भाषेवरील अतिक्रमण आहे का? अशा अनेक प्रश्नांवर बोलतायत, या क्षेत्रातील नामवंत...

**केदार शिंदे– दिग्दर्शक**

'अगबाई अरेच्चा' हा चित्रपट जेव्हा मी केला तेव्हा त्यात एक प्रसंग डान्सबारमधला होता. त्यावेळी डान्सबार मोठ्या प्रमाणावर होते, या डान्सबारमध्ये मराठी गाणी वाजवली जात नसत. त्याकाळात मराठी गाणी फारशी लोकप्रिय नव्हती. जुनी मराठी गाणी लोकांना प्रचंड आवडत होती पण मध्यंतरीच्या काळात मराठी गाण्यांची लोकप्रियता काहीशी कमी झाली होती. आता डान्सबारमध्ये गाणं शूट करायचं आहे आणि वास्तवात डान्सबारमध्ये मराठी गाणी वाजतच नव्हती तर मी माझ्या सिनेमात तरी ते कसं दाखवणार? माझ्या स्क्रिनप्लेची तशा मागणी होती म्हणून तिथं एक हिंदी गाणं असणं अपेक्षित होतं. त्यानुसार आम्ही 'चमचम करता है' हे गाणं केलं आणि ते खूप लोकप्रिय झालं. मराठी चित्रपटात हिंदी गाणं आणून कुठला ट्रेंड निर्माण करणं हा माझा हेतू मुळीच नव्हता पण त्यानंतर हा ट्रेंड झाला कारण आपल्याकडे फॉलो

**'जी भाषा आपण सध्या वापरतोय त्यात किती हिंदी इंग्रजी शब्द येतात, ते आपण अगदी सहज बोलून जातो, आपल्याला जाणवतही नाहीत इतके आपल्या तोंडात ते रुळलेत. त्यामुळे तसे शब्द गाण्यांमध्येही वापरले जातात. यात मुद्दाम मराठी न वापरता हिंदी वापरावी असं नसतं ते आजच्या भाषेला अनुरूप असावे म्हणून वापरले जातात.'**



केदार शिंदे



अमितराज



**आपण ज्यांच्यासाठी गाणी बनवतोय त्यांना ती आपलीशी वाटली पाहिजेत. ते रोज जी भाषा वापरतात त्या भाषेत जर गाणी ऐकायला मिळाली तर ती त्यांना आवडतात. त्यांच्यासाठी साऊंड महत्त्वाचा आहे. तो साऊंड जो त्यांना बॉलीवूडच्या गाण्यांमध्ये ऐकायला मिळतो, जो त्यांना प्रचंड आवडतो, तो त्यांना मराठीत मिळाला तर ते का नाही ऐकणार?**

केलं जातं. 'माहेरची साडी' हा चित्रपट हिट झाल्यावर त्या धर्तीवर नंतर अनेक सिनेमे आले. कोणतीही गोष्ट यशस्वी झाली की, लगेच त्याचं अनुकरण केलं जातं. मराठी सिनेमात हिंदी गाणं किंवा मराठी गाण्यांमध्ये हिंदी शब्द याचंपण काहीसं असंच झालंय.

मला अनेकदा विचारलं जातं की, तुमच्या गाण्यांमध्ये हिंदी शब्द का येतात? त्यावर माझं उत्तर असतं की, जी भाषा आपण सध्या वापरतोय त्यात किती हिंदी इंग्रजी शब्द येतात, ते आपण अगदी सहज बोलून जातो, आपल्याला जाणवतही नाहीत इतके आपल्या तोंडात ते रुळलेत. त्यामुळे तसे शब्द गाण्यांमध्येही वापरले जातात. यात मुद्दाम मराठी न वापरता हिंदी वापरावी असं नसतं ते आजच्या भाषेला अनुरूप असावे म्हणून वापरले जातात.

मराठी भाषा ही समृद्ध आहे, आपलं साहित्य दर्जेदार आहे या सगळ्या गोष्टी आम्हाला माहित आहेतच. पण माझ्या कथानकाची, त्यातल्या पात्रांची भाषा जर हिंदी मिश्रीत मराठी आहे तर माझ्या गाण्यांमध्ये तीच भाषा येणं अपेक्षित आहे. नाहीतर ते कानांना खटकू शकतं. आता माझी जी फिल्म आहे 'अगबाई.. २' त्यामधलं 'दिल मेरा' या गाण्याचं उदाहरण आपण घेऊ. यातली मुलगी कॉलेजमध्ये शिकणारी आहे. हे गाणं मराठी आहे पण यातली हुकलाईन आहे 'दिल मेरा दिल मेरा खाली खाली सुना सुना'. आता यात 'सुना सुना' हा मराठी शब्द आहे पण 'दिल मेरा खाली खाली' यासाठी मला अपेक्षित असलेला परिणाम साधणारे शब्द नाही मिळाले. इथं 'हृदय माझं रिकामं रिकामं' असे शब्द चांगले वाटले नसते. अशा वेळेला काही बंधनं आपोआपचं येतात आणि मग आपण दुसऱ्या भाषेतले शब्द वापरतो. पण याच चित्रपटातलं 'जगण्याचे भान हे' किंवा विठ्ठलाचं एक गाणं आहे त्यात कुठेही तुम्हाला हिंदी, इंग्रजी शब्द ऐकायला मिळणार नाहीत. माझ्या गाण्यांमध्ये इतर भाषेतले शब्द वापरण्यामागे फक्त आणि फक्त कथानकाची मागणी हेच एकमेव कारण असतं.

अनुकरण करणं वाईट नक्कीच नाही. कुठल्याही यशस्वी गोष्टींचा प्रभाव हा पडलाच पाहिजे, त्याचं अनुकरण करण्यात काहीच गैर नाही, पण ते अंधानुकरण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. एखादी गोष्ट यशस्वी झाली तरी ती का केली गेली, याची कारणंही समजून घेणं गरजेचं आहे. एखादा ट्रेंड फॉलो करताना डोळे बंद करुन तो फॉलो न करता त्यातही आपलं वेगळेपणं कसं जपता येईल, आपला विचार कसा मांडता येईल, याचा विचार केला पाहिजे.

**अमितराज–संगीतकार**

मराठी गाण्यांमध्ये हिंदी किंवा इंग्रजी शब्द हा नवीन ट्रेंड नाहीय; या आधीही अशी गाणी येत होती, फक्त त्याची संख्या कमी होती. आता ती संख्या वाढलीय. कोणतंही गाणं करताना त्यात हिंदी शब्द आलेच पाहिजेत हा अट्टहास नसतो. जिथं गरज असेल तिथंच असे शब्द वापरले जातात. सध्याची जर तरुण पिढीची भाषा तुम्ही पहाल तर यामागचं कारण तुमच्या सहज लक्षात येईल. त्यांच्या बोलण्यात बरेच हिंदी आणि इंग्रजी शब्द ऐकायला मिळतात. काही मराठी मुलांना आपआपसात हिंदीत बोलतानाही आपण ऐकतो. अर्थात मी कशाचंही समर्थन करत नाहीये पण ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे तरुणाईशी संबंधित किंवा त्यांना डोळ्यांसमोर ठेवून जेव्हा गाणी केली जातात तेव्हा त्यामध्ये हिंदी किंवा इंग्रजी शब्द वापरले जातात.

या सगळ्यात महत्त्वाचं असतं ते आपण ज्यांच्यासाठी गाणी बनवतोय त्यांना ती आपलीशी वाटली पाहिजेत. ते रोज जी भाषा वापरतात त्या भाषेत जर गाणी ऐकायला मिळाली तर ती त्यांना आवडतात. अशा पद्धतीची गाणी आल्यापासून तरुण वर्ग मराठी गाण्यांकडे वळू लागलाय. त्यांच्यासाठी साऊंड महत्त्वाचा आहे. तो साऊंड जो त्यांना बॉलीवूडच्या गाण्यांमध्ये ऐकायला मिळतो, जो त्यांना प्रचंड आवडतो, तो त्यांना मराठीत मिळाला तर ते का नाही ऐकणार?

सगळ्याच गाण्यांमध्ये हिंदी शब्द वापरले जात नाहीत. आपल्याकडची रोमॅन्टिक गाणी पाहिलीत तर ती पूर्णपणे मराठी शब्द असलेली ऐकायला मिळतील पण जिथं उडत्या चालीची किंवा खास तरुणाईसाठी गाणी केली जातात, त्यात तुम्हाला हिंदी शब्द जास्त ऐकायला मिळतील. गरज असेल तिथंचं दुसऱ्या भाषेतले

शब्द वापरले जावेत असा आमचाही आग्रह असतो. आता मी 'प्यारवाली लव्ह स्टोरी' हा चित्रपट केला. त्यात मी जी कव्वाली केलीय ती पूर्ण हिंदी होती, पण त्याचा अंतरा मराठी होता. इथं कथानकाची मागणी तशी होती. कारण यात सई ताम्हणकर ही नायिका मुस्लिम दाखवलीय. लग्नाचा प्रसंग आहे, तिथं कव्वाली सुरु आहे म्हणून त्यात हिंदी शब्द येणं स्वाभाविक आहे. कथानकाच्या मागणीनुसार असे शब्द येणं चुकीचं नाही. पण कथानकाची, प्रसंगाची मागणी नसताना असे शब्द गाण्यांमध्ये वापरणं चुकीचं आहे. आज अनेक अमराठी निर्माते मराठी सिनेसृष्टीत येतायत पण त्यांचाही कल हा पूर्णपणे मराठी गाण्यांकडे असतो. आवश्यकता नसेल तर उगाच इतर भाषेतले शब्द गाण्यामध्ये वापरणं मलाही वैयक्तिकरित्या पटत नाही.

**मंदार चोळकर–गीतकार**

कुठल्याही गाण्यामध्ये इतर भाषेतले शब्द आले आणि आपल्याला ते खटकले तर त्याचा दोष हा चटकन आपण गीतकाराला देऊन मोकळे होतो. त्याआधी गीतकार असं का करतो किंवा त्याला असं का करावं लागतं, हे समजून घेणं गरजेचं आहे. कुठलाही कवी किंवा गीतकार ठरवून दोन भाषांची मिसळ करून लिहीत असेल असं मला वाटत नाही. सध्याची आमची गीतकारांची पिढी तर निश्चितच साहित्याचे संस्कार जपणारी आहे. त्यामुळे गीतकार स्वेच्छेने अशी सरमिसळ करतात हे चुकीचं आहे.

कितीही नाही म्हटलं तरी संगीताची स्वतःची एक भाषा असते. वाद्यांचा स्वतःचा असा एक बाज असतो. त्यामुळे मराठी चित्रपटात जर पार्टी किंवा पबसाँग असेल तर सहाजिकच ड्रम, गिटार ही वाद्यं येणारच. मराठी गाण्यात हिंदी शब्द आले तर आक्षेप घेतला जातो, तर मग अशा पार्टी–पब गाण्यांमध्ये मृदुंग–झांजा का नाही वापरायला सांगत? तिथं वाद्यांच्या बाबतीत आग्रह धरत नाही. कारण ती त्या गाण्याची मागणी आहे असं जर तुम्ही मानता, तर हाच न्याय शब्दांना का नाही लागू पडतं? असे हिंदी, इंग्रजी शब्द ही तशाप्रकारच्या गाण्यांची गरज आहे हे समजून घेणं गरजेचं आहे.

मराठी ही समृद्ध आणि ओघवती भाषा




आहे. मराठी चित्रपटांना शब्दप्रधान भावगीतांची परंपरा आहे. जुन्या जमान्यातही जेव्हा 'नंबर सिक्स्टी फोर'सारखी प्रासंगिक गाणी तयार होतात तेव्हा भाषेचा लहेजा तर बदलला जातोच. अलिकडच्या काळात फक्त अशा सिच्युएशन वाढतायत इतकंच.

यातलं आणखी एक महत्वाचं कारण म्हणजे आधी चाल आणि त्यावर शब्द लिहिण्याची पद्धत. जर गाण्याची चाल मराठमोळी असेल तर त्यावर शब्द मराठीच येणार. अलिकडे 'गाना बजनाईच चाहिये' या अट्टहासापायी हिंदी धाटणीच्या चाली आधी पास करून घ्यायच्या आणि त्यावर गीतकाराला शब्द लिहायला सांगायचे, या प्रकारामुळे गाण्यांमधील शब्दांचं महत्व कमी होत चाललंय.

हिंदीत डब झालेल्या दाक्षिणात्य चित्रपटात जसे हिंदी शब्द हास्यास्पद आणि चालीत कोंबल्यासारखे वाटतात तसं मराठीचं होऊ नये म्हणून चालीला साजेसे हिंदी, इंग्रजी शब्द वापरले जातात. त्यामुळे चालीवर शब्द लिहीताना किमान त्या गाण्याला न्याय मिळावा म्हणून आम्ही असे शब्द वापरतो. कथानकाची आणि गाण्याची आवश्यकता नसेल तर मी असे शब्द वापरण्याच्या पूर्ण विरोधात आहे. यासाठी आधी शब्द मग चाल या पद्धतीने काम करण्याकडे माझा कल असतो.

**शब्दांकन – विशाखा टिकले पंडित**
भ्रमणध्वनी : ९८७०९९४०५१
vishakha.tikale@gmail.com

**संगीताची स्वतःची एक भाषा असते. वाद्यांचा स्वतःचा असा एक बाज असतो. त्यामुळे मराठी चित्रपटात जर पार्टी किंवा पबसाँग असेल तर सहाजिकच ड्रम, गिटार ही वाद्यं येणारच. मराठी गाण्यात हिंदी शब्द आले तर आक्षेप घेतला जातो, तर मग अशा पार्टी–पब गाण्यांमध्ये मृदुंग–झांजा का नाही वापरायला सांगत? तिथं वाद्यांच्या बाबतीत आग्रह धरत नाही. कारण ती त्या गाण्याची मागणी आहे असं जर तुम्ही मानता, तर हाच न्याय शब्दांना का नाही लागू पडतं? असे हिंदी, इंग्रजी शब्द ही तशाप्रकारच्या गाण्यांची गरज आहे हे समजून घेणं गरजेचं आहे.**



# तुझी माझी जोडी

**अश्विनी सहस्रबुद्धे**

**अजय–अतुल या जोडीच्या यशानंतर मराठीतही मोठ्या प्रमाणावर संगीतकार जोड्या काम करताना दिसत आहेत. दोघांना मिळून जेव्हा एकत्र काम करायच असतं तेव्हा ते जबाबदाऱ्या कशा वाटून घेतात? त्यांच्यात मतभेद होतात का आणि त्यातून सुवर्णमध्य कसा काढता? दोघांनी एकत्र काम करायला सुरुवात केल्यापासून ते आजवरचा प्रवास कसा झाला हे आम्ही या जोड्यांकडून जाणून घ्यायचा प्रयत्न केला.**

हुस्नलाल–भगतराम ही हिंदी चित्रपटसृष्टीतली पहिली संगीतकार जोडी मानली जाते. १९४०–५० च्या दशकात त्यांनी 'प्यार की जीत', 'बडी बहन', 'अफसाना' अशा अनेक हिट चित्रपटांना संगीत दिले होते. शंकर–जयकिशन या प्रसिद्ध संगीतकार जोडीमधील शंकर यांचे ते गुरू होते. यानंतर बॉलीवुडमध्ये शंकर–जयकिशन, कल्याणजी–आनंदजी, लक्ष्मीकांत–प्यारेलाल, जतीन–ललित, नदिम–श्रवण ते आताचे विशाल–शेखर, मीत ब्रदर्स अशा अनेक संगीतकार जोड्या झाल्या. मराठीत मात्र संगीतकार अनिल–अरुण, राम–लक्ष्मण वगळता अशा जोड्या अभावानेच झाल्या.

आता मात्र मराठी चित्रपट संगीतात आमूलाग्र बदल झाले आहेत. प्रोडक्शन व्हॅल्यूज आणि तांत्रिक गोष्टींमध्ये सुधारणा झाल्या आहेत. तरुण प्रेक्षकवर्ग मराठीकडे वळायला लागल्याने त्यांना आवडेल, रुचेल अशी गाणी मराठीत होत आहेत. रॉक, कन्टेम्पररी म्युझिक आपल्याकडे येतंय आणि प्रेक्षकांनाही ते आवडतं.

संगीतकार जोड्याही आहेत. अजय–अतुल या जोडीच्या यशानंतर मराठीतही मोठ्या प्रमाणावर संगीतकार जोड्या काम करताना दिसत आहेत. दोघांना मिळून जेव्हा एकत्र काम करायच असतं तेव्हा ते जबाबदाऱ्या कशा वाटून घेतात? त्यांच्यात मतभेद होतात का आणि झाल्यास त्यातून सुवर्णमध्य कसा काढता? जोडीने काम करण्याचे काय फायदे, तोटे आहेत? दोघांनी एकत्र काम करायला सुरुवात केल्यापासून ते आजवरचा प्रवास कसा झाला हे आम्ही या जोड्यांकडून जाणून घ्यायचा प्रयत्न केला.



चिनार–महेश

**चिनार–महेश (टाईमपास–टाईमपास २)**

आम्ही दोघंही ठाणेकर आहोत. ठाणा कॉलेजमध्ये असताना आम्ही एकमेकांना ओळखत नव्हतो. मी त्यावेळेस जरा बरा गातो म्हणून सगळे मित्र मला गायला लावायचे. महेश त्यावेळेस गिटार वाजवायचा. आमच्या एका कॉमन मित्राने आमची ओळख करून दिली. महेश तेव्हा डाय हार्ड रॉक फॅन होता. तो नेहमी इंग्रजी गाणी ऐकायचा आणि मी आपला मराठी, हिंदी गाणी ऐकायचो. त्यावेळेस लकी अलीचं 'ओ सनम' गाणं हिट होतं शिवाय ते गिटार बेस होतं. कॉलेजच्या एका फंक्शनला आम्ही ते गाणं सादर केलं होतं. त्यानंतर आमचे सूर जुळले. नंतर आम्ही दोघांनी मिळून एक गाणं कंपोझ केलं ते एका छोट्या स्टुडिओत रेकॉर्ड केलं. स्टुडिओचे भाडे ३५०० रुपये होते. तेही आम्ही मित्रांकडून वगैरे पैसे जमवून भरले. ते गाणं आम्ही मित्रांना ऐकवलं. सगळ्यानांच आवडलं, तेव्हा आम्हांला विश्वास वाटला की, आपण संगीत क्षेत्रात काहीतरी करू शकतो. मग आम्ही लोकल दुकानांच्या ॲडसपासून सुरुवात केली. महेश गिटार आणि मी किबोर्डवर चाली बनवायचो. त्या रेकॉर्ड करून दुकानदारांना ऐकवायचो. त्या लोकांना त्याचा काही गंध नसायचा. पण 'इसमे मजा नही आया' असं तो मालक म्हणाला की, परत त्यात व्हेरीएशन्स करून ऐकवायचो. मग आम्हांला एकांकिकांना संगीत देण्याचं काम मिळालं. विजू माने यांच्या 'भीती' या एकांकिकेचं म्युझिक आम्ही केलं. मग व्यावसायिक नाटकं केली. आतासारखी तेव्हा सॉफ्टवेअर्स नव्हती. नाटकाला संगीत घ्यायचं तरी २५–२५ दिवस लागायचे. मग 'अवंतिका', 'ऊन पाऊस', 'भाग्यविधाता' यासारख्या मालकांना म्युझिक दिलं. पूर्वी बीटा कॅसेट असायच्या. कधीही फोन आला की

बाईकवरून आम्ही एपिसोडची सीडी आणायला अंधेरीला जायचो. मग परत ठाण्याला येऊन पार्श्वसंगीताचं काम करून पुन्हा अंधेरीला पोचवायचो. ऊन-पाऊस वारा काहीही असेल तरी. 'स्टार प्रवाह' ही वाहिनी लाँच झाली तेव्हा तिचं टायटल आम्ही केलं. अनेक शोजचं टायटल केलं. मग जिंगल्स केल्या. २००४ मध्ये आम्ही पहिला चित्रपट केला. बरेच चित्रपट केले, काही गाजले; काही नाही. काहीतर रिलीजच नाही झाले. 'फुलपाखरू ऑन द रॉक' हा आमचा अल्बम होता. 'सागरिका'साठी काही अल्बम केले. मग विजू मानेचा 'शर्यत', रवी जाधवांचा 'बीपी', 'टाईमपास' अशा चित्रपटांनी आमची जोडी हिट व्हायला लागली.

एखादा प्रोजेक्ट आमच्याकडे आला की आम्ही जॅमअप करतो. महेशवर रॉक ब्रॅण्डचा खूप प्रभाव असल्याने आम्हाला ही सवय लागलीय. आम्ही दोघं दोन वेगवेगळ्या रुम्समध्ये बसून गाण्याबद्दल विचार करतो. पण आम्हांला बरेचदा थॉट सेम मिळतो. फारच कमी वेळा आमची मतं वेगवेगळी असतात. पण एकमत झाल्याशिवाय आम्ही ते कोणाला ऐकवत नाही. मग आम्ही ते तसंच ठेवतो. पुन्हा काही दिवसांनी ती परत ऐकतो. कारण एखादी चाल पहिल्याच फटक्यात आवडेलच असं नाही. पण सतत ऐकल्यावर ती आवडायला लागते. काहीवेळा याच्या उलटही होतं. मग आम्ही ती चाल स्क्रॅप करून टाकतो. तेवढा वेळ त्या त्या गोष्टीला द्यावाच लागतो. एखादं गाणं जर आम्ही एन्जॉय करू नाही शकलो तर ते आम्ही लॉक करत नाही. आजवर कधी असं झालं नाहीय की दिग्दर्शक किंवा निर्मात्याला आमचं काम आवडलेलं नाही.

दोघांनी एकत्र काम करण्याचे फायदे खूप आहेत. एकतर सेकंड ओपिनिअन लगेचच मिळतो, शिवाय क्रिएटिव्ह फिल्डमध्ये कधी कधी अशी वेळ येते की, तुम्हाला काहीच सुचत नाही किंवा एखादे ड्रास्टिक वेगळे चित्रपट करता तेव्हा एकमेकांची मतं खूप आवश्यक असतात. एखाद वेळेस जरी एखादी धून एखाद्याला आवडली नाही तरी जर दुसरा एकदम convinced असतो तेव्हा आम्ही अडून बसत नाही, तेवढी स्पेस आम्ही एकमेकांना देतो. आम्ही एकाच गाडीची दोन चाकं आहोत. ती जर स्मूथ चालली तर आमची गाडी व्यवस्थित चालेल. कधीतरी ट्रिकी सिच्युएशन्स येतात. जेव्हा आम्हांला जे वाटतं आणि निर्मात्याला जे हवं असतं त्यात तफावत असते. अशावेळेस सुवर्णमध्य काढायला एकमेकांची मदत होते.

सध्या आमच्याकडे अदित्य सरपोतदार, आशिष बेळकर ह्यांचे चित्रपट आहेत. 'विठ्ठलाशप्पथ' बरोबरच अजून एका चित्रपट आहे, त्याचं नाव अजून ठरलं नाही. हिंदीत काम करायचं आहे.



अविनाश-विश्वजित

**अविनाश-विश्वजित**

**(मुंबई-पुणे- मुंबई, प्रेमाची गोष्ट, इश्कवाला लव्ह)**

मी (विश्वजित) पुण्याच्या कॉलेजचा विद्यार्थी होतो. कॉलेजला असताना मी नाटकांमधून अभिनय करायचो. त्याचवेळेस एकांकिकांना वगैरे संगीत द्यायचो. नंतर हळूहळू जाहिरातींच्या जिंगल्स करायला लागलो. सलील कुलकर्णीसोबत त्याच्या अल्बमचा अरेंजर म्हणून काम केलं. माझेही अनेक अल्बम आले. त्यात अजय-अतुलने अरेंजर म्हणून काम केलं होतं. अविनाशही जॉब करत होता. त्याचीही अरेंजर म्हणून कामं सुरूच होती. एका अल्बमसाठी दोन गाणी मी, दोन गाणी अविनाशने अरेंज केलेली तेव्हा आमची ओळख झाली. मग मी मुंबईत शिफ्ट झालो. काही वर्षांनी अविनाशही मुंबईत आला. मग आम्ही चित्रपटाचं बॅकग्राउंड म्युझिक करायला सुरुवात केली. राजीव पाटील याचा 'टाईम बिईंग' हा आमचा पहिला चित्रपट. त्याच वेळेस सतीश राजवाडेबरोबर ओळख झाली. त्याच्या 'असंभव' वगैरे मालिका आम्हांला आवडल्या होत्या. 'वेग' या त्याच्या मालिकेसाठी आम्ही पार्श्वसंगीत दिलं. सतीशनेच आम्हांला 'एक डाव धोबी पछाड'साठी म्युझिक करायची संधी दिली. मग 'गैर' केला. 'मुंबई-पुणे-मुंबई'ने आम्हाला संगीतकार म्हणून प्रस्थापित केलं. त्यानंतर आम्ही 'प्रेमाची गोष्ट', 'गुरुपौर्णिमा', 'पोपट', 'कॅपेचिनो', 'इश्कवाला लव्ह' असे अनेक चित्रपट केले. 'इश्कवाला लव्ह'मध्ये आम्ही खूप वेगळ्या स्टाईलची कॉन्टेम्पररी बॅण्ड

**दोघांनी एकत्र काम करण्याचे फायदे खूप आहेत. एकतर सेकंड ओपिनिअन लगेचच मिळतो, शिवाय क्रिएटिव्ह फिल्डमध्ये कधी कधी अशी वेळ येते की, तुम्हाला काहीच सुचत नाही किंवा एखादे ड्रास्टिक वेगळे चित्रपट करता तेव्हा एकमेकांची मतं खूप आवश्यक असतात. एखाद वेळेस जरी एखादी धून एखाद्याला आवडली नाही तरी जर दुसरा एकदम convinced असतो तेव्हा आम्ही अडून बसत नाही, तेवढी स्पेस आम्ही एकमेकांना देतो. आम्ही एकाच गाडीची दोन चाकं आहोत. ती जर स्मूथ चालली तर आमची गाडी व्यवस्थित चालेल.**

**जोडीने काम करण्याचे आमच्या दृष्टीने तोटे अजिबातच नाहीयेत. उलट एकाने जर एखादी ट्यून बनवली तर ती कशी झालीय, appealing आहे की नाही यावर चटकन आणि frank मत मिळतं. एकमेकांच्या conviction वर आमचा पूर्ण विश्वास आहे.**

स्टाईलची गाणी केली.

जोडीने काम करण्याचे आमच्या दृष्टीने तोटे अजिबातच नाहीयेत. उलट एकाने जर एखादी ट्यून बनवली तर ती कशी झालीय, appealing आहे की नाही यावर चटकन आणि frank मत मिळतं. एखाद्या प्रोजेक्टच्या वेळेलाही एखाद्या गोष्टीवर दोघांपैकी कोणी एक देखील convince असेल, तर आम्ही पुढे जातो. कारण एकमेकांच्या conviction वर आमचा पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे कोणी स्वत:च्या म्हणण्यावर अडून बसत नाही. कधीकधी गाण्याच्या बाल्यावस्थेत आमच्यातला एकजण पूर्णत्वावर पोचू शकत नाही. अशा वेळी एकमेकांच्या confidence वर आम्ही confidence ठेवतो. अशावेळेस १००% अंडरस्टॅंडिंग असावं लागतं. जर अविनाशच्या conviction वर आम्ही पुढे गेलो तर त्यात माझ्या बाजूने मला जास्तीत जास्त काय योगदान देता येईल त्याचा मी विचार करतो. अविनाशचा



समीर-अजित

विचारही तोच असतो. आमच्यात स्पर्धा कधीच नसते. त्यामुळे क्रिएटिव्हिटीमध्ये आम्ही कमी पडत नाही. ढोबळमानाने कामाची विभागणी करायची झाल्यास Rhythem मी बघतो आणि melody setting अविनाश करतो.

सध्या आमच्याकडे 'मुंबई-पुणे-मुंबई २', जालिंदर कुंभार यांच्या 'रेडीमिक्स' आणि सचिन कुंडलकरचा एक चित्रपट आहे. अजूनही काही चित्रपटांबाबत बोलणी सुरू आहेत.

**अजित-समीर (दे धक्का, हुप्पा हुय्या)**

मी (अजित) संगीतकार वगैरे होईन असा कधी विचारच केला नव्हता. मला पार्श्वगायकच व्हायचं होतं आणि माझे सगळे प्रयत्नही त्याचदृष्टीने होते. महेश मांजरेकर माझा खूप चांगला मित्र होता, आहे. आम्ही दोघं एकत्र खूप क्रिकेट खेळायचो, त्याने मला त्याच्या 'देह' या चित्रपटासाठी पार्श्वसंगीत करण्याविषयी विचारलं. त्याच्या प्रोत्साहनामुळे मी तो प्रोजेक्ट केला. मग मी आणि हृषीकेश कामेरकरने मिळून अनेक चित्रपटांचं बॅंकग्राऊंड म्युझिक केलं. 'मातीच्या चुली', 'यंदा कर्तव्य आहे' अशा चित्रपटांची गाणी केली. पुढे हृषीकेशला हिंदीत जायचं होतं त्यामुळे त्याने मराठीतलं काम थांबवलं, त्यानंतर काही प्रोजेक्टस् मी एकट्याने केले.

मी आणि हृषीकेश काम करत असताना समीर म्हात्रे प्रोग्रॅमिंग करायचा. आमचे दोघांचही ट्युनिंग चांगलं होतं आणि मैत्रीही होती. मग 'दे धक्का'पासून आम्ही एकत्र संगीतकार जोडी म्हणून काम करायला सुरुवात केली. मग 'हुप्पा हुय्या' 'नऊ महिने नऊ दिवस' हे चित्रपट केले. लवकरच आमचा 'संदूक' चित्रपट प्रदर्शित होईल.

जेव्हा तुम्ही जोडी म्हणून काम करता तेव्हा तुमच्यात ट्युनिंग चांगल असणं हे अत्यावश्यक आहे. तरच तुमचं काम व्यवस्थित होईल. कारण व्यक्ती तितक्या प्रकृती. एखाद्या सिच्युएशनवर दोघांनाही सारखंच सुचेल असं नाही. मतभेद तर होतातच पण स्वत:च्या म्हणण्यावर आम्ही दोघेही अडून बसत नाही. आपलं म्हणणं दुसऱ्याला व्यवस्थितपणे पटवून देण्याचा प्रयत्न करतो पण अट्टहास नक्कीच नसतो. कधीकधी एखादी धून अशीच ऐकायला छान वाटते. पण त्या सिच्युएशनसाठी ती परफेक्ट नसते. हेही आम्ही समजून घेतो. एकाने एखादी चाल बांधली आणि दुसरा convince नसेल तर काही सुवर्णमध्य निघतोय का ते बघतो. कधीकधी एखादी धून पहिल्या फटक्यात नाही आवडत. पण ५-६ वेळा ऐकली की मजा येते. पार्टनरशिप असली तरी कामाची विभागणी अशी संगीताच्या बाबतीत कधीच करता येत नाही.

या जोड्यांव्यतिरिक्त संगीत- सिद्धार्थ हळदीपूर, श्रेयस-प्रीत (तिचा उंबरठा) आरिफ-ट्रॉय (क्लासमेट्स), सुमीत बेल्लारी-रोहित, सिद्धार्थ-सौमिल (स्वप्न तुझे माझे), बाबी-तुतुल (तुझी माझी लव्ह स्टोरी) अशा अनेक संगीतकार जोड्या मराठीत आहेत. अजय-अतुल तर बॉलीवूडमध्येही खूप मोठे प्रोजेक्टस् करत आहेत. तसेच इतरांनाही संधी लवकर मिळू देत.

**जेव्हा तुम्ही जोडी म्हणून काम करता तेव्हा तुमच्यात ट्युनिंग चांगल असणं हे अत्यावश्यक आहे. मतभेद तर होतातच पण स्वत:च्या म्हणण्यावर आम्ही दोघेही अडून बसत नाही. आपलं म्हणणं दुसऱ्याला व्यवस्थितपणे पटवून देण्याचा प्रयत्न करतो पण अट्टहास नक्कीच नसतो.**

**- अश्विनी सहस्रबुद्धे**
भ्रमणध्वनी : ९९८७०६३७६६
sahasrabuddhe.ashwini@gmail.com

**मिलिंद चंपानेरकर** यांच्या समर्थ अनुवादातून
सिद्ध झालेली 'रोहन'ची २ पुस्तकं...

रोहन प्रकाशन | घराला समृद्ध करणारी पुस्तकं




एका प्रतिभासंपन्न
अभिनेत्रीचा
चित्रपट व जीवनप्रवास
तिच्याच शब्दांत

लेखिका : **नसरीन मुन्नी कबीर** • अनुवाद : **मिलिंद चंपानेरकर**

पृष्ठं : २४५ छायाचित्रांसह • किंमत रु.२५०




**अबरार अल्वी** यांच्या कथनातून
गुरू दत्तच्या अनेक चित्रपटांच्या
निर्मितीप्रक्रियेचा सूक्ष्म वेध,
तसेच त्याच्या मृत्यूसह अनेक घटनांवर
नव्याने प्रकाश टाकणारं पुस्तक...

लेखक : **सत्या सरन** • अनुवाद : **मिलिंद चंपानेरकर**

पृष्ठं : २६०+८ पानं छायाचित्रं • किंमत रु.२५०

रोहन प्रकाशन

५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ३०
✆ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२

अधिक माहितीसाठी
आमच्या वेबसाईटला भेट द्या
**www.rohanprakashan.com**



# एक सिनेमा अनेक संगीतकार

**विशाखा टिकले**



पकंज पडघन

**म**राठी सिनेसृष्टीत एका सिनेमात एकापेक्षा जास्त संगीतकार हा प्रवाह हळूहळू दिसू लागलाय. खरंतर आजवर एका संगीतकाराने किंवा संगीतकार जोडीने चित्रपटातील सगळ्या गाण्यांची आणि अनेकवेळा पार्श्वसंगीताची जबाबदारीही यशस्वीपणे सांभाळलेली असताना एका सिनेमासाठी एकापेक्षा जास्त संगीतकारांची गरज आहे का? एका संगीतकाराच्या क्षमतेवर हा अविश्वास नाही का? अनेक संगीतकार घेण्यामागे दिग्दर्शनाचा कोणता विचार असतो? यामुळे संगीतकारांवर आणि एकंदरीत संगीतविश्वावर नेमका काय परिणाम होतो याविषयी आम्ही मतं जाणून घेतलीत या क्षेत्रातील नामवंतांकडून...

**पंकज पडघन-संगीतकार : टीमवर्कचं यश**

एक सिनेमात अनेक संगीतकार असा निर्णय मुख्यत्वे दोन गोष्टींसाठी घेतला जातो. एक कारण म्हणजे त्या कथानकाची गरज. कथानकाच्या मागणीनुसार दिग्दर्शक आपली टीम निवडतो, त्यामुळे एका सिनेमासाठी एकापेक्षा जास्त संगीतकार घेतले जाऊ शकतात. जेणेकरून दिग्दर्शकाला अपेक्षित असलेलं काम त्याला मिळू शकतं. यामागील दुसरं कारण म्हणजे व्यावहारिक दृष्टिकोन. ज्याप्रमाणे एखाद्या सिनेमात एकापेक्षा जास्त नामवंत कलाकार घेतले की त्या सिनेमाचा प्रेक्षकवर्ग वाढतो कारण प्रत्येक मोठ्या कलाकाराचा स्वतःचा असा एक चाहतावर्ग असतो. साहजिकच एकापेक्षा जास्त नामवंत कलाकार घेतले की त्यांचा चाहतावर्ग सिनेमाला गर्दी करतो. त्याचप्रमाणे संगीतकारांचाही एक चाहतावर्ग असतो, तो सगळा चाहतावर्ग त्या सिनेमाला मिळतो. यात निर्मात्याचा फायदा असतो. प्रेक्षकांमधल्या प्रत्येक वर्गाची आवडनिवड वेगळी असते. त्या त्या पद्धतीची निरनिराळी गाणी एकाच सिनेमात ऐकायला मिळत असल्याने या सगळ्या वर्गांना सिनेमाकडे खेचणं सोपं होतं. सिनेमाच्या प्रमोशनसाठी जेवढे नामवंत जास्त तेवढी त्याची प्रसिद्धी जास्त होते.

एका सिनेमात अनेक संगीतकार घेतल्याने सगळं वाईटच होतं असं नाही. पण मी म्हणेन की, त्या सिनेमाचा आत्मा मात्र हलतो. उदाहरणच द्यायचं झालं, तर एखादी घटना एकाच्या दृष्टिकोनातून किंवा एकाच्या तोंडून ऐकणं आणि तीच गोष्ट अनेकांच्या तोंडून ऐकणं यात फरक असतो. त्यात योग्य ताळमेळ साधता आला नाही तर त्या गोष्टीचा तेवढा प्रभाव पडत नाही. सिनेमाच्याबाबतीतही तसं होऊ शकतं. त्यामुळे मला असं वाटतं की, एका सिनेमाचं संगीत हे एकाच संगीतकाराने करणं योग्य आहे.

**एका सिनेमात अनेक संगीतकार घेतल्याने सगळं वाईटच होतं असं नाही. पण मी म्हणेन की, त्या सिनेमाचा आत्मा मात्र हलतो. उदाहरणच द्यायचं झालं, तर एखादी घटना एकाच्या दृष्टिकोनातून किंवा एकाच्या तोंडून ऐकणं आणि तीच गोष्ट अनेकांच्या तोंडून ऐकणं यात फरक असतो. त्यात योग्य ताळमेळ साधता आला नाही तर त्या गोष्टीचा तेवढा प्रभाव पडत नाही. सिनेमाच्याबाबतीतही तसं होऊ शकतं.**

फक्त संगीतकारच नाही तर या प्रवाहाचा संपूर्ण संगीतक्षेत्रावरच परिणाम होतो. समजा एखाद्या सिनेमात हिरो एखादं वाद्य वाजवणारा आहे असं दाखवायचं आहे. संपूर्ण सिनेमात तो गिटार वाजवतोय असं दाखवताना काही गाण्यांमध्येही ती गिटार वाजताना दाखवायची असल्यास खऱ्या गिटारवादकाला एकापेक्षा जास्त संगीतकारांकडे काम करावं लागतं. अशावेळी प्रत्येक संगीतकाराची काम करण्याची पद्धत निरनिराळी असते. काही जणांच्या कामाच्या पद्धती, विचार त्याला नाही पटले तरी काम करावं लागतंच, अशा वेळेला त्या कलाकाराला कामाचं समाधान मिळेलच असं नाही.

अर्थात याला काही निर्माते-दिग्दर्शक अपवाद आहेत, जे फक्त व्यावसायिक

गणितांसाठी अनेक संगीतकारांकडे गाणी सोपवत नाहीत, तर त्यामागे त्यांचा काहीतरी विचार असतो, त्या कथानकाची तशी मागणी असते. अशा एका दिग्दर्शकासोबत मी काम करतोय तो म्हणजे संजय जाधव. संजय जाधव हा असा दिग्दर्शक आहे, ज्याचा या निर्णयामागचा एक विचार होता. त्याच्या एखाद्या सिनेमासाठी मी आणि अमितराज असे दोन संगीतकार काम करतोय, तर आम्ही दोघे वेगवेगळ्या ठिकाणी गाणी बनवतो, पण गाणं बनल्यावर आम्ही एकत्र बसून ते ऐकतो. त्याच्यावर विचारविनिमय करतो. त्यामुळे दुसरा संगीतकार काय विचार करतो, आपलं काम कसं होतंय याचा अंदाज येतो. खेळीमेळीच्या, मैत्रीपूर्ण वातावरणात एकमेकांच्या कामांची माहिती घेत जर चार लोक एकत्र येऊन पुढे जात असतील तर काम चांगलं होणारच. पण एक संगीतकार काय करतो ते दुसऱ्याला माहीत नाही; आपल्या गाण्याव्यतिरिक्त सिनेमात काय घडतंयय याची संगीतकाराला माहिती नाही. बऱ्याचदा संगीतकाराला आपल्यासोबत दुसराही एक संगीतकार या सिनेमावर काम करतोय याची माहितीही नसते. कलाकार म्हणून अशा गोष्टी त्रासदायक असतात. त्यामुळे दिग्दर्शक आपल्या टीमकडून कसं काम करून घेतो त्यावर एका सिनेमात अनेक संगीतकार हा प्रवाह चांगला की वाईट हे अवलंबून असतं.

**संजय जाधव–दिग्दर्शक : विचार महत्त्वाचा...**

सिनेमा ही एक भव्य कलाकृती आहे. त्याच्या निर्मितीचं श्रेय हे कुण्या एकाचं नसतं तर सर्वांनी एकत्र मेहनत करून ती कलाकृती घडवलेली असते. ती घडवताना प्रत्येक गोष्टीमागे एक विचार असतो. उगाच कोणाला काही वाटलं आणि त्याने ते विचार न करता काहीतरी केलं असं होत नाही. 'दुनियादारी' या चित्रपटानंतर एका सिनेमात एकापेक्षा जास्त संगीतकार हा प्रवाह मराठीत यशस्वी म्हणून गणला गेला, यामागेही काही विचार होते. दुनियादारीचा विषय पडद्यावर मांडताना त्यात जी तीन गाणी करायची ठरली, त्या तिन्ही गाण्यांचा फ्लेवर वेगळा होता, जॉनर वेगळा होता. त्यामुळे एका संगीतकाराऐवजी तीन वेगवेगळ्या संगीतकारांकडून ही गाणी बनवून घ्यायचं ठरवलं. समीर साप्तीस्कर आणि सेबॅन्डचं काम पाहिलं होतं. त्यांचा 'ब्रेकअप के बाद' हा अल्बम हिट झाला होता, दुनियादारीमधलं 'जिंदगी जिंदगी' हे गाणं मला त्या पद्धतीचं हवं होतं म्हणून मी त्यांना हे गाणं करायला सांगितलं. तसंच केदार शिंदेच्या चित्रपटासाठी काम करताना मी पंकज पडघनचं काम पाहिलं होतं. तो मेलडी खूप छान करतो. त्यामुळे 'यारा यारा' हे गाणं मी पंकजकडून करून घ्यायचं ठरवलं. तो या सिनेमाचं बॅकग्राऊंड म्युझिक करत होता, त्या दरम्यान तो 'टिक टिक वाजते डोक्यात' हे गाणं घेऊन आमच्याकडे आला आणि त्याने ते गाणं केलं. अमितराजबरोबर मी '७२ मैल एक प्रवास' हा सिनेमा केला होता. त्याच्या गाण्यांची शैली पाहून मी त्याला 'देवा तुझ्या गाभाऱ्याला' हे गाणं करायला सांगितलं. या अशा तीन वेगवेगळ्या धाटणीच्या गाण्यांसाठी मी या तीन संगीतकारांची निवड केली. ही सगळी गाणी हिट झाली.

'फिल्म दिलसे करने की चीझ है', हे मी मानतो आणि त्यानुसार मी काम करतो. माझ्या मते ज्या संगीतकाराची जी स्ट्रेंग्थ आहे, त्यानुसार मी त्याच्याकडून ती गाणी करून घेतो. एखाद्याला असं वाटत असेल की माझ्याकडे असा संगीतकार आहे की जो सगळ्या प्रकारची गाणी उत्कृष्ट करू शकतो, त्याने अवश्य त्याच्याकडून काम करून घ्यावं. मी मात्र माझ्या कथानकाच्या गरजेनुसार माझ्या टीमकडून काय बेस्ट करून घेऊ शकतो ते पाहतो.

मी नेहमी म्हणतो की, सिनेमा हे एक टीमवर्क आहे, आणि त्यात प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. अगदी माझ्या स्पॉटबॉयलापण माहीत असतं की उद्या आपण कुठला सीन करणार आहोत आणि तो कसा करणार आहोत, त्यामुळे एकाऐवजी चार संगीतकारांसोबत जरी मी काम करत असेन तरी कुठलाही गोंधळ न उडता प्रत्येकजण चर्चा, सल्लामसलत करत काम करतात, या सहकाऱ्यांमध्ये कुठलाही इगो प्रॉब्लेम होऊ नये म्हणूनही काळजी घेणं गरजेचं असतं.

**कमलेश भडकमकर – संगीतकार आणि संगीत संयोजक : विचार आणि संवाद गरजेचा...**

एका सिनेमासाठी अनेक संगीतकार ही गोष्ट व्यक्तिशः मला योग्य वाटत नाही. कारण



संजय जाधव

**'दुनियादारी' या चित्रपटानंतर एका सिनेमात एकापेक्षा जास्त संगीतकार हा प्रवाह मराठीत यशस्वी म्हणून गणला गेला, यामागेही काही विचार होते. दुनियादारीचा विषय पडद्यावर मांडताना त्यात जी तीन गाणी करायची ठरली, त्या तिन्ही गाण्यांचा फ्लेवर वेगळा होता, जॉनर वेगळा होता. त्यामुळे एका संगीतकाराऐवजी तीन वेगवेगळ्या संगीतकारांकडून ही गाणी बनवून घ्यायचं ठरवलं.**



कमलेश भडकमकर

**एका सिनेमात एकापेक्षा जास्त संगीतकार याला मी ट्रेन्ड नाही म्हणणार. फारतर एक फॉरमॅट म्हणेन. हा फॉरमॅट वापरताना त्यामागे काही विचार असतील तरच कदाचित तो पुढेही चांगला चालू शकतो. पण एकाचा सिनेमा या फॉरमॅटमुळे गाजला म्हणून त्याचं अंधानुकरण होणार असेल, गरज नसताना फक्त चार चांगली नावं असावीत म्हणून चार संगीतकार संगीत देणार असतील तर सिनेमाच्या एकसंधतेबद्दल अनेक प्रश्नचिन्हं उभी राहतील.**

त्याने सिनेमाच्या एकसंधतेला बाधा येऊ शकते. सिनेमाचं संगीत ही तुकड्यातुकड्यात विखुरलेली गोष्ट नसावी तर ती एकसंध असावी. संगीतासारखी सिनेमातली अतिशय महत्त्वाची गोष्ट एका व्यक्तीच्या हातात असावी असं मला वाटतं. आपल्याकडे एकाहून एक दिग्गज संगीतकार होऊन गेलेत ज्यांनी एखाद्या सिनेमासाठी नुसती अनेक गाणीच केली नाहीत तर त्या सिनेमाच्या पार्श्वसंगीताची बाजूही तितकीच प्रभावीपणे सांभाळली. त्यामुळे संगीतकाराच्या क्षमतेवर विश्वास ठेवणं आवश्यक आहे. सुदैवाने आजही अनेक धाटणीची गाणी देण्याचं सामर्थ्य असलेले संगीतकार आपल्याकडे आहेत. जे रोमॅन्टिक गाण्यांपासून, भक्तीगीतांपासून पॉप म्युझिकपर्यंत सगळ्या पद्धतीची गाणी करू शकतात. एक गोष्ट असते की, प्रत्येकाची स्वतःची अशी स्ट्रेंग्थ असते, पण त्याच्याबाहेर ती व्यक्ती कामच करू शकत नाही असं नाही. पण दुर्दैवाने आपल्याकडे एखाद्या गोष्टीचा शिक्का बसला की त्या व्यक्तीकडे त्याच पद्धतीचं काम सोपवलं जातं. संगीतकार आणि गायकांच्या बाबतीतही तेच लागू होतं. एखाद्या संगीतकाराचं एक गाणं हिट झालं की त्याला त्याच पद्धतीची गाणी बनवायला सांगितलं जातं. त्याच्यापलीकडे जाऊन तो आणखी काय चांगलं देऊ शकतो याचा विचार फार कमी केला जातो. त्यामुळे एका सिनेमात वेगवेगळ्या संगीतकारांकडे वेगवेगळ्या धाटणीची गाणी सोपवली जातात.

आजही काही नावाजलेले संगीतकार वगळले तर कितीजणांना आपल्या मनासारखं काम करण्याची संधी दिली जाते? त्यांच्या विचारांना महत्त्व दिलं जातं? अगदी उदाहरणंच द्यायचं झालं तर हे गाणं ना... अमक्या अमक्या हिट गाण्यासारखं झालं पाहिजे, असं सांगितलं जातं. अरे ते गाणं हिट गाणं आहे हे मान्य आहे, पण त्याच्यासारखंच कशाला? त्या संगीतकाराला स्वतःची काही मते आहेत की नाही? त्याला ते त्याच्या पद्धतीने करू द्या ना. ते तुमच्या मनाप्रमाणे नाही झालं तर तो दुसरं करेल, पण काही करायच्या आधीच त्याच्यासमोर असे पर्याय ठेवले गेले तर त्याला अपेक्षित काम करता येईल का? त्यामुळे मी काम करत असलेल्या सिनेमात आणखी किती संगीतकार आहेत? त्यांच्याकडे किती गाणी आहेत? मला का एकच गाणं? असे प्रश्न त्यांना पडत असले तरी त्याकडे दुर्लक्ष करावं लागतं.

एका सिनेमात एकापेक्षा जास्त संगीतकार याला मी ट्रेन्ड नाही म्हणणार. फारतर एक फॉरमॅट म्हणेन. हा फॉरमॅट वापरताना त्यामागे काही विचार असतील तरच कदाचित तो पुढेही चांगला चालू शकतो. पण एकाचा सिनेमा या फॉरमॅटमुळे गाजला म्हणून त्याचं अंधानुकरण होणार असेल, गरज नसताना फक्त चार चांगली नावं असावीत म्हणून चार संगीतकार संगीत देणार असतील तर सिनेमाच्या एकसंधतेबद्दल अनेक प्रश्नचिन्हं उभी राहतील.

एका सिनेमात एकापेक्षा जास्त संगीतकार असूनही तो सिनेमा एकसंध वाटला पाहिजे यासाठी काही गोष्टी जाणीवपूर्वक कराव्यात असं मला वाटतं. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे दिग्दर्शक आणि संगीतकार यांच्यात संवाद असला पाहिजे. काही मोजक्या सिनेमांमध्ये सिनेमाच्या पूर्ण टीममध्ये म्हणजे अगदी निर्माता दिग्दर्शकापासून ते कलाकार, संगीतकार यांच्यामध्ये सुसंवाद असेल तर त्याचे रिझल्टस पडद्यावर दिसून येतातच. अशा कामांमुळे काहीतरी चांगलं करण्याचा हुरूप येतो. मराठी संगीताला चांगले दिवस आले आहेत, आर्थिक गणितं चांगली जमू लागल्याने संगीतकारांनाही नवीन प्रयोग करायला मिळतायत; त्याचप्रमाणे त्यांना चांगल्या टीमसोबत काम करता येतं.

यातली दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे एकापेक्षा जास्त संगीतकार असेल तर संगीत संयोजक किंवा म्युझिक प्रोग्रामर एक असला पाहिजे. प्रत्येक संगीतकाराने आपआपल्या पद्धतीने गाणी केली तरी सिनेमात ती गाणी वापरताना किंवा त्यातली एखादी थीम पार्श्वसंगीतातून संपूर्ण सिनेमात वापरायची असल्यास संगीत संयोजक, म्युझिक प्रोग्रामर हे खूप मोलाची जबाबदारी पार पाडू शकतात. त्यांच्या आपआपसातील योग्य संवादांमुळे ते संपूर्ण सिनेमाचा बॅलन्स उत्तम साधू शकतात.

कुठलीही गोष्ट बरी की वाईट या समीक्षेत शिरण्यापूर्वी त्याची कारणं समजून घेणं मला गरजेचं वाटतं. योग्य कारणांसह ती गोष्ट केली तर रिझल्ट हा नक्कीच चांगला मिळतो.

**शब्दांकन – विशाखा टिकले पंडित**
भ्रमणध्वनी : ९८७०९९४०५१
vishakha.tikale@gmail.com

# सूर राहू दे रे

**राधिका कुंटे**

**मराठी चित्रपट संगीतातल्या पंचप्राणांपैकी एक ठरलेत ते पार्श्वगायक! ‘श्वास’नंतर कात टाकलेल्या मराठी चित्रपट आणि संगीताच्या पार्श्वभूमीवर आजचं बदललेलं पार्श्वगायन, रियाज, गाण्याचे बोल, गाण्याची लोकप्रियता, दखलपात्र प्रयोग आणि येत्या दहा वर्षातल्या बदलांबद्दलचे अंदाज आदी मुद्यांवर हृषिकेश रानडे, डॉ. नेहा राजपाल, अनघा ढोमसे, रोहित राऊत नि आर्या आंबेकर यांच्याशी साधलेला हा संवाद.**



**आर्या आंबेकर**

आजच्या पार्श्वगायनातलं वेळेचं गणित बदललेलं आहे. पूर्वी ॲनालॉग रेकॉर्डिंग होतं. मोठी प्रोसेस असायची ती. तेव्हा एखाद्या चुकीमुळं पूर्ण गाणं पुन्हा गायला लागत होतं. ते शक्यतो टाळण्यासाठी भरपूर रिहर्सल्स करूनच रेकॉर्डिंग व्हायचं. आता गोष्टी खूपच सोयीच्या झाल्यात. सॉफ्टवेअर्सच्या मदतीनं चूक सुधारता येऊ शकते. पूर्वी एकत्र गाण्यामुळं येणाऱ्या इमोशन्स  आताशा येत नाहीत, कारण आता गाणं बऱ्याचदा एकेकटं गायलं जातंय, असा आक्षेपही काही वेळा घेतला जातो. इथं मुद्दा येतो तो वेळेचा. अनघा ढोमसे म्हणते की, ‘‘आर्टिस्ट रेकॉर्डिंगव्यतिरिक्त बऱ्याच गोष्टींत गुंतलाय. मग ते शोज असोत किंवा इंडिपेन्डण्ट म्युझिक. या गोष्टी आपल्या जीवनाचा अपरिहार्य भाग बनल्यात. तंत्रज्ञानातल्या या बदलांकडं सकारात्मक दृष्टीनं बघता येऊ शकतं. या जनरेशनची असल्यानं मी हे फील करतेय. एकत्र गायलं गेलं तर नक्कीच फरक पडेल. मी कुणाल गांजावालासोबत ड्युएट गायलं होतं. तेव्हा

**आता गाणं लोकप्रिय होण्यासाठी गुणवत्तेबरोबरच मार्केटिंगचीही जोड असणं आवश्यक झालंय. स्वतःचं यूट्यूब चॅनेल काढून त्यावर सेल्फीव्हिडिओ अपलोड करणं, सिंगल रिलीज करून ते म्युझिक चॅनेल, एफ.एम. रेडिओ किंवा फेसबुक, व्हॉट्सॲपसारख्या सोशल साईटवर अपलोड करण्याचं प्रमाण वाढतंय.**





अनघा ढोमसे

**तंत्रज्ञानातल्या या बदलांकडं सकारात्मक दृष्टीनं बघता येऊ शकतं. या जनरेशनची असल्यानं मी हे फील करतेय. एकत्र गायलं गेलं तर नक्कीच फरक पडेल. मी कुणाल गांजावालासोबत ड्युएट गायलं होतं. तेव्हा कुणाल गाऊन गेल्यानंतर मी गायले. नंतर ते गाणं ऐकल्यावर वाटलं की, यात आणखी एक्स्प्रेशन देता आलं असतं. काही वेळा अशा गाण्यांतलं गिव्ह अँण्ड टेक कुठंतरी लॅकिंग होत असावं. पूर्वीच्या रिहर्सल्स मला महत्त्वाच्या वाटतात. त्यात गाणं कुठंतरी मुरलं जायचं.**

कुणाल गाऊन गेल्यानंतर मी गायले. नंतर ते गाणं ऐकल्यावर वाटलं की, यात आणखी एक्स्प्रेशन देता आलं असतं. काही वेळा अशा गाण्यांतलं गिव्ह अँण्ड टेक कुठंतरी लॅकिंग होत असावं. पूर्वीच्या रिहर्सल्स मला महत्त्वाच्या वाटतात. त्यात गाणं कुठंतरी मुरलं जायचं. गाण्याचा मूड नि आपला मूड वेगळा असेल तर तो कंट्रोल करायला थोडा वेळ लागतो. तो मूड त्या गाण्यासारखा व्हायला हवा. पण तसं होत नाही. थोडीशी रिहर्सल करून लगेच गायचं असतं. हे टाळण्यासाठी संगीतकार नि गायकांमध्ये सुसंवाद व्हायला हवा. रिहर्सल्सचं महत्त्व जाणून त्यासाठी वेळ काढायला हवा.''

हाच धागा पकडून हृषिकेश रानडे म्हणतात की, ''मुळात शास्त्रीय संगीताच्या बेसिक रियाजात काही बदल झालाय असं वाटत नाही. सध्या पुरुष गायक हाय स्केलनं गायचा ट्रेंण्ड आहे. त्यामुळं हाय रेंज वाढवण्यासाठी रियाजाच्या माध्यमातून प्रयत्न केले पाहिजेत. ही आजच्या बदलत्या काळाची गरज आहे. म्युझिक खरोखर ग्लोबल होतंय. त्यामुळं जगभरातलं वेगवेगळ्या प्रकारचं म्युझिक ऐकलं गेलं पाहिजे. कोणतीही चौकट आखून घेऊ नये. सॉफ्टवेअरमुळं सगळं अँडव्हान्स झालंय. रेकॉर्डिंग टेक्निक्स बदलली आहेत. एखादा ट्रेण्ड नाही पण ट्रेण्ड फ्लेव्हरचा आवाज गाण्यात वापरून त्या वेळची गरज भागू शकतेय. आपल्याकडचा साऊंड खूप ॲडव्हान्स झालाय. पूर्वीएवढा फरक आता त्यात जाणवत नाही. मात्र करेक्शन सॉफ्टवेअर किंवा वेगवेगळ्या वेळी जाऊन रेकॉर्डिंग केल्यानं काही वेळा गाणं थोडंसं इकडंतिकडं झालं तरीही ते करेक्ट करता येतंय म्हटल्यावर कदाचित एफर्टवर थोडा फरक पडू शकतो. ही गोष्ट त्या त्या आर्टिस्टच्या डेडिकेशनवर अवलंबून आहे. वेगवेगळ्या वेळी जाऊन आर्टिस्ट गाणं गायल्यानं त्यातला लाईव्ह फील कदाचित काही गाण्यांत मिस होतो.''

याच मुद्यावर डॉ. नेहा राजपाल म्हणतात की, ''आजच्या पार्श्वगायनात रियाज तसाच राहिलाय, पण तंत्र खूपच बदललंय. आपल्या शास्त्रीय गायनानं दिलेला रियाजाचा ठेवा गायकांसाठी एकदम परफेक्ट टूल आहे. लवचिकता असो किंवा ग्रास्पिंग असो, नोट्सचं ज्ञान असो, हे सगळंच परिपूर्ण पद्धतीनं शास्त्रीय संगीतामध्ये रियाजासाठी नेमून दिलेलं आहे. आजच्या तंत्रामध्ये त्याचा वापर केला गेला तर सोने पे सुहागा! गायकाचा आवाज आणि साऊंडही बदलणं आवश्यक आहे. त्यात फरक जाणवला तर वाटेल की, तुम्ही मागच्या पिढीचे गायक आहात आणि या टोनमध्ये ब्लेंड नाही झालात. म्हणून एका गायकाला तंत्र जाणून घेणं फार आवश्यक आहे. ट्रॅकमधल्या साऊंडप्रमाणं आवाजाचा पोत आणि ठेवण ठरवावी लागते. डायरेक्ट गाण्याचा आवाज नि स्टुडिओतल्या प्रोसेसिंगनंतर गाण्यातला आवाज वेगळा असतो. त्या तंत्रानुरूप गाण्याची सांगड घालणं ही गायकाची खरी कसोटी असते.''

आर्या आंबेकर सांगते की, ''गायनात कौशल्य प्राप्त करण्यासाठी स्वराभ्यास करणं गरजेचंच नव्हे तर क्रमप्राप्त आहे. त्याचबरोबर व्हिब्रोटो, फॉल्सीटोन, हस्की टोन, प्रोजेक्शन इत्यादींचाही गाण्याच्या आवश्यकतेनुसार वापर करावा लागतो. त्यामुळं या सर्व गोष्टींचाही अभ्यास करणं ओघानं आलंच. त्यासाठी मी पुण्याच्या एका स्टुडिओमध्ये रेकॉर्डिंगचं प्रशिक्षण घेतेय.''

रोहित राऊत म्हणतो की, ''आता जुन्या पद्धतीचं रेकॉर्डिंग जवळपास पूर्ण बंद झालंय. आमच्या जनरेशच्या रेकॉर्डिंगचा फंडा असतो की, रेकॉर्डिंगचं काम आल्यावर त्याचा ट्रॅक मागवायचा. त्या ट्रॅकसोबत लिरिक्सही असतातच. तो ट्रॅक ऐकून आम्हांला काय गायचंय, ते पक्कं करतो. साधारणपणे रेकॉर्डिंगच्या दोन दिवस आधी हा ट्रॅक आमच्या हातात आलेला असतो. म्हणजे जुन्या काळासारखी तालीम नसली तरीही अशी रिहर्सल होतेच. काही वेळा आर्टिस्ट बुक केला जातो पण ट्रॅक रेडी नसतो. त्यामुळं स्टुडिओत काय गायचंय ते आयत्या वेळी कळतं. तीही एका परीनं त्या गायकाची परीक्षा असते. त्या थोडक्या वेळात ते गाणं समजून घेऊन रेकॉर्ड करायचं असतं. तेही असं रेकॉर्ड करायचं की, ते दुसऱ्यांदा ऐकताना त्याविषयी अजिबात खंत वाटता कामा नाही. टेक्नॉलॉजीवाईज आताचं तंत्र खूप ॲडव्हान्स्ड आहे. मला स्वतःला जुन्या काळातल्या टेक्नॉलॉजीत काम करायला आवडलं असतं. तेव्हाचे गायक फार प्रिसाईज होते. ते निष्काळजी नसायचे. आताशा काही गायक

थोडेसे निष्काळजीपणं गातात. थोडं चुकलं तर सॉफ्टवेअर आहेच, हा काहींचा दृष्टिकोन असतो. रेकॉर्डिंग करताना माझी कमीत कमी चूक होईल, असा माझा प्रयत्न असतो. एकत्र गाण्यानंही फरक पडतो. कधी वेळेअभावी वेगवेगळं रेकॉर्डिंग करतात. त्यामुळं आधीच्या गायकाच्या हिशोबानं पुढच्या गायकाला गावं लागतं. शक्यतो दोघांचं रेकॉर्डिंग एकाच वेळी ठेवलं तर दुसरा काय गाणारेय हे दोघांनाही नीट कळेल. त्यांचा गिव्ह अँण्ड टेक चांगला होईल. 'प्यारवाली लव्हस्टोरी'च्या वेळी 'शटर का ताला'चं मी आणि अमितराजनी एकाच वेळी रेकॉर्डिंग केलं. त्या गाण्यात ती एनर्जी 'दिसली'. एखादं रोमँण्टिक ड्युएट गाताना गायिका कशी गातेय, तिचे एक्स्प्रेशन्स काय आहेत, त्याला गाण्यातून काय रिप्लाय करायचा, हे जाणून घेत अशा पद्धतीनं गाता येईल. पण एकत्र गाणं हल्ली फारसं होत नाही.

कितीही व्यस्त दिनक्रम असला तरी रियाजाला वेळ काढायलाच हवा. आम्ही तसा तो काढतोच, यावर हृषिकेश, अनघासह सगळ्यांचंच एकमत झालं. ''सारेगमपमुळं प्रसिद्धी मिळण्याआधी रियाजाला अगदी व्यवस्थित वेळ मिळत होता. त्यावेळी दिवसभरात कमीत कमी चार तास तरी रियाज करायचो. आता तेवढं शक्य होत नाही. तरीही वेळ मिळेल तेव्हा रियाज करण्याचा प्रयत्न करतो'' असं रोहित प्रांजळपणं सांगतो. हाच मुद्दा नेहा अधिक स्पष्ट करताना म्हणतात की, ''गाण्याचा रियाज रोजच करणं आवश्यक आहे. एखाद्या वेळी तुम्ही रियाजाशिवाय गायलात तर क्वचित प्रसंगी लोक ते स्वीकारतीलही, पण दुसऱ्यांदा तेच चालून जाणार नाही. गळा खराब आहे हे कारण वारंवार चालणार नाही. रियाज मस्टच असला तरी तो मला नाही जमत कधी कधी. निर्माती असल्यानं व्यवधानं वाढलीयेत नि त्याचा आवाजावर परिणाम होतोय. त्यामुळं मी आवाजाची काळजी घेतेय. रोजचा रियाज नि व्हॉईस कंट्रोल ठेवाल, तेवढं चांगलंच. म्हणूनच मी सध्या फार गात नाहीये नि सध्या निर्मितीक्षेत्रात लक्ष केंद्रित केलंय.'' तर आर्या सांगते की, ''मला बाबांसारखं डॉक्टर व्हायचं असल्यामुळं आठवीपर्यंत अभ्यासाकडं माझा अधिक कल होता. विविध प्रकारच्या संगीत परीक्षा दिल्या असल्या तरी गाण्यात करियर करणार, हे निश्चित नव्हतं. सारेगमपनंतर मी सिरिअसली रियाजाला सुरुवात केली नि गाण्याचं करिअर निश्चित केलं. त्यानंतर शाळा, कॉलेजची परीक्षा असो किंवा अन्य व्यवधानांतून रियाजासाठी मी वेळ काढायचेच नि काढतेच. गेल्या काही महिन्यांपासून विख्यात पार्श्वगायिका नि शास्त्रीय गायिका देवकीताई पंडित यांच्याकडं मी शास्त्रीय गायनाचं शिक्षण घेण्यास सुरुवात केली आहे.''

गायकाच्या सुराइतकंच महत्त्व असतं त्यातल्या शब्दांना. शब्दोच्चारांच्या महतीचा एक किस्सा रोहित सांगतो की, ''मी एका सिंधी फिल्मचं गाणं गायलो होतो. हिंदी नि पंजाबी मिक्स अशी सिंधी भाषा आहे. त्यातले काही शब्द उच्चारायला नाही, पण त्यांचा खास लहेजा आणायला कठीण वाटतात. त्यात एक शब्द होता 'मुंजायारावे' असा. पण गाताना ते 'मुंज' असं गायचं होतं. पुढ्यात लिहिलेलं वेगळंच होतं. त्याबद्दल सांगण्यात आलं की डोक्यात 'आ' ठेवा नि तोंडावर 'ओ'. मी तसं गायलं. भाषा कोणतीही असो शब्दांवर मेहनत घ्यावीच लागते.'' आर्या सांगते की, ''भावगीत ही शब्दप्रधान गायकी मानली जाते. त्यामुळं शब्दांकडं विशेष लक्ष द्यावंच लागतं. 'टाईम्स मुझिक'तर्फे 'दिवा लागू दे रे' या माझ्या पहिल्या स्वतंत्र अल्बममध्ये सुरेश भटांपासून ते संदीप खरेंपर्यंतच्या नामवंतांची गीतं होती. संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांनी रेकॉर्डिंगच्या दरम्यान शब्दांचं महत्त्व, शब्दोच्चार, कोणत्या शब्दावर कसा भर द्यावा आदी गोष्टी समजावल्यामुळं मला त्याचा फार उपयोग झाला. शिवाय गाणं गाताना त्याच्या व्याकरणासह उच्चारांकडं दुर्लक्ष होणार नाही, याची काळजी मी घेते. त्यासाठी चौफेर वाचन नि कवितावाचन करते. वैविध्यपूर्ण गाणी ऐकते.'' इथं अनघा वेगळा मुद्दा मांडते की, ''वेगळ्या बाजाच्या शब्दांचे उच्चार समजून घेऊन शिकल्यास त्याचा फायदा गायकालाच होतो. वेगळ्या भाषेतील गाण्यांच्या वेळी ट्यूटर गाईड करतो. भाषा हा अभ्यासाचा भाग असल्यानं ती शिकता येते. त्यासाठी टेक्नॉलॉजीचा खूप फायदा होतो. 'हॅप्पी



हृषिकेश रानडे

**मुळात शास्त्रीय संगीताच्या बेसिक रियाजात काही बदल झालाय असं वाटत नाही. सध्या पुरुष गायक हाय स्केलनं गायचा ट्रेंड आहे. त्यामुळं हाय रेंज वाढवण्यासाठी रियाजाच्या माध्यमातून प्रयत्न केले पाहिजेत. ही आजच्या बदलत्या काळाची गरज आहे. म्युझिक खरोखर ग्लोबल होतंय. त्यामुळं जगभरातलं वेगवेगळ्या प्रकारचं म्युझिक ऐकलं गेलं पाहिजे. कोणतीही चौकट आखून घेऊ नये. सॉफ्टवेअरमुळं सगळं अँडव्हान्स झालंय. रेकॉर्डिंग टेक्निक्स बदलली आहेत. एखादा ट्रेण्ड नाही पण ट्रेण्ड फ्लेव्हरचा आवाज गाण्यात वापरून त्या वेळची गरज भागू शकतेय.**


डॉ. नेहा राजपाल

**गाण्याचा रियाज रोजच करणं आवश्यक आहे. एखाद्या वेळी तुम्ही रियाजाशिवाय गायलात तर क्वचित प्रसंगी लोक ते स्वीकारतीलही, पण दुसऱ्यांदा तेच चालून जाणार नाही. गळा खराब आहे हे कारण वारंवार चालणार नाही. रियाज मस्टच असला तरी तो मला नाही जमत कधीकधी. निर्माती असल्यानं व्यवधानं वाढलीयेत नि त्याचा आवाजावर परिणाम होतोय. त्यामुळं मी आवाजाची काळजी घेतेय. रोजचा रियाज नि व्हॉईस कंट्रोल ठेवाल, तेवढं चांगलंच. म्हणूनच मी सध्या फार गात नाहीये नि निर्मितीक्षेत्रात लक्ष केंद्रित केलंय.**

जर्नी'सारख्या चित्रपटांतली गाणी ही आताच्या जनरेशनची आहेत. त्यांना सिंपल नि स्ट्रेटफॉरवर्ड ऐकायला आवडतं. तर हृषिकेश म्हणतात की, ''वेगळ्या भाषेतून गाताना त्या भाषेचा लहेजा, ते उच्चार इंग्रजीत लिहून घेतल्यास ती भाषा समजून घ्यायला सोपं पडतं. नाहीतर तुम्ही ती भाषा गाताय असं वाटणार नाही. ती त्या भाषिकांशी कनेक्ट होणार नाही. बऱ्याचदा योग्य शब्दोच्चारांनी गाण्यात चांगलं फिलिंग येतं. हिंदी-इंग्रजीचा मराठी गाण्यातला वापर वाढलाय. त्यांचे उच्चार त्या धाटणीचे होणं हे खूपच चांगलं. पण मराठी शब्दांवर त्याचा परिणाम होऊ नये. ते शब्द मराठीच वाटले पाहिजेत. त्याला संगीत वेगळ्या धाटणीचं दिलं गेलं तरी त्यातलं मराठीपण हरवून जाऊ नये.'' हाच मुद्द पुढं नेत नेहा सांगतात की, ''हिंदी किंवा इंग्रजी शब्द मराठी गाण्यांत सर्रास वापरले जातात. कारण आताची पिढी पूर्ण मराठी भाषाच वापरत नाही. माझी निर्मिती असलेल्या चित्रपटाच्या गाण्यांत एकही अमराठी शब्द नाहीये. सगळी मराठी गाणी आहेत. पूर्णपणे मराठी शब्द वापरण्याचा माझा अट्टहास होता. नवीन पिढीनं अशी मराठी गाणी ऐकली तर ती पुढं पासऑन होऊ शकतील. भाषा, तिचा आत्मा नि त्यातला गोडवा जाणून घेणं फार आवश्यक आहे.''

सत्तर एमएमचा पडदा व्यापणारे नायक-नायिका नि त्यांचा ठराविक 'गाता गळा' हे समीकरण बदललंय हे अनघा, हृषिकेश, आर्या नि रोहित मोकळपणानं मान्य करतात. ते म्हणतात की, ''आताच्या गायकांच्या आवाजाचा पोत वेगवेगळा आहे. आता गाण्याच्या रिक्वायरमेंटनुसार गायकाकडं काम येतं. हल्ली नायकानुसार गायक निवडणं किंवा गायकानं नायकानुसार गाणं हे थोडंसं कमी झालंय. हल्ली सिच्युएशनची माहिती घेतली जाते. त्या गाण्यातला फील जाणून घेतला जातो. नायक कोण आहे, यापेक्षा त्याचं नेचर काय आहे, तो कसा दाखवलाय, त्याप्रमाणं ती स्टाईल गाण्यात आणली जाते. त्यामुळं काहीवेळा गाणं गाताना इमॅजिनेशनवरच भर देऊन गावं लागतं. बऱ्याचदा गायकाला नायक कोण आहे, हेही माहिती असतं, पण ते कळल्यामुळं फार काही फरक पडत नाही. कारण गायकाला त्याचं गाणं गायचं असतं. एखाद्या नायकाची छाप लोकांवर असली त्याच्यासाठी गाताना तसा विचार करून गावं लागतं.'' कधी नायक-नायिका डोळ्यांसमोर ठेवून गाणं गायलं जातं नि नाहीही. याबद्दलचा एक किस्सा नेहा सांगतात की, ''प्रिया बापटचं 'नवा गडी नवं राज्य' नाटकातलं नि 'टाईमप्लीज' चित्रपटातलं गाणं मी गायलंय. ते नाटकासाठी गायलं तेव्हाचा स्केल, चित्रपटासाठी गाताना बदलला, कारण त्याचं माध्यम बदललं. नाटकातल्या भूमिकेत प्रिया बापट ही 'प्रिया' म्हणून बऱ्यापैकी दिसते, त्यामुळं तिची प्रकृती लक्षात घेऊन ते गाणं संगीतबद्ध केलं गेलं होतं. तर 'हुप्पाहुय्या'मध्ये गिरीजा ओकवर 'वाकडंतिकडं' गाणं चित्रित झालं होतं. रेकॉर्डिंगच्या वेळी ते फिक्स नव्हतं. ते चित्रित झाल्यावर तिचं एक्स्प्रेशन आपल्या गाण्यातही यायला हवं, यासाठी काही गोष्टी मी पुन्हा डब केल्या. काही वेळा गायक खूप एक्स्प्रेशन देतो पण पडद्यावर ते तेवढं खुलत नाही. त्यामुळं गायक नि कलाकारांनी एक करेक्ट दुवा साधणं फार आवश्यक आहे.''

गाणं लोकप्रिय व्हायचे निकष दिवसेंदिवस बदलताना दिसताहेत. त्याबद्दल आर्याचं निरीक्षण असं आहे की, ''आता गाणं लोकप्रिय होण्यासाठी गुणवत्तेबरोबरच मार्केटिंगचीही जोड असणं आवश्यक झालंय. स्वतःचं यूट्यूब चॅनेल काढून त्यावर सेल्फीव्हिडिओ अपलोड करणं, सिंगल रिलीज करुन ते म्युझिक चॅनेल, एफ.एम. रेडिओ किंवा फेसबुक, व्हॉट्सॲपसारख्या सोशल साईटवर अपलोड करण्याचं प्रमाण वाढतंय.'' तर हृषिकेशच्या मते, ''गाणं लोकप्रिय होण्यासाठी प्रसिद्धी आवश्यक असते. त्याचं उत्तम कॅन्व्हासिंग, उत्तम हॅमरिंग, कॅम्पेनिंग होणं, यामुळं गाणं पॉप्युलर होतं. सतत वेगवेगळ्या माध्यमांतून ते ऐकू आलं-दिसलं तर त्यामुळं ते लोकप्रिय होतं. दुसरं असं की, खरंच त्या गाण्यात प्रचंड चांगला कन्टेन्ट असणं. काही वेळा गाणं सहा महिन्यांनीही लोकप्रिय होतं. काही वेळा गाण्यातले सगळेच घटक छानपैकी जमून आले, तर ते हिट होतं. गाण्यांचं वर्ल्डक्रॉस पिक्चर असं आहे की, ते व्हिज्युएलाईजेशनमुळं लोकप्रिय होतं. कारण व्हिज्युएल मिडिया खूप पॉवरफुल आहे.'' याला

दुजोरा देत अनघा सांगते की, ''योग्य प्रमोशनच्या अभावी कितीतरी चांगली गाणी पुढं आलेली नाहीत. सध्या प्रमोशनसाठी अनेक प्लॅटफॉर्म्स उपलब्ध असून त्यांचा वापर करता येईल.''

नेहांच्या मते, ''गाण्याच्या लोकप्रियतेचा असा काही फॉर्म्युलाच नाहीये. कोणतं गाणं का लोकप्रिय होतं, ते सांगता येणार नाही. गाणं करताना तुम्हांला ते आवडलं असेल, तर ते लोकांना आवडेल. कारण लोकांसाठी म्हणून करायला गेलात तर ते फसू शकतं. मुळात गाणंच चांगलं नसेल तर ते कितीही प्रमोट करा ते हिट होऊ शकत नाही.'' रोहित म्हणतो की, ''खूपदा लोकप्रिय गाण्यामागचं कारण असतं लक. खूपदा ते गाणं खरंच चांगलं नसतं, पण त्याच्या टायमिंगमुळं फरक पडतो. ते कोणत्या वेळी रिलीज करताय, त्याचं प्रमोशन कसं होतंय, यावर ते अवलंबून असतं. खूपदा असंही होतं की, खरंच मनापासून झालेली चांगली गाणी लोकांपर्यंत पोहचत नाहीत. त्याकडं साफ दुर्लक्ष होतं. त्याउलट एखादं सुमार गाणं चांगल्या टायमिंगला रिलीज झालं असेल तर ते हिट होतं. मात्र कधीही गाणं हिट होईल किंवा नाही या पद्धतीनं विचार नाही केला तरच बरं.''

आवर्जून दखल घेण्याजोगे प्रयोग मराठी संगीतक्षेत्रात होताहेत. अनघा म्हणते की, ''मिलिंद इंगळेंच्या 'गारवा'नंतर फारसे अल्बम आले नव्हते. मग अवधूत गुप्ते नि वैशाली सामंत यांनी खूप वेगळा ट्रेण्ड आणला. आताही बरेच इन्डिपेण्टण्ट अल्बम येताहेत. माझा 'हळुवार अंतरीच्या' हा सेल्फशूट व्हिडिओ मध्यंतरी आला. त्याचं शूटिंग हा एक वेगळाच अनुभव होता माझ्यासाठी. खूप आनंद मिळाला होता मला त्यातून.'' आर्या सांगते की, ''इतर देशांमधील वैविध्यपूर्ण संगीत, वाद्य आणि तांत्रिक गोष्टींचा अभ्यास केला जातोय. आपल्याकडं न वापरली जाणारी वाद्यं इतर देशातून मागवली जातात. पाश्चात्य नि भारतीय संगीताचा मिलाप केला जातोय नि त्यातूनच नवनवे प्रयोग घडताताहेत. अशा प्रयत्नांमधूनच चांगले बदल घडतात नि ते लोकप्रिय होतात. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळं नि उपलब्ध सॉफ्टवेअरमुळं एरवी गळ्यातून निघणार नाहीत असेही काही इफेक्ट दिले जाऊ शकतात.''

हृषिकेश म्हणतात की, ''गेल्या १०-१२ वर्षांत म्युझिक प्रचंड बदललेय तेही सकारात्मकरित्या. साऊंड खूप बदललाय. खूप चांगले कम्पोझर चांगले प्रयोग करताहेत. अजय-अतुल, अविनाश-विश्वजीत, नीलेश मोहरीर, अमितराज, नरेंद्र भिडे असे कितीतरीजण चांगलं काम करताहेत. या प्रत्येकाचा स्वतःचा असा एक छाप आहे. अजय-अतुलनी एक जबरदस्त प्रयोग केला होता की, एकही वाद्य न घेता गाणं केलं होतं. फक्त व्होकल साऊंडची किमया साधली होती. त्यामुळं गाणं ऐकताना ती ती वाद्यं वाजताहेत असा फील येतो. अविनाश-विश्वजीतनी 'हॅलो कशी आहेस तू'मध्ये साऊंडचे चांगले प्रयोग केलेत. नीलेश मोहरीरच्या संगीतातून मराठीपण जाणवतं. लोकांनाही हे प्रयोग आवडताहेत. नेहा म्हणतात की, ''नीलेश मोहरीर संगीताचा आत्मा म्हणजेच मेलडी कायम ठेवून त्यात प्रयोग करत राहिलाय. गाण्यात मेलडी असली की ते तुम्हांला भावणारच. मनात घर करणारच. मेलडी, शब्द नि ट्यून हा संगीताचा मूळ गाभा आहे. आमच्या पिढीतल्या अनेक संगीतकारांनी मूळ गाभा सोडला नाहीये. तरीही नवीन चित्रपट संगीताप्रमाणं बदल आणलेत. आपलं संगीत न सोडता नवीन संगीत कसं आत्मसात करून घ्यावं, हे त्यांच्याकडून शिकण्यासारखं आहे.'' रोहित थोडा वेगळा विचार करतो. तो म्हणतो की, ''श्वासनंतरच्या काळात म्युझिकमध्ये प्रयोग झालेले नाहीत. म्युझिक बदललेलं नाही. मराठीतलं संगीत अवधूत गुप्ते यांनी रॉक आणलं होतं तेव्हा बदललं होतं. 'जय जय महाराष्ट्र', 'परी म्हणू की सुंदरा' आदी गाण्यांची वेगळी कल्पना होती. आता नवीन असं काहीच नाहीये. आता फक्त गाणी तयार होताहेत. बॉलिवूडसारखी गाणी तयार होण्याला नवीन गाणं म्हणायचं का हा प्रश्न आहे.''

येत्या दहा वर्षांतल्या बदलांचा अंदाज बांधणं अवघड आहे, असं म्हटलं गेलं तरीही साऊंड आणखीन ॲडव्हान्स होईल, यावर सगळ्यांचं एकमत झालं. हृषिकेश म्हणतात की, ''आपली बदलती लाईफस्टाईल या क्षेत्रातही रिफ्लेक्ट व्हायला लागली आहे. गाण्यांची स्टाईल बदललेय. कडवी कमी होताहेत. चित्रपटाचा



रोहित राऊत

**खूपदा लोकप्रिय गाण्यामागचं कारण असतं लक. खूपदा ते गाणं खरंच चांगलं नसतं, पण त्याच्या टायमिंगमुळं फरक पडतो. ते कोणत्या वेळी रिलीज करताय, त्याचं प्रमोशन कसं होतंय, यावर ते अवलंबून असतं. खूपदा असंही होतं की, खरंच मनापासून झालेली चांगली गाणी लोकांपर्यंत पोहचत नाहीत. त्याकडं साफ दुर्लक्ष होतं. त्याउलट एखादं सुमार गाणं चांगल्या टायमिंगला रिलीज झालं असेल तर ते हिट होतं. मात्र कधीही गाणं हिट होईल किंवा नाही या पद्धतीनं विचार नाही केला तरच बरं.**

कालावधी कमी होतोय नि त्याचा परिणाम गाण्यांवर–त्यातल्या कडव्यांवर होऊ शकेल.'' अनघा म्हणते की, ''इन्डिपेण्टण्ट म्युझिक क्रिएट होण्याचं प्रमाण वाढीस लागेल ते जागतिक स्तरावर पोहचू शकेल.'' रोहित सांगतो की, ''आपल्या मराठी चित्रपटांतच मोठे बदल होतील. प्रॉडक्शन व्हास्ट होतंय. बजेट कोटींच्या घरात गेलंय. प्रॉडक्शन वाढल्यानं चित्रपट वाढणारेत. प्रॉडक्शन वाढून त्याच स्पीडनं आपलं म्युझिकही वाढलं तर मला खूप आनंद होईल. बॉलिवूडच नाही तर जागतिक स्तरावर मराठी संगीत प्रसिद्ध होईल, या दृष्टीनं मी प्रयत्न करणारेय. प्रत्येक संस्कृतीचा खास बाज नि आवाजाचा ठेवा आहे. तो ठेवा तसाच ठेवून साऊंड बदललात तर काहीतरी वेगळं होऊ शकेल. हा साऊंडच लोकांना अपील होईल.'' आर्या आंबेकर म्हणते की, ''भाषेत बदल होईल. बोली भाषेत बोलताना आपण सर्रासपणे इंग्रजी शब्द वापरतो. त्याचप्रमाणं गाण्यातही तोच ट्रेण्ड लोकप्रिय होतोय नि तो पुढंही तसाच राहिल. इंटरनेटमुळे विविध वाद्यं, संगीत पद्धती यांचा अवलंब केला जातोय. लोकांना उत्कृष्ट क्वॉलिटीचा साऊंड ऐकायची सवय झालेय. या सगळ्यात मेहनत घेऊन सुरेल गाणं सुरू ठेवल्यास ते बदल निश्चितच चांगले असतील.'' नेहांच्या मते, ''बदल हा स्वतःत, आपल्या भोवतालात नि प्रोफेशनली करणं फारच आवश्यक आहे. उदाहरणार्थ माझ्या आगामी चित्रपटात लूक नि फील आजच्या पिढीचा असूनही त्यातल्या एलिमेंटसमध्ये मराठमोळेपणा दिसून येईल. माणसाच्या मुळातल्या भावभावना बदलत नाहीत. मटेरिॲलिस्टिक गोष्टी बदलतात. त्यांचं करेक्ट कॉम्बिनेशन करत पुढं जाण्यातली मजा काही औरच. संगीतात फारतर टेक्निकली काही बदल होतील, पण गायकाची गायकी तशीच राहणारेय.'' पार्श्वगायनातल्या बदलांचा मागोवा घेताना जाणवली ती, संगीतनिष्ठा, शब्दसुरांवरचं सच्चं प्रेम... भले ते व्यक्त करण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी असेल पण त्यात 'सूरा मी वंदिले' हा मूळ गाभा कायमच आहे नि तो पुढल्या काळातही तसाच राहिल...म्हणूनच...'तुझे गीत गाण्यासाठी... सूर राहू दे रे...'

**पार्श्वगायनातल्या बदलांचा मागोवा घेताना जाणवली ती, संगीतनिष्ठा, शब्दसुरांवरचं सच्चं प्रेम... भले ते व्यक्त करण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी असेल पण त्यात 'सूरा मी वंदिले' हा मूळ गाभा कायमच आहे नि तो पुढल्या काळातही तसाच राहिल...म्हणूनच...'तुझे गीत गाण्यासाठी... सूर राहू दे रे...'**

**– राधिका कुंटे**
भ्रमणध्वनी : ९८२००८९३७६
kunte.radhika@gmail.com

ग्रंथाली

# अफलातून मुंबई – सविता अमर

चार दिवस जिवाची मुंबई करण्यासाठी आलेल्या पाहुण्यांना या महानगरीची मनाजोगती सफर करण्यास मदत करणारे हे उपयुक्त असे अफलातून पुस्तक लिहून सविता अमर यांनी मोलाचे काम केले आहे. मुंबईविषयक अत्याधुनिक व तपशीलवार माहितीने समृद्ध अशी दुसरी पुस्तके मराठीत फारशी आढळणार नाहीत. महाराष्ट्राची राजधानी व मराठी मनाचा मानबिंदू असलेल्या या अफाट शहराच्या बाबतीत मराठी भाषेतील ही कमतरता प्रस्तुत पुस्तकाने भरून काढण्यास जोमदार सुरुवात केली आहे, असे म्हणावयास हरकत नाही. त्याबद्दल लेखिका सविता, प्रकाशक ग्रंथाली तसेच प्रकाशनास सहाय्य करणारे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ या सर्वांचे अभिनंदन केले पाहिजे. त्याचबरोबर नमूद करायला हवे की केवळ प्रासंगिक पाहुणे किंवा पर्यटक यांच्यासाठी असे हे पुस्तक नसून जन्मापासून इथेच राहत असलेल्या अस्सल मुंबईकरांनी देखील ते अवश्य वाचण्यासारखे आहे. म्हणजे त्यांनाही आपण न पाहिलेल्या मुंबईची मुशाफिरी करण्याची स्फूर्ती येऊ शकेल...

– अरुण साधू




**मूल्य १००० रु.   सवलतीत ६०० रु.**

# मैत्रेय प्रकाशनाची 'अर्थ'रत्ने!

## अर्थसंकल्पः अनेक अर्थ! - चन्द्रशेखर टिळक

अर्थसंकल्प देशाचा विकास घडवू शकतो तसाच तो रोखूही शकतो. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळापासून ते आजपावेतो भारतात मांडलेल्या अर्थसंकल्पांचे सखोल विश्लेषण करणारे हे पुस्तक महत्वाचे ठरते.

• पृष्ठे-२१६ • मूल्य-२२५/-




## अर्थानुभव - चन्द्रशेखर टिळक




अर्थशास्त्रीय विश्लेषकाच्या भुमिकेतून केलेल्या निवडक भाषणाच्या या संग्रहात मानसशास्त्र, समाजशास्त्र, मानवी नातेसंबंध आणि महिला उद्योजकता अशा विविध अंगाने अर्थचिकित्सा केली आहे.

• पृष्ठे-१५६ • मूल्य- १७५/-

## तिची लक्ष्मी - विनायक कुळकर्णी




आजच्या आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र स्त्रीने तिच्या हक्काची कमाई कशी आणि कुठे गुंतवावी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करणारा लेखसंग्रह.

• पृष्ठे-१४४
• मूल्य- १५०

## गुंतवणुकीचं ग म भ न - विनायक कुळकर्णी

स्त्रियांना नजरेसमोर ठेवून केलेल्या या अर्थविषयक लेखनात तिच्या जीवनात कोणत्या घटना घडू शकतात, त्या प्रसंगी तिने कोणती उपाययोजना करावी, यासंबंधी विस्तृत मार्गदर्शन करणारे पुस्तक.

• पृष्ठे-१२० • मूल्य- १२५




## सहज सोपे अर्थसूत्र - अरुण केळकर

ट्रेडमार्क, कॉपीराइट, सबसिडी, पेटंट, करपद्धती, अर्थसंकल्प, सोने खरेदी इ. अनेक वित्तीय संकल्पांची मुद्देसूद व सोप्या भाषेत माहिती देणारे पुस्तक.

• पृष्ठे-१२५
• मूल्य- १२५




## गोष्टी पैशाच्या - विनायक कुलकर्णी




वेगवेगळी चलनं कशी अस्तित्वात आली, शेअर्स-पेन्शनपासून ग्रॅच्युईटीपर्यंत विविध आर्थिक गोष्टींचा उदय कसा झाला याची माहिती देणारे पुस्तक.

• पृष्ठे-६४ • मूल्य- ७०

मैत्रेय प्रकाशन

पारधी हाऊस, ३ रा मजला, एम.जी. रोड, विलेपार्ले (पू.), मुंबई- ४०० ०५७.
फोन- (०२२) २६१०१०१६, २६१५०३५८.
टोल फ्री नंबर : १८००२२२६१३.
Website : www.maitreyaprakashan.com

आमची वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती, वाचनसंस्कृतीला देते दर्जेदार मिती

# ‘ऐका दाजिबा’ वय वर्षे दहा

**वैशाली सामंत**




**‘ऐका दाजिबा’ हे ऑडियन्सनं मोठं केलेलं गाणं आहे. त्यानंतर वैशाली सामंत कोण आहे, अवधूत गुप्ते कोण आहे, सागरिका म्युझिक या सगळ्यांची आपली अशी एक ओळख निर्माण झाली.**

**‘ऐका दाजिबा’चा २००० साली प्रवास सुरू झाला आणि ‘कुसुमिता’ हिंदीमधे डब झालं. ‘कुसुमिता’चं हिंदी रूपांतर केलं शामराजजींनी. अप्रतिम शब्द मिळाले. गाणं जर यशस्वी व्हायचं असेल तर गाण्याचे शब्द strong असायला हवेत हे मला खूप जवळून शिकायला मिळालं. शब्दांचं भान आलं. अवधूत तर उत्तम गीतकार आहेच. या अल्बममधली बाकीची सगळी गाणी त्यानं लिहिली आहेत.**

२००३ डिसेंबर. अगदी वर्ष संपतासंपता ‘ऐका दाजिबा’ रिलीज झालं. खऱ्या अर्थानं लोकांपर्यंत पोचेस्तोवर २००४ चा जानेवारी–फेब्रुवारी उजाडला. कारण एक गाणं येऊन, त्याचा व्हिडिओ सगळीकडे पसरून तो पॉप्युलर व्हायला तेवढा वेळ लागतोच. बरं ‘ऐका दाजिबा’ची तयारी ही त्याआधी दोन वर्षं सुरू झाली. २००० साली मी आणि अवधूतनं या अल्बमवर काम करणं सुरू केलं. अक्षरश: दोन वर्षं आम्ही झगडत होतो, की नवीन काय करायचं!

त्याच्या आधीचा माझा प्रवास तुम्हाला सांगावासा वाटतोय. नवीन कलाकार ज्या ज्या प्रकारची गाणी गातो, ज्यात रिमिक्स आली, कव्हर वर्जन्स आली, आधीच एस्टॅब्लिश झालेल्या आर्टिस्टसाठी डबिंग करणं हे सगळे प्रकार मी करत होते. स्वत:ची ओळख पटवण्यासाठी काय करता येईल ही धडपड सुरू होती.

असं सगळं सुरू असताना ‘सागरिका म्युझिक’ने मला बोलावलं. त्यांच्याबरोबरही आधी काम झालं होतं; परंतु स्वतंत्र स्वत:ची गाणी मिळणं हा एक खूप मोठा योग असतो. तो योग २००० साली माझ्या आयुष्यात आला. तिथे मला विचारलं की, ‘तू काही स्क्रॅच केलेस का रेकॉर्ड? नवीन फ्रेश गाणी आहेत का?’ मग कुणाकुणा नवीन संगीतकारांबरोबर जितकी गाणी मी केली होती तेवढी त्यांच्यापुढे मांडली. त्याच्यातलं अवधूतचं आणि माझं जे काम होतं; म्हणजे अवधूतसोबत मी एका अल्बमसाठी गायले होते, नवीन गाणी होती, तो अल्बम ऐकवला. ‘कुसुमिता’ हे त्यानं कंपोझ केलेलं गाणं ऐकवलं. ते मराठीत होतं.

‘गार्गी’ नावाच्या अल्बमसाठी त्यावेळी आम्ही एकत्र काम करत होतो. गार्गी ही एक कॉलेजमधली मुलगी असते. तिच्या आयुष्यात घडणाऱ्या घटना – म्हणजे टिपिकल आमच्या त्या वयाला साजेसा असा एक अल्बम आम्ही आमच्या दृष्टीनं करत होतो. त्याच्यातलं ‘कुसुमिता’ हे गाणं कंपनीला आवडलं. सागरिका दास या कंपनीच्या सी.ई.ओ. आहेत– She is a very musical lady! – तिनं बरोबर हेच छान गाणं हेरलं. ती म्हणाली, ‘वैशाली इसको करते हैं! हिन्दी मे करते हैं!’ – असं म्हणून खरं तर ‘ऐका दाजिबा’ या अल्बमची सुरुवात झाली. म्हणजे त्यावेळी ’ऐका दाजिबा’ हे गाणं अस्तित्वातही नव्हतं किंवा अल्बमचं नावही अर्थातच तयार नव्हतं. We just started

working. तब्बल दोन वर्षं अगदी एखाद्या dedicated good girl सारखं मी काम करायला सुरुवात केली.

'ऐका दाजिबा'चा २००० साली प्रवास सुरू झाला आणि 'कुसुमिता' हिंदीमधे डब झालं. 'कुसुमिता'चं हिंदी रूपांतर केलं शामराजजींनी. अप्रतिम शब्द मिळाले. गाणं जर यशस्वी व्हायचं असेल तर गाण्याचे शब्द strong असायला हवेत हे मला खूप जवळून शिकायला मिळालं. शब्दांचं भान आलं. अवधूत तर उत्तम गीतकार आहेच. या अल्बममधली बाकीची सगळी गाणी त्यानं लिहिली आहेत. मला आठवतंय, 'ऐका दाजिबा' अवधूतनं पूर्ण वऱ्हाडी भाषेतले शब्द वापरून लिहिलं होतं. मग आमचे क्रिएटिव्ह तात्त्विक वाद झाले त्यावर खूप! मी म्हणत होते की, 'हे गाणं आपण अमराठी लोकांपर्यंत नेणार आहोत. त्यांना हे असं कसं कळेल?' शेवटी बराच खल झाला आणि 'मले-तुले'ला 'मुझे'चा ऑप्शन मान्य झाला!! 'सायला' नावाचं एक अरेबिक गाणं झालं. असं करतकरत एक अल्बम आकार घ्यायला लागला. आणि त्यावेळी सतत मला ही गोष्ट जाणवत होती की, जेव्हा आपण एक अल्बम करतो तेव्हा त्यात, फिल्म साँग्जमध्ये जशी हिरो-हिरॉईन अशी एक स्टोरी असते आणि ते 70 MM वर ऑडियन्ससमोर वाजवलं जातं, तसं अल्बमचं नसतं. अल्बमचा भार हा पूर्णपणे त्या गायकाच्या खांद्यावर असतो. त्यामुळे मला काय वेगळं सादर करता येईल, जे अजून झालं नाही, हा विचार सुरू होता. माझी स्वत:ची ओळख त्यातून निर्माण होईल असं काहीतरी मला हवं होतं.

त्या काळात प्रायव्हेट अल्बम खूप सुरू होते चॅनल्सवर. वेगवेगळ्या भाषांमधले - प्रकर्षाने पंजाबी भाषेतले जास्त होते. तो काळच असा होता की, प्रायव्हेट अल्बमची लाट होती. खूप गाणी, व्हिडिओ येत होते. या सगळ्यांमधे आपलं वेगळेपण काय यावरच ब्रेनस्टॉर्मिंग चालायचं आमचं दिवसरात्र. कारण कसं असतं ना, कन्टेट क्रिएट करायला योग्य तो लीड लागतो. तो मिळाला एकदा की वेळ नाही लागत. आपली दिशा क्लिअर असावी लागते. आणि ती दिशाच आम्हाला मिळत नव्हती. नंतर असं वाटलं की, मराठी फोक बेस काहीतरी करायला हवं. आपणच पंजाबी किंवा गुजराती केलं तर आपण वेगळं काय करतोय? जे आधी कुणी केलं नाहीये ते करून बघण्याची रिस्क ही आताच घ्यायला हवी. हे एकदा मनानं घेतलं आणि मग त्यावर आमचे वेगवेगळे प्रयोग सुरू झाले. आणि 'ऐका दाजिबा' हा फॅन्टॅस्टिक कन्सेप्ट अवधूतनं काढला. त्याची अरेंजमेंट, त्याचे शब्द काय असायला हवेत यावर परत चिक्कार ऊहापोह झाला. असं करतकरत गाणी झाली. 'ऐका दाजिबा'ही झालं.

२००१ च्या अखेरीस हा अल्बम तयार होता. पण आम्ही, लोएल अरोरा नावाचा एक कोरियोग्राफर, व्हिडिओ डायरेक्टर होता, त्याला हा अल्बम ऐकवला. तेव्हा त्यानं आम्हाला सांगितलं की, 'नाही, हे मला ऐकायला आवडत नाहीये! I am not finding this different.' हे आमच्यासाठी अतिशय shocking होतं. 'गाणी चांगली आहेत; पण त्यात contemporary sound नाहीये,' अशा त्यांच्या comments ऐकून आम्ही हादरलो. माझ्यासाठी तर हे फारच कठीण होतं. कारण आयुष्यात अशी संधी फार मेहनतीनं मिळाली होती. बऱ्याच कंपन्यांमधे जाऊन, बऱ्याच लोकांसोबत काम करून लक्षात आलं होतं की, आपल्याला मिळालेली प्रत्येक संधी ही महत्त्वाची असते. आणि ही तर मराठीतून येऊन मोठी संधी होती. कंपनी, अवधूत सगळेच मला support करत होते. माझ्यासाठी स्वत:चा वेळ आणि बुद्धी खर्च करत होते. तेव्हा ठरवलं की, आपण यावर काहीतरी उपाय केला पाहिजे. दुर्लक्ष करून चालणार नाही.

मग २००२ च्या जानेवारीपासून जून-जुलैपर्यंत यातली सहा गाणी रि-डब केली. नवीन ट्रॅक तयार झाले. वेगवेगळ्या अरेंजरना घेऊन वेगवेगळ्या साऊंडसवर अभ्यास सुरू झाला. त्यातून 'ऐका दाजिबा'चा साऊंड तयार झाला. जतिन शर्मा हे नाव मला घ्यायलाच हवं. त्यानंही तितकीच मेहनत 'ऐका दाजिबा'वर घेतली आहे. जतिन शर्मा स्वत: आसामी आहे. त्याची विचार करायची पद्धत, त्याचं school-ing हे अतिशय वेगळं आहे. या सगळ्यामधून 'ऐका दाजिबा'चा जन्म झालाय. त्याचा ट्रॅक आजही तितकाच young वाटतो, Foottapping वाटतो, याचं कारण जतिन शर्मा आहे. I thank Avdhut and Sagarika for

**'ऐका दाजिबा' हे Mass appealing song होतं. तरी एकूण सगळा विचार करता काही गोष्टी घडायच्या असतात. आपण काही विचार करतो पण काही गोष्टी distimed असतात. तसं काहीसं झालं. या व्हिडिओचे डायरेक्टर अचानक सागरिकाच्या ऑफिसमध्ये आले. खरं तर कुठल्यातरी वेगळ्याच व्हिडिओच्या निमित्तानं आले होते आणि त्यांनी 'ऐका दाजिबा' ऐकलं. ते म्हणाले, 'ये गाना भी लेके जाते है बँकॉक!' सगळंच काहीतरी वेगळंच घडत होतं. एक तर 'ऐका दाजिबा' तयार झालं. त्यात 'दाजिबा' हा शब्दच खास आपला मराठमोळा शब्द! हा शब्द घेऊन बँकॉकला जायचं, व्हिडिओ करायचा हे सगळं जाम अतरंगी घडत होतं; पण मज्जा येत होती. तर असं पहिलं गाणं तयार झालं ते 'ऐका दाजिबा'!**




**वैशाली सामंत आणि अवधूत गुप्ते ही दोन नावं 'ऐका दाजिबा' निमित्तानं इंडस्ट्रीमध्ये आली, रुळली. आमचं खूप कौतुक झालं. माझ्या आयुष्यात 'शोज' हे एक नवं दालन उघडलं गेलं. त्याआधी मी ठरवलं होतं की तोवर शोज नाही करणार जोपर्यंत माझी स्वत:ची अशी गाणी होत नाहीत. पण आता माझी गाणी मला मिळाली होती.**

allowing me to do this changes. आधी ऐकायला येत होतं त्यापेक्षा वेगळंच तयार झालं नंतर. मला आठवतंय, जेव्हा हे तयार होत होतं तेव्हा स्टुडिओच्या बाहेर खेळणारी मुलं येऊन थांबायची आणि ऐकायची की 'ये क्या हो रहा हैं!' तेव्हाच वाटायला लागलं की, Yes, I have got the song! आणि 'ऐका दाजिबा' साकारलं.

जुलैमध्ये सागरिकानं ते ऐकलं. She was very happy. आता व्हिडिओ करायची वेळ आली. तिचं favourite होतं 'कुसुमिता' कारण musically very rich and beautiful words!! तर 'ऐका दाजिबा' हे Mass appealing song होतं. तरी एकूण सगळा विचार करता काही गोष्टी घडायच्या असतात. आपण काही विचार करतो पण काही गोष्टी distimed असतात. तसं काहीसं झालं. या व्हिडिओचे जे डायरेक्टर आहेत ते अचानक सागरिकाच्या ऑफिसमध्ये आले. खरं तर कुठल्यातरी वेगळ्याच व्हिडिओच्या निमित्तानं आले होते आणि त्यांनी 'ऐका दाजिबा' ऐकलं. ते म्हणाले, 'ये गाना भी लेके जाते है बँकॉक!' सगळंच काहीतरी वेगळंच घडत होतं. एक तर 'ऐका दाजिबा' तयार झालं. त्यात 'दाजिबा' हा शब्दच खास आपला मराठमोळा शब्द! हा शब्द घेऊन बँकॉकला जायचं , व्हिडिओ करायचा हे सगळं जाम अतरंगी घडत होतं; पण मज्जा येत होती. तर असं पहिलं गाणं तयार झालं ते 'ऐका दाजिबा'!

जगदीश माळी याचे डायरेक्टर होते. त्यांनी आमच्यासाठी आयुष्यभराचं एक मोठ्ठं काम करून ठेवलंय हे. मला नेहमी आठवण येते त्यांची जेव्हाजेव्हा मी हा व्हिडिओ पाहते. 'ऐका दाजिबा' घेऊन बँकॉकला गेलो. त्याच्यातल्या स्टेप्स, त्यातलं सगळंच अतरंगी होतं. गेल्यागेल्या पाऊस सुरू झाला. त्यामुळे ज्या जागा ठरवल्या होत्या त्या सगळ्या कॅन्सल झाल्या. आणि अक्षरश: बँकॉकच्या रस्त्यांवर आम्ही गाणं शूट केलं.

हे सगळं करत करत २००३ नोव्हेंबरपर्यंत गाडी गेली होती. आता थांबण्यात काही अर्थ नव्हता. Lets release this! कोणताही सोहळा, रिलिज फंक्शन असं काहीही झालं नाही. माझ्या एकाही अल्बमचं आतापर्यंत हे सोकॉल्ड रिलिज फंक्शन, प्रेस किंवा लोकांना बोलावणं, परफॉर्मन्स असं झालेलं नाही. पण by God's grace गाणी रिलीज झाल्यानंतर आपणहून त्याला स्वत:चा असा ऑडियन्स लाभलाय. 'ऐका दाजिबा' हे गाणं एक दिवस असंच आम्ही चॅनलवर सोडून दिलं. काही चॅनल्सनी 'ये क्या हैं?' अशीही प्रतिक्रिया दिली. पण खऱ्या अर्थाने ते प्रसिद्ध झालं, जेव्हा एका चॅनलवर गाणं आलं आणि दुसरी चॅनल्स ते गाणं मागायला लागली तेव्हा. ऑडियन्स रिक्वेस्ट करायला लागले गाण्यासाठी. 'ऐका दाजिबा' हे ऑडियन्सनं मोठं केलेलं गाणं आहे. त्यानंतर वैशाली सामंत कोण आहे, अवधूत गुप्ते कोण आहे, सागरिका म्युझिक या सगळ्यांची आपली अशी एक ओळख निर्माण झाली.

पुढचं वर्ष आम्ही त्यात बिझी झालो. म्युझिक एशिया ॲवॉर्डसाठी 'ऐका दाजिबा' गेलं. वैशाली सामंत आणि अवधूत गुप्ते ही दोन नावं इंडस्ट्रीमध्ये त्या निमित्तानं आली, रुळली. आमचं खूप कौतुक झालं. माझ्या आयुष्यात 'शोज' हे एक नवं दालन उघडलं गेलं. त्याआधी मी ठरवलं होतं की तोवर शोज नाही करणार जोपर्यंत माझी स्वत:ची अशी गाणी होत नाहीत. पण आता माझी गाणी मला मिळाली होती.

यातल्या इतर गाण्यांबद्दलही सांगायला

आवडेल. 'ऐका दाजिबा', 'कुसुमिता', 'सायला', 'पिया लागेना जिया', 'ये जिगर के तार', 'सागर की लहरें' - अशी वेगवेगळ्या प्रकारची, वेगवेगळ्या जॉनर्सची गाणी आम्ही यात एकत्र आणली. असं म्हणतात ना, की आपले सगळे प्रकार गाऊन झाले पाहिजेत, कारण एक अल्बम म्हणजे एका आर्टिस्टचा पोर्टफोलिओ असतो. अवधूतनं प्रत्येक गाणं खूप विचारपूर्वक आणि त्यातलं एक्झॅक्ट एक्स्प्रेशन टॅप करतकरत केलंय. आणि कदाचित म्हणूनच अख्खा अल्बम लोकांना आवडतोय. लोकांना गाणी तोंडपाठ आहेत. बऱ्याच वेळा अजूनही 'सायला' गा, 'ये जिगर के तार' गा अशी फर्माईश होते. 'पिया लागेना जिया' हे तर ॲब्स्ट्रॅक्ट पेंटिंगसारखं गाणं केलंय. खूप मज्जा आली ही सगळी गाणी करताना. माझ्या आयुष्यातली अतिशय सुंदर आणि चॅलेंजिंग अशी ही दोन वर्षं होती. पुढे काय होणार आहे याचा काहीही अंदाज नव्हता; म्हणजे म्हणतात ना, 'अंधेरे मे तीर'! पण एवढंच माहीत होतं की जे आपल्याला पटतंय, जे आपल्याला जमतंय ते करायचं. जे योग्य वाटतंय ते करायचं आणि जे योग्य वाटत नाही ते कितीही रुखरुख वाटली तरी स्क्रॅप करायचं. मला आठवतंय, अजून चार-पाच गाणी होती जी आम्ही अतिशय मनावर दगड ठेवून बाजूला ठेवली. कारण अल्बम म्हणून त्याचा एक स्वत:चा श्वास असतो. आठ गाणी तुम्हाला काय देतात, काय व्हरायटी देतात आणि व्हरायटीबरोबरच एक बॅलन्सही असतो, हा सगळा तोल साधत, सांभाळत आम्ही पुढे गेलो.

या अख्ख्या अल्बमचं मास्टरिंग सागरिका म्युझिकच्या वाशीच्या प्लॅन्टमध्ये जाऊन केलं. मास्टरिंगसाठी मी तिथे बसून होते; कारण वाटत होतं, काहीतरी फार आयुष्यात महत्त्वाची गोष्ट होतेय. या मास्टरिंगनंतर जी गाणी ऐकायला येणार आहेत ती लोक ऐकणार आहेत. खूप उत्सुकता होती मला की काय होणार आहे माझ्या अल्बमचं! देवकृपेनं अल्बम खूप चालला, खूप नाव मिळवून दिलं या अल्बमनं. शोज माझ्या आयुष्यात आले. माझा आधीपासूनच एक अतिशय महत्त्वाचा निर्णय होता आयुष्यातला की, आपण ऊठसूट फक्त पैसे मिळवण्यासाठी शोज नाही करायचे. माझी आयडेंटिटी असेल, अख्ख्या शोमध्ये किमान दहा गाणी तरी माझी असावीत. लोकांनी मला का ऐकावं नाहीतर? खूप आनंद झाला, कारण 'ऐका दाजिबा'नंतर मला शोजची विचारणा होऊ लागली. कॉन्सर्ट्स, शोज हा आणखी एक टप्पा माझ्या आयुष्यात आला. त्यातली मजा कळायला लागली. मग त्या निमित्ताने होणारे प्रवास, शोजचं प्लॅनिंग, साऊंड, रिहर्सल्स हे सगळं माझ्या आयुष्यात आलं. पण मला आनंद हा होता की, जेव्हा मी स्टेजवर जाते तेव्हा माझी अशी स्वतंत्र ओळख आहे. मग ती आठ गाण्यांनी का होईना! तोपर्यंत हळूहळू अल्बमसोबत फिल्मसाठीही मी गात होतेच. पण आर्टिस्ट म्हणून माझी आयडेंटिटी नव्हती- जी 'ऐका दाजिबा'ने मला मिळवून दिली.

'ऐका दाजिबा'ने फक्त महाराष्ट्रात नव्हे तर अख्ख्या भारतात मला ओळख मिळवून दिली. सिलिगुडीसारख्या अतिशय टोकावर असलेल्या जागीही 'ऐका दाजिबा' रात्री तीन वाजता कॉलेज ऑडियन्ससमोर मी परफॉर्म केलं. मी तिथे गेले तेव्हा परिस्थिती अशी होती की 'यहाँ पर तो कोई दिखही नही रहा हैं! यहाँ पर कब शो होगा? और होगा भी तो सुनेगा कौन?' हळूहळू ऑडियन्स जमला आणि 'ऐका दाजिबा' त्या लोकांना तोंडपाठ होतं. मला इतका आनंद झाला की, शब्दनाद लोकांना कसा वेड लावतो, याचं ते उत्तम उदाहरण होतं. शब्दांचा अर्थ कळत नसेल ठीक आहे; पण त्यातली एक्स्प्रेशन्स आणि त्यातली मजा त्यांना कळत होती. त्यातला ट्रॅकचा साऊंड त्यांना ॲमेझिंग वाटला. हा खूप वेगळा नि लक्षात राहणारा अनुभव होता. महाराष्ट्रात तर काय मज्जाच होती नुसती! स्टेजवर गेल्यावर ऑडियन्स जे काही वेडं व्हायचं- अजूनही होतं- त्यानं जी एनर्जी मिळते, बॅटरी चार्ज होते ना, त्यामुळे we want to perform more and more songs. २००६ साली बीडमधे एक लाख लोक जमले होते. गणपती उत्सवातला कार्यक्रम होता. सुरुवातीला आयोजक म्हणाले की, दहा ते पंधरा हजारांचा ऑडियन्स असेल. त्या दृष्टीनं कार्यक्रमाची व्यवस्था केली होती. मी पोचले तिथे आणि आयोजक म्हणाले की, 'मॅडम, तुम्ही पोचायच्या आधीच अनेक गाड्या इथे येऊन उभ्या आहेत. त्या भरभरून लोक इथे आलेत. आम्हाला कळत नाहीये की आम्ही आता काय करावं!' अगदी

**'ऐका दाजिबा'नं खरंच आपल्यावर किती उपकार केलेत हे मला जेव्हा मी स्टेजवर जायचे तेव्हा कळायचं. हो! लोक मला ओळखतात! माझ्या गाण्यांमुळे ओळखतात! अत्यंत समाधान देणारा अनुभव आहे हा, की एक कलाकार म्हणून 'ऐका दाजिबा' देवानं माझ्या आयुष्यात पाठवलं आणि त्यानंतर जी अनेक गाणी मिळाली मला ती या गाण्यामुळेच मिळाली, असं मी म्हणेन. माझी आयडेंटिटी मिळाली, माझा ब्रँड झाला. अनेक उत्तमोत्तम संगीतकार, गीतकार यांच्यासोबत काम करायची संधी मिळतेय.**



**अवधूतसोबत शोज करताना जी मजा आहे ती वेगळीच! We both know each other since day one. स्वत: आर्टिस्ट म्हणून सादर होताना, एकमेकांबरोबर सादर झालोय. ती वेव्हलेंग्थ, ते अंडरस्टँडिंग amazing आहे. त्यानंतर त्याचे जे अल्बम्स झाले त्याच्यात मी काही गाणी गायले. 'महाराष्ट्र माझा'मधली गाणी, अजून रिलीज न झालेली गाणी असं खूप काम आहे एकत्र! अवधूत तर आता 'यशस्वी दिग्दर्शक' झालाय. मीही सात चित्रपटांचं संगीत दिग्दर्शन केलंय.**

शोच्या काही वेळ आधी त्यांनी अख्खं स्टेडियम बुक केलं. पूर्ण शो तिकडे शिफ्ट झाला. डोळ्यांसमोर चित्रं आणून पाहा. 'ऐका दाजिबा' सुरू झालं आणि अख्खा ऑडियन्स जेव्हा एखादा क्रिकेटिअर सिक्सर मारतो तेव्हा कसा उठून उभा राहतो तसा उभा होता आणि माझ्या मनात येत होतं, 'देवा हे काय आहे! किती अद्भुत काहीतरी तू माझ्या आयुष्यात आणलंयस. ही सगळी माझ्या घरच्यांची पुण्याई माझ्या पाठीशी आहे. हे माझं नाही. हे या सगळ्यांमुळे माझ्या आयुष्यात आलंय. त्याची काळजी घेणं आणि त्याला पुढे नेणं हे माझ्या हातात आहे.' दिल्लीलाही एक असाच अनुभव आला. सगळे परफॉर्मर्स पंजाबी होते. ते गात असताना मला वाटलं, 'यार, कौन मुझे सुनेगा?' पण आश्चर्य असं की ज्यावेळी मी स्टेजवर चढले त्यावेळी तिथे दोन सुखी जीव होते. त्यातल्या एकाचं नाव होतं सुखविंदर. दोघांनी माझी इतकी छान ओळख करून दिली. 'She is the girl from Maharashtra. हम पंजाब की मिट्टी की खुशबू लेकर आए है और ये महाराष्ट्र का झटका लेकर आयी हैं!' त्या सगळ्यांना हे गाणं माहीत होतं.

एक असतं ना की आर्टिस्टला वाटतं की हे लोक आपल्याला ओळखतात का, आपल्याबद्दल यांना काय माहितीये? आपली गाणी ऐकलीत का यांनी? ही जी मनात एक भीती असते तशी सुरुवातीला साहजिकच मला असायची. आणि 'ऐका दाजिबा'नं खरंच आपल्यावर किती उपकार केलेत हे मला जेव्हा मी स्टेजवर जायचे तेव्हा कळायचं. हो! लोक मला ओळखतात! माझ्या गाण्यांमुळे ओळखतात! अत्यंत समाधान देणारा अनुभव आहे हा, की एक कलाकार म्हणून 'ऐका दाजिबा' देवानं माझ्या आयुष्यात पाठवलं आणि त्यानंतर जी अनेक गाणी मिळाली मला ती या गाण्यामुळेच मिळाली, असं मी म्हणेन. माझी आयडेंटिटी मिळाली, माझा ब्रँड झाला. अनेक उत्तमोत्तम संगीतकार, गीतकार यांच्यासोबत काम करायची संधी मिळतेय.

दहा वर्षं झाली 'ऐका दाजिबा'ला! मला वाटतं, एवढी गाणी माझ्याकडे आहेत, पण लोकांना 'ऐका दाजिबा' ऐकायचंय का? विचारलं की उत्तर येतं, 'हो! ऐकायचंय!' वैशाली सामंत आणि 'ऐका दाजिबा' हे एकत्र आहेत. हे समीकरण कधीही बदलणार नाही, पुसलं जाणार नाही. जसं घरी देवाला नमस्कार करून बाहेर पडतो, तसं 'ऐका दाजिबा' म्हटल्याशिवाय मी स्टेज सोडूच शकत नाही. अगदी आताचा अनुभव आहे. वीस मिनिटांचाच एक परफॉर्मन्स द्यायचा होता मला. त्यामुळे वाटलं की जी लेटेस्ट हिट्स आहेत ती गाऊया. म्हणून मी 'ऐका दाजिबा' जरा बाजूला ठेवलं होतं. पण लोकांनी सांगितलं ते ऐकायचंच आहे. आजही तितक्याच उत्साहानं या गाण्याच्या ट्रॅकवर लोक नाचतात. प्रचंड कौतुक आहे लोकांना या गाण्याचं! त्यांना मी जेव्हा सांगते, की दहा वर्षं झालीत या गाण्याला तेव्हा त्यांनाही आश्चर्य वाटतं. त्यांना वाटतं की आत्ता रिलीज झालंय हे गाणं!! खरंच गॉड गिफ्ट आहे हे गाणं माझ्यासाठी!

मला खूप आनंद होतो जेव्हा माझी गाणी दुसरे कलाकार गातात. कारण ती गाणी पॉप्युलर आहेत, लोकांना आवडतात म्हणून ती गायली जातात. कलाकार म्हणून मला खूप आनंद मिळतो की, माझी गाणी लोकांच्या ओठी आहेत.आणि हेच तर व्हायला हवंय. त्यासाठीच आम्ही येतो. जशी माझी सुरुवात माझ्या सिनियर्सची गाणी गात, ऐकत झाली, तशी माझी गाणी गात कुणी मोठं होतंय का हे फिलिंग किती छान आहे!! आपण इथे आपला ठसा उमटवायला आलो आहोत आणि आपल्या पावलावर पाऊल टाकत ठसा उमटवण्याची कुणाचीतरी तयारी आहे, ही खूप आनंदाची गोष्ट आहे. नवे काय जुने काय; आम्ही सगळे एंटरटेनर आहोत. त्यामुळे लोकांना जे आवडतंय ते आम्ही देतो नि देणार. मी तर म्हणेन खूप ओरिजनल गाणी मला मिळावीत, लोकांना ती

आवडावीत, इतरांनी ती गावीत आणि लोकांचं मनोरंजन व्हावं!

अवधूतबरोबरचा हा प्रवास 'ऐका दाजिबा'पासून जो सुरू झालाय तो आजही सुरू आहे. इतक्या वर्षांनी बीएमएमला (बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात) आम्ही एकत्र सादर करणार आहोत गाणी. किती गाणी गाऊ नि किती वगळू असं झालंय. अवधूतसोबत त्यानंतर खूप काम झालं. दोन अल्बम झाले. व्हरायटी ऑफ जॉनर्स गायलो. 'ही गुलाबी हवा' हे त्याच्या फिल्ममधलं पहिलं गाणं; ज्याला आम्हाला पुरस्कारही मिळाला. 'दादला', 'चेडवा' नावाचं एक सुंदर गाणं आहे. किती सांगू नि किती नको असं झालंय आता मला. ही सगळी गाणी घेऊन आम्ही तिकडे निघालोय. आम्हाला वेळ कमी पडेल कदाचित, पण अवधूतसोबत शोज करताना जी मजा आहे ती वेगळीच! We both know each other since day one. स्वत: आर्टिस्ट म्हणून सादर होताना, एकमेकांबरोबर सादर झालोय. ती वेव्हलेंग्थ, ते अंडरस्टँडिंग amazing आहे. त्यानंतर त्याचे जे अल्बम्स झाले त्याच्यात मी काही गाणी गायले. 'महाराष्ट्र माझा'मधली गाणी, अजून रिलीज न झालेली गाणी असं खूप काम आहे एकत्र! अवधूत तर आता 'यशस्वी दिग्दर्शक' झालाय. मी सात चित्रपटांचं संगीत दिग्दर्शन केलंय. लतादीदी, आशाताई, विठ्ठल उमप, सुरेश वाडकर, उषा उत्थुप, साधना सरगम, शंकर महादेवन, सोनू निगम, अवधूत गुप्ते, स्वप्नील बांदोडकर, आनंद शिंदे या गायकांनी माझी गाणी गायली याचा अतिशय आनंद आहे. 'ऐका दाजिबा'नंतरच्या दहा वर्षांतला हा अवधूतचा आणि माझा सांगितिक प्रवास असा बहरतो आहे. यापुढची सगळी वर्षंही असंच भरभरून, उत्साहानं काम करण्याची आहेत हा आत्मविश्वास आहे.

आता 'ऐका दाजिबा'चा हा सगळा दहा वर्षांचा लेखाजोखा घेऊन आम्ही पुन्हा एकदा श्रोत्यांना आनंद देणार आहोत, देत राहू!

**– वैशाली सामंत**
vaishalisamant7@gmail.com

**॥ग्रंथाली॥**



## लेणी महाराष्ट्राची – डॉ. दाऊद दळवी

भारतात बाराशे लेणी आहेत. त्यांपैकी आठशे महाराष्ट्रात आहेत! इसवी सनाच्या आरंभकाळाच्या आगेमागे बौद्ध महाराष्ट्रात आले, त्यांना सह्याद्रीच्या डोंगरदऱ्या व त्यातील कातळ, लेणी खोदण्यास योग्य वाटले. त्यामधून एक नवा कलाविष्कार या भूमीत प्रकटला. नंतर हजार–बाराशे वर्षांपर्यंत बौद्धांबरोबरच हिंदू व जैन पंथीयांनी महाराष्ट्रात सर्वत्र उत्तमोत्तम, विविध गुणदर्शी लेणी कोरली, याची महती सांगणारा दस्तावेज.

**मूल्य १२०० रुपये ● सवलतीत ७५० रुपये**



## मंदिर–शिल्पे – डॉ. माया पाटील

डॉ. माया पाटील यांच्या प्रस्तुत ग्रंथातून मंदिर–स्थापत्य आणि मूर्तिशिल्पे यांच्या आधारे संस्कृतीची सांगोपांग तसेच अंतर्बाह्य माहिती सांगण्याचा प्रयत्न केला गेला आहे. यासाठी त्यांनी मराठवाड्यातील लातूर आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांतील विविध मंदिरांचा आणि मूर्तिशिल्पांचा सांगोपांग विचार केलेला आहे, विश्लेषण केलेले आहे. त्याची चित्रांसह सर्वंकष माहिती देणारा हा ग्रंथ.

**मूल्य ३०० रुपये ● सवलतीत १८० रु.**

# भारतीय संगीतात महिलांचे स्थान



**शरद विचारे**

**स्त्री आणि पुरुष या वर्गवारीत नेहमीच समाजात पुरुषाचा वरचष्मा राहिला आहे. स्त्रीची भूमिका ही दुय्यम राहिली. तोच निकष संगीतातही लावला जातो. या समाजरचनेत कोणतीही कलासाधना अंगिकारायची असेल तर स्त्रियांना मर्यादा होत्याच. तरीही संगीताच्या बाबतीत विशेषत: शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात स्त्रियांनी दिलेले योगदान नजरेआड करताच येणार नाही. समाजाची बंधने असतानाही स्त्रियांनी आपले ठसठशीत योगदान संगीतक्षेत्रात दिलेले आहे. स्त्री-कलाकारांनी कलासाधना करताना या समाजामध्ये घेतलेले कष्ट, त्यांनी दाखवलेले धैर्य आणि मिळविलेले ज्ञान हे चरित्र आणि समाज या दोहोंच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.**

**भा**रतीय परंपरेतल्या ६४ कलांपैकी संगीत ही एक कला. चार वेदांपैकी सामवेद हाही संगीताशी संबंधित आहे. स्वर आणि संगीत हे आपल्या जीवनाशीही संबंधित आहे. त्याला काहीजण आत्म्याची भाषा असेही म्हणतात. देवादिकांची स्तुती करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे संगीत ही धारणा अजूनही आपल्याकडे रूढ आहे. त्यामुळे चित्रपटाच्या संगीतापलिकडेही या कलेचे स्थान अबाधित आहे. देवाला उठवण्यापासून बाळाला झोपवेपर्यंत संगीताचा आधार घेतला जातो. या संगीताचा मागोवा घेतघेत मागे जायचे म्हटले तर कुणी या विश्वाच्या उत्पत्तीपर्यंत जाऊन पोहोचेल. आपल्या भारतीय संस्कृतीत 'ओम'चा ध्वनी चराचरात होता असे मानले जाते तर बायबल म्हणते की, आधी शब्द होता.' म्हणजेच या चराचराच्या निर्मितीपासून ध्वनी आणि संगीत दोन्ही आहे. कारण जिथे ध्वनी आहे तिथे संगीत आहेच. निर्झरापासून समुद्राच्या लाटांच्या गाजेपर्यंत आणि पानांच्या सळसळीपासून बांबूच्या वनातील गुंजनापर्यंत पावसाच्या धारेपर्यंत सर्वत्र संगीत आहे. परंतु आपण लोकार्थाने आणि रूढार्थाने मानवी गळ्यातून निघणाऱ्या स्वराला संगीत समजू लागलो आहोत.

आनंदाच्या प्रसंगी संगीताची साथ असते आणि दु:खद क्षणांच्या वेळीही संगीताचेच सूर असतात. अशा या संगीताचे नंतरच्या काळात विविध प्रकार कल्पिले गेले. वादन आणि गायन असे प्रमुख दोन प्रकार. यातील गायनात शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत, सुगम संगीत, भावगीत, बडबड गीत असे अनेक भेद त्यात केले गेले. तरीही त्यामागची भावना तीच आहे - आनंद देणे.

संगीत हे शास्त्र आहे. शास्त्र म्हटले की, त्याला नियम आणि उपनियम आले. संगीतालाही नियम आहेत. विशेषत: शास्त्रीय संगीताला. हे नियम शिकायचे म्हणजे अभ्यास करायचा. हा अभ्यास किती काळाचा असेल? त्याला काळवेळाची मर्यादा नाही. काही जण ३०-४० वर्षे संगीत शिकत असतात. या संगीताच्या शिकण्याच्या पद्धतीवरून यात घराणी निर्माण झाली. प्रत्येक घराण्याने आपापली परंपरा जतन करून ठेवली आहे. आज भारतीय शास्त्रीय संगीत जगात अव्वल मानले जाते. ही परंपरा जतन करून ठेवणाऱ्या दिग्गजांचा आपल्याला सार्थ अभिमान आहे. अनेकांनी या संगीताच्या क्षेत्रात आपला अमीट ठसा उमटवला आहे. तानसेन, गोपाल नायक, सदारंग, जयदेव, बिरजू यांच्यापासून अल्लादियाँखान, भूर्जीखान, मल्लीकार्जून मन्सूर. ही यादी संपणार नाही. ती आताच्या गायकांपर्यंत येऊन पोहोचेल. इथे जरी तानसेन (तन्नमिश्र)चे नाव अगोदर लिहिले असले तरी त्यालाही कुणी शिकवणारे होतेच. स्वामी हरिदास हे त्यांचे नाव. आपण इतिहासाच्या खोलात जास्त शिरणार नाही. पण स्त्री आणि पुरूष यांपैकी पुरूषवर्गाने संगीताच्या क्षेत्रात वर्चस्व गाजवले हे अमान्य करता येणार नाही. त्यांची संख्या गायिकांच्या मानाने जास्त होती. ते अधिक मेहनत करीत. तथापि, सामाजिक स्थिती आणि पुरूषप्रधान संस्कृती पाहता स्त्रियांचाही त्यात लाखमोलाचा वाटा आहे, हे मान्य करावेच लागेल.

स्त्री आणि पुरूष या वर्गवारीत नेहमीच समाजात पुरूषाचा वरचष्मा राहिला आहे. स्त्रीची भूमिका ही दुय्यम राहिली. तोच निकष संगीतातही लावला जातो. या समाजरचनेत कोणतीही

कलासाधना अंगिकारायची असेल तर स्त्रियांना मर्यादा होत्याच. तरीही संगीताच्या बाबतीत विशेषत: शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात स्त्रियांनी दिलेले योगदान नजरेआड करताच येणार नाही. समाजाची बंधने असतानाही स्त्रियांनी आपले ठसठशीत योगदान संगीतक्षेत्रात दिलेले आहे. त्याच अनुषंगाने आपण इथे चर्चा करू. स्त्री–कलाकारांनी कलासाधना करताना या समाजामध्ये घेतलेले कष्ट, त्यांनी दाखवलेले धैर्य आणि मिळविलेले ज्ञान हे चरित्र आणि समाज या दोहोंच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. कारण पुरूषप्रधान संस्कृतीत त्यांना पुरूष कलाकारांबरोबर स्पर्धा करावी लागत होती आणि अजूनही लागत आहे. ह्या सर्वांमुळे त्यांचे अनुभव बहुमोल असतात. पूर्वी केवळ संगीतसाधना हा एकच विषय नव्हता. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस गायन आणि अभिनय या दोहांचा मिलाप एकाच कलाकारात झालेला असणे आवश्यक होते. चित्रपटात आणि नाटकात भूमिका करतानाच त्यांना गावेही लागायचे. खुर्शीदबेगम, बेगम अख्तर, नूरजहाँ, सुरय्या, जोहराबाई अंबालावाली, राजकुमारी, झेबुन्निसा, हुस्नबानू, शमशाद बेगम, अमीरबाई, गोहरबाई ही त्यांतली काही उदाहरणादाखल नावे.

या शास्त्रीय संगीताने जाती–पातीच्या भिंती ओलांडल्या आहेत. धर्मापेक्षा कला श्रेष्ठ ठरवली गेली. अमीरबाई कर्नाटकी आणि गोहरबाई कर्नाटकी या बिळगी भगिनी हिंदू पुराणकथांवर आधारित कथा आणि संगीत असलेल्या रंगभूमी, चित्रपट आणि संगीतक्षेत्रात काम करत होत्या. त्या 'कृष्ण–पारिजात', 'राधान आट', 'दासर आट' अशा परंपरेत वाढल्या होत्या. धर्माने मुसलमान असल्या तरी त्या क्षेत्रातील परंपरा जपतच त्यांना या कलाक्षेत्रात यावे लागले. हे वाटते तितके सोपे नसते. जर त्यावेळच्या या स्त्री–कलाकारांनी ही मेहनत घेतली नसती, हा धोका पत्करला नसता तर भारतीय संगीतक्षेत्राला कित्येक नामवंत आणि कीर्तीवंत गायिका मिळाल्या नसत्या.

या संगीत क्षेत्राला उत्तरेत मोगल सम्राटांनी आणि दक्षिणेत मंदिर संस्कृतीने आश्रय दिला. सांप्रदायिक अथवा धार्मिक समाजाची सीमा ओलांडून जाण्याचा कल बऱ्याच कलाकारांकडे असतो. त्यांच्या वैयक्तिक जीवनातही त्यांचा व्यवहार धर्मातीत होता. अशी अनेक उदाहरणे देता येतील. शास्त्रीय संगीताबरोबर ठुमरी, दादरा, ख्याल यांसारखे गायनप्रकार गाणाऱ्या आणि त्यावर नृत्य करणाऱ्या तवायफ मंडळींची परंपरा मुगल काळापासून होती. नजीकच्या भूतकाळात ज्याप्रमाणे मुस्लिम स्त्रियांवर सामाजिक बंधने आली तशी बंधने त्यापूर्वीच्या काळी निश्चितच नव्हती. त्यामुळे मुस्लिम महिलांना संगीत आणि नृत्य यासारख्या कलांमध्ये भाग घेणे काही नवीन नव्हते. आपण तवायफ किंवा कोठी याचा वेगळा अर्थ घ्यायला सुरुवात केली. परंतु तवायफ म्हणजे एकप्रकारची संगीत शिकवणारी पाठशाळाच होती. या संगीत पाठशाळेत सरंजामदार आणि प्रतिष्ठितांची मुले संगीत शिकायची. म्हणूनच कोठीवाल्या स्त्रियांनी शृंगाररसयुक्त विरहगीत सादर करणे हे सामान्यपणे दिसत होते. फारसी भाषेत 'तवायिफ' म्हणजे संगीत, नृत्य, गायन, काव्यरचना शिकण्याची जागा. येथे काव्यरचना म्हणजे, ख्याल, गजल, ठुमरी गायन प्रकारासाठी लागणाऱ्या रचना. राजे, संस्थानिक आणि समाजातील प्रतिष्ठित वर्ग आपल्या मुलांना काव्यरचना शिकवण्यास तवायफींकडे पाठवत असत. लखनौची तवायफ, गायिका उमरावजान ही काव्यरचनेतही प्रवीण होती. बनारसची तवायफ मलकाजान काव्यरचना करायची. तिची कन्या गोहरजान कलकत्तेवाली हीदेखील नावारूपाला आलेली होती. मोगल आणि नवाबांच्या प्रभावाखाली असलेली दिल्ली, लखनौ, कोलकाता, बनारस, हैदराबाद, रामपूर ही शहरे तवायफींची केंद्रे म्हणून प्रसिद्ध होती. भारताची पहिली ग्रामोफोन ध्वनिमुद्रिका गायिका गोहरजान कलकत्तेवाली, सिद्धेश्वरीदेवी, खुर्शीदबेगम, बेगम अख्तर, अभिनेत्री


लता मंगेशकर


आशा भोसले

बेगम अख्तर





गंगुबाई हनगल

**पार्श्वगायनापासून संगीतकारापर्यंत महिलांचा वावर नोंद घेण्याजोगा आहे. लता मंगेशकरांपासून सुरू झालेली भरभराट अद्यापही ओघवती आहे. या प्रवासात कित्येक गायिका होऊन गेल्या. काहींनी आपले गायन शास्त्रीय गायनापुरते मर्यादित ठेवले. यात गानसरस्वती किशोरी आमोणकर यांचे नाव घेता येईल. या क्षेत्रात शिस्तीला आणि मेहनतीला किती महत्त्व आहे, हे किशोरीताईंकडून जाणून घ्यावे.**



सुमन कल्याणपूरकर

सायराबानूची आजी चमियानबेगम यांसारख्या कलाकार त्या केंद्रांत होत्या. ठुमरीची राणी रसूलनबाई, गझलगायिका बेगम अख्तर, जोहराबाई अंबालावाली, बडी मलकाजान आजमपूरवाली, शमशादबेगम, जद्दनबाई, हमिदाबानू अशा काही स्त्री-कलाकार याच परंपरेतून उदयाला आल्या. इथे एक बाब नमूद करावीशी वाटते - पूर्वीच्या काळी म्हणजे मोगलकाळात केवळ राजघराण्यातील स्त्रियांना बेगम, बानू, देवी यांसारखे गौरवसूचक संबोधन वापरत. जोधाबाई हिला प्रथम बाई हे संबोधन वापरलेले आहे. हेच संबोधन या गायिकांना वापरले आहे. म्हणजे नृत्य-गायन करणाऱ्यांना त्या काळात मानाचे स्थान होते, हे अधोरेखित होते. हिंदुस्थानी संगीत गायकीत बाई हे संबोधन अनेक ठिकाणी दिसते. उदा. केसरबाई, मोगुबाई, तानीबाई, चंपुबाई, हिराबाई, अमीरबाई, बडी मोतीबाई, अशी कित्येक नावांची यादी देता येईल. बागलकोटमधील बावलीबाई हल्याळ आणि सुशीलाबाई अमीनगड ह्या शास्त्रीय संगीताच्या मुशीतल्याच होत्या. हे बाई संबोधन केवळ गाणी म्हणणाऱ्या कलाकारांना लावले जायचे. (जान हे संबोधन नृत्य आणि गायन या दोन्ही कला सादर करणाऱ्यांना लावले जायचे.).

कर्नाटक संगीत हे मूलत: मंदिर संस्कृतीतून आलेले होते. वैयक्तिक भक्तीनुसार ते मंदिरात गात. कर्नाटक संगीतातील रचना ह्या संस्कृत, कन्नड, तेलुगु भाषेत असत. तर हिंदुस्थानी संगीतातील कलाकार हे मुस्लिम राजांच्या दरबारात होते. ते आम जनतेच्या मनोरंजनासाठी गात. यातील बंदिशी ह्या पंजाबी, फारशी, ब्रज, अवधी, मैथली, भोजपुरी, मारवाडी, मराठी, उर्दू अशा भाषांत असत. पुढे राजदरबारातून आणि मंदिरांतून हे संगीत बाहेर आले. धर्माच्या भिंतीही तोडल्या. अल्लादियाँखान यांचे पट्टशिष्य म्हणजे भास्करबुवा बखले, केसरबाई केरकर, मोगुबाई कुर्डीकर, शांता हुबळीकर यांनी अब्दुल करीमखान यांच्याकडून संगीताचे शिक्षण घेतले होते. लता मंगेशकर ह्या उस्ताद अमन अलीखान यांच्याकडून संगीत शिकल्या.

या संगीतक्षेत्रात कित्येक महिलांनी समाजात मानाचे स्थान, मानमरातब, धनदौलत कमावली. संगीताला प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करून दिले. आजही संगीत क्षेत्रातील महिलांना मानाचे स्थान आहे. पैसाही बक्कळ मिळतो. त्यांचा फार मोठा चाहता वर्ग आहे. आता तर ही एक इंडस्ट्री बनली आहे. सद्यस्थितीकडे पाहता संगीत हे क्षेत्र महिलांनी काबीज केले आहे. पार्श्वगायनापासून संगीतकारापर्यंत महिलांचा वावर नोंद घेण्याजोगा आहे. लता मंगेशकरांपासून सुरू झालेली भरभराट अद्यापही ओघवती आहे. या प्रवाहात आणि प्रवासात कित्येक गायिका होऊन गेल्या. काहींनी आपले गायन शास्त्रीय गायनापुरते मर्यादित ठेवले. अपवाद म्हणून त्यांनी चित्रपटगीते आणि भावगीते गायिली आहे. यात गानसरस्वती किशोरी आमोणकर यांचे नाव घेता येईल. गायनाचा वारसा त्यांनी आपल्या आईंकडून घेतला आणि जपला तेवढाच वाढवला. या क्षेत्रात शिस्तीला आणि मेहनतीला किती महत्त्व आहे, हे किशोरीताईंकडून जाणून घ्यावे. कृष्णा कल्ले, सुमन हेमाडी-कल्याणपूर, श्यामा चित्तार, मंगेशकर भगिनी, देवकी पंडित, वैशाली सामंत. किती किती म्हणून नावे घ्यावीत, या साऱ्यांनी हे क्षेत्र नावारूपाला आणले आहे. परंतु या टप्प्यावर येण्यापूर्वीचा एक टप्पा असा होता की, तिथे महिला कलाकार डगमगल्या असत्या तर आपल्याला हे आताचे सोनेरी दिवस पाहायला मिळाले नसते.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला संगीत नाटकांसारख्या दृश्य कलाप्रकारामध्ये स्त्रियांचा सहभाग नसे. त्याच काळात त्या या कलेसाठी नवचैतन्य घेऊन आपली प्रतिभा दाखवायला सज्ज होत होत्या. जुन्या परंपरा तोडून नवीन परंपरा निर्माण करण्याचा हा काळ, नवे सामाजिक मानदंड निर्माण होण्याचा हा काळ, हा सर्व कलाविश्वाच्या स्थित्यंतराचा काळ होता. ह्या कलाविश्वाने केलेले सीमोल्लंघन समजून घेणे म्हणजे भारताच्या वर्तमान आणि भविष्यासाठी असलेल्या धर्मातीत तत्त्वांचा शोध घेण्यासारखे आहे. गायक-नटी म्हणून प्रसिद्ध पावलेल्या हिराबाई बडोदेकर ह्या मराठी रंगभूमीवर प्रवेश केलेल्या पहिल्यावहिल्या स्त्री-कलाकार होत्या, असे काहींचे म्हणणे आहे. पुढील काळात कलेमध्ये असणारी भक्ती आणि अपमानरहित जगणे किती असाध्य आहे, हे समजते. या संदर्भात एक उदाहरण द्यावेसे वाटते. बाई अंजलीबाई मालपेकर या तालेवार गायिका

होत्या. अथक परिश्रमातून त्यांनी गायनकला साध्य केली. सत्तरीतही त्यांचा आवाज खणखणीत आणि सुरेल होता. तरीही त्यांनी १९२०च्या सुमारास गाणे अचानक सोडले. त्यावेळी त्या जवळपास चाळीशीत होत्या. म्हणजे ऐन बहराचा काळ. साधारणत: हा स्वातंत्र्यपूर्वीचा जमाना म्हणजे खाजगी मैफलींचा जमाना. त्यावेळी मैफली राजेरजवाड्यांकडे होत. त्यातील काही दुर्व्यसनीही असत. बाई अंजलीबाई यांना असे कटू अनुभव येऊ लागले म्हणून त्यांनी गाणे सोडले. ज्या राजघराण्यांनी या नृत्य आणि गायन कलेला आश्रय दिला, त्यांतील काही दुर्व्यसनींमुळे त्याला बट्टा लागू लागला. गंगूबाई हनगल, शांता हुबळीकर, मळवल्ली सुंदराम्मा, रसूलबाई, आर. नागरत्नाम्मा, अमीरबाई, गोहरबाई, गंगूबाई गुळेदगुड्ड यांची जीवनचरित्रे पाहिली तर कीर्ती, स्वातंत्र्य, अपमान या सर्वांचे विचित्र मिश्रण आपल्याला पाहायला मिळते. कलुषित दृष्टीने पाहणारा समाज, लोकांच्या विचित्र नजरा आणि टक्केटोणपे झेललेले त्यांचे आयुष्य आहे. मंदिरामध्ये, राजदरबारामध्ये, जमीनदारांच्या आश्रयाखाली असलेल्या या समाजात, नवीन आणि आधुनिक काळात स्वत:च्या अस्तित्वासाठी हे कलाकार धडपडत होते. सामाजिकदृष्ट्या निकृष्टतेला वैयक्तिक पतनाचे रूप असलेल्या कलेला त्यांनी राष्ट्रीय आंदोलनासाठी आणि समाजसुधारणेसाठी हत्यार बनवले. हा देवदासी, कलावंत, पातर, तवायफ या समुदायांच्या धडपडीचा तसेच त्यांच्या मुक्ततेचा इतिहास आहे.

१९३०च्या दशकात सिनेमा, संगीत, नाटक या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना पतित स्त्रिया (फॉलन वुमेन) समजत असत. कलाकार कुचेष्टेने त्यांना 'फ्री वुमेन' असे संबोधत असत. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीस संगीत आणि नाट्य क्षेत्र हे पांढरपेशा समाजात निषिद्ध समजले जायचे. म्हणून नाटकात आणि चित्रपटातही स्त्री पार्टी करणाऱ्या महिला मिळत नव्हत्या. पुरूषांनाच स्त्रियांच्या भूमिका कराव्या लागत. भारतीय चित्रपटाचे जनक दादासाहेब फाळके यांच्या चित्रपटात  महिला कलाकार मिळत नव्हत्या म्हणून त्यांनी वेश्यांना पाचारण केले. पण गंमत अशी की, वेश्यांनीही चित्रपटात काम करणे कमीपणाचे मानले. कलेवरील भक्ती आणि अपमानरहित जगणे हे असाध्यच होते. अशा काळातही महिलांनी संगीतक्षेत्रातील प्रवेशाला ओहोटी येऊ दिली नाही. आपल्या प्रतिभेने त्यांनी टीकाकारांची तोंडे बंद केली. कला-माध्यमाला चिकटलेली अपकीर्ती त्यांनी दूर केली. ह्या कलावंतांनी घेतलेले कष्ट, प्रवाहाविरुद्ध जाऊन केलेले प्रयत्न हे स्वातंत्र्याच्या चळवळीइतकेच महत्त्वाचे होते. म्हणूनच आता चित्रपट, संगीत आणि नाटक क्षेत्रात काम करणे प्रतिष्ठेचे झाले आहे. त्याला ग्लॅमर निर्माण झाले. सामाजिक प्रतिष्ठा मिळाली आहे. आज एखाद्या स्त्री-कलाकाराच्या अवतीभवती चाहत्यांचा गराडा असतो, पण या क्षेत्राला हे मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी काही पिढ्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले आहे. संगीतातील त्यांचे योगदान कधीच विसरता येणार नाही.

ही संगीत परंपरा जतन करण्याचे काम ज्याप्रमाणे वर विविध ठिकाणी उल्लेख केलेल्या महिलांनी केले आहे, त्याप्रमाणे आपल्या घरातील मातांनीही केले आहे. विशेषत: ग्रामीण भागात आपली सकाळच होते ती जात्यावरच्या ओव्यांनी. सारे गाव गाढ निद्रेत असताना घरातील मायमाऊली भल्या पहाटे जात्यावर दळत बसते. जात्याच्या घरघरीतून अनामिक सूर येतो तसाच भावपूर्ण आणि अर्थपूर्ण सूर त्या माऊलीच्या कंठातून उमटतो. जात्यातून जसे पीठ बाहेर पडते तसे तिच्या मुखातून गाणे बाहेर पडते. या भोळ्याभाबड्या सुरावटीने आपले सांस्कृतिक पोषण केले आहे. दळणकांडणानंतर केरकचरा, सडासारवण, अंगणातली रांगोळी, तुळशीची पूजा या साऱ्या उपक्रमाला मुखातील संगीताची साथ होती. बाळाला झोपवताना माऊली जी अंगाई गीते म्हणायची त्याचे शिक्षण कोणत्याही घराण्यात घेतलेले नव्हते. पण या स्त्रियांनीच ही परंपरा जतन करून ठेवली आहे. जरी थोडेसे विषयांतर झाले तरी या अनामिक आणि अशिक्षित गायिकांची नोंदही घेतली गेलीच पाहिजे. त्याचे श्रेय कुणाही पुरूषाला जाणार नाही.

**– शरद विचारे**

भ्रमणध्वनी : ९८२१५०३१६१
Vsharad69@gmail.com



**किशोरी आमोणकर**

**कृष्णा कल्ले, सुमन कल्याणपूर, श्यामा चित्तार, मंगेशकर भगिनी, देवकी पंडित, वैशाली सामंत. किती म्हणून नावे घ्यावीत, या साऱ्यांनी हे क्षेत्र नावारूपाला आणले आहे. परंतु या टप्प्यावर येण्यापूर्वीचा एक टप्पा असा होता की, तिथे महिला कलाकार डगमगल्या असत्या तर आपल्याला हे दिवस पाहायला मिळाले नसते.**



**देवकी पंडित**



# स्ट्रगल अपेक्षांचा

**ऋषिकेश रानडे**

*__आज__ जवळजवळ बारा वर्षे मी या क्षेत्रात आहे. मागे वळून पाहिले की खूप गोष्टी आठवतात. माझे संगीताचे शिक्षण हे विजय कोपरकर आणि माझे बाबा प्रमोद रानडे यांच्याकडे झाले. मी २००४ साली हिंदी 'सा रे ग म प'मध्ये भाग घेतला होता आणि त्या रियालिटी शोचा मी विजेता होतो. २००९ साली मी मराठी सा रे ग म प पर्वाचा पण विजेता झालो. या दोन्ही कार्यक्रमांनी मला खूप काही दिले. मुख्य म्हणजे अशा कार्यक्रमांमुळे माझ्या नावाला, चेहऱ्याला ओळख मिळाली. पण म्हणून काही स्ट्रगल संपले नव्हते, उलट ते चालू झाले होते असे म्हणायला हवे. जेव्हा लोक तुम्हाला ओळखू लागतात, एक कलाकार म्हणून तुम्हाला फॉलो करत असतात, तेव्हा तुमची जबाबदारी वाढते. करिअरच्या सुरुवातीच्या टप्प्यात मी पुण्यात राहायचो. बऱ्याचदा एखाद्या गाण्यासाठी फोन यायचा आणि मी म्हणायचो की मी आत्ता पुण्यात आहे, उद्या मुंबईत येऊ शकेन. पण रेकॉर्डिंग अर्जंट असायचे आणि त्या दिवशी पुणे-मुंबई प्रवास करणे अशक्य असायचे, त्यामुळे अशी काही कामे माझ्या हातातून गेली सुद्धा. ही माझ्या या प्रवासातील अडचण होती. त्यामुळे करीअर करायचे तर मुंबईत जागा घेणे हे गरजेचे होते कारण संगीत क्षेत्रातील बहुतांशी काम हे मुंबईत आहे.*

*माझा स्वभाव पूर्वी थोडा बुजरा होता. त्यामुळे काम मिळवण्यासाठी एखाद्या संगीतकाराला भेटणे, त्याला आपले रेकॉर्डिंग ऐकवणे या गोष्टी मला खूप कठीण वाटायच्या. पण माझ्या या क्षेत्रातील मित्रांनी मला सांगितले की, आपण आपले काम एखाद्याला ऐकवणे यात काहीच गैर नाही. हळूहळू माझ्या स्वभावातील बुजरेपणा नाहीसा झाला. प्रत्येक गायकाला अशी इच्छा असते की आपल्याला स्वतःचे गाणे गायला मिळाले पाहिजे आणि हे सध्याच्या काळातील खूप मोठे आव्हान आहे असे मी म्हणेन. 'मुंबई पुणे मुंबई' या चित्रपटाच्या निमित्ताने मला खूप महत्त्वाची संधी मिळाली. अविनाश आणि विश्वजित हे दोन संगीतकार माझे मित्र. मी अनेक वेळा त्यांच्याकडे गाण्याच्या काही रेकॉर्डिंगसाठी गेलो होतो. 'कधी तू' हे 'मुंबई पुणे मुंबई'साठी असलेले गाणे माझ्या आवाजात टेस्टिंगसाठी रेकॉर्ड केले गेले. निर्मात्यांना ते आवडले आणि मग हे गाणे माझ्या स्वरात रेकॉर्ड झाले.*

**प्रत्येक गायकाला अशी इच्छा असते की आपल्याला स्वतःचे गाणे गायला मिळाले पाहिजे आणि हे सध्याच्या काळातील खूप मोठे आव्हान आहे असे मी म्हणेन.**

*स्ट्रगल आणि आव्हान म्हणाल तर एकदा या क्षेत्रात आपण आलो की आपल्या आपल्याकडूनच अपेक्षा वाढत जातात. आपल्या नावावर एखादे गाणे स्वतःचे म्हणून लोकप्रिय व्हायला हवे. अशी इच्छा कायम मनात असते. सध्या स्पर्धा खूप वाढली आहे. पण त्यामुळे आपण आपल्या समकालीन गायकांशी किंवा गायिकांशी स्पर्धा करू नये, त्यामुळे एकमेकांचे मैत्रीपूर्ण संबंध बिघडू शकतात. आपल्या समकालीन गायक आणि गायिकांशी आपण मैत्रीचे नाते ठेवायला हवे. आपल्याला संधी मिळणे हे सुद्धा एका अर्थाने स्ट्रगल आहे, आव्हान आहे. कारण रियालिटी शोच्या माध्यमातून दिवसागणिक कित्येक कलाकार पुढे येत आहेत. 'बावरे प्रेम हे', 'पितृऋण', 'मुंबई पुणे मुंबई' या चित्रपटातील माझ्या गाण्यांना काही पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. नुकतेच 'अरे वेड्या मना' या मालिकेचे शीर्षक गीत मी गायलो आहे. निलेश मोहरीर यांनी हे गीत संगीतबद्ध केले आहे. निलेशनेच संगीत दिलेले 'काळजात खोल खोल' हे मालिकेतील गीत मी गायलो आहे. आत्तापर्यंतचा हा प्रवास लोकांच्या, आपल्या चाहत्यांच्या शुभेच्छांमुळे यशस्वी झाला आहे, असे मी म्हणेन.*

***शब्दांकन : गणेश आचवल***
atharvabharadhwaj@gmail.com

# टिकटिक वाजते मनात

**सायली पंकज**



*__खरे__ तर आमच्या घरात संगीत हे प्रोफेशन कुणाचेच नव्हते. पण गाण्याची आवड मात्र होती. माझी आई हौस म्हणून गायची. मी गायिका व्हावे ही आईची इच्छा होती. कोल्हापुरात दत्ता डावजेकर यांची मुलाखत आणि त्यांची गाणी असा एक कार्यक्रम होता, त्यात मी गायलेल्या गाण्याचे दत्ता डावजेकरांनी कौतुक केले होते. असाच एका वर्षी संगीतकार श्रीनिवास खळे यांची मुलाखत व गाणी असा कार्यक्रम होता आणि त्यात सुद्धा मला गायचे होते. खळेकाका स्वतः कार्यक्रमाच्या आधी चार दिवस आमच्याकडून गाणी बसवून घ्यायला आले होते. मी तेव्हा बहुधा बारावीत होते. मी त्यांना सहज विचारले की, मला तुमच्याकडे शिकता येईल का? आणि त्यांनी लगेच होकार दिला, यावर माझा विश्वास बसत नव्हता.*

*आम्ही कोल्हापुरात आणि खळेकाका मुंबईत. त्यामुळे महिन्यातून मी काही दिवस मुंबईत यायचे. खळेकाका एक-एक गाणे चार ते पाच तास शिकवायचे, गाण्यातले बारकावे, जागा, लता मंगेशकर यांनी त्यांची गायलेली गाणी या सगळ्या गोष्टींचे मार्गदर्शन करायचे. गाण्यातील प्रगल्भता म्हणजे काय हे त्यांच्याकडून कळले. मला नेहमी मुंबईतच यावे असे वाटायचे आणि खळेकाका मला नेहमी सांगायचे की आधी पदवीधर हो, मग ये. मी अतिशय उत्तम गुणांनी बी.कॉम. झाले आणि तातडीने काकांना फोन केला की, आता मला मुंबईत यायचे आहे. खळेकाकांनी देवकी पंडित यांना माझे नाव सुचवले आणि हिला गाणे शिकव असे सांगितले. मी देवकी पंडित यांच्याकडे गेले. आमचे मुंबईत कोणीच नसल्याने सुरुवातीचे पंधरा दिवस मी देवकी पंडित यांच्या घरीच राहिले. त्या मला लवकर उठवून पहाटे पाच ते आठ रियाझ करवून घ्यायच्या, मग दुपारी अकरा ते एक आणि मग पुन्हा चार ते सात असा रियाझ असायचा. मग त्यांनी जे पंधरा दिवस शिकवले, त्याचा मी कोल्हापुरात जाऊन सराव करायचा आणि मग पुढच्या महिन्यात पुन्हा मुंबईला यायचे, असे सुरू होते.*

*प्रकाशझोतात यायचे असेल तर माझ्याकडे गाणे शिकू नकोस, आधी आपला आवाज तयार व्हायला हवा, हे त्यांचे शब्द मी कधीच विसरणार नाही. माझी एका घरी पेईंग गेस्ट म्हणून सोय झाली आणि मी अंधेरीला राहू लागले. मग देवकी पंडित यांनी एक दिवस 'दिवाळी पहाट'ला त्यांच्याच कार्यक्रमात मला संधी दिली होती.*

*२०१३ साली माझे व पंकजचे लग्न झाले, तेव्हा 'दुनियादारी' चित्रपट पूर्ण झाला होता. मात्र त्यात आधी प्रणयगीत नव्हते. पंकज पियानो वाजवत होता, त्याला एक ट्यून सुचली, त्याने गीतकार मंगेश कांगणे याला फोन केला, मंगेशने 'टिकटिक वाजते डोक्यात' असे शब्द लिहिले, ते मी माझ्या आवाजात रेकॉर्ड करून दुसऱ्या दिवशी पंकजने संजय जाधव यांना ते ऐकवले, त्यांना ते गाणे खूप आवडले, त्यांनी ते गाणे चित्रित करण्याचा निर्णय घेतला. सोनू निगम यांना ते गाणे पाठवले आणि सोनू निगम यांनी पाच दिवसांनी गाणे गायला होकार दिला आणि गाणे माझ्या आणि सोनूजींच्या आवाजात रेकॉर्ड झाले. त्या गाण्याकरिता मला 'म.टा. सन्मान', 'मिफ्ता पुरस्कार', 'संस्कृती कलादर्पण पुरस्कार', 'चित्र पदार्पण पुरस्कार' असे अनेक पुरस्कार मिळाले. या गाण्याने माझ्या जीवनात वेगळे वळण आणले आणि आता लोकांच्या अपेक्षा वाढल्या. 'प्यारवाली लव्ह स्टोरी', 'क्लासमेट्स' या चित्रपटांकरिता गायले आहे. आपले आयुष्य म्हणजे एक स्ट्रगल आहे आणि आता लोकांच्या अपेक्षांना योग्य न्याय देणे हेसुद्धा एक आव्हानच आहे.*

**'टिकटिक वाजते डोक्यात' या गाण्याने माझ्या जीवनात वेगळे वळण आणले आणि आता लोकांच्या अपेक्षा वाढल्या. आपले आयुष्य म्हणजे एक स्ट्रगल आहे आणि आता लोकांच्या अपेक्षांना योग्य न्याय देणे हेसुद्धा एक आव्हानच आहे.**

***शब्दांकन : गणेश आचवल***

atharvabharadhwaj@gmail.com



# स्ट्रगल नव्हे, साधना

**मंगेश बोरगावकर**

*'सा रे ग म प'चे पहिले पर्व होते. मी कोल्हापूरमध्ये माझ्या कुटुंबीयांबरोबर फिरायला गेलो होतो. आम्ही ज्या हॉटेलमध्ये राहिलो होतो, तिथे 'सा रे ग म प'ची ऑडिशन सुरू होती. माझ्या आईने मला तिथे जाऊन गायला सांगितले. मी काही फार सिरिअस नव्हतो. दोन गाणी गायली. दुसऱ्या दिवशी जेव्हा 'झी'वर स्क्रोल पाहिला तेव्हा लक्षात आले की, कोल्हापूर विभागातून पुढील फेरीसाठी निवडल्या गेलेल्या नावांत माझे नाव होते आणि मग मला ऑडिशनसाठी मुंबईला यावे लागले. मुंबईला आल्यावर लक्षात आले की 'सा रे ग म प' म्हणजे एक मोठे विश्व आहे. कारण मुंबईत अनेकजण (७० पेक्षा अधिक) या रियालिटी शोच्या अंतिम ऑडिशनसाठी आले होते. ते पाहिल्यावर ठरवले की, आता मागे जायचे नाही. आपल्याला मेहनत प्रचंड घ्यायचीच आहे. मी व्यवस्थित गायलो आणि त्या पहिल्या पर्वातील स्पर्धक म्हणून सिलेक्ट झालो.*

*मी लातूरचा. आमच्या घराण्यात संगीतपरंपरा आहे. माझे वडील डॉक्टर राम बोरगावकर आणि काका बाबुराव बोरगावकर यांच्याकडून मी संगीत शिकलोय. पण मी लातूरमध्ये नाट्यगीत, अभंग असे गीतप्रकार गात होतो. मी भावगीतं फारशी गायली नव्हतीच. मुंबईत शुटींग असल्याने एका वेगळ्या जगात मी प्रवेश केला होता. माझ्यासाठी ते खूप मोठे आव्हान होते. 'सा रे ग म प'च्या अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास हा अनुभवांची शिदोरीच होती. प्रतिसादाने आम्ही सर्वजण जणू दबलो होतो. कारण हे सारेच लातूरमध्ये राहणाऱ्या आमच्या दृष्टीने खूप अजब होते. आपल्याला पुढच्या वाटचालीसाठी मुंबईत यायलाच हवे हा विचार पक्का झाला.*

*एका कार्यक्रमाला अशोक पत्की भेटले आणि ते म्हणाले की, तुझा अल्बम मला करायचा आहे आणि खरोखरच तो अल्बम जुळून आला. युनिव्हर्सल म्युझिकने 'दिवाना झालो तुझा' हा मी गायलेल्या आणि अशोक पत्की यांनी स्वरबद्ध केलेल्या गीतांचा अल्बम प्रकाशित झाला.*

*माझ्या आयुष्यातील महत्त्वाची व्यक्ती म्हणजे गौतम राजाध्यक्ष. त्यांनी माझे कौतुक केले होते, पुढे आमची मैत्री झाली. मी त्यांच्याकडे ऑपेरा म्युझिक ऐकायला जायचो. जवळजवळ दोन वर्षे मी त्यांच्याकडे ऑपेरा म्युझिक ऐकले, त्यांचा संगीत कलेचा चांगला अभ्यास होता. त्यांनी माझे फोटो शूट पण केले होते. संगीतकार राम-लक्ष्मण यांच्याकडे मी 'मेरा भारत महान' या फेस्टिवल फिल्मकरिता गीत गायलो.*

**एक गायक म्हणून स्वतःला सिद्ध करणे हे खूप मोठे आव्हान असते. मी या क्षेत्रातील स्ट्रगलला स्ट्रगल म्हणत नाही. ती कलाकाराची 'साधना' आहे असे मी म्हणेन. प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती नाव कमावण्यासाठी जी मेहनत करते, ते स्ट्रगल नसून साधना असते.**

*मी या क्षेत्रातील स्ट्रगलला स्ट्रगल म्हणत नाही. ती कलाकाराची 'साधना' आहे असे मी म्हणेन. प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती नाव कमावण्यासाठी जी मेहनत करते, ते स्ट्रगल नसून साधना असते. सुप्रसिद्ध गायिका गानसरस्वती किशोरी आमोणकर यादेखील माझ्या गुरू आहेत, त्यांच्याकडून मी खूप काही शिकत आलोय.*

*संगीतकार निलेश मोहरीर याच्याशी झालेली मैत्री माझ्या आयुष्याला एक वेगळे वळण देणारी ठरली. एक महत्त्वाची गोष्ट मी पाळतो, ती म्हणजे माझ्या घरच्या संस्कारातून आलेली गोष्ट आहे. कधीच कोणाबद्दल मनामध्ये मत्सर किंवा नकारात्मक भावना ठेवायची नाही. सगळ्यांशी चांगल्या प्रकारे वागायचे.*

*आज गायक कलाकार या नात्याने मला सातत्याने माझ्या आवाजावर मेहनत घेतली पाहिजे, काळानुसार, परिस्थितीनुसार मला स्वतःला बदलता आले पाहिजे ही गोष्टसुद्धा मी ध्यानात ठेवतो.*

***शब्दांकन : गणेश आचवल***
atharvabharadhwaj@gmail.com

# संगीत हेच ध्येय

**उर्मिला धनगर**



*__खरे__ तर आमच्या घरात संगीत हे करिअर केलेले कोणीच नव्हते. माझे बाबा आवड म्हणून गायचे. ते शासकीय सेवेत कार्यरत असल्याने त्यांच्या ठिकठिकाणी बदल्या व्हायच्या. शालेय शिक्षण पण नाशिक, उल्हासनगर, बदलापूर अशा ठिकाणी झाले. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी असला की, मी शाळेत गाणी सादर करत होते. शिक्षक माझे कौतुक करायचे. तू गाणे शिक असे म्हणायचे, पण गाणे कोणाकडून शिकायचे हे काही समजत नव्हते. पुढे कॉलेजला गेल्यावरसुद्धा अनेक स्पर्धांतून गाण्यासाठी बक्षिसे पण मिळाली. प्राध्यापकांनी आई-बाबांना सांगितले की, हिला गाणे शिकायला पाठवा. बदलापूर येथे पंडित अच्युत जोशी यांच्याकडे मी संगीत शिकू लागले आणि मग मला समजून आले की, हे क्षेत्र खूप मोठे आहे. आपल्याला खूप काही शिकायचे आहे. संगीत ही साधना आहे. माझा या कलेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलून गेला. मी संगीत विशारद झाले, मग अच्युत ठाकूर यांच्याकडे सुगम संगीत देखील शिकले.*

*'सा रे ग म प'च्या पहिल्या दोन्ही पर्वासाठी मी ऑडिशन दिल्या होत्या, पण माझी निवड झाली नव्हती. जेव्हा मी 'सा रे ग म प' बघत होते, तेव्हा कायम मनात यायचे की, आपण आपले ध्येय सोडायचे नाही. कधी ना कधी तरी यात आपल्याला संधी मिळेलच. 'सा रे ग म प'च्या तिसऱ्या पर्वासाठी मी पुणे येथून ऑडीशन दिली, माझी निवड झाली आणि मी अंतिम फेरीची सुद्धा विजेती ठरले. तो संपूर्ण प्रवास मला एक गायिका म्हणून समृद्ध करणारा ठरला. माझ्या आई-बाबांचे स्वप्न मी पूर्ण केल्याचा मला खूप आनंद झाला होता. मी आधी खूप वेगळ्या जगात होते आणि या कार्यक्रमामुळे माझ्या चेहऱ्याला, नावाला ओळख मिळाली होती. तेव्हा डॉ. सलील कुलकर्णी यांनी मला 'पहिले, प्लेबॅकचे गाणे तू माझे गाशील' असे वचन दिले होते आणि 'हापूस' चित्रपटात त्यांनी ते गाणे मला देऊन त्यांचे वचन पाळले. माझ्या यशात 'सा रे ग म प'चा मोलाचा वाटा आहे. मला विविध कार्यक्रम मिळाले, लोकांच्या अपेक्षा वाढत गेल्या. 'पिंजरा', 'भाग्यलक्ष्मी' या मालिकांची शीर्षकगीते मिळाली. आपल्या आवाजाचा योग्य वापर कसा करता आला पाहिजे, विविध गीतप्रकार कसे गाता आले पाहिजेत हे समजू लागले. 'जय मल्हार'मधील माझी गीते पण लोकप्रिय झाली.*

*या क्षेत्रात लोकांच्या अपेक्षा वाढल्या की, त्यांना न्याय देणे हे खूप मोठे आव्हान असते. माझी आतापर्यंत एकशेदोन गाणी रेकॉर्ड झाली आहेत. मी २०१० सालचे 'सा रे ग म प'चे पर्व जिंकले आणि मला एकामागोमाग एक अनेक चित्रपटांच्या ऑफर्स आल्या. 'दुर्गा म्हणत्यात मला'मधील मी गायलेल्या गीतासाठी (गोंधळ गीत) मला सर्वोत्कृष्ट गायिकेचा शासनाचा पुरस्कार मिळाला. 'अजिंठा'साठी मला 'म. टा.' सन्मान मिळाला. तसेच 'मिफ्ता' पुरस्कार, 'महाराष्ट्राचा फेव्हरिट पुरस्कार' असे अनेक पुरस्कार मिळाले. 'यशवंतराव चव्हाण - बखर एका वादळाची' या चित्रपटात संगीतकार आनंद मोडक यांनी माझ्याकडून ओव्या गाऊन घेतल्या. त्यांनीच संगीत दिलेला आणि महानोरांची गाणी असणारा 'गंध मातीचा' या अल्बमसाठी मला 'सागरिका अॅवॉर्ड ' मिळाले.*

*मी आकाशवाणी मुंबई केंद्राच्या एफएम गोल्ड वाहिनीवर आर जे म्हणून काम केले होते, हे फार कमी जणांना माहित असेल. संगीत हे क्षेत्र करिअर म्हणून निवडले आहेच, पण त्यात विविध आव्हान पेलण्यासाठी गरज असते ती चाहत्यांच्या आशीर्वादाची आणि सदिच्छांची. या गोष्टीवर माझा पूर्ण विश्वास आहे.*

**लोकांच्या अपेक्षा वाढल्या की, त्यांना न्याय देणे हे खूप मोठे आव्हान असते. संगीत हे क्षेत्र करिअर म्हणून निवडले आहेच, पण त्यात विविध आव्हान पेलण्यासाठी गरज असते ती चाहत्यांच्या आशीर्वादाची आणि सदिच्छांची.**

***शब्दांकन : गणेश आचवल***
atharvabharadhwaj@gmail.com

# यश टिकवणे महत्त्वाचे

## आदर्श शिंदे



**आमच्या** घरातच संगीत कलेचा वारसा आहे. मी प्रल्हाद शिंदे यांचा नातू आणि आनंद शिंदे यांचा मुलगा, त्यामुळे संगीत कलेचे संस्कार माझ्यावर लहानपणापासूनच होत गेले. माझे मोठे भाऊ उत्कर्ष आणि हर्षद हे सुद्धा उत्तम गातात. मला आठवतंय, मी पाचवीत असताना एका गाण्याच्या स्पर्धेत भाग घेतला होता आणि त्यात बक्षीस मिळवले होते. आमच्या घरी संगीताचे वातावरण असल्याने अनेक दिग्गज कलाकार आमच्या घरी यायचे. लहानपणी मी तबला, ढोल वाजवायचो. मला ताल आणि सूर यांची जाण आहे, त्यामुळे मी या क्षेत्रात पुढे येऊ शकेन असा विश्वास वाढत गेला. मी या क्षेत्रात खरं तर लहानपणापासून आलोय. तेव्हा मी अनेक चित्रपटांसाठी लहान मुलांकरिता म्हणून गायलो होतो. याच क्षेत्रात करिअर करायचे असा विचार पक्का होत गेला.

कॉलेजला गेल्यावर तर अनेक स्पर्धा या माझा आत्मविश्वास वाढवणाऱ्या ठरल्या. मी अंधेरीच्या भवन्स कॉलेजचा विद्यार्थी. उमंग आणि मल्हारमध्ये तर सलग दोन वर्षे मी विजेता होतो. अशोककुमार यांच्याकडे मी शास्त्रीय संगीत शिकू लागलो. मुंबई विद्यापीठाचा युवा महोत्सव हा माझ्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा होता. वेस्टर्न सिंगिंग, गजल, ग्रुप सिंगिंग अशा सर्व संगीत प्रकारात मी सहभागी होतो. सुगम संगीतात तर झोनल, स्टेट आणि राष्ट्रीय अशी सर्व स्तरावर मला बक्षिसे मिळाली होती.

स्टार प्रवाहवर 'आता होऊन जाऊ द्या' नावाचा रियालिटी शो होणार होता. त्यात भाग घ्यावा की नाही याबाबत मी खूप साशंक होतो. कारण माझ्या नावाला एक वलय होते. मी अनेक रेकॉर्डिंग केली होती, अनेक गाणी गायलो होतो. मला म्युझिक इंडस्ट्रीमध्ये नावाने ओळखले जात होते, पण माझ्या चेहऱ्याला जी ओळख मिळायला पाहिजे, ती मिळाली नव्हती. रियालिटी शोमध्ये मला नवीन कोणाबरोबर स्पर्धा करायचीच नव्हती. पण जेव्हा 'आता होऊन जाऊ द्या'मध्ये सर्व प्रसिद्ध गायक-गायिका आहेत हे समजले, तेव्हा मला त्यात भाग घ्यावेसे वाटले. तो टप्पा खूप महत्त्वाचा होता. बाबा आणि आजोबा या क्षेत्रात असल्यामुळे त्यांच्या नावाला कुठेही धक्का लागता कामा नये, आपले काम चांगले झालेच पाहिजे हे दडपण तेव्हाही होते आणि आताही आहे. त्या शोचा मी विजेता झालो. तिथे 'अमितराज' यांनी माझे गाणे ऐकले होते आणि त्यांनी शब्द दिल्याप्रमाणे मला 'दुनियादारी'तील 'देवा तुझ्या गाभाऱ्याला' हे गाणे दिले. या गीताला प्रचंड लोकप्रियता मिळाली. माझ्या नावाला आणि आता चेहऱ्याला सुद्धा ओळख मिळाली होती. पण इथे स्ट्रगल संपत नाही, तर वेगळ्या अर्थाने स्ट्रगल चालू होतो. लोकांच्या तुमच्याकडून अपेक्षा वाढतात. आमच्या घरचे वातावरण खूप साधे आहे. आपण जेव्हा प्रसिद्ध होतो, तेव्हा आपले पाय कायम जमिनीवर असायला हवेत हे संस्कार माझ्या घरातून आले आहेत. आणि याचे भान मी कायम ठेवत असतो. बाबा नेहमी म्हणतात, या क्षेत्रात यश मिळणे सोपे असेल, पण ते टिकवणे खूप कठीण असते. त्यासाठी अभ्यास करावा लागतो, संगीताचे वेगवेगळे प्रकार अभ्यासावे लागतात, विविध प्रकारची गाणी गायली पाहिजेत. मेहनत घ्यायला हवी. लोकसंगीत, त्यातले वेगळे प्रकार, भावगीत अशी सर्व गाणी तुम्हाला गाता आली पाहिजेत. हे सुद्धा आव्हानच असते. संगीतकार राहुल रानडे यांनी संगीत दिलेले एक भक्तिगीत मी नुकतेच गायलो आहे. विविध प्रकारची गाणी गाता येणे हे खूप महत्त्वाचे आव्हान असते असे मी म्हणेन.

**'दुनियादारी'तील 'देवा तुझ्या गाभाऱ्याला' या गीताला प्रचंड लोकप्रियता मिळाली. माझ्या नावाला आणि आता चेहऱ्याला सुद्धा ओळख मिळाली. पण इथे स्ट्रगल संपत नाही, तर वेगळ्या अर्थाने स्ट्रगल चालू होतो. लोकांच्या तुमच्याकडून अपेक्षा वाढतात.**

**शब्दांकन : गणेश आचवल**
atharvabharadhwaj@gmail.com

# घरापासून दूर येण्याचा स्ट्रगल

**कीर्ती किल्लेदार**



*मी मुळात मध्यप्रदेश-इंदूर येथील. तिथेच माझे शालेय शिक्षण झाले. घरात गाण्याची आवड होती. इंदूरमध्ये असताना शाळेत अनेक स्पर्धांत भाग घेतला होता, बक्षिसे मिळवली होती. संगीत क्षेत्रात नाव कमावण्याचे स्वप्न नक्कीच होते आणि मग त्यासाठी शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर मी पुण्यात येण्याचा निर्णय घेतला. पुण्यात मी सुवर्णा माटेगावकर, प्रतिभा कर्णिक आणि डॉक्टर संजीव शेंडे यांच्याकडे संगीताचे शिक्षण घेऊ लागले. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून मानसशास्त्राची मी पदवी घेतली. संगीतासाठी जेव्हा घर सोडून पुण्यात आले, तेव्हापासूनच स्ट्रगल सुरू झाला. घरच्यांपासून दूर राहायला येणे हा खूप मोठा स्ट्रगल असतो. साम मराठी वाहिनीवर 'साम गुरुकुल' नावाचा एक रियालिटी शो होता. त्यात मी सहभागी झाले होते. तेव्हा अनेक संगीतकारांनी माझी कला पाहिली, माझी गाणी ऐकली. मी काही कार्यक्रमातूनसुद्धा गात होते. हळूहळू लोक मला ओळखू लागले होते. संगीतकार संमेलन जेव्हा कमलेश भडकमकर यांच्या संस्थेने आयोजित केले होते, त्या संमेलनात विविध संगीतकारांनी संगीतबद्ध केलेल्या गाण्यांची एक सीडी प्रकाशित झाली होती, त्यात निलेश मोहरीर यांनी स्वरबद्ध केलेले 'पावसा रे पावसा' हे गीत मी गायले, ते खूप लोकप्रिय झाले.*

*माझ्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'दुनियादारी' चित्रपटासाठी मी आणि आदर्श शिंदे यांनी गायलेले 'देवा तुझ्या' हे गीत. तो माझ्या आयुष्यातील खूप महत्त्वाचा टप्पा कारण संगीतकार अमितराज यांनी मला ती संधी दिली, ते गाणे हिट झाले. अमितराज यांच्याच 'वंशवेल' चित्रपटात मी गायले. 'मंगलाष्टक वन्स मोअर'साठी मी आणि मंगेश बोरगावकर यांनी गायलेले 'उसवले धागे' हे गीतही लोकप्रिय झाले. या गाण्याकरिता मला रेडिओ मिरची पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते. 'दुसरी गोष्ट'साठी मला सर्वोत्कृष्ट गायिकेचा 'झी गौरव पुरस्कार' मिळाला. आता लोकांच्या अपेक्षा वाढल्या होत्या आणि ते खूप मोठ्ठे आव्हान असते. इथे रोज स्वतःला सिद्ध करावे लागते. मला या क्षेत्रात येताना कोणीच गॉडफादर नव्हता. त्यामुळे सगळी मेहनत स्वतःला करावी लागत होती. आता मी आणि माझे बाबा मुंबईत वास्तव्य करतो, माझी आई इंदूरला असते. हा स्ट्रगल मला आजही करावा लागतो. घरच्यांची खूप आठवण येत असते. आज मुंबईत खूप स्पर्धा आहे, रोज नव्या गायक-गायिकांची एक नवी फळी या क्षेत्रात येत असते. त्यामुळे इथे सध्या फार कमी वेळात एखाद्याला या क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करावे लागते. इथे टेक्श्चर ओरीयनटेड गावे लागते. म्हणजे असे की, तुमच्या आवाजाचे टेक्श्चर वेगळे हवे. तुम्हाला सगळ्या प्रकारची गाणी गाता आली पाहिजेत. त्यामुळे सतत आपला या अपेक्षांशी स्ट्रगल चालू असतो. पूर्वी कसे होते की एकच गायक वर्षानुवर्षे खूप गायचा, त्याला तशी संधी पण मिळत होती. आता संधी आहे आणि स्पर्धा पण तितकीच आहे. कोणता ट्रेंड कधी येईल काही सांगता येत नाही. त्यामुळे माझ्या मते या क्षेत्रात स्वतःला टिकवणे हे खूप मोठे आव्हान आहे. मी तमिळ आणि ओरियामध्ये पण गायले आहे. 'दि ब्लू बेरी हंट' या हिंदी फिल्मसाठी पण मी गायले आहे. एक अष्टपैलू गायिका अर्थात व्हर्सटाइल सिंगर म्हणून माझी ओळख व्हावी असे मला वाटते.*

**संगीतासाठी जेव्हा घर सोडून पुण्यात आले, तेव्हापासूनच स्ट्रगल सुरू झाला. घरच्यांपासून दूर राहायला येणे हा खूप मोठा स्ट्रगल असतो. माझ्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'दुनियादारी' चित्रपटासाठी मी आणि आदर्श शिंदे यांनी गायलेले 'देवा तुझ्या' हे गीत. तो माझ्या आयुष्यातील खूप महत्त्वाचा टप्पा.**

***शब्दांकन : गणेश आचवल***
atharvabharadhwaj@gmail.com



# रोजच परीक्षा

## आर्या आंबेकर

***माझी*** *आई ही गायिका आहे आणि बाबा डॉक्टर आहेत. मी आईच्या पोटात असल्यापासून माझ्यावर स्वरांचे संस्कार झाले आहेत. आई गर्भवती असताना गाण्याचा रियाज करायची, ते गर्भसंस्कार माझ्यावर झाले. माझी आई नेहमी मला एक किस्सा सांगते. आई एकदा ' पुरिया धनश्री ' राग गात होती आणि माझी पणजी मला सांभाळत होती. मी तेव्हा पावणेदोन वर्षाची होते. जसे सूर आई लावत होती, मी पण तसे सूर लावण्याचा प्रयत्न करत होते. मी आईकडे गाणे शिकू लागले. वयाच्या सहाव्या वर्षीच गाण्याची पहिली परीक्षा दिली. मी अभ्यासात हुशार होते. त्यामुळे पहिल्यापासूनच मेरीट विद्यार्थिनी होते. मी आठवीत असताना प्रशांत दामले फॅन फाउंडेशनची राज्यस्तरीय गाण्याची स्पर्धा होती, त्यात आम्हाला चार भक्तीगीत, भावगीत आणि नाट्यगीत तयार करायची होती. त्या स्पर्धेत मी विजेती ठरले.*

*'सा रे ग म प'चं लिटील चॅम्प पर्व माझ्या आयुष्यात वेगळे वळण आणणारे ठरले. जेव्हा ऑडिशन होत्या तेव्हा मी फिरायला कोकणात गेले होते. मी ऑडिशनसाठी आले तेव्हा माझा आठशेवा नंबर होता, बाहेर प्रचंड ऊन होते. मी ऑडिशन दिली आणि माझी निवड झाल्याचे कळल्यावर थोडे टेन्शन आले होते. एका नव्या जगात पाऊल ठेवले होते. मुंबईत २६ नोव्हेंबरचा दहशतवादी हल्ला झाला, त्याच्या दुसऱ्या दिवशी आमचे शुटींग होते, पण ते रद्द झाले होते. आम्ही हॉटेलमध्ये होतो आणि रात्री निरोप आला. त्या हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिस अधिकाऱ्यांसाठी श्रद्धांजली वाहणारा कार्यक्रम करायचा आहे. संपूर्ण रात्र जागून आईने माझी चार गाण्यांची तयारी करून घेतली होती. शिवाजी पार्कवर एक विशेष कार्यक्रम झाला. तेव्हा मुंबईच्या महापौरांनी मला 'ए मेरे वतन के लोगो' हे गीत गाण्याकरिता आमंत्रित केले होते, हा एक अविस्मरणीय क्षण होता. 'सा रे ग म प' हा आयुष्यातील एक मोठा प्रवास होता. हृदयनाथ मंगेशकर हे देखील आम्हा बाल कलाकारांकडून गाणी बसवून घेण्यास आले होते आणि त्यांनी आम्हाला खूप मोलाचे मार्गदर्शन केले होते. अवधूत गुप्ते आणि वैशाली सामंत हे आम्हाला एपिसोडनंतर ज्या टिप्स द्यायचे, त्या माझी आई लिहून ठेवायची आणि पुढच्या एपिसोडची तयारी मी तशी करायचे. या कार्यक्रमामुळे गाणे हेच करिअर करायचे हे नक्की झाले होते. श्रीनिवास खळे यांनी 'कळी' नावाच्या चित्रपटासाठी माझ्याकडून गाणे गाऊन घेतले. तेव्हा त्यांच्याकडे गाणारी मी शंभरावी गायिका होते हे सांगायला मला विशेष आनंद होत आहे.*

*'रमा माधव', 'बालगंधर्व', 'योद्धा' या चित्रपटासाठी मी गायले आहे. यशवंत देव, आनंद मोडक, अविनाश-विश्वजित, पंकज पडघन, डॉ. सलिल कुलकर्णी अशा अनेक मान्यवर संगीतकारांकडे मी गायले आहे. 'दिवा लागू दे रे' नावाचा माझा अल्बम प्रकाशित झाला आहे. मी गायलेले 'दिल दोस्ती दुनियादारी'चे शीर्षकगीत लोकांना खूप आवडते, या क्षेत्रात सर्वात महत्त्वाचे आव्हान काय असेल तर स्वतःचे स्थान टिकवून ठेवणे. रोज नवीन नवीन कलाकार येत आहेत. त्यामुळे रोजच इथे परीक्षा असते, स्वतःला सिद्ध करावे लागते. रियाज कायम करायलाच हवा. मुख्य म्हणजे बर्फाचा गोळा, आइस्क्रीम, चिंच असे पदार्थ मला खूप आवडतात, पण ते खाता येत नाहीत. ते पथ्य पाळावेच लागते. मेहनत घेतल्याशिवाय या क्षेत्रात स्वतःला सिद्ध करताच येणार नाही. मेहनत तुम्हाला यशाच्या दिशेने घेऊन जाते.*

**या क्षेत्रात सर्वात महत्त्वाचे आव्हान काय असेल तर स्वतःचे स्थान टिकवून ठेवणे. रोज नवीन नवीन कलाकार येत आहेत. त्यामुळे रोजच इथे परीक्षा असते, स्वतःला सिद्ध करावे लागते. रियाज कायम करायलाच हवा. मुख्य म्हणजे बर्फाचा गोळा, आइस्क्रीम, चिंच असे पदार्थ खाता येत नाहीत. ते पथ्य पाळावेच लागते. मेहनत घेतल्याशिवाय या क्षेत्रात स्वतःला सिद्ध करताच येणार नाही. मेहनत तुम्हाला यशाच्या दिशेने घेऊन जाते.**

***शब्दांकन : गणेश आचवल***

atharvabharadhwaj@gmail.com

# बहुश्रुतता महत्त्वाची

## अनिरुद्ध जोशी



**मी** मुळात नागपूरचा. सातत्याने विविध स्पर्धांतून भाग घ्यायचो, गाणे शिकत होतो, बक्षिसे मिळवत होतो. बी कॉम झाल्यावर पुण्याला सिम्बॉयसिस कॉलेजमध्ये मी taxation या विषयात पुढचा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि कॅम्पस मुलाखतीतून मला हैद्राबाद येथे नोकरी पण मिळत होती. पण मग मनात विचार आले की, खरे तर मी संगीत शिकायला पुण्यात आलो होतो आणि एकीकडे सिम्बॉयसिसमधील अभ्यासक्रम पूर्ण केला होता, पण तेव्हा गाण्याकडे दुर्लक्ष झाले होते. घरच्यांशी बोललो आणि पुन्हा संगीतात एमए पुणे विद्यापीठातून करण्याचा निर्णय घेतला. ते पूर्ण केलं. 'सा रे ग म प'च्या एका शेड्यूलमध्ये रनर-अप झालो. तेव्हापासून लोक ओळखू लागले होते. कार्यक्रमाच्या खूप ऑफर्स येत होत्या. मी नागपूरला गेलो. कार्यक्रमात खूप बिझी झालो होतो, मानधन पण चांगले मिळत होते. पण मग विचार येत होते की, आपले स्वतःचे गाणे पण महत्त्वाचे आहे. २०१० मध्ये पुन्हा 'सा रे ग म प'च्या शेड्यूलमध्ये भाग घेतला आणि त्या पर्वाचा विजेता पण झालो. आता माझे करिअर एक वेगळे वळण घेणार होते. लोकांच्या अपेक्षा वाढल्या होत्या.

आपल्याला जर प्लेबॅक मिळवणे आवश्यक असेल तर आपल्याला संगीतकारांना भेटायला हवे, स्वतःची काही रेकॉर्डिंग ऐकवायला हवीत आणि या प्रोसेसला कंटाळता कामा नये. मी नागपूर-मुंबई असा प्रवास करू लागलो होतो आणि ते अर्थात माझ्यासाठी स्ट्रगलचा एक भाग होता. अशोक पत्की आणि अवधूत गुप्ते यांचा मी आवर्जून उल्लेख करेन. मी जेव्हा जेव्हा मुंबईला यायचो, तेव्हा तेव्हा ते मला वेळ द्यायचे, मला मार्गदर्शन करायचे. अवधूतने तर मला तू करिअरसाठी मुंबईत ये असे सांगितले होते. ज्यावेळी 'तुकाराम' चित्रपट निर्माण होत होता, तेव्हा एक गाणे मी माझ्या आवाजात रेकॉर्ड करून दिले. ते गाणे तीन-चार जणांनी रेकॉर्ड केले होते. पत्की काका म्हणाले की, नेमके कोण निवडले जाईल माहित नाही. पण जेव्हा चंद्रकांत कुलकर्णी आणि निर्माते यांनी माझ्या आवाजातील रेकॉर्डिंग ऐकले, तेव्हा त्यांनी त्या गीतांसाठी मला निवडले. अशोक पत्की आणि अवधूत गुप्ते या दोघांनीही या चित्रपटासाठी संगीत दिले आहे. या चित्रपटातील चार गाणी मी गायली आहेत.

या क्षेत्रात करिअर करणे हेच मोठे आव्हान म्हणायला हवे. कारण इथे कसलीही शाश्वती नाही. एखादा शो जिंकल्यावर पहिले चार-पाच महिने खूप काम आणि मग काही काळ कामच नाही असेसुद्धा इथे होऊ शकते. त्यामुळे पेशन्स ठेवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. इथे महिना ठराविक उत्पन्न मिळेलच असे नाही. त्यामुळे संगीत हे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून विचार करताना तो निर्णय खूप काळजीपूर्वक घ्यावा लागतो. आजच्या काळात म्युझिकचा ट्रेंड दर दोन वर्षांनी बदलत चालला आहे. त्यामुळे वेगवेगळ्या पद्धतीचे तुम्हाला गाता आले पाहिजे. प्रत्येक गायकाने बहुश्रुत असायला हवे. विविध कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. आता मी मुंबईत राहू लागलो आहे. मी अशोक पत्की यांच्या काही कार्यक्रमात गायलो होतो, तसेच अवधूत गुप्ते याच्या कार्यक्रमात देखील मी गात असतो. सध्याच्या काळात मार्केटिंगचा जमाना असल्याने तुम्ही जास्तीत जास्त लोकांपर्यंत आपली कला कशी पोचवता हे खूप महत्त्वाचे आहे. त्यासाठी सोशल मिडिआचा वापर कसा करता हे देखील महत्त्वाचे आहे. माझी पत्नी रसिका देखील याच क्षेत्रात आहे. तिचाही पाठिंबा मला कायम मिळत असतो.

**इथे कसलीही शाश्वती नाही. एखादा शो जिंकल्यावर पहिले चार-पाच महिने खूप काम आणि मग काही काळ कामच नाही असेसुद्धा इथे होऊ शकते. त्यामुळे पेशन्स ठेवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. इथे महिना ठराविक उत्पन्न मिळेलच असे नाही. त्यामुळे संगीत हे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून विचार करताना तो निर्णय खूप काळजीपूर्वक घ्यावा लागतो.**

*शब्दांकन : गणेश आचवल*

atharvabharadhwaj@gmail.com



# अडचण हीच संधी

## सावनी रवींद्र

*‘**भा**वसरगम’मध्ये मी गाऊ लागले, तेव्हा मला खूप काही शिकायला मिळाले. पंडित हृदयनाथ मंगेशकर म्हणजे एक विद्यापीठ आहे असे मी म्हणेन. ‘भावसरगम’चे मी शंभराहून अधिक प्रयोग केले आहेत, तो अनुभव मला खूप काही देऊन जाणारा ठरला. आपले स्वतःचे गाणे कसे मांडावे हे मी त्यांच्याकडून शिकले.*

*माझ्या आईवडिलांनी मला या क्षेत्रात येण्यासाठी अर्थातच पाठिंबा दिला. त्यामुळे घरचा सपोर्ट मिळवण्यासाठी जे स्ट्रगल करावे लागते, ते माझ्या बाबतीत करावंच लागलं नाही. शास्त्रीय संगीतापेक्षा माझा अधिक ओढा सुगम संगीताकडे आहे. आणि माझ्या आवाजाची जातकुळी ही सुगम संगीताला जास्त योग्य आहे.*

*सुरुवातीला रियालिटी शो वगैरेचा मी कधी विचारच केला नव्हता. रियालिटी शोमध्ये कलावंताचे गुण खरेच दिसतात का, असे मला वाटायचे आणि मी कधी अशा कोणत्या कार्यक्रमात सहभागी होईन असे मला वाटले पण नव्हते. झी मराठीच्या ‘सा रे ग म प’चे दहावे पर्व सुरू होणार होते आणि मुळात प्रोफेशनल असणाऱ्या गायक-गायिकांचा सहभाग त्यामध्ये असणार होता आणि झीकडून थेट मला याकरिता विचारले गेले. संगीतकार अजय-अतुल त्याचे जज असणार होते. एक वेगळा अनुभव घ्यायला काय हरकत आहे, या हेतूने मी होकार दिला. त्यात मी अंतिम पाचजणांमध्ये होते. असे शो म्हणजे गायकाच्या आणि गायिकेच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाची परीक्षा असते असे मी म्हणेन. कारण तिथे तुम्हाला स्पर्धेत सहभागी व्हायचे असते. कधीकधी तर आज गाणे दिले जाते आणि उद्या शुटींग असते. तीन मिनिटाच्या गाण्यासाठी दिवसभर सुद्धा शुटींग असते. या शेड्यूलशी रुळायला मला खूप वेळ लागला आणि त्यात मी आजारीसुद्धा पडले. पण स्पर्धेत भाग घेतला, शो मस्ट गो ऑन. तुम्हाला गाणे सादर करावेच लागते. त्या शोमध्ये सहभागी झाल्याने मला खूप काही शिकता आले, आपला स्वर नेमका कोणत्या गाण्यांना जास्त चांगला आहे आणि आपल्या मर्यादा काय आहेत हे सुद्धा शिकता आले.*

*मी काम मिळवण्यासाठी कधीच गाणे केले नाही, तर पॅशन (passion) म्हणून गाणे केले. आमच्या नादब्रह्म नावाच्या संस्थेतर्फे अनेक कार्यक्रमांची निर्मिती होत असते. तेव्हा आईवडिलांचे एक वाक्य मी कायम ध्यानात ठेवलंय. ते म्हणतात, एखादा कार्यक्रम करताना काही अडचण आली, तर त्या अडचणीला संधी समजा आणि पुढे जा. मी तेच शिकले. आम्ही ‘लव्ह आज कल’ नावाचा एक सांगीतिक कार्यक्रम पण केला होता. तसेच ‘ब्लॅक ॲण्ड व्हाईट’ नामक एका कार्यक्रमात माझा सहभाग असतो आणि या कार्यक्रमाचे आम्ही परदेशात सुद्धा दौरे केले आहेत.*

*सध्या मी दर आठवड्याला यू ट्यूबवर ‘सावनी अनप्लग्ड’ म्हणून माझ्या गाण्यांचे व्हिडीओ अपलोड करते. नुकताच मी एका तमिळ अल्बमचा म्युझिक व्हिडीओ पण केला, तसेच तमिळ फिल्मसाठी पण गायले आहे. ‘होणार सून’मधील मी गायलेली गाणी खूप लोकप्रिय झाली आहेत. गेल्या वर्षीच्या बीएमएममध्ये मी अजय-अतुल यांच्या कार्यक्रमात परफॉर्म केले होतं. त्यांनी संगीत दिलेल्या ‘नीलकंठ मास्तर’ नामक फिल्मसाठी पण मी गायले आहे.*

**मी काम मिळवण्यासाठी कधीच गाणे केले नाही, तर पॅशन (passion) म्हणून गाणे केले. आईवडिलांचे एक वाक्य मी कायम ध्यानात ठेवलंय. ते म्हणतात, एखादा कार्यक्रम करताना काही अडचण आली, तर त्या अडचणीला संधी समजा आणि पुढे जा. मी तेच शिकले.**

***शब्दांकन : गणेश आचवल***
atharvabharadhwaj@gmail.com

# सातत्याने अभ्यास हवा

**आनंदी जोशी**



*'सा रे ग म प'चे सहा महिने म्हणजे एक वेगळाच अनुभव होता. स्वतःला समृद्ध करणारा अनुभव होता. माझ्या नावाला आणि चेहऱ्याला ओळख मिळाली होती. त्यानंतर सातत्याने मी एक-दोन वर्ष खूप कार्यक्रमांतून गात होते. दौरे करत होते. पण मग त्यात खूप दगदग होऊ लागली आणि मी विचार करू लागले की, आपल्याला नक्की काय करायचे आहे? आपण एका ध्येयावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. मग मी कार्यक्रमांची संख्या कमी केली. विविध प्रकारचे संगीत ऐकले पाहिजे असे ठरवले आणि या सगळ्यात मला मदत करणारा ठरला तो मुंबई विद्यापिठाचा युवा महोत्सव. विद्यापीठ क्लब हाउसमधील चाळीस दिवस तर खूप काही शिकवून गेले. तिथे माझी ओळख आदर्श शिंदे याच्याशी झाली. आदर्शकडून सुद्धा मी खूप काही शिकले. संगीतात करिअर करताना प्रत्येक गायकाने स्वतःचा अल्बम करायला हवा असे मला वाटते. कारण तो त्या गायकाच्या किंवा गायिकेच्या अभ्यासाचा भाग असतो. नुसते चित्रपट संगीत या एकाच गोष्टीवर अवलंबून राहून कसे चालेल? गाण्याचे अनेक प्रकार गाता आले पाहिजेत. मी मिथिलेश पाटणकर यांनी स्वरबद्ध केलेला 'आनंदी' याच शीर्षकाचा अल्बम केला. अल्बम करताना एक गोष्ट जाणवली की, ज्या संगीतकाराचे गाणे तुम्ही गात आहात, त्याला एक माणूस म्हणून जर तुम्ही ओळखू लागलात, तर गाण्यामध्ये त्या भावना चांगल्या अर्थाने प्रकट करता येतात. अल्बम हा कलाकाराच्या आयुष्यातील एक टप्पा आहे असे मला वाटते.*

*मी फिल्म्ससाठीसुद्धा गाऊ लागले होते. या क्षेत्रात तुम्ही स्वतःला कसे प्रेझेंट करता हे पण महत्त्वाचे आहे. तुम्ही केलेले काम तुम्ही विविध संगीतकारांना ऐकवले पाहिजे. आपण नुसते चांगले कलाकार असून चालत नाही, तर आपले गाणे लोकांपर्यंत आणि मान्यवर संगीतकार लोकांपर्यंत कसे पोचते हे महत्त्वाचे आहे.*

*'दुनियादारी'मध्ये मी 'स्वप्न माझे आज नव्याने फुलले, अर्थ सारे स्पर्शाने उलगडले' अशा दोनच ओळी गायल्या होत्या. त्या उर्मिला कानेटकर या अभिनेत्रीवर चित्रित झाल्या होत्या. पण त्या दोन ओळींनी सुद्धा मला खूप चांगला प्रतिसाद मिळाला.*

*आजच्या काळात संगीत हे करिअर करताना कला, त्यातील पैसा आणि कलाकाराला मिळणारी प्रसिद्धी या साऱ्या गोष्टींचा मेळ जमवावा लागतो आणि ते एक मोठे आव्हान आहे.*

*प्रत्येक कलाकाराने चांगली नाटके पहावीत, विविध संगीत ऐकावे, भरपूर फिरावे, चांगले चित्रपट पहावे. तो अनुभव एक सिंगर म्हणूनसुद्धा आपल्याला खूप काही देऊ शकतो. मला आठवतंय मी 'बिहू' नावाचा एक लोकगीत प्रकार नृत्यात सादर केला होता आणि तेव्हा मी 'बिहू'बद्दल जाणूनसुद्धा घेतले होते. मी ब्राझिलीअन म्युझिकपण ऐकले आहे. त्या संगीत प्रकारातून मला परदेशी फिल्म बघण्याची पण आवड निर्माण झाली, मग परदेशातील संगीत कसे आहे, त्यांच्या शैली कशा आहेत, हा अभ्यास पण मी करत असते.*

*मी नुकतेच साऊथमध्ये गायले. चेन्नईमध्ये रेकॉर्डिंग झाले, तेव्हा एक गोष्ट नव्याने कळली. दाक्षिणात्य भाषात एका कलाकाराला खूप उत्तम काम मिळू शकते. तिथे पैसा पण आहे आणि समाधान पण आहे. या क्षेत्रात काम करताना समाधान आणि पैसा या दोन्ही गोष्टी खूप महत्वाच्या आहेत. पण त्यांचा योग्य मेळ घालता आला पाहिजे.*

**आजच्या काळात संगीत हे करिअर करताना कला, त्यातील पैसा आणि कलाकाराला मिळणारी प्रसिद्धी या साऱ्या गोष्टींचा मेळ जमवावा लागतो आणि ते एक मोठे आव्हान आहे असे मला वाटते.**

***शब्दांकन : गणेश आचवल***

atharvabharadhwaj@gmail.com



# फ्युजन संगीताला पर्याय नाही!

**जसराज जोशी**

**फ्युजन म्हणजे केवळ भारतीय अभिजात आणि पाश्चात्य अभिजात संगीताचा मिलाफ अशी काही जणांची समजूत आहे. ती चुकीची आहे. कोणी लावणी आणि बिहू (आसाम) या संगीत प्रकारांना एकत्र आणले तर ते फ्युजनच ठरते. अशा प्रकाराने आसाम आणि महाराष्ट्राच्या संस्कृतींना एकमेकांची ओळख होईल. म्हणून फ्युजन हा केवळ संगीत प्रकारांचाच नाही, तर संस्कृतींचा देखील मिलाफ आहे. असा मिलाफ घडवून संगीत आणि त्याद्वारे रसिकांचं जीवन समृद्ध, विविधतेने नटलेलं बनवणे हेच फ्युजनचे काम आहे, आणि मला वाटतं ह्यातच त्याचे यश आहे.**

**१९९०**च्या दशकांनंतर तंत्रज्ञानामुळे झालेला बदल हा या पूर्वी कधीही झाला नसावा इतका वेगाने आणि मानवी जीवनावर दूरगामी परिणाम करणारा आहे. याचं प्रतिबिंब आपल्या सांस्कृतिक जीवनावर देखील पडलं. आपल्या अभिजात भारतीय संगीतात युवा वर्गाचा वाढता वावर; विविध परदेशी वाहिन्यातून घडणारं जागतिक संगीताचं दर्शन, आधी केवळ श्राव्य असणाऱ्या संगीताला दृष्य माध्यमाची मिळालेली साथ व त्यामुळे सादरीकरणाला आलेले वेगळे स्वरूप, विविध पाश्चात्य वाद्य व शैलीचा संगीतातील मुक्त वापर यातून संगीत बदलू लागलं. 'फ्युजन संगीत' हा अलीकडच्या वीस वर्षातील प्रचलित शब्द असला तरी आपल्या संगीतात वेगवेगळे प्रवाह मिसळल्याने बदल अनेक वर्षांपासून होतच होते पण त्याला गती जागतिकीकरणाने मिळाली. फ्युजन म्हणजे माझ्या मते दोन  गोष्टींचे मिश्रण. संगीतातले फ्युजन म्हणजे दोन संगीत प्रकारांचे केलेले असे मिश्रण, ज्याने एक तिसरा प्रकार (genre) निर्माण होईल. मी आणि माझा बँड नेहमी हा प्रयत्न करतो की दोन 'जीव' अशा पद्धतीने एकत्रित करावेत की तयार होणारी गोष्ट ही नवीन असेल. नुसती भारतीय अभिजात बंदिश घेऊन त्यावर वेस्टर्न संगीत संयोजन करण्याला मी फ्युजन समजत नाही. आम्ही हा प्रयत्न करतो की, अभिजात संगीताच्या आणि वेस्टर्न संगीताच्या भाषांचा वापर एखादी नवीन रचना करण्यासाठी कसा उपयोग करता येईल आणि असे फ्युजन केल्यास भारतीय अभिजात संगीताचा ऱ्हास होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण ते संगीत त्याच्या जागी ठाम आहे, ही फक्त एक त्याची उप-शाखा आहे. उलट पंडित रविशंकर, उस्ताद अमजद अली खाँसाब यांच्यापासून ते रशीद खान, शंकर महादेवन अशा दिग्गज कलाकारांनी फ्युजनद्वारे भारतीय संगीताची भाषा पूर्ण जगभरात पोहोचवली, तिचा प्रसार केला. ज्याने आपल्या अभिजात संगीताचा ऱ्हास न होता ते अजून समृद्ध झाले असेच म्हणावे लागेल.

भारतीय समाजाचा सांस्कृतिक श्वास संगीत आहे, त्याच्या जीवनशैलीचा तो अविभाज्य भाग आहे आणि दैनंदिन जीवनातील प्रत्येक प्रसंगात संगीताशी त्याचे नाते जुळले जाते. मग ते कार्य जन्म, विवाह किंवा मृत्यू ह्यांच्याशी संबंधित असो, की ते श्रमाशी जोडलेले असो. इतक्या समृद्ध सांगीतिक वातावरणात, वेगवेगळ्या संगीत प्रकारात देवाण-घेवाण होणे साहाजिकच होते, आणि तसेच झाले. उदाहरणार्थ, मध्य युगात प्रचलित असलेल्या ध्रुपद या गायनप्रकाराचा काही अंश नंतरच्या ख्याल गायकीत दिसतो. आणि ठुमरी गायकीत ख्यालाचा आणि लोकसंगीताचा अंश दिसतो. धार्मिक संगीतातही हेच दिसून येते, आणि विसाव्या शतकातल्या फिल्म संगीतात तर केवढेतरी सांगीतिक प्रभाव ऐकायला मिळतात. हे सर्व प्रभाव फ्युजन म्युझिकचेच अंग असून त्या-त्या संगीत प्रकारांना अशी एक नवीन दिशा देऊन गेले की, जिच्यामुळे नवीन संगीतप्रकार जन्माला आले किंवा या प्रभावांना आधीच्या संगीतप्रकारांनी स्वतःत सामावून घेतले. अमेरिकेत जसे जॅझ-रॉक सारखे दुहेरी प्रकार तयार झाले तसे भारतात तेवढ्या प्रमाणात झाले नाहीत हे खरे आहे. पण यातही आता स्वागतार्ह बदल घडताना दिसून येतात.

अजून एक गोष्ट म्हणजे फ्युजन म्हणजे



केवळ भारतीय अभिजात आणि पाश्चात्य अभिजात संगीताचा मिलाफ अशी काही जणांची समजूत आहे. ती चुकीची आहे. कोणी लावणी आणि बिहू (आसाम) या संगीत प्रकारांना एकत्र आणले तर ते फ्युजनच ठरते. अशा प्रकाराने आसाम आणि महाराष्ट्राच्या संस्कृतींना एकमेकांची ओळख होईल. म्हणून फ्युजन हा केवळ संगीत प्रकारांचाच नाही, तर संस्कृतींचा देखील मिलाफ आहे. असा मिलाफ घडवून संगीत आणि त्याद्वारे रसिकांचं जीवन समृद्ध, विविधतेने नटलेले बनवणे हेच फ्युजनचे काम आहे, आणि मला वाटतं ह्यातच त्याचे यश आहे.

फ्युजन गाताना माझ्यासमोर शंकर महादेवन ह्यांचा आदर्श असतो. शंकरजी यांच्या गायकीतच मुळात उत्तर भारतीय आणि कर्नाटकी संगीताचा सुरेल मिलाफ आहे. शिवाय ते 'शक्ती' या बँडमधे जे अभिनव प्रयोग करतात ते असे असतात की आपल्याला दुसरीकडे कुठे ऐकू येत नाही. वेस्टर्न संगीताबरोबर गाताना त्यांची गायकी, सरगम, आलाप आणि त्यांच्या रचना अशा असतात ज्या शुद्ध भारतीय अभिजात गायकीत गायल्या जाऊ शकत नाहीत.

मराठीतले फ्युजन म्हटल्यावर ठळकपणे डोळ्यांसमोर येतात ती अवधूत गुप्ते-वैशाली सामंत ह्यांची 'ऐका दाजीबा'सारखी गाणी किंवा स्वप्नील बांदोडकर-अशोक पत्की यांचे 'राधा ही बावरी'. मराठी लोकगीताबरोबर पाश्चात्य संगीत संयोजन ह्यांमधे वापरण्यात आले आहे. या गाण्यांनी मराठीत फ्युजनचा पायंडा पाडला. ही उत्कृष्ट फ्युजनची उदाहरणे आहेतच, पण त्यानंतर मात्र मराठीत विशेष प्रयोग झाले नाहीत. किंबहुना लोकगीत आणि वेस्टर्न ह्या मिश्रणाशिवाय दुसरे काही बनले नाही असे मला वाटते. मराठीमधे फ्युजन आणून त्याचा जगभरात प्रसार व्हायला नक्कीच मदत होईल. उत्तम उदाहरणे म्हणजे तौफ़ीक़ कुरैशी- केशव बडगे ह्यांचे rhydhun अल्बममधील 'जी जी रे', ज्यात गोंधळासारखे मराठी लोकसंगीत आणि विविध तालवाद्ये ह्यांच्या मिलाफ आहे, आणि अजय- अतुल ह्यांचा नटरंग! लोकगीतांमधे सिम्फनीचा उत्तम वापर झाल्याने 'अप्सरा आली' आणि 'खेळ मांडला'सारखी गाणी मराठी न कळणाऱ्या लोकांनाही तितकीच आवडतात. मराठी अभिजात संगीताला जगाच्या नकाशावर न्यायचे असेल तर फ्युजन संगीताला पर्याय नाही.

मी माझ्या बँडमधे प्रामुख्याने अभिजात आणि पाश्चात्य रॉक, जॅझ ह्यांचे फ्युजन करतो. हे अगदीच प्राथमिक आहे ह्याची मला कल्पना असून भविष्यात मराठीत अजून नवीन प्रयोग करण्याची इच्छा आहे. विशेषतः संतवाङ्मय जे कालातीत आहे, प्रत्येक काळासाठी लागू आहे, ते फ्युजनच्या माध्यमाने आजच्या काळासाठी नव्या पद्धतीने सादर करण्याची इच्छा आहे.

**शब्दांकन : धनंजय कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९९२११९५९२६
dskul21@gmail.com

**मराठीतले फ्युजन म्हटल्यावर ठळकपणे डोळ्यांसमोर येतात ती अवधूत गुप्ते-वैशाली सामंत ह्यांची 'ऐका दाजीबा'सारखी गाणी किंवा स्वप्नील बांदोडकर-अशोक पत्की यांचे 'राधा ही बावरी'. मराठी लोकगीताबरोबर पाश्चात्य संगीत संयोजन ह्यांमधे वापरण्यात आले आहे. या गाण्यांनी मराठीत फ्युजनचा पायंडा पाडला. ही उत्कृष्ट फ्युजनची उदाहरणे आहेतच, पण त्यानंतर मात्र मराठीत विशेष प्रयोग झाले नाहीत. किंबहुना लोकगीत आणि वेस्टर्न ह्या मिश्रणाशिवाय दुसरे काही बनले नाही असे मला वाटते.**



## गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका

अरुण खोपकर

रसिकमान्य, विद्वज्जनांनी वाखाणलेले, सिनेमावरील सर्वोत्कृष्ट लेखनाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळालेले पहिले मराठी पुस्तक. हिंदी, इंग्रजी, इटालिअन आणि फ्रेंच भाषांत अनुवादित. नवे लेखन व नवी छायाचित्रे यांसहित. शब्दार्थ आणि चित्रार्थ यांना नव्या लयीत बांधलेल्या देखण्या ग्रंथरूपातली नवी आवृत्ती.

पाने : २७८
किंमत : ₹ ४५०
पुठ्ठाबांधणी




## प्रतिमा-प्रचीती

नितीन दादरावाला

विदेशातील पंचवीस छायाचित्रकारांचा परिचय करून देणारे, कवी आणि चित्रकार नितीन दादरावाला यांचे अनोखे पुस्तक. उत्तमोत्तम छायाचित्रांचा स्वतंत्रपणे आस्वाद घेता-घेता छायाचित्रांच्या इतिहासातून वावरण्याचा आनंद मिळवून देणारे लिखाण. लोकवाङ्मय गृहाच्या उत्कृष्ट निर्मितीमूल्यांसहित.

पाने : ४२४
किंमत : ₹ ५००
पुठ्ठाबांधणी




## चित्रव्यूह

अरुण खोपकर

अरुण खोपकर यांना अगदी लहानपणीच मामा वरेरकर, पु, ल. देशपांडे अशा नामवंतांचा सहवास लाभला. याशिवाय बारा भाषा येणारा पानपट्टीवाला, बालमोहन शेजारचे आंब्याचे झाड अशा अनेक अनुभवांनी त्यांचे बालविश्व समृद्ध झाले आणि पुढे कलाक्षेत्रात आल्यावर विस्तारतच गेले. त्या साऱ्याचे वाचकालाही श्रीमंत करणारे चित्रण.

पाने : २००
किंमत : ₹ ३५०
पुठ्ठाबांधणी




## चित्रपटाचे सौंदर्यशास्त्र

प्रा. सतीश बहादूर
अनुवाद : सुषमा दातार

पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये वीस वर्षे चित्रपट रसग्रहणाचा अभ्यासक्रम शिकवणारे प्रा. सतीश बहादूर यांच्या दिशादर्शक लेखनाचे मराठी भाषांतर. 'रुपवाणी'त वाचकप्रिय झालेली लेखमाला आकर्षक पुस्तकाच्या स्वरूपात.

पाने : ८८
किंमत : ₹ १५०



## चलत्-चित्रव्यूह

अरुण खोपकर

विविध पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या अरुण खोपकर यांना कला-चित्रपटांच्या निर्मितीच्या काळात महाराष्ट्रातल्या आणि भारतातील महान कलाकारांना जवळून पाहण्याची संधी मिळाली. मुख्य म्हणजे कलांबद्दलच्या त्यांच्या कुतूहलाने त्यांच्या सर्जनशील अंतरंगाचा वेध घेता आला. त्यासंबंधी जाणीवपूर्वक केलेले लेखन.

पाने : २७४
किंमत : ₹ ४२५
पुठ्ठाबांधणी




## दृश्यकला आणि साहित्य

वसंत आबाजी डहाके

साहित्याच्या भाषेशी म्हणजे प्रतिमा-प्रतीक-रुपक-मिथकयुक्त भाषेशी दृश्यकलांच्या भाषेचा अनुबंध कशा रीतीने जोडता येतो, चित्र, छायाचित्र, रंगभूमी, चित्रपट या कलाक्षेत्रांतील विचारव्यूहांचा, निर्मितीचा, प्रयोगांचा, बदलांचा संदर्भ साहित्याला आणि साहित्यविचाराला का ध्यानात घ्यावा लागतो यावर भाष्य करणाऱ्या लेखांचा संग्रह.

पाने : २५०
किंमत : ₹ २००

पिपल्स बुक हाऊस : १५, मेहेर हाऊस, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ : २२८७ ३७६८
लोकवाङ्मय गृह : भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादवी, मुंबई - ४०० ०२५ : २४३६ २४७४
फॅक्स : २४३१ ३२२०. E-mail : lokvangmayagriha@gmail.com

आमची निवडक पुस्तके BookGanga.com/newshunt.com वर उपलब्ध आहेत.

# मराठी 'ज्ञाना'ची चार'पीठे'

देदीप्यमान मराठी साहित्य परंपरेविषयीचा अभिमान अभिव्यक्त करण्यासाठी तसेच वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर या पूर्वीच्या ज्ञानपीठ विजेत्यांचे स्मरण करण्यासाठी आणि यावर्षीचा ज्ञानपीठ पुरस्कार विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे यांचे संपूर्ण महाराष्ट्राच्या वतीने अभिनंदन करण्यासाठी 'मर्मज्ञ-२०१५' या दिमाखदार सोहळ्याचे आयोजन गेट वे ऑफ इंडियावर करण्यात आले होते. ७ मे, २०१५ रोजी हा कार्यक्रम झाला.

समुद्राच्या फेसाळलेल्या संथ लाटांच्या पार्श्वभूमीवर हजारो मराठी रसिकांनी मायमराठी भाषेच्या साहित्य खजिन्याचा आस्वाद घेतला. राज्याच्या मंत्रिमंडळात जेव्हा मला मराठी भाषा व सांस्कृतिक कार्य विभागाची जबाबदारी मिळाली, तेव्हाच मी मराठी भाषा व संस्कृती याबाबतचा एखादा भव्य कार्यक्रम गेटवे ऑफ इंडियावर घ्यायचाच असे ठरवले. डॉ. नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे संधी मिळाली आणि या सोहळ्याद्वारे माझी इच्छा पूर्ण झाली.

चारही मराठी ज्ञानपीठ विजेत्या साहित्यिकांच्या कलाकृतींवर आधारित अभिवाचन-नाट्यप्रवेश-गायन असा अप्रतिम सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाला. साहित्य, नाटक, इत्यादी क्षेत्रांतील मान्यवरांसह सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनीही कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

महाराष्ट्राच्या कोट्यवधी नागरिकांच्या वतीने आपण मराठी साहित्य क्षेत्रातील दिग्गजांना मानाचा मुजरा अर्पण केला. या ज्ञानपीठ विजेत्यांच्या साहित्यामुळे खऱ्या अर्थाने मराठी भाषेचा व महाराष्ट्राचाही गौरव झाला आहे, या भावनेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या बारा कोटी नागरिकांच्या वतीने ज्ञानपीठ विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे यांचा गौरव केला. श्रीमती प्रतिभा नेमाडे यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला. पठडीबाज, ठोकळेबाज कार्यक्रम न करता, भाषणबाजी टाळून एक दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल उपस्थितांनी अतिशय समाधानाची भावना व्यक्त केली.

**अभिजात दर्जासाठी प्रयत्न**

मराठी भाषा विभागात आम्ही आतापर्यंत दोन विषयांवर लक्ष केंद्रित केले होते. एक अभिजात भाषेचा दर्जा आणि दुसरा, भाषा विकासाचे धोरण. 'मराठी भाषेचा विकास ही शासनाची जबाबदारी आहेच, पण हा लोकचळवळीचाही विषय आहे.' हा विचार केंद्रस्थानी ठेवूनच आम्ही अभिजात दर्जा मिळवण्यासाठीच्या प्रयत्नांत लोकांना सहभागी केले, एक पत्र मोहीम चालवली. सर्व स्तरांवरील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, ग्रंथालये, विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, प्रसारमाध्यमे इत्यादींना अभिजात दर्जा मिळवण्यासाठी साहित्य अकादमीच्या अध्यक्षांना पत्रे पाठवा असे आवाहन केले. या आवाहनाला उत्तम प्रतिसाद मिळाला. काही वृत्तपत्रांनी या विषयाला चांगली प्रसिद्धी दिली. हजारो पत्रे साहित्य अकादमीच्या अध्यक्षांना गेली.

अभिजात दर्जाबाबत केंद्रीय सांस्कृतिक मंत्र्यांना भेटलो, सर्वपक्षीय खासदारांना हा विषय संसदेत मांडा, असा आग्रह धरला.



**यंदाचे 'ज्ञानपीठ पारितोषिक विजेते' साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांचा मुंबईत 'गेट वे ऑफ इंडिया'च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार केला. अ.भा. नाट्य संमेलनाच्या अध्यक्ष फैय्याज, नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी, सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे, उद्योगमंत्री सुभाष देसाई, श्रीमती प्रतिभा नेमाडे, अ.भा. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे आणि साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा माधवी वैद्य त्यावेळी उपस्थित होते.**

# मराठी भाषा विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न



**मराठी भाषेच्या अभिजात दर्जाविषयीचा प्रस्ताव सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांनी केंद्रीय सांस्कृतिक मंत्री डॉ. महेश शर्मा यांच्याकडे दिल्लीत सादर केला.**

**लोकसहभाग प्रयत्न –**

- 'मराठी भाषेचा विकास ही शासनाची जबाबदारी आहेच, पण हा लोकचळवळीचाही विषय आहे'.
- प्रयत्नांत लोकांना सहभागी केले, एक पत्र मोहीम चालवली.
- सर्व स्तरांवरील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, ग्रंथालये, विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, प्रसारमाध्यमे इत्यादींना मी स्वत: पत्रे पाठवली आणि त्यांना साहित्य अकादमीच्या अध्यक्षांना पत्रे पाठवा, असे आवाहन केले.
- या आवाहनाला उत्तम प्रतिसाद मिळाला. काही वृत्तपत्रांनी या विषयाला चांगली प्रसिद्धी दिली. हजारो पत्रे साहित्य अकादमीच्या अध्यक्षांना गेली.

**केंद्रात पाठपुरावा –**

- अभिजात दर्जाबाबत मी केंद्रीय सांस्कृतिक मंत्र्यांना भेटलो (दि. ७ जाने, २०१५).
- ही प्रक्रिया आता अगदी अंतिम टप्प्यात आली आहे.
- मुख्य म्हणजे साहित्य अकादमीच्या भाषा तज्ज्ञ समितीने, 'मराठीला अभिजात दर्जा द्यावा,' अशी आग्रही शिफारस केंद्रीय सांस्कृतिक मंत्र्यांकडे केली आहे (४ फेब्रुवारी, २०१५).
- आता पुढे फक्त प्रशासकीय औपचारिकता बाकी आहे. कोणत्याही क्षणी हा निर्णय जाहीर होऊ शकतो.

**अभिजात दर्जा – सद्य:स्थिती –**

- केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाकडून केंद्रीय कायदा व न्याय विभाग, मनुष्यबळ विभाग व गृह विभागाकडे अभिजात दर्जाचा प्रस्ताव अभिप्रायासाठी गेला होता.
- कायदा व न्याय विभाग आणि मनुष्यबळ विभागाकडून सकारात्मक शेऱ्यासह प्रस्ताव सांस्कृतिक मंत्रालयाकडे आला आहे. गृहविभागाचा पाठपुरावा सुरू आहे.

साहित्य अकादमीतील मराठी भाषेच्या प्रतिनिधी असलेल्या साहित्यिकांचाही पाठपुरावा केला. ही प्रक्रिया आता अगदी अंतिम टप्प्यात आली आहे. मुख्य म्हणजे साहित्य अकादमीच्या भाषातज्ज्ञ समितीने, 'मराठीला अभिजात दर्जा द्यावा' अशी आग्रही शिफारस केंद्रीय सांस्कृतिक मंत्र्यांकडे केली आहे. आता पुढे फक्त प्रशासकीय औपचारिकता बाकी आहे. कोणत्याही क्षणी हा निर्णय जाहीर होऊ शकतो. अभिजात दर्जामुळे मराठीवर राज्यमान्यतेची मोहोर उमटणार आहे, तसेच भाषा विकासासाठी मोठा निधीही प्राप्त होणार आहे.

**भाषा विकास धोरण**

भाषा सल्लागार समितीने पुढील २५ वर्षांचे भाषाविकासाचे धोरण राज्यासमोर ठेवले आहे. या धोरणावर जास्तीत जास्त विचार व्हावा, अधिकाधिक अभिप्राय यावेत यासाठी आम्ही प्रयत्न केले. अभिप्राय मागवण्याची मुदत २५ फेब्रुवारीपर्यंत वाढवली. आम्ही राज्यातील नऊ विद्यापीठांमध्ये भाषा धोरणावर चर्चासत्रे योजली. विद्यापीठांतील मराठी भाषा विभागांनी पुढाकार घ्यावा, असा आग्रह केला. विद्यार्थी, प्राध्यापक, पत्रकार, साहित्यिक, भाषाप्रेमी, भाषातज्ज्ञ असे सुमारे १५०० जण यांत सहभागी झाले. यातूनच सुमारे १००० लिखित अभिप्राय आम्हाला मिळाले. यावरून एक चांगला कृती आराखडा तयार होईलच आणि याची अंमलबजावणी आम्ही टप्याटप्याने करू.

**साहित्य संस्कृती मंडळाकडून लेखकांच्या मानधनात वाढ**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या पुस्तक प्रकाशन योजनेअंतर्गत मंडळाने लिहून घेतलेल्या पुस्तकाच्या लेखकास प्रत्येक प्रकाशनार्थ आणि हस्तलिखितांचे परीक्षण करण्यासाठी नियुक्त केलेल्या तज्ज्ञांचे परिश्रम विचारात घेऊन त्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे. प्रकाशन योजनेअंतर्गत असणाऱ्या लेखक आणि परीक्षकांच्या मानधनात तब्बल सात वर्षांनी वाढ केली आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून राबविलेल्या पुस्तक प्रकाशन योजनेअंतर्गत पुस्तकाच्या लेखकास प्रत्येक प्रकाशनार्थ १००० शब्दांना ३०० रुपये आणि आलेल्या तज्ज्ञांना ५०० रुपये प्रति हस्तलिखित इतके मानधन पूर्वी देण्यात येत होते. मात्र यापुढे मानधनात वाढ करून लेखनासाठी प्रत्येक १००० शब्दांना ९०० रुपये आणि परीक्षण तज्ज्ञांना १ हजार ५०० रुपये एवढे मानधन मिळणार आहे.

- शासकीय नोंदकोष मराठी भाषेतून तयार करणार.
- महाराष्ट्रात सुमारे ६० बोली भाषा अस्तित्वात आहेत. या बोली भाषांचे डिजिटायझेशन करणार.
- आयटीआयच्या परीक्षा आता मराठीतून घेण्यात येणार.

**– विनोद तावडे**

- गृहविभागाकडून सकारात्मक प्रस्ताव येणे, सांस्कृतिक मंत्रालयाने कॅबिनेट नोट बनविणे आणि केंद्रीय मंत्रिमंडळाने प्रस्तावावर शिक्कामोर्तब करून 'मराठीला अभिजात दर्जा' देण्याचा निर्णय जाहीर करणे....या प्रक्रिया होणे बाकी आहे.
- हा एका अर्थाने प्रतिकात्मक विजय आहे. दर्जा मिळाल्यामुळे महाराष्ट्रात भाषाभिमानाची एक सार्थ लाट निर्माण होईलच. भाषाविकासासाठी भरीव निधीही प्राप्त होईल.

**पुस्तकांचे गाव –**

- पुस्तकाच्या गावाचा संकल्पनात्मक पातळीवर विचार सुरू आहे.
- वाचनसंस्कृतीचा विकास हा भाषाविकासातील अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. यासाठीच चौकटीबाहेरचा (out of box) विचार करून नव्या कल्पना प्रत्यक्षात उतरविणे गरजेचे आहे.
- ब्रिटनमध्ये 'हे ऑन वे' या नावाचे पुस्तकांचे गाव आहे. हरफोर्डशायर भागात हे गाव आहे. जगभरातील सुमारे ८०,००० लेखकांची पुस्तके या गावात आहेत. मे महिन्यात जगातील लेखक-प्रकाशकांचा मेळा येथे भरतो. दरवर्षी सुमारे ५ लाख पर्यटक येथे भेट देतात.
- महाराष्ट्रात महाबळेश्वरजवळील एखादे गाव निवडता येऊ शकेल.
- कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रकाशक व ग्रंथालये यांचे सहकार्य घ्यावे लागेल.
- गावातील निवडक ठिकाणांवर तात्पुरते किंवा कायमस्वरूपी पुस्तकांचे कक्ष असावेत.
- यामध्ये वैशिष्ट्यपूर्ण रचना उभ्या करून त्यात प्रकाशकांना पुस्तकविक्री व प्रदर्शनासाठी कक्ष देता येतील.
- गावात चौक, शासकीय इमारती, उद्याने, बसथांबे इत्यादी ठिकाणी आकर्षक बुकस्टॉल्स उभे करता येऊ शकतील.
- ऑडियो बुक्सचा (ध्वनी पुस्तके) आस्वाद घेता येईल, अशी केंद्रेही निर्माण करता येतील.
- सुरुवातीला नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी या महिन्यांत हा उपक्रम करता येऊ शकेल.



पुस्तकांच्या गावा यावे!

- वरील ३ महिन्यांतील विशिष्ट, निवडक दिवशी साहित्यिक गावात येतील; पर्यटक, वाचकांना भेटतील.
- गावात एक कायमस्वरूपी कवी कट्टा असेल.
- परिसरातील भिंतींवर मराठीतील निवडक उतारे व निवडक कविता कोरलेल्या असतील.
- विशिष्ट दिवशी पुस्तकांच्या गावात लेखकांच्या व सुप्रसिद्ध व्यक्तींच्या भेटी आयोजित करता येतील.
- वरील २-३ महिन्यांसाठी तात्पुरते गाव उभे करायचे, पर्यटकांना आकर्षित करायचे, लेखक-प्रकाशकांना बोलवायचे, असे सुरुवातीला करावे. कालानुरूप हळूहळू याचे रूपांतर कायमस्वरूपी पुस्तकांच्या गावात होऊ शकते.

**मराठी पुस्तक विक्री दुकानांना सवलती व आरक्षण –**

- महाराष्ट्रातील नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील जागांचे वाढते दर लक्षात घेता, मराठी पुस्तकांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न.
- पुस्तकांच्या दुकानांसाठी जागा आरक्षित ठेवण्यात येईल.
- या दृष्टीने पुस्तकांच्या दुकानासाठी जागा किंवा गाळा सवलतीच्या दरात देण्यात येईल. विक्रीची किंमत किंवा भाड्याचा दर सवलतीचा असेल.
- नुकताच घुमान येथे मी जाहीरपणे हा विषय मांडला. मा. मुख्यमंत्र्यांनीही या विषयाला मान्यता दिली आहे.

## कायद्याच्या भाषेतही 'मुंबई'च!

- हा प्रतिकात्मक परंतु मराठी अस्मितेशी जोडलेला विषय आहे.
- महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे, १९६० रोजी झाली. त्याआधी द्वैभाषिक राज्य अस्तित्वात होते.
- ब्रिटिशांच्या सत्तेपासून ते १९६० पर्यंत बॉम्बे हे नाव अनेक ठिकाणी वापरले जात होते, आजही अनेक बाबतीत ते प्रचलित आहेच. ते अनेक ठिकाणी अधिकृतपणे वापरले जाते.
- ब्रिटिश काळापासून अनेक कायद्यांच्या नावांतही बॉम्बे हा शब्द आहेच. कारण पूर्वी बॉम्बे नावाचा प्रांत/प्रदेशच अस्तित्वात होता.
- बॉम्बे हा शब्द नावात आहे, असे सुमारे १२७ कायदे मुंबई उच्च न्यायालयाच्या (बॉम्बे हायकोर्टाच्या) संकेतस्थळावर आढळतात. एक प्रकारे, बॉम्बे या शब्दाद्वारे ब्रिटिश कालखंडाचा शिक्का आजही अस्तित्वात आहे.
- हा परकीय शिक्का पुसून टाकण्याची नितांत गरज आहे. म्हणजेच कायद्यांच्या नावांमधील बॉम्बे हा शब्द काढून महाराष्ट्र किंवा मुंबई हे शब्द योग्य त्या ठिकाणी घालणे

आवश्यक आहे.

- गुजरात राज्याने ही प्रक्रिया गुजरात राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षातच (२०१०-११) पूर्ण केली आहे. गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. नरेंद्र मोदी यांनी, '६७ कायद्यांच्या नावांत बॉम्बेचे गुजरात असा बदल करून 'गुजरात राज्याला ही भेट देत आहे', असे जाहीर केले होते.
- वरील विषयाबाबतची प्रक्रिया आम्ही सुरू केली आहे. विधी व न्याय विभागाच्या सहकार्याने आम्ही हा विषय पुढे नेऊ.

**बोली भाषांचे जतन :**

- मराठी भाषेच्या सुमारे ६० बोली महाराष्ट्रात बोलल्या जातात. या बोलींचे दृक-श्राव्य पद्धतीने जतन करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
- अहिराणी, नागपुरी, वऱ्हाडी, कोकणी, मालवणी, तसेच आदिवासींच्या विविध बोली यांचे जतन करण्याचे आम्ही ठरविले आहे.
- त्या त्या बोलींच्या उत्कृष्ट तज्ज्ञांचा शोध घेणे, विविध बोलींवरील कोषात्मक पुस्तकांचा शोध घेणे यांबाबतचे काम सुरू आहे.
- पुस्तक स्वरूपातील काम दृक-श्राव्य स्वरूपात कसे रूपांतरित करायचे या अनोख्या कल्पनेबाबत तज्ज्ञांशी विचारविनिमय सुरू आहे. ●

१) दासबोध श्राव्य पुस्तक
https://rmvs.maharashtra.gov.in/audio/dasbodhaudiobook.html
२) कृष्णाकाठ श्राव्य पुस्तक
https://rmvs.maharashtra.gov.in/audio YCaudiobook.html
३) कविता कुसुमाग्रजांची श्राव्य पुस्तक
https://rmvs.maharashtra.gov.in/audio/kusumagraj.html
४) कविता विंदांची श्राव्य पुस्तक
https://rmvs.maharashtra.gov.in/audio/vinda.html
५) आकाशदीप दृकश्राव्य प्रकाशन
https://rmvs.maharashtra.gov.in/audio/1/ default.html
६) पिंपळपान दृकश्राव्य प्रकाशन
https://rmvs.maharashtra.gov.in/audio/3/ default.html

ही सर्व प्रकाशने राज्य मराठी विकास संस्थेच्या संकेतस्थळावर नि:शुल्क उपलब्ध आहेत. पैकी 'दासबोध' आणि 'कृष्णाकाठ' ही श्राव्य पुस्तके सीडीच्या स्वरूपात तर 'आकाशदीप' व 'पिंपळपान' ही दृकश्राव्य प्रकाशने डिव्हीडीवर आहेत.


ग्रंथाली

जगभर कुणीही शिकावी अशी...

माय मराठी – My Marathi

मराठी शिकवणारे सुलभ मार्गदर्शन

मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने तयार केलेला, ग्रंथालीने प्रकाशित केलेला एक अपूर्व अभ्यासक्रम

एकात्मिक संभाषणात्मक पद्धतीने पद्धतशीर मराठी शिकू इच्छिणाऱ्या अमराठींसाठी. 'माय मराठी'च्या एका संचात पाठ्यपुस्तक, अभ्यासपुस्तिका आणि विनामूल्य दृक्श्राव्य डीव्हीडी यांचा समावेश आहे.




मूल्य रु.१२५० १००० रुपये फक्त

$ 30

प्रकल्प समन्वयक
विभा सुराणा
दीपक पवार

लेखक
सुहास लिमये
जयवंत चुनेकर

टपालखर्च १०० रु.

# मौज प्रकाशनाची नवीन प्रकाशने




संगीतासारख्या कलेच्या चिरंतनत्वाचा अर्थ मानवी जीवनाबद्दलच्या मूलभूत प्रश्नांच्या तळापर्यंत कसा झिरपत गेला आहे हे मांडत, नव्या परिमाणांसह मुद्रा कादंबरी प्रकटत जाते आणि उत्कट अशी सर्जनशील अभिजात कलाकृती वाचल्याचा सात्त्विक आनंद वाचकांना बहाल करत राहते.

## मुद्रा

**आशा बगे**

किंमत २७५ रुपये



रण-दुर्ग या मिलिंद बोकिलांच्या कादंबरिकांतून स्त्री-पुरुष नातेसंबंधांचे वेगवेगळे कोन तपासत, माणूस आणि  निसर्ग यांच्यातील अनाम पण सूक्ष्म नातं शोधण्याचा प्रयत्न राहिला आहे. या वाटेवरचीच ही नवी कादंबरिका... निसर्गाचं एक उत्कट, सजीव लँडस्केप जणू शब्दांतून चितारत जाणारी, वाचकांना गुंतवून ठेवत अंतर्मुखतेचा प्रत्यय देणारी

## मार्ग

**मिलिंद बोकील**

किंमत १२० रुपये



भिन्नधर्मीय आईवडिलांच्या पोटी जन्म घेतलेल्या एका बुद्धिमान आणि संवेदनशील तरुणाने धर्म आणि संस्कृती यांचा अर्थ शोधण्यासाठी केलेल्या विचक्षण प्रवासाचे, मन हेलावणारे कथन

## इतिहासाचा अनभिज्ञ यात्री

**आतिश तसीर अनुवाद शारदा साठे**

किंमत ३०० रुपये



शहर वसण्याआधी, फक्त तू जागी हो, माझ्याच थारोळ्यात रुतलेली मुलगी, झोपू दे मला निवान्त माझ्याच थारोळ्यात, मृत्यू या दीर्घ कवितांचा समावेश असलेला नीरजा यांचा नवीन काव्यसंग्रह.

## मी माझ्या थारोळ्यात

**नीरजा**

किंमत १०० रुपये

**मौज प्रकाशन** गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ ☎२३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com



# मराठी मैफल रंगे जीतूराजसंगे

**'आरजे' जीतूराज**
(रेडिओ मिर्ची ९८.३ एफएम)

**एफएम रेडिओच्या विश्वात सुपरस्टार आरजे असं ज्यांचं वर्णन करावं लागेल असं नाव म्हणजे आरजे जीतूराज. एका हिंदी वाहिनीवरून मराठी सिनेमा, मराठी गाणी याबद्दल सातत्याने लोकांना माहिती देण्याचं काम जीतूराज करत आहेत. मराठी संगीताला लाभलेली संपन्न परंपरा, सध्याचं संगीत, लोकांची आवड यावर त्यांनी त्यांच्या शब्दात आणि खास त्यांच्या शैलीत केलेलं भाष्य... जीतूराज आपल्या कार्यक्रमांमध्ये स्वतःच उल्लेख मी असा न करता जीतूराज असा करतात. त्यामुळे या लेखात देखील तसा उल्लेख आढळेल.**

**सं**वाद आणि गाणी हा रेडिओचा आत्मा आहे. रेडिओच्या क्षेत्रात काम करताना रोज नव्यानं संवाद साधावा लागतो. हा संवाद कोणा एका व्यक्तीशी नसतो तर तो असतो ओळखीच्या ना पाळखीच्या अनेक भाषांच्या विविध वयोगटांच्या असंख्य लोकांशी. 'रेडिओ मिर्ची' ही वाहिनी हिंदी रेडिओ वाहिनी असली तरी जीतूराज कार्यक्रमांमध्ये अनेक भाषांमधून लोकांशी संवाद साधत असतो. भाषा ही हृदयापासून बोलली गेली पाहिजे त्यामुळे जीतूराज बिनधास्तपणे वेगवेगळ्या भाषांमधून बोलतो...

सुरुवातीपासूनच मराठी गाणी कानावर पडत गेली आणि ती आवडायला लागली. आकाशवाणीवर जी जुनी मराठी गाणी ऐकायला मिळतात तो खूप मोठा खजिना आहे. ताला-सुरांची आवड असल्याने अनेकदा ती गाणी ऐकली जायची. त्यातच मुंबई पुण्यासारख्या महानगरांबरोबरच महाराष्ट्रांच्या काही ग्रामीण भागांमध्येही राहिलो असल्याने तिथं लग्नकार्यात, सणसमारंभात वाजवली जाणारी अनेक गाणी मनात घर करून राहिली आहेत.

जेव्हा रेडिओवर काम करायला सुरुवात केली तेव्हापासून या वेगवेगळ्या भाषा आणि त्यातल्या गाण्यांबद्दल आवर्जून बोलतोय. मराठी सिने आणि संगीत सृष्टीबद्दल खूप जास्त माहिती नसली तरी सातत्याने या क्षेत्रात काम करणाऱ्या माणसांच्या संपर्कात राहतो आणि हवी असलेली माहिती मिळवतो.

**'मी शिवाजीराजे...'मुळे पालटलं चित्र**

'मी शिवाजी राजे भोसले बोलतोय' या चित्रपटाने मराठी रसिकांना पुन्हा एकदा थिएटरकडे वळवलं आणि जीतूराजला मराठी सिनेसंगीत सृष्टीच्या अधिक जवळ नेलं. या सिनेमानंतर मराठी सिनेमा आणि गाण्यांबद्दल लोक विचारणा करू लागले. अगदी पूर्वीचे मराठी सिनेमे आणि गाणी प्रचंड लोकप्रिय होतीच पण मध्यंतरीच्या काळात ही लोकप्रियता थोडी कमी झाली असं वाटत असतानाच, 'मी शिवाजीराजे'... हा सिनेमा आला आणि चित्र पालटलं. मराठी सिनेमा आणि संगीतसृष्टीत मोठ्या प्रमाणावर बदल होत होते, नवनवीन प्रयोग होत होते. त्यामुळे त्याची प्रतिक्रिया रेडिओवर उमटणं स्वाभाविकच होतं. या गोष्टी रेडिओवर आल्याच पाहिजेत त्यामुळे त्याची जास्तीत जास्त माहिती मिळवत रेडिओवर या गोष्टी बोलत गेलो. दोन-तीन वर्ष जास्तीत जास्त मराठी सिनेमे पाहत होतो, मराठी सिनेमांची परीक्षणं करत होतो, मराठी कलाकारांच्या मुलाखती घेत होतो. मराठी गाणी लोकांपर्यंत पोचावी यासाठी सतत प्रयत्नशील होतो. हे अभिमानाने सांगू इच्छितो की सर्वप्रथम खासगी एफएम वाहिन्यांवर जीतूराजने मराठी सिनेमा आणि संगीतसृष्टीबद्दल बोलायला सुरुवात केली, आणि आता सगळ्याच रेडिओ वाहिन्यांवर मराठी गाणी लावली जातात.

**जुन्या गाण्यांची चलती...**

सध्या कोणत्याही चॅनलवरील मराठी गाण्यांच्या स्पर्धेतील गाणी तुम्ही ऐकलीत तर त्यावर जुन्या गाण्यांचा प्रभाव तुम्हाला जास्त जाणवेल. ती गाणी आजही कमालीची लोकप्रिय असलेली आपल्याला पाहायला मिळतात. अगदी अलीकडचीच एक गोष्ट सांगेन की, जीतूराजला मराठी गाण्यासंदर्भात एक स्पर्धा घ्यायची होती. त्यामुळे फेसबुक अकाऊंटरवरून जीतूराजच्या

फॉलोअर्सना एक प्रश्न विचारला की तुमच्या मते सध्याची १० सुपरहिट मराठी गाणी कोणती? तुमचा विश्वास बसणार नाही पण लोकांना १० गाणी सोडाच जेमतेम ३ गाणीच देता देता नाकीनऊ आले होते. इथं एक प्रश्न विचारावासा वाटतो की, इतके मराठी सिनेमे येतायत, गाणी येतायत पण ती गाणी रुजतायत का? मराठी मनांमध्ये त्याला खरंच स्थान मिळतंय का? हा प्रश्न कुठेतरी या क्षेत्रातल्या लोकांनी स्वतःला विचारला पाहिजे. एखाद्या रेडिओ स्टेशनने तुमची गाणी वाजवावी असं वाटत असेल तर ती गाणी लोकांनाच आवडणं गरजेचं आहे. लोकांना काय आवडतं, ते किती गाणी डाऊनलोड करतात हे महत्त्वाचं आहे. जे गाणं लोकांना आवडतं त्याबद्दल ते फोन करून आरजेला कळवतात. त्या गाण्यांचा समावेश आम्ही आमच्या कार्यक्रमात करावा हा त्यांचा आग्रह असतो. अलीकडे शेवटच्या ज्या गाण्याविषयी लोकांनी जीतूराजला आवर्जून फोन करून सांगितलं, त्याच्या डाऊनलोडबद्दल लोक बोलले... ते होतं फँड्रीमधलं अजय-अतुलचं गाणं. त्यानंतर एकाही गाण्याविषयी लोकांनी स्वतः फोन करून माहिती दिलेली नाही. त्याचप्रमाणे रितेश देशमुखच्या लय भारीच्या गाण्यांविषयी खास करून माऊली माऊलीबद्दल लोकांनी कळवलं होतं. हे पाहून कधीतरी प्रश्न पडतो हे काय चाललंय, मराठी संगीताला इतका संपन्न वारसा असताना मोजक्या चार नावांवरच संगीतसृष्टीचं भवितव्य अवलंबून आहे का?

**हिंदीचा प्रभाव...**

काही अपवाद वगळता हल्ली मराठी गाण्यांवर हिंदीचा खासकरून बॉलीवूड म्युझिकचा प्रभाव जास्त जाणवतो. मराठी लोकांना काय आवडेल ते तुम्ही द्या. हिंदीत काय चालू आहे त्याचं अनुकरण आपण का करायचं? मराठी संगीतात मराठी वाद्यांचा वापर झाला पाहिजे. लेझिम, ढोल ताशे यांचा साऊंड मराठी गाण्यांमध्ये जाणवला पाहिजे. मराठी गाणी ही मराठमोळी वाटली पाहिजेत. जर ती गाणी हिंदीसारखी वाटली तर हिंदी गाणीच ऐकेन ना. मराठी गाण्याचं वेगळेपण जपलं तर मराठी गाणी ही मराठमोळी वाटतील. हिंदीसारखी वाटणारी गाणी लवकर लोकप्रिय होतात, लोकांना आवडतात हे खरं असलं तरी पण फक्त त्यासाठी तुम्ही तुमची गाणी हिंदीसारखी करणार? मराठमोळी मराठी गाणी लोकांना आवडत नाही हे कोणी सांगितलं? मराठमोळी गाणी लोकांना नक्कीच आवडणार आणि आवडतातही. तुम्ही तशी गाणी नुसती बनवू नका तर ते कसं जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचेल याचा विचार करा. त्यासाठी नव्या कल्पना लढवा.

**मराठीचा बोलबाला...**

ज्यांची मातृभाषा मराठी नाही पण जे मुंबईत काही वर्ष राहतायत त्यांना मराठी गाणी आवडतात. फक्त गाणीच नव्हे तर मराठी सिनेमा, मराठी कलाकार यांच्याबद्दल त्यांना माहिती असते. त्यांनाही मराठी सिनेमा पाहायला आवडतो. हे ठामपणे यासाठी सांगू शकतो की कार्यक्रमात जीतूराज मराठीबद्दल बोलतो आणि कार्यक्रम लोकांना आवडतो याचा अर्थ त्यांना जीतूराज जे बोलतोय ते आवडतं, ते विषय आवडतात, त्याबद्दल ऐकायला आवडतं, नाहीतर त्याविरुद्ध लोकांनी सांगितलं असतं. सध्या कुठे आहेत चांगली मराठी गाणी? गाणं हिट झालं. लोकांना आवडलं हे समजायचं असेल तर ते गाणं सहज लोकांच्या तोंडात बसलं पाहिजे, त्या गाण्याची विचारणा झाली पाहिजे. चॅनेलवरच्या स्पर्धांमध्ये नवीन गाणी ऐकता आली पाहिजेत. इतकी मराठी गाणी आली पाहिजेत आणि हिट झाली पाहिजेत की प्रत्येक रेडिओ स्टेशनला मराठी गाणी लावणं भाग पडलं पाहिजे. या मुलाखतीच्या माध्यमातून मराठी संगीतसृष्टीला आवाहन करतो की बनवा भरपूर मराठी गाणी, जीतूराजबरोबर शेअर करा. तुमच्या गाण्यांबद्दल फेसबुक, ट्वीटर अकाऊंटवरून लोकांना सांगेन (फेसबुकसाठी fb.com/rjjeeturaaj आणि ट्वीटरसाठी @jeetutaaj), शेअर करेन, मराठी कार्यक्रमांमध्ये चांगली मराठी गाणी वाजवली जातील. रिंगटोन, कॉलर ट्यून सगळ्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत गाणी पोचवा, मराठी गाण्यांची लोकप्रियता हिंदी गाण्यांपेक्षा जास्त झाली तर कोणता रेडिओ स्टेशन ती वाजवणार नाही?

**शब्दांकन - विशाखा टिकले पंडित**
भ्रमणध्वनी : ९८७०९९४०५१
vishakha.tikale@gmail.com




**जीतूराजने रेडिओवरच्या कार्यक्रमातूनही हे जाहीरपणे सांगितलंय की येणाऱ्या काळात मुंबईत आणि महाराष्ट्रात एखाद्या वाहिनीला २४ तासांच्या मराठी रेडिओ स्टेशनचं जर लायसन्स मिळालं तर केवढे संगीतविषयक कार्यक्रम आणि गाणी लागतील. त्यासाठी आपण तयार आहोत का? या चोवीस तासांच्या रेडिओ स्टेशनवर आजकालची गाणी लावली तर लोक ती ऐकतील का? ऐकणार नाहीत असं म्हणणं नाही पण ते पुरेसं असेल का? त्यासाठी पुन्हा जुन्या काळाकडे परतावं लागेल. पुन्हा एकाहून एक दिग्गजांनी दिलेली अजरामर गाणी पुन्हा वाजवावी लागतील.**



# जुन्या-नव्याचा योग्य मेळ साधणं आवश्यक

**'आरजे' गणेश आचवल**

**१९९९ सालापासून गेली १६ वर्षे 'आरजे गणेश' आकाशवाणीच्या एफएम वाहिन्यांवर काम करत आहे. मराठी गाणी आणि त्यासंबंधीची विविध माहिती, शब्दखेळ असे अनेक उत्तम कार्यक्रम तो सातत्याने सादर करत असतो... मराठी गाणी आणि लोकांची आवडनिवड याबद्दल जाणून घेऊया आरजे गणेशकडून...**

एफएम सुरू झालं तेव्हा दोन तासांच्या कार्यक्रमात विविध विषय आणि लोकांच्या पसंतीची गाणी, वेगवेगळ्या गीतकार-संगीतकारांची गाणी, अनेक सिनेमांमधली गाणी आम्ही ऐकवायचो. लोकांच्या आवडीची गाणी तर आम्ही ऐकवायचोच शिवाय अशीही अनेक गाणी होती की, ती चांगली होती पण लोकांसमोर फारशी आली नव्हती. अशा गाण्यांच्या रेकॉर्डस मी आधी ऐकायचो आणि त्यातली चांगली निवडक गाणी लोकांना ऐकवायचो. एक आरजे म्हणून चांगलं संगीत, चांगले विषय लोकांसमोर आणण्याची जबाबदारी आम्हाला पार पाडावी लागते.

आमच्या कार्यक्रमांमध्ये गाण्यांची फर्माईश केली जायची. त्याचा एक कार्यक्रम असायचा, लोक आपल्या आवडीची गाणी कळवायचे. त्याचं एक रजिस्टर होतं. त्यात सगळी नोंद केलेली असायची आणि त्यानुसार वेगवेगळी गाणी ऐकवली जायची. लोकांच्या आवडीची गाणी ऐकवताना वेळेचं भान पाळावं लागतं. गाणं सकाळी ऐकवलं जातंय की संध्याकाळी, त्याचप्रमाणे मूडसप्रमाणे गाण्यांची निवड करावी लागते. काळाप्रमाणे लोकांच्या आवडीनिवडीही बदलतात. त्याची नोंद घेत आरजेंना गाण्यांची निवड करावी लागते. जुनी मराठी गाणी अजूनही लोकांना आवडतात. त्याचप्रमाणे सध्याच्या संगीतकारांनी केलेल्या चांगल्या कामाचंही स्वागत केलं जातं. निलेश मोहरीर, अवधूत गुप्ते, अजय अतुल यांचं संगीत लोकांना आवडल्याच्या प्रतिक्रिया आम्हाला मिळतात. स्वप्नील बांदोडकरने गायलेली गाणी खूप ऐकली जातात. अलीकडची उदाहरणं घ्यायची तर 'दुनियादारी', 'टाईमपास', 'मंगलाष्टक वन्स मोअर' या सिनेमांच्या गाण्यांविषयी श्रोते विचारणा करतात. त्यामुळे कार्यक्रमाची आखणी करताना तीन जुनी दोन नवी किंवा दोन जुनी, दोन नवी अशी आखणी करावी लागते. सगळी जुनी किंवा सगळी नवी गाणी लावण्यापेक्षा लोकांना दोन्ही गाणी ऐकायला जास्त आवडतात. असं असलं तरी सर्वसाधारणपणे जुन्या गाण्यांकडे लोकांचा कल जास्त असतो. नवीन गाणी त्या त्या काळापुरती हिट होतात. त्यामुळे त्याचा समावेश आम्ही कार्यक्रमात करतो, पण जुन्या गाण्यांची लोकप्रियता कायम टिकून आहे.

आजकालच्या काही गाण्यांमध्ये म्युझिक खूप लाऊड असल्याचं श्रोते सांगतात. या लाऊड म्युझिकमुळे गाण्याच्या शब्दांकडे दुर्लक्ष होत असल्याचं सांगितलं जातं. तरुणांसाठीची गाणी म्हणजे उडत्या चालीची गाणी हा समजही चुकीचा आहे. 'मुंबई पुणे मुंबई'मधल्या 'कधी तू'सारखी गाणी तरुणाईत अतिशय लोकप्रिय आहेत. फक्त साऊंड चांगला आहे म्हणून आपल्याकडे गाणी ऐकली जातात असा मला तरी अनुभव नाही. काही गाण्यांच्या बाबतीत तसं जरी घडलं असेल तरी आजवर शब्द, चाल आणि वाद्य यांचा योग्य मेळ साधलेल्या गाण्यांना लोक चांगला प्रतिसाद देतात असा माझा अनुभव आहे. त्यामुळे अजूनही आपल्याकडे शब्दप्रधान गायकी टिकून आहे आणि लोकांना ती आवडतेय हे त्यांच्या प्रतिक्रियांवरून जाणवतं.

**शब्दांकन - विशाखा टिकले पंडित**
भ्रमणध्वनी : ९८७०९९४०५१
vishakha.tikale@gmail.com

# महाराष्ट्राचा 'मेक ओव्हर'

**देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



''आपले लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मेक इन इंडिया' या सोनेरी स्वप्नाचा 'मेक इन महाराष्ट्र' हा कणा असणार आहे.''

**स**र्वसामान्यांच्या सामाजिक-आर्थिक जीवनात बदल घडविण्याचा विचार घेऊन गेले अडीच दशक मी सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. यात राजनीती हा शब्दच माझ्या डिक्शनरीमधून वगळला आहे. राजनीती व राजधर्म यामध्ये खूप मोठी दरी असल्याचे मला समजले आहे. राजधर्मात दिली जाणारी आश्वासने राजकारणात दूरपर्यंत दिसत नाहीत. महाराष्ट्राला महान परंपरा आहे. या गौरवशाली राज्याच्या मुख्यमंत्रीपदाचा पदभार स्वीकारतानाच माझ्या मनात आले की, महान सेवक बनून जनतेची सेवा करेन व त्याचा मोबदला म्हणून जनता ते लक्षात ठेवेल. जनतेने मोठ्या विश्वासाने माझ्यावर मुख्यमंत्रीपदाची धुरा सोपवली. त्यास तडा जाऊ नये, याकरिता चिकाटी गरजेची होती. त्यातूनच 'मेक इन महाराष्ट्र' ही संकल्पना साकारता येणार आहे. आपले लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मेक इन इंडिया' या सोनेरी स्वप्नाचा 'मेक इन महाराष्ट्र' हा कणा असणार आहे. आश्वासने, चर्चा आणि फक्त घोषणा करून कोणत्याही राज्याचा विकास साधता येणार नाही. त्यासाठी कृती करणे आवश्यक आहे तरच राज्याच्या विकासाकडे वाटचाल होऊ शकेल. महाराष्ट्राची ११ कोटी लोकसंख्या आहे. या सर्वांच्या एकत्रित, प्रातिनिधिक स्वरूपात मी 'मेक इन महाराष्ट्रा'चे जे स्वप्न पाहिले आहे, ते तेव्हाच सत्यात उतरू शकते जेव्हा राज्याची प्रत्येक व्यक्ती या संकल्पनेस जोडली जाईल. त्यासाठी केवळ औद्योगिक विकासाचे अभियान आहे, असे नाही, तर औद्योगिक विकासाचा राज्याच्या विकासात सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्राला अव्वल उत्पादन राज्य बनविण्याचा आपला मानस आहे. उत्पादन क्षेत्रातून चीनने ज्या पद्धतीने रोजगार उपलब्ध केला, त्यानुसार महाराष्ट्रात प्रत्येक शहर आणि गाव सुफलाम करता येऊ शकेल. 'संतुलित विकास ते सर्वांचा विकास' ही फक्त लोकप्रिय घोषणा होऊ इच्छित नाही, तर त्यापुढे जाऊन महाराष्ट्राला 'ग्लोबल इंडस्ट्रियल हब' बनविण्याची तयारी सुरू झाली आहे. मुंबईसारखी चकाकी नागपूर, पुणे आणि औरंगाबाद या शहरांनाही मिळेल, तेव्हा खऱ्या अर्थाने 'मेक इन महाराष्ट्र' साकार होईल.

महाराष्ट्रात नैसर्गिक आपत्ती आणि लालफितीने शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान ठाकले आहे. शेतकऱ्यांना प्रोसेसिंग सेंटरला जोडून थेट बाजारपेठ उपलब्ध करून योग्य तो हमीभाव मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहोत. युवाशक्तीला कुशल मनुष्यबळामध्ये रूपांतरित करून महिलांना आत्मसन्मानाने समानतेचा दर्जा दिल्यास 'मेक इन महाराष्ट्र' ही संकल्पना यशस्वी होणार आहे. शांतता व सुव्यवस्थेच्या अभावी कुठलाही देश, राज्य महाशक्ती बनू शकत नाही. मी पुन्हा सांगू इच्छितो, या महासेवकाला जेव्हा जनतेची साथ लाभेल तेव्हाच महाराष्ट्र महासत्ता बनू शकेल!

●

# गुंतवणुकीच्या वाटेवर..

**सुभाष देसाई,** उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य



डच बँक, जेपी मॉर्गन, नोमुरा फायनॅन्शियल सर्व्हिसेस, जनरल इलेक्ट्रिक या कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी तत्परता दाखविली आहे. शिंडलर कंपनी एक्सलेटर तयार करण्याचा कारखाना राज्यात सुरू करणार आहे. तर नागपूर आणि अमरावती शहरांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे वस्त्रोद्योग पार्क उभारण्याची तयारी दाखविली गेली आहे. मायक्रोसॉफ्ट कंपनी देशातील पहिली दोन प्रमुख डाटा सेंटर राज्यात उभारणार आहे. त्यात कंपनीकडून २ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. कुर्ल्यामध्ये युनायटेड किंग्डम भारत बिजनेसची स्थापना करण्यात येईल. ऑस्ट्रेलियाने जलयुक्त शिवार योजनेत मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

भारतात महाराष्ट्रात सर्वात जास्त परदेशी गुंतवणूक होणारे राज्य आहे. राज्यात देशाच्या तुलनेत सर्वात जास्त परदेशी गुंतवणूक करण्यास कंपन्या उत्सुक आहेत. परदेशी दौऱ्यामुळे विदेशी उद्योगपतींच्या विचारात आमूलाग्र बदल झाले असून राज्यात उद्योग सुरू करण्यासाठी कोणतीही अडचण नसल्याचा विश्वास त्यांना आला आहे. विदेश दौऱ्यात अनेक कंपन्यांच्या प्रमुखांची आम्ही मुख्यमंत्र्यासह भेट घेऊन त्यांच्या शंकाचं निरसन करण्यात यशस्वी झालो आहोत.

जगातील अनेक नामवंत ऑटोमोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील उद्योगांनी राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याची तयारी दर्शविली आहे. त्यात मर्सिडिज-बेंज, फोक्सवॅगनसारख्या नामांकित कंपन्यांव्यतिरिक्त फुड प्रोसेसिंग आणि वाईनची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचाही समावेश आहे. भारताबद्दल गुंतवणुकी-संदर्भात आकर्षण वाढले असून भविष्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार आहे. उद्योगांची स्थापना करण्यासाठी येथील जमीन, कुशल मनुष्यबळ प्रेरणादायी आहे.

गेल्या केंद्र व राज्य सरकारच्या तुलनेत नव्या सरकारने देशी-विदेशी गुंतवणुकीची मुहूर्तमेढ मोठ्या दिमाखात रोवली आहे. भारताचा ७.५ टक्के जीडीपी जगाला आकर्षित करत आहे. उद्योगस्थापनेसाठी अनेक नियमांमध्ये बदल करून परवाना संख्येत कपात करण्यात आली आहे. राज्यात गुंतवणूक वाढीच्या दृष्टीने उद्योजकांसाठी एक खिडकी योजना राबवण्यात येत असूनही विदेशी गुंतवणूकदारांना उपयोगी पडत आहे.

अमरावतीमध्ये टेक्स्टाईल पार्कचे भूमिपूजन करण्यात आले आहे. तर नागपुरात सीएट प्रकल्प भूमिपूजनाच्या तयारीत आहे. मंत्रिमंडळात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती राज्यात उद्योग स्थापना करण्यासाठी असलेल्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करून त्यावर अंमल करेल.

●



उद्योगांमुळेच होईल राज्याचा विकास

# चित्रनगरीला संजीवनी

**विनोद तावडे** मंत्री, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य




दादासाहेब फाळके चित्रनगरीची पुनर्रचना करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. गोरेगांव पूर्व येथे सुमारे ५२१ एकरच्या भव्य जमीनीवर वसलेल्या या चित्रनगरीला गोरेगांव फिल्मसिटी या नावाने ओळखले जाते. चित्रपट व्यवसायाला चालना देताना एकाच छताखाली चित्रिकरणाच्या व पोस्ट प्रोडक्शनच्या सुविधादेण्यासाठी चित्रनगरीमध्ये इनडोअर आणि आऊट डोअर स्टुडिओंची निर्मिती करण्यात येणार आहे. हिंदी आणि मराठी चित्रपट सृष्टीबरोबरच मराठी, हिंदी, गुजराथी आदी प्रादेशिक भाषांमधील दुरदर्शन मालिकांच्या निर्मितीसाठी ही चित्रनगरी कलाकार, दिग्दर्शक तसेच तंत्रज्ञांची कर्मभूमी मानली जाते.

चित्रपट निर्मितीसोबतच आशियातील सर्वात मोठी चित्रपटनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या दादासाहेब फाळके चित्रनगरीमध्ये नवीन प्रस्तावित प्रकल्पामध्ये चित्रपट पर्यटनाला योग्य स्थान देण्यात येणार आहे. सिनेटुरिझम ही संकल्पना अन्य देशांमध्ये अवगत आहे. याच संकल्पनेच्या धर्तीवर चित्रनगरीमध्ये चित्रपट पर्यटन निर्माण करण्याचा आमचा संकल्प आहे. चित्रपट पर्यटन हा महत्वाचा रोजगार निर्मितीचा व पर्यटकांना आकर्षित करणारा घटक चित्रनगरीमध्ये निर्माण करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. मुंबईतील बॉलीवूड म्हणून ओळखली जाणारी चित्रपटसृष्टी ही केवळ भारतातच नव्हे तर जगात एक आकर्षणाचा विषय आहे. त्यामुळे या चित्रनगरीत बॉलीवूडच्या म्युझियमची निर्मिती करुन चित्रनगरी हे एक आकर्षक पर्यटन केंद्र भविष्यात नावारुपास येणार आहे.

चित्रपटसृष्टीच्या गेल्या दोन दशकाच्या इतिहासात चित्रपटनिर्मितीमधील तांत्रिक विषयात अनेक अत्याधुनिक स्वरुपाचे बदल झाले. ज्या गतीने चित्रपट निर्मितीमधील तंत्रज्ञान वेगाने पुढे गेले त्यागतीने मात्र चित्रनगरीत आधुनिक सुविधा निर्माण झाल्या नाहीत. सध्या चित्रनगरीत अस्तित्वात असलेल्या अनेक सुविधा कालबाह्य झाल्या आहेत. मुंबई हे हिंदी-मराठी चित्रपटसृष्टीचे व दुरदर्शन मालिकांचे प्रमुख केंद्र असतांना व बहुतांश सर्व कलाकार-तंत्रज्ञ मुंबईत असताना ज्या प्रमाणात चित्रनगरीमध्ये चित्रिकरण होवून उत्पन्न मिळणे अपेक्षित होते. ते अपूऱ्या सोयीसुविधा व आधुनिकीकरण न झाल्यामुळे मिळाले नाही ही वस्तूस्थिती पाहता चित्रनगरीच्या पुनर्रचना प्रकल्पामध्ये येथे अत्याधुनिक सोयी-सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

चित्रपट निर्मितीच्या आत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करुन मुंबइतच नव्हे तर भारतामधील सर्वात आकर्षक सिनेकेंद्रीत पर्यटन स्थळ बॉलीवूड म्युझियमच्या संकल्पनेच्या माध्यमातून विकसित करण्यात येणार आहे. चित्रपट व्यवसायाच्या सोयीसाठी चित्रनगरीमध्ये नवीन स्टुडिओंची निर्मिती करणे तसेच सद्य: अस्तित्वात असलेल्या स्टुडिओंचे आधुनिकीकरण करणे त्याचबरोबर महाराष्ट्रासह विविध प्रांतांचे देखावे असलेली गावे आणि आऊटडोअर चित्रीकरण स्थळे विकसित करण्यात येणार आहेत.

चित्रनगरीमध्ये उभारण्यात येणाऱ्या प्रस्तावित बॉलीवूड म्युझियममध्ये वॅक्सम्युझियम स्टंटसिन एनॅक्मेंट थियेटर, थ्रिडी व प्रीव्हियू थियेटर आदींचा समावेश असेल. त्याचप्रमाणे देशातच नव्हे तर जगभरातूनयेणाऱ्या पर्यटनकांना मराठी संस्कृती कळावी या दृष्टीने या ठिकाणी मराठी संस्कृती संग्रहालय उभारण्यात येईल.

मराठी चित्रपटसृष्टीचा इतिहास जतन करण्याच्या दृष्टीने आणि मराठी चित्रपटाची ओळख युवापिढीला होण्यासाठी चित्रनगरीमध्ये नवीन कक्ष उभारण्यात येईल. मुकपटापासून बोलपटापर्यंतचा मराठी चित्रपटसृष्टीचा प्रवास एकत्रितरित्या पर्यटक, संशोधक, अभ्यासक यांना उपलब्ध होण्यासाठी या चित्रनगरीत सरस्वतीबाई दादासाहेब फाळके फिल्म अर्काईव्हची निर्मिती करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे चित्रनगरीच्या पुनर्रचना प्रकल्पामध्ये महानायकश्री.अमिताभ बच्चन यांचे सहकार्य लाभणार आहे. या प्रकल्पाचे मुख्य सल्लागार पद श्री.अमिताभ बच्चन यांनी स्विकारले आहे. त्यामुळे चित्रपटसृष्टीचा आगळावेगळा इतिहास आणि भविष्यातील चित्रपट निर्मितीसाठीचे महत्वपूर्ण योगदान श्री.बच्चन यांच्याकडून आपणास लाभणार आहे.

दिल्लीमध्ये असलेल्या नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाच्या धर्तीवर महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा उभारण्याचा विचार सुरु असून याचे मुख्य केंद्र हे मुंबईत गोरेगांव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीमध्ये स्थापन करण्यात येईल.

●

# लाँचिंग @ लॉस एंजेलिस

## ...आता 'ॲप'ली ग्रंथाली!




- ई पबमध्ये 'ग्रंथाली'ची पुस्तके होणार उपलब्ध.
- १०० पुस्तके 'टॅब'सहित.
- फक्त 'ॲप'ही डाऊनलोड करण्याची सोय.

॥ग्रंथाली॥

## कोलाज

### अमेरिकेच्या अंतरंगाचा

**डॉ. लतिका भानुशाली**
**डॉ. गजानन सबनीस**




**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

अमेरिकेच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, ऐतिहासिक जीवनाचा हा कोलाज आहे. हे रूढ अर्थाने अमेरिका या देशाचे भौगोलिक प्रवासवर्णन नाही. हे पुस्तक म्हणजे अमेरिकेत ४०-५० वर्षे वास्तव्य करून त्या देशात स्वत:चे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलेल्या स्थलांतरितांचा जीवन इतिहास तर आहेच. पण त्याचबरोबर भारतातील वेगवेगळ्या क्षेत्रात अति महत्त्वाचे काम करणाऱ्या आणि अमेरिकेला वरचेवर भेट देणाऱ्या लोकाचा अमेरिकेसंदर्भात असलेला परखड दृष्टिकोन व्यक्त करणारे वास्तववादी पुस्तक आहे. विविध मुलाखतींच्या माध्यमातून अमेरिका या देशाचे अंतर्बाह्य चित्र स्पष्ट करणारा आगळवेगळा प्रयोग म्हणजे कोलाज : अमेरिकेच्या अंतरंगाचा!

॥ग्रंथाली॥

## विद्या हर्डीकर-सप्रे यांची दोन पुस्तके




### मांजरफन

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

'मांजरफन' हे, पुस्तकाच्या नावाप्रमाणेच, एक साहित्यिक 'फ्युजन' आहे.प्रामुख्यानं विनोदी आणि काही ललित लेखांचा संगम ह्या पुस्तकात झालेला दिसतो.

विनोदाचे कितीतरी प्रकार विद्याला लीलया हाताळता येतात - शब्दनिष्ठ, स्वभावनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ, प्रसंगनिष्ठ, संस्कृतिनिष्ठ आणि विनोदानं माखलेले किस्सेसुद्धा. तिचे हे निखळ विनोदी लेख खदखदून हसायला लावतात.

**– हेमलता अंतरकर**
संपादक हंस व मोहिनी

अमेरिकन मराठी

### जन मन अधिवेशन




**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

अमेरिकन स्टाईलनं सांगायचं तर - This book is great fun. बृहन्महाराष्ट्रमंडळाच्या सर्व अधिवेशनांची गोष्ट इतक्या मस्त, ओघवत्या पद्धतीनं सांगितलीय की आपल्याला त्या अधिवेशनांना उपस्थित असल्याचा आनंद मिळतो. अधिवेशनाची धमाल, त्यात आलेल्या अडचणी, रुसवे-फुगवे - कदाचित हेवेदावे - तरी त्या सर्वांतून तरून जात उत्तमपणे पार पडलेलं अधिवेशन...... अमेरिकेत गेलेल्या, स्थिरावलेल्या माणसांचेही अनुभव ऐकायला येतात. एकूण मिळून हा 'collector's item' आहे!

**– अविनाश धर्माधिकारी**




# मराठी संगीताची डिजिटल स्पेस

**वैभव वझे**

**सं**गीताचं वहन जगभरात होत असताना आज ते कोणत्या स्वरूपात होतं हे पाहणं अधिक महत्त्वाचं झालं आहे. संगीत, त्याची साधना, जगभरात कुठंही गेलात तरी सात स्वर तेच असणं, सात स्वरांची नावं वेगवेगळी असली तरी ते सारखेच ऐकू येणं हे सगळं वेळोवेळी अभ्यासलं गेलं आहे. संगीताचं ध्वनिमुद्रण करण्याची सोय सर्वसामान्यांच्या आवाक्यात आली आणि साहजिकच त्या संगीताच्या श्रोत्यांची संख्या वाढली. स्थानिक पातळीवर तयार होणारं संगीत प्रादेशिक सीमा ओलांडून जाऊ लागलं. 'तोच चंद्रमा नभात' या गाण्यातला चंद्रमा जगभरातील काव्यप्रतिभेला वेगवेगळा दिसला, परंतु हे अजरामर झालेलं गीत मात्र मराठी माणूस जगात जिथे गेला तिथं सोबत घेऊन गेला.

आज तर ध्वनीच्या क्षेत्रात क्रांती झाली आहे. ॲनलॉग पद्धतीचं ध्वनिमुद्रण आता डिजिटल स्वरूपात होऊ लागलं आहे. डिजिटल स्वरूपात ध्वनिमुद्रण झाल्यामुळे ते सोबत नेणंही सोपं झालंय. स्पूलची जागा कॅसेट्सनी आणि कॅसेटची जागा सीडीनी घेतल्याने कमी जागेत अधिक संगीत रेकॉर्ड करून ते घेऊन जाणं शक्य झालंय. मराठी संगीतही या बदलापासून वंचित नाही. डिजिटल हा परवलीचा शब्द झाल्यानं साहजिकच या तंत्राचा वापर करून संगीत कानसेनांची तृप्ती करण्यासाठी अनेक मार्गही उपलब्ध झाले. त्यातला सर्वात प्रभावी मार्ग आहे इंटरनेटचा.

इंडियन म्युझिक इंडस्ट्री ही कंपनी देशातील बनावट सीडी तयार करणाऱ्यांवर करडी नजर ठेवते. या कंपनीचे सीईओ सॅव्यो डिसुझा यांच्या मते डिजिटल संगीतामध्ये ७० टक्के महसूल हा यूट्यूबच्या माध्यमातून गोळा होतो. टिप्स, सागरिका, युनिव्हर्सल, टाइम्स म्युझिक, सोनी आदी कंपन्यांचे यूट्यूबवर चॅनल्स आहेत. त्या माध्यमातून आता या कंपन्यांकडे महसूल गोळा होतो. याखेरीज आयट्यून, फोर्टिफाय अशा चॅनलच्या माध्यमातून उरलेला ३० टक्के महसूल गोळा होतो. अर्थात यासाठी या सगळ्या चॅनल्सवर संगीत अपलोड होणं फार आवश्यक असतं. मिनिमम गॅरंटी किंवा ज्याला पूर्वी रॉयल्टी म्हणत ती रक्कम संबंधित म्युझिक कंपनीला दिल्यावर या माध्यमांवर संगीत अपलोड होतं. मग त्या संगीताचे हक्क कुणाकडे राहणार ते ठरवलं जातं. झी समूहासारखा समूह स्वतःच संगीत तयार करतो, त्याचा व्हिडिओ अवतारही तयार करतो आणि स्वतःच्याच झी म्युझिकतर्फे ते गाणं बाजारातही आणतो. त्यामुळे महसूल किंवा मिनिमम गॅरंटी ही समूहातच फिरत राहते.

मराठी चित्रपट संगीताला जगभरातून मागणी वाढली आहे, याला टाइम्स म्युझिकच्या गौरी यादवडकरनेही पुष्टी दिलीय. अर्थातच ही मागणी प्रत्यक्ष सीडींसाठी फार नसून डिजिटल म्युझिकसाठी मोठी आहे. त्यातही मराठी गाण्यांचं रिंगटोनचं मार्केट अधिक विस्तारलेलं आहे. कोणत्याही संगीताची किंवा गाण्याची लोकप्रियता ही त्या गाण्याची जाणीवपूर्वक प्रसिद्धी किती व कशी केली जाते यावर अवलंबून राहू लागली आहे. याचा फायदा सध्या प्रादेशिक संगीताला अधिक मिळतोय ही वस्तुस्थिती आहे. यामुळे मराठी संगीताची लोकप्रियता वाढली आहे. इंटरनेटमुळे तिचे मापन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा दोन स्तरांवर विभागून करता येणार नाही. परंतु आज मराठी संगीतही तितक्याच उत्सुकतेनं ऐकलं – पाहिलं जातं हे मात्र निश्चित.

**संगीताची आवड ही वैश्विक आहे. परदेशी संगीत भारतात येतं तसंच भारतीय संगीतही परदेशात जातं. संगीताचा हा प्रवास सुरूच राहिला असला तरी काळानुरूप त्याच्या स्वरूपात बदल होत गेले. आज मराठी संगीत परदेशात जातं. त्याचं स्वरूप डिजिटल झालंय....**

**आज तर ध्वनीच्या क्षेत्रात क्रांती झाली आहे. ॲनॅलॉग पद्धतीचं ध्वनिमुद्रण आता डिजिटल स्वरूपात होऊ लागलं आहे. डिजिटल स्वरूपात ध्वनिमुद्रण झाल्यामुळे ते सोबत नेणंही सोपं झालंय. स्पूलची जागा कॅसेट्सनी आणि कॅसेटची जागा सीडीनी घेतल्याने कमी जागेत अधिक संगीत रेकॉर्ड करून ते घेऊन जाणं शक्य झालंय. मराठी संगीतही या बदलापासून वंचित नाही.**

ही लोकप्रियता वाढली आहे असं म्हणतानाच आपण तिचं संख्यात्मक मूल्य काढता येणार नाही असंही म्हणतो आहोत. हा विरोधाभास दुर्दैवानं खरा आहे, असं सागरिका म्युझिकच्या सागरिका दास यांचंही म्हणणं आहे. मराठी संगीताचं सर्वात मोठं मार्केट हे पारंपरिकदृष्ट्या अमेरिका हेच आहे. मराठी भाषिक भारतीयांचं मोठ्या प्रमाणावर अमेरिकेत झालेलं स्थलांतर हे याला कारण आहे. त्याचवेळी आता यूके व आखाती देशांतील काही देश हेदेखील याचं मोठं मार्केट आहे. या तिन्ही बाजारपेठांचा विचार केला तर दुकानात जाऊन सीडी विकत घेण्यापेक्षा श्रोत्यांचा कल हा डिजिटल म्युजिक डाउनलोड करून ऐकण्याकडेच अधिक आहे. याचा फायदा घेऊन गाना डॉट कॉम, धिंगाणा डॉट कॉम, सावन डॉट कॉम अशा संकेतस्थळांवर सर्व प्रकारची गीतं डाउनलोड करण्यासाठी सशुल्क उपलब्ध आहेत.

हे सगळं खरं असलं तरी मराठी संगीताच्या या डिजिटल स्पेसला ग्रहण लागलंय ते पायरसीचं. पायरसीतून बुडणारा महसूल वार्षिक तब्बल तीस कोटी रुपये आहे. आता तर फिजिकल पायरसीऐवजी डिजिटल पायरसी ही नवी डोकेदुखी होऊन बसली आहे. सावन डॉट कॉमसारख्या संकेतस्थळावर गेलात तर तिथं प्रत्येक गाणं डाउनलोड करण्यासाठी विशिष्ट शुल्क दिलेलं असतं. मग अशावेळी बव्हंशी श्रोते त्याचा ट्रायल पॅक डाउनलोड करून तेवढे दिवस गाणी ऐकणे पसंत करत आहेत. पैसे देऊन डाउनलोड करावं लागू नये म्हणून आपल्या नेटपॅकचा वापर करून रोज किंवा ऐकण्याची इच्छा झाल्यावर त्यावेळी हवं ते गाणं डाउनलोड करून ते ऐकण्याला अधिक पसंती मिळत आहे. यालाच स्ट्रिमिंग असं म्हणतात. यामुळे गाणं विकलं जात नाही आणि त्यामुळे महसूल वाढीसाठी केवळ पुनःपुन्हा श्रोत्याने गाणं डाउनलोड करणं यावरच अवलंबून राहावं लागतं.



असं असलं तरी मराठी संगीताची लोकप्रियता परदेशांतून वाढते आहे हे मात्र नक्की. याच्या कारणांचा मागोवा घेताना असं लक्षात येतं की, योग्य वेळी गाणं बाजारात दाखल करणं आणि त्याची प्रसिद्धी कल्पकतेनं करणं या दोन गोष्टी महत्त्वाच्या झाल्या आहेत. ताजं उदाहरण 'यारा' या सागरिका म्युझिकच्या अल्बमचं घेता येईल. आजचा हार्टथ्रोब अभिनेता शशांक केतकर आणि गायिका दिपिका जोग यांनी गायलेलं 'यारा' अल्बमचं गाणं सध्या यूट्यूबवर तुफान लोकप्रिय आहे. त्याचं यूट्यूबवर येणं, त्याची प्रचार-प्रसिद्धी याविषयी बाळगलेली जागरुकता आणि या सर्वांसाठी साधलेलं योग्य टायमिंग यामुळेही हे गाणं खूप लोकप्रिय व्हायला मदत झाली. हे गाणं परदेशांतही आवडतं आहे. म्हणजेच नव्या मराठी गाण्यांनाही तेवढाच श्रोता उपलब्ध आहे. किंबहुना आपल्याकडे नव्या गाण्यांना पसंती मिळण्यापूर्वीच ती परदेशांत माहिती झालेली असतात असाच म्युझिक कंपन्यांचा अनुभव आहे.

लोकप्रियतेवर मराठी संगीत सध्या आरुढ झालं आहे. मात्र याची अधिकृत विक्री तितक्या जोमानं होत नाही ही खरी खंत आहे. अशी विक्री न होण्यामागे स्ट्रिमिंग हे मोठं कारण आहे. स्ट्रिमिंगमुळे गाणं वारंवार ऐकून, त्याच्या हिट्समध्ये वाढ होऊन पैसा मिळतो हे बरोबर आहे, परंतु त्यामुळे डाउनलोडिंग वाढत नाही ही खरी खंत आहे. त्यातच पायरसीमुळे श्रोत्याला फुकटात गाणं ऐकायला मिळतं. मात्र त्यामुळे म्युझिक कंपन्यांचं उत्पन्न वाढत नाही हीदेखील वस्तुस्थिती आहे. तरीही... गेल्या चार-पाच वर्षांत मराठी संगीताला डिजिटल स्पेस मिळाल्यामुळे त्याला अमेरिका, यूके, आखाती देश आणि सिंगापूर इथं मोठ्या प्रमाणावर ग्राहक मिळतोय हे नजरेआड करून चालणार नाही.

**– वैभव वझे**

भ्रमणध्वनी : ९५९४९९९४१०

vsv1975@gmail.com



# बदललेला मराठी चित्रपट आणि बरेच काही...

**दिलीप ठाकूर**

**'कोर्ट'**, 'किल्ला' 'ख्वाडा' यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळतो तेव्हा सगळीकडे मराठी चित्रपट किती बदलला याची कौतुक यात्रा सुरू होते.

'दुनियादारी', 'टाईपपास', 'लय भारी', 'पोस्टर बॉईज', 'टाईमपास २' जेव्हा उत्पन्नाची कोटीच्या कोटी उड्डाणे घेतात तेव्हा वाटते, प्रेक्षकांना वेगळ्या वाटेवरच्या चित्रपटापेक्षा मसालेदार मनोरंजक चित्रपट 'पैसा वसूल' आनंद देतात. वेगळ्या प्रवाहातील चित्रपटांपेक्षा या चित्रपटाचा प्रेक्षकवर्ग खूप मोठा व हुकमी आहे, असाही निष्कर्ष निघतो.

नेमके सत्य काय आहे? की दोन्हीचा सुवर्णमध्य काढायला हवा?

पण 'वेगळ्या प्रवाहातील मराठी चित्रपट' ही तर आपली खरी व प्रतिष्ठा देणारी ओळख आहे.

काही सिनेमावाल्यांनाच या साऱ्यावर बोलते केले तेव्हा काही वेगळेच मुद्दे व गुद्दे सापडले...

'चेकमेट', 'दुनियादारी', 'क्लासमेटस्' या चित्रपटांचा दिग्दर्शक संजय जाधवने एक वेगळा मुद्दा मांडला. तो सांगू लागला की, मराठीतील दर्जेदार चित्रपटाची टक्केवारी खूप चांगली आहे, एकीकडे खूप वेगळ्या प्रकारचे चित्रपट निर्माण होत असतानाच दुसऱ्या बाजूने प्रेक्षकांना पैसा वसूल मनोरंजन मिळेल असेही चित्रपट मराठीत निर्माण होत आहेत, त्यामुळे योग्य समतोल राखला जात आहे. पण एवढ्यावरच समाधान मानणे योग्य नाही. कारण चित्रपटाच्या यशाची टक्केवारी वाढायला हवी. दिग्दर्शक संजय जाधव आपले मत व्यक्त करताना पुढे म्हणाला, ''एखादा दुनियादारी, लय भारी, पोस्टर बॉईज, टाईमपास २ खणखणीत यशस्वी ठरतात. ख्वाडा, कोर्ट, किल्ला यांचे भरपूर कौतुकही होते. पण आपणाला तेवढ्यावरच थांबून कसे चालेल? आणखीन काही चित्रपटांना यश मिळायला हवे असे मला वाटते आणि तेवढा आपला 'मराठी प्रेक्षक' आहे, तसाच आपला मराठी चित्रपटही चांगला निघतो आहे. आपले आता बजेटही व्यवस्थित वाढले आहे, प्रॉडक्शन चकाचक असते, प्रमोशनमध्येही आपण सरस आहोत, आता आपण एकाच दिवशी, अर्थात पहिल्या शुक्रवार, किमान अडिचशे-तीनशे चित्रपटगृहांत चित्रपट प्रदर्शित करतो, म्हणजे आपण कशातही कमी पडत नाही. पण तेवढ्या प्रमाणावर आजही मराठीला प्रेक्षक लाभत नाही याचे वाईट वाटते. आता मराठी प्रेक्षक महिन्याला दोन मराठी चित्रपट पाहू लागला आहे, याचे नक्कीच कौतुक आहे. पण ते थोडे वाढवता आले तर फार चांगले होईल. मिडियाची मराठी चित्रपटाला नक्कीच चांगली साथ आहे, आता प्रेक्षकांची साथ वाढावी असे वाटते. त्यामुळे मराठी चित्रपटसृष्टीतील उत्साहाचे वातावरण आणखी वाढीला लागेल. त्या उत्साहातून मराठी चित्रपट आणखी चांगले निघतील, याचा मला पूर्ण विश्वास आहे. तेवढी मराठी चित्रपटसृष्टीत गुणवत्ता, सातत्य व क्षमता नक्कीच आहे, प्रयत्न वेगळे असोत अथवा व्यावसायिक त्याचा रसिक प्रेक्षकांचा प्रतिसाद वाढता राहावा असे मनोमन वाटते.''

दिग्दर्शक रवि जाधवने 'नटरंग', 'बालगंधर्व', 'बालक पालक', 'टाईमपास', 'टाईमपास २' अशी विविधता आणि यशाची चढती कमान ठेवली आहे. त्याच्याशी संवाद साधताना नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन व सर्व माध्यमातील भविष्यातील बदल यावरच्या

**आपण कशातही कमी पडत नाही. पण तेवढ्या प्रमाणावर आजही मराठीला प्रेक्षक लाभत नाही याचे वाईट वाटते. आता मराठी प्रेक्षक महिन्याला दोन मराठी चित्रपट पाहू लागला आहे, याचे नक्कीच कौतुक आहे. पण ते थोडे वाढवता आले तर फार चांगले होईल. मिडियाची मराठी चित्रपटाला नक्कीच चांगली साथ आहे, आता प्रेक्षकांची साथ वाढावी असे वाटते. त्यामुळे मराठी चित्रपटसृष्टीतील उत्साहाचे वातावरण आणखी वाढीला लागेल. त्या उत्साहातून मराठी चित्रपट आणखी चांगले निघतील, याचा मला पूर्ण विश्वास आहे.**




**चित्रपट हा अतिशय बेभरवशाचा आणि कसलाच पूर्व अंदाज येऊ न शकणारा असा व्यवसाय आहे. त्यामुळे अमुकच केले म्हणजे तमुकच होईल असे येथे कोणतेही समीकरण अथवा फूटपट्टी नाही. त्यामुळे आपण आपल्या डोक्यात 'फिट' असेल अशा कथानकावरचा चित्रपट निर्माण करावा, त्या 'थीम'ला अधिकाधिक परिपूर्ण न्याय द्यायचा प्रयत्न करावा. रसिक प्रेक्षक त्याचा योग्य तो स्वीकार करतील असा विश्वास ठेवावा. तो बऱ्याचदा खरा ठरतो.**




त्याच्या दृष्टिकोनाचा छानसा प्रत्यय येतो. तो या विषयासंदर्भात सांगतो, ''मला स्वतःला दिग्दर्शक म्हणून एकाच धाटणीचे चित्रपट साकारायला आवडत नाही. सतत काही तरी नवीन शोधावे हा माझा स्वभाव आहे व त्यात मला भरपूर आनंद मिळतो आणि आव्हान आहे असेही वाटते. त्या शोधातूनच हाती काही वेगळे लागते. अर्थात, कोणताही चित्रपट करताना माझ्या डोक्यात 'गल्ला पेटी'वरील विक्रमापेक्षा प्रेक्षकांच्या आवडीनिवडीचा विचार आधी येतो. खरं तर चित्रपट हा अतिशय बेभरवशाचा आणि कसलाच पूर्व अंदाज येऊ न शकणारा असा व्यवसाय आहे. त्यामुळे अमुकच केले म्हणजे तमुकच होईल असे येथे कोणतेही समीकरण अथवा फूटपट्टी नाही. त्यामुळे आपण आपल्या डोक्यात 'फिट' असेल अशा कथानकावरचा चित्रपट निर्माण करावा, त्या 'थीम'ला अधिकाधिक परिपूर्ण न्याय द्यायचा प्रयत्न करावा. रसिक प्रेक्षक त्याचा योग्य तो स्वीकार करतील असा विश्वास ठेवावा. तो बऱ्याचदा खरा ठरतो. कारण आपण त्या विजयाचा दृश्यमाध्यमातून विचार केलेला असतो. पण असा चित्रपट प्रेक्षकांपर्यंत योग्यरित्या पोहचवणेदेखील तेवढेच जास्त गरजेचे असते. त्यासाठी योग्य पद्धतीचे प्रसिद्धीचे तंत्र आणि प्रभावी मार्केटिंग यांची गरज असते. बड्या हिंदी चित्रपटाची स्पर्धा, इतरही काही गोष्टींची आव्हाने यामध्ये टिच्चून टिकून राहण्यासाठी हे प्रमोशन व मार्केटिंग 'मस्ट' झाले असून ते 'मस्त' झाले तरच मराठी चित्रपट प्रेक्षकांपर्यंत योग्यरित्या पोहचू शकतो. आजचा चौदा ते चौतीस-पस्तीस वर्षाचा युवक ऑनलाईन 'माध्यमा'मध्ये गुरफटलाय, त्याला सगळं कसं पटपट, थेट व शॉर्टकटमध्ये हवे आहे. त्याचे भान ठेवून ऑनलाईनवरील मराठी चित्रपटाच्या प्रमोशनचा 'फोकस' ठेवायला हवा.'' प्रसारमाध्यमात वेगाने होत असलेल्या बदलांकडेही आता मराठी चित्रपटसृष्टीने लक्ष ठेवायला हवे'', असे सांगून दिग्दर्शक रवि जाधव म्हणाला, ''विशेषतः अमेरिकेत उपग्रह वाहिन्यांची वाढलेली संख्या, छोट्या आकाराचे म्हणजेच कमी वेळाचे थेट कथानक सांगणारे चित्रपट हे आता आपल्याकडेही वेगाने येणार आहे, त्याचा प्रभाव व प्रवाह आपण रोखू शकत नाही. बदलत्या काळासोबत सगळ्याच गोष्टी बदलत असतात, त्यामुळे प्रत्येक बाबतीत आपण जुन्याला चिकटूनच राहायला हवे असे नव्हे. या सर्व प्रकारच्या बदलामधून मराठी चित्रपटदेखील बदलत जाईल, तेवढी क्षमता व गुणवत्ता आपल्याकडे आहे. विदेशात आता पंचाहत्तर आसनक्षमतेच्या चित्रपटगृहाचे युग आले आहे. ते आपल्याकडेही येईल. त्यामुळे एका नवीन चित्रपटगृह संस्कृतीचा उगम होईल. वेगळ्या विषयावरच्या चित्रपटांच्या ते नक्कीच पथ्यावर पडेल. कारण, त्या चित्रपटांचा व चित्रपटगृहांचा स्वतःचा एक हुकमी रसिकवर्ग तयार होईल आणि तो 'निश्चित' आहे अशा विश्वासाने असे वेगळ्या वळणाचे दिग्दर्शक 'निश्चित' राहतील असे मला वाटते.''

दिग्दर्शक राजू पार्सेकरचा प्रवास तसा खूप मोठाही आहे आणि तो चक्क दुरंगी आहे. म्हणजे एकीकडे तो तीस वर्षांपूर्वी 'अर्धसत्य' चित्रपटाच्या वेळी पटकथाकार विजय तेंडुलकर व दिग्दर्शक गोविंद निहलानी यांचा साहाय्यक होता. गंभीर चित्रपट ही राजू पार्सेकरची मूळ प्रवृत्ती आहे. 'सत का गत' या चित्रपटातून त्याने ते सिद्धही केले, पण तोच राजू पार्सेकर 'तीन बायका फजिती ऐका', 'वॉन्टेड बायको नंबर वन' यांसारखे तद्दन सवंग चित्रपटही का देतो? असा त्यालाच थेट प्रश्न केला असता तो सांगू लागला, ''काही चित्रपट आपल्या मानसिक समाधानासाठी करावे लागतात, त्यात आपल्या बुद्धीला पटतील ते विषय मांडावेत, त्याला चित्रपट समीक्षकांकडून वाहवा मिळते, जगातील विविध चित्रपट महोत्सवात त्याचा सहभाग होतो, राज्यात/विदेशात त्याला बरेचसे पुरस्कारही मिळतात. कोणत्याही संवेदनशील दिग्दर्शकाला हे सगळे सुखावून टाकते, त्याला ते हवेहवेसे वाटते. पण या साऱ्यातून 'निर्माता' जगेलच असे नाही. त्याने अशा चित्रपटातून केलेली 'आर्थिक गुंतवणूक' वसूल होणेही तितकेच अत्यंत गरजेचे असते. त्यासाठीच तर पारंपरिक लोकप्रिय मसालेदार मनोरंजक चित्रपटाची निर्मिती करावी लागते. मी अशा निर्मात्याला या बेभरवशाच्या क्षेत्रात उभे राहता यावे, पुढचाही चित्रपट निर्माण करावासा वाटावा म्हणूनच तर हे 'बायको' वगैरे प्रकारचे चित्रपट दिग्दर्शित करतो. सांगून कदाचित आश्चर्य वाटेल, पण अशा 'नॉन्सेन'

मनोरंजन महणून गणल्या गेलेल्या आणि समीक्षकांनी टीका केलेल्या चित्रपटांना उपग्रह वाहिन्यांवर भरपूर प्रेक्षक आहे. माझा 'तीन बायका फजिती ऐका' तर झी टॉकिजवर किती वेळा दाखवला जातो याची गणतीच नाही. या वाहिन्या विदेशातील मराठी माणूसही पाहतो, त्यामुळे बऱ्याचदा आपल्याकडे रात्री उशीरा हा चित्रपट प्रक्षेपित होतो. तात्पर्य, प्रेक्षकांना जे जास्त पसंत आहे ते निर्माण करणे, व्यावसायिकदृष्ट्या अत्यंत गरजेचे आहे.

चित्रपटाच्या व्यवसायात सर्वप्रथम 'अर्थकारण' महत्त्वाचे मानले जाते आणि निर्माता जगला अथवा उभा राहिला तर आणि तरच 'वेगळ्या वाटा'ना मोठा 'आधार' मिळेल, असे सांगून राजू पार्सेकर पुढे म्हणाला, ''वेगळे चित्रपट काढा, वेगळ्या वाटा हव्यात असे बोलणे तसे सोपे असते. पण त्यात नेमका कसा अडथळा येईल हे सांगू शकत नाही. 'सत का गत'मधील नायिकेच्या भूमिकेसाठी मी मराठीतील आघाडीच्या चार-पाच तारकांना विचारले. त्या प्रत्येकीने 'बलात्काराचा प्रसंग' आपण साकारू शकत नाही, तो प्रसंग साकारताना 'कम्फर्ट' वाटणार नाही असे सांगितले. म्हणून मी भोजपुरी चित्रपटाची आघाडीची अभिनेत्री पाखी हेगडे हिची निवड केली. तिने व्यावसायिक दृष्टीने या संधीकडे पाहिलेच, पण तिने त्या बलात्कारित स्त्रीच्या वेदना, व्यथा, मानसिकता याचाही विचार केला. ते दाखवण्याची एक उत्तम संधी म्हणून तिने या भूमिकेकडे पाहिले. म्हणजे मला मराठीत काही वेगळे करायचे असेल तर त्यासाठी महाराष्ट्रीय कलाकारांवर जास्त अवलंबून राहावे लागले ही दुर्दैवाने वस्तुस्थिती आहे. असो. पण 'पोलिस लाईन'सारख्या वेगळ्या चित्रपटावरही माझे लक्ष आहे. पोलिसांच्या वेदना व वस्तुस्थिती मी त्यात मांडत आहे. थोडक्यात, मला शक्य तेव्हा मी वेगळ्या वाटा चोखाळत असतोच व भरपूर ??? मिळवण्यासाठी तेवढे मला पुरेसे वाटते.''

मकरंद अनासपुरे चतुरस्र अभिनेता आहे. पण त्यानेही सयाजी शिंदे व छायाचित्रणकार सुवर्णा यांच्यासोबत 'चित्रपट निर्मिती' संस्था स्थापून 'गोष्ट छोटी डोंगराएवढी' हा शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या समस्येवरचा चित्रपट निर्माण केला. त्याला 'मराठीतील वेगळ्या वाटा'संदर्भात विचारले असता त्याने एक वेगळा मुद्दा मांडला. तो म्हणाला, ''कोणत्याही भाषेतील चित्रपटांकडे आपण एक नजर टाकली तर लक्षात येईल की, सर्वोत्तम चित्रपटाचे प्रमाण हे वीस ते पंचवीस टक्के इतकेच असते. तीस पस्तीस टक्के चित्रपट बऱ्यापैकी स्वरूपाचे असतात आणि उर्वरित चित्रपट अगदीच जेमतेम असतात. ही वस्तुस्थिती बदलता येणे शक्यच नाही. कारण, प्रत्येक चित्रपटाचा निर्माता आणि दिग्दर्शक यांचे आपले काही हेतू असतात, आपली काही गणिते असतात व त्या-त्यानुसार चित्रपट बनत असतात. वर्षानुवर्षे हेच तर चाललेले आहे. त्यात कदापि बदल होणे शक्य नाही. कोणी तरी चांगला चित्रपट बनवणारा, कोणी तरी चालणारा चित्रपट घडवणार. पुन्हा एक प्रॉब्लेम असा की, चांगला चित्रपट म्हणजे नेमके काय, त्याची व्याख्या कशी ठरवणार? बरं, अमुकच चित्रपट प्रेक्षकांना आवडेल, तो यशस्वी ठरेल, 'गल्ला पेटी'वर 'धूम' मचवेल याची कधीच कोणी खात्री देऊ शकत नाही. पण मला आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे, त्याचा राज्यशासनाने अवश्य विचार करावा. मुंबई, पुणे व ठाणे वगळता राज्यात कुठेही नाट्यगृहात दररोज नाट्यप्रयोग नसतो. महिन्यातून फार तर चार रात्री तेथे नाट्यप्रयोग असतो, तर तशाच चार रात्री लावणीचा फड असतो. म्हणजे मोजून फक्त आठच दिवस तेथे ते नाट्यगृह उपयोगाला येते. तर मग उर्वरित दिवशी तेथे मराठी चित्रपट प्रदर्शित करायला काय हो हरकत आहे? म्हणजे ते नाट्यगृह इतर दिवशी ओसाड पडणार नाही, कार्यरत राहिल्याने त्याची वरचेवर सुधारणा होत राहील, स्थानिक प्रेक्षकांना तेथे वारंवार येण्याचे वळण लागेल. बरं, आता पूर्वीसारखे प्रोजेक्शन वापरून चित्रपट दाखवायचा आहे असेही नाही. सॅटेलाईटच्या माध्यमातून तेथे चित्रपट पोहचू शकतो. म्हणजे खर्चही तसा कमी आहे. त्यामुळे मराठी चित्रपटाचे उत्पन्नाचे साधन वाढेल. महाराष्ट्रात आज अकरा कोटी मराठी जनता असून त्यातील किती कोटी प्रेक्षकांपर्यंत मराठी चित्रपट पोहोचतो याचा गंभीरपणे विचार व्हायला हवा. जर नाट्यगृहांचा चित्रपटासाठी वापर केलाच तर हे प्रमाण नक्कीच वाढेल. आज आपण म्हणतो तशी मराठी चित्रपटाची स्थिती तेवढी चांगली




**चित्रपटाच्या व्यवसायात सर्वप्रथम 'अर्थकारण' महत्त्वाचे मानले जाते आणि निर्माता जगला अथवा उभा राहिला तर आणि तरच 'वेगळ्या वाटा'ना मोठा 'आधार' मिळेल. वेगळे चित्रपट काढा, वेगळ्या वाटा हव्यात असे बोलणे तसे सोपे असते. पण त्यात नेमका कसा अडथळा येईल हे सांगू शकत नाही.**





नाही. कोर्ट, किल्ला, ख्वाडासारखे चित्रपट राष्ट्रीय पुरस्कार पटकावतात तेव्हा आपल्याला उचंबळून येते, मराठीत काही वेगळे प्रयोग होत आहेत असे आपण खूप खूप कौतुकाने म्हणतो. पण व्यावसायिकदृष्ट्या मराठी चित्रपटाची स्थिती कशी आहे याचा खूपच गांभीर्याने विचार व्हायला हवा. कारण जवळपास पंचाऐशी टक्के निर्माते एकाच चित्रपटातून येऊन 'बाद' होतात, दुसरा चित्रपट निर्माण करण्याचे त्राणच त्याच्यात शिल्लक नसते ही एक भयाण वस्तुस्थिती आहे. हे जे अमुक चित्रपटाने आठ दिवसात चार कोटी कमावले, तमुक चित्रपटाने वीस कोटीचा 'गल्ला' जमवला, या सगळ्या फसव्या बातम्या आहेत. 'मिडिया' ते देण्यात एवढा आनंद का मानते तेच समजत नाही. राज्यातील एक कोटी जनता एका आठवड्यात मराठी चित्रपट 'पाहणे' शक्यच नाही. तरी एवढे उत्पन्न कसे होते? नवा निर्माता दुर्दैवाने या चढ्या आकड्यांना फसतो. अरे, किमान त्याच्या भावनांचा विचार करा. या उत्पन्नातून चित्रपटाचा निर्मिती खर्च, प्रमोशन-मार्केटिंगचा खर्च व आयकरासह विविध कर एवढे सगळे कापून जाऊन जे उरतात तीच खरी त्या चित्रपटाची कमाई असते. हे 'सत्य' मिडियाने लोकांसमोर आणायला हवे.'' मराठीत खूप चित्रपट निर्माण होतात, वेगळ्या प्रकारचे चित्रपट पाहायला मिळतात. हे सगळे कितीही सत्य असले तरी इतर बऱ्याच घटकांचा विचार व्हायलाच हवा. झीकडे निर्मिती, वितरण व प्रदर्शन याची उत्तम साखळी आहे, खूप पैसा आहे म्हणून त्याला मोठी झेप घेता येते. इतरांचाही विचार व्हायलाच हवा, तेव्हा चांगल्या वातावरणातही किती व कसा खडतरपणा आहे याचा प्रत्यय येईल, असे सांगून मकरंद अनासपुरेने एकदमच 'ज्वलंत' मुद्दा मांडून विचार करायला भाग पाडले.

**आपण मनोरंजनाची चौकट सांभाळून काही वेगळे करत असलो, तरी चित्रपटाच्या पूर्वप्रसिद्धीचा खर्च परवडत नाही. पण तो भार पेलण्याशिवाय गत्यंतरच नसते. त्या प्रसिद्धीतच चित्रपट प्रदर्शित होणे गरजेचेही असते... मराठी चित्रपटाला चांगले दिवस तर आले आहेत, पण 'अडथळ्याची स्पर्धा' काही संपलेली नाही.**



'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असते' आणि 'रमा माधव' अशा दोन चित्रपटांच्या दिग्दर्शनाच्या अनुभवामुळे मृणाल कुलकर्णी हिच्याकडे बरेच काही सांगता येण्यासारखे आहे. तिच्याकडे हा विषय काढताच ती सांगू लागली, ''मी दिग्दर्शनात उतरताना आपल्या बुद्धीला पटतील असेच चित्रपट साकारावेत यावर माझे 'लक्ष्य' होते. सुदैवाने माझ्या दोन्ही चित्रपटांना समीक्षक व प्रेक्षक या दोघांकडूनही उत्तम प्रतिसाद मिळाला. 'प्रेम म्हणजे...' मध्ये आधुनिक काळातील नातेसंबंधाची कल्पना आली अशी अनेकांनी मला प्रतिक्रिया दिली. एक-दोन समीक्षकांनी तर अमेरिकन चित्रपट शैलीचा जणू प्रत्यय आला असे या चित्रपटावर आपले प्रांजळ मत व्यक्त केले. 'रमा माधव' ही पेशवेकालीन प्रेमकथा साकारताना मला इतिहासाच्या वाचन व आवडीचा खूप खूप फायदा झाला. तपशिलामध्ये कुठे काही चूक राहू नये याची मी विशेष काळजी घेतली. पण हे सगळे करत असताना जाणवले की, आपण मनोरंजनाची चौकट सांभाळून काही वेगळे करत असलो, तरी चित्रपटाच्या पूर्वप्रसिद्धीचा खर्च परवडत नाही. पण तो भार पेलण्याशिवाय गत्यंतरच नसते. त्या प्रसिद्धीतच चित्रपट प्रदर्शित होणे गरजेचेही असते. पण नेमक्या त्याच शुक्रवारी आणखी तीन मराठी चित्रपट प्रदर्शनासाठी सज्ज असतात. म्हणजे पुन्हा अपेक्षित प्रमाणात चित्रपटगृहे मिळवणे अडचणीचे ठरते. मल्टीप्लेक्समध्ये आपल्या चित्रपटाला गैरसोयीच्या वेळा मिळतात. म्हणजे वेगळे काही करायचे तर आहे, पण त्यात अडथळे किती बघा?'' मराठी चित्रपटाला चांगले दिवस तर आले आहेत, पण 'अडथळ्याची स्पर्धा' काही संपलेली नाही असे म्हणून मृणाल कुलकर्णीने वेगळाच मुद्दा मांडला...

'बदललेला मराठी सिनेमा' हा खरंच किती, कसा, का बदलला हे वेळोवेळी चर्चेत असतेच. एखादा 'कोर्ट' वा 'नागरिक' येतो तेव्हा त्या बदलाची खूप चर्चा होते. पण तो खरंच तसा व तेवढा बदलला आहे का? आणि बदल म्हणजे नेमके काय?', 'व्यावसायिक चित्रपट देखील गरजेचा असतो ना' या साऱ्याचा येथे शोध तर घेतला आहे.

त्यातून काही प्रश्नांची उत्तरे मिळाली असतील.

तर काही उत्तरांतून नवे प्रश्नही निर्माण झाले असतील.

**– दिलीप ठाकूर**
ए ७०२, शारदा सहनिवास, राजेंद्रनगर,
बोरिवली (पूर्व), मुंबई – ४०० ०६६
भ्रमणध्वनी : ९८७०६१६२१६
glam.thakurdilip@gmail.com

# मेकअप इज आर्ट ऑफ इल्यूजन



**श्रीराम खाडिलकर**

**आ**पल्याकडे मेकअप कोठून आणि कसा आला याचा विचार करताना थेट विष्णुदास भावे यांच्या 'सीता स्वयंवर'पर्यंत मागे जावं लागेल. आता त्या नाटकात जो मेकअप आला तो कर्नाटकमधल्या यक्षगानमधून आला असं मानलं जातं, त्यामुळे नाटकातलेच मेकअपमन सिनेमात आल्यानं मेकअपमधला बटबटीतपणा तिकडून आला असावा असं मानायला वाव आहे. आज विक्रम गायकवाड हे कलाकाराला व्यक्तिरेखेची ओळख देण्याच्या तंत्रातलं ठळक आणि महत्त्वाचं नाव आहे. बालनाट्यापासून सुरूवात करून मराठीबरोबरच हिंदी, बंगाली आणि अनेक दाक्षिणात्य चित्रपटांसाठीही मेकअपमन म्हणून काम करत आलेला, दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळवून आपलं कसब सिद्ध केलेला अनुभवी कलाकार ही विक्रम गायकवाड यांची खरी ओळख.

पूर्वीच्या आणि आजच्या बदलत्या मराठी सिनेमात मेकअपच्या अंगानं काय जाणवतं हे जाणून घेताना विक्रम गायकवाड यांच्याशी संवाद साधला. तेव्हा ते म्हणाले की, मराठी सिनेमातला ब्लॅक ॲण्ड व्हाईट जो एरा होता, तो हॉलिवूडच्या तोडीचा होता. म्हणजे विश्राम बेडेकर, भालजी पेंढारकर, राजा परांजपे, व्ही. शांताराम अशा त्या काळातल्या दिग्दर्शक मंडळींच्या सिनेमातले मेकअप हे कॅरेक्टर ओरिअंटेड होते. त्यांनी दाखवलेला मेकअप हे सौंदर्य होतं. आत्मिक आणि नैसर्गिक सौंदर्य होतं. कॉस्मॅटिकनं साधलेलं सुंदरपण नव्हतं आणि ब्यूटी कॉन्टेस्टमधली ब्यूटी तर अजिबातच नव्हती. व्यक्तिरेखेचं सोज्ज्वळपण हेच त्याचं सौंदर्य होतं. वेश्या असली तरी तिच्यात साधेपणा होता आणि तरीही ती आकर्षक दिसायची. याउलट नटून-थटून जे काही दाखवलं जातंय ते जास्त हिडीस आहे असं आपल्याला वाटत असल्याचं त्यांनी सांगितलं.

नैसर्गिक सौंदर्याला महत्त्व देणं त्यावेळी शक्य होतं. कारण तेव्हाच्या दिग्दर्शकांपुढे आवाज करण्याची कोणाची हिंमत नव्हती. कारण एकतर ते स्वत: हुषार होते आणि त्यांचा दबदबाही होता. तसंच त्या काळातले राजा गोसावी, अरूण सरनाईक असे हिरो होते. त्यांना स्वत:चं आणि हिरो म्हणूनही एक व्यक्तिमत्व होतं. ते जाऊन छछोरपणा, शाब्दिक विनोद आणि अंगविक्षेप करणाऱ्यांना फोकस केलं जायला लागलं. असं करणारे नटही टॅलंट असलेलेच होते. प्रेक्षकाच्या काही वर्गाला त्यांनी केलेलं चालतं हा व्यावसायिक हेतू नजरेसमोर ठेवून त्या नटांना त्याच पठडीत बसवलं गेलं. आम्हाला लोक त्याच रूपात पसंत करतात, कॅरेक्टरप्रमाणे आमच्या मेकअपमध्ये बदल नको, नाही तर लोक आम्हाला स्वीकारणार नाहीत असा आग्रह त्यांनीही धरला. मग धोका कोण बरं पत्करणार?

खरं सांगायचं झालं तर मराठी काय किंवा हिंदी सिनेमा करणाऱ्यांनी काय, तो ॲडव्हान्स कसा होईल याचा विचार फारसा कधी केला नाही आणि या गोष्टीला त्यांनी कधी महत्त्वच दिलं नाही. त्यामुळे जो जो मेकअप आर्टिस्ट काम करेल ते काम, त्यातही हिरॉईनला आवडेल असा मेकअप हा उत्तम. म्हणजे असं की तिला जरा रंग लावला, तिला गोरी केली, तिला जरा लिपस्टिक लावली, तिचे डोळे ज्यानं चांगले केले तो मेकअप आर्टिस्ट मोठा झाला.

हिंदी सिनेमा दक्षिणेतल्या सिनेमाला घाबरतो हे वास्तव आहे. म्हणून इंडियन फिल्म



विक्रम गायकवाड

**मराठीतले कोणतेही क्लासिक सिनेमा घ्या; त्याच्या आसपासही आजच्या मराठी सिनेमाचा मेकअप फिरकू शकत नाही, असं दोन राष्ट्रीय पुरस्कारांवर आपली मोहर उमटवलेले प्रख्यात मेकअप आर्टिस्ट विक्रम गायकवाड म्हणतात. कलाकाराला व्यक्तिरेखेची ओळख देण्यात मेकअप हे माध्यम महत्त्वाची कामगिरी पार पाडत असतं. अशा माध्यमाच्या अंगानं आजचा मराठी सिनेमा कुठे चाललाय त्याचे विक्रम गायकवाड यांना दिसलेले हे चित्र.**



**सिनेमा आता परिपूर्ण व्हायला पाहिजे. मराठीत चांगलं तंत्र शिकलेली माणसं आहेत, पण त्यांनासुद्धा कन्फ्यूजन आहे. मराठी सिनेमा आज कान्सला जावो किंवा आणि कोणत्याही इन्टरनॅशनल फेस्टिव्हलला जावो, आपल्या राज्यात तो सिनेमा चालत नाही ही त्यांची खंत आहे. आता ज्यांचा सिनेमा चालतो तो काही वाईट नाही, पण तो जागतिक दर्जाचाही नाही. तसाही सिनेमा असावा, नाही असं नाही, पण मराठीत सेन्सिबल सिनेमा यायला हवा. त्यात समाजाचं प्रतिबिंब दिसायला हवं, मार्ग दिसायला हवा.**



इंडस्ट्री दिल्लीकडे नेण्याचे जोरदार प्रयत्न झाले. पण ते अपयशी ठरले. त्यामुळे आपल्या तंत्रज्ञांनी अधिक जोरदार प्रयत्न करून मराठी सिनेमाला अधिक प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अलीकडच्या काही वर्षांमध्ये फॅन्ड्री, बालगंधर्व, असे चांगले विषय आणि चांगले सिनेमा आले खरे, पण आपण त्यानं हुरळून जातो. ते सगळे स्टोरीबेस्ड आहेत, त्यात टेक्नॉलॉजीचा वापर किती आहे हे लक्षात घेतलं पाहिजे. नाहीतर आपलं नाटक आणि त्यासाठी नाटकबेस्ड मेकअप चालला आहेच की. तेव्हा हा सिनेमा आता परिपूर्ण व्हायला पाहिजे असंही त्यांनी सांगितलं. मराठीत चांगलं तंत्र शिकलेली माणसं आहेत, पण त्यांनासुद्धा कन्फ्यूजन आहे. मराठी सिनेमा आज कान्सला जावो किंवा आणि कोणत्याही इन्टरनॅशनल फेस्टिव्हलला जावो, आपल्या राज्यात तो सिनेमा चालत नाही ही त्यांची खंत आहे. आता ज्यांचा सिनेमा चालतो तो काही वाईट नाही, पण तो जागतिक दर्जाचाही नाही. तसाही सिनेमा असावा, नाही असं नाही, पण मराठीत सेन्सिबल सिनेमा यायला हवा. त्यात समाजाचं प्रतिबिंब दिसायला हवं, मार्ग दिसायला हवा, सिनेमा विनोदी असावा पण त्यातला विनोद राजा परांजपेंचा असावा, राजा गोसावींचा असावा. किती वर्ष शब्दच्छल करणार? एक पिढी झाली, दुसरी झाली, तरीही ते तेच करतायत. याला काहीच अर्थ नाही. हे कुठेतरी आता थांबलं पाहिजे, असंही त्यांनी बोलून दाखवलं.

स्कूल म्हणजे काय, असा आजही लोक प्रश्न विचारतात. यावर बोलताना विक्रम गायकवाड म्हणाले की, परदेशात नट-नट्यांच्या स्कूलला फार महत्त्व आहे. आपल्याकडे तशी पद्धतच नव्हती. मीसुद्धा बालनाट्यातूनच आलोय. पण इन्स्टिट्यूटमध्ये जाऊन पाहिलं तेव्हा समजलं की आपण करतोय ते भले चांगलं होतंय, पण तरीही ते बरोबर नाही, कारण काय करतोय ते आपल्यालाच नीट माहिती नाही. आपल्या प्रत्येक कृतीला शास्त्रीय आधार हवा, तो माझ्याकडे नाही, ते स्कूलमध्येच शिकवलं जातं असं लक्षात आलं. मग मी स्वत: परदेशातलं स्कूल जॉईन केलं. स्कूल किती महत्त्वाचं आहे हे तेव्हा मला समजलं. कारण प्रॅक्टिकल करतच माणूस मास्टर होत असतो. वास्तविक आपल्याकडे कोणतंही स्कूल नव्हतं. फक्त प्रभात स्टुडिओला स्कूल समजायचे. पण ते काही स्कूल नव्हे. तो प्रॅक्टिकल स्टुडिओ होता. पगारी काम करत तिथं तयार झालेली तंत्रज्ञ तिथं असत. त्यांनाच मग प्रभातच्या स्कूलमधून आला असं म्हणायला लागले. त्या स्कूलमधल्यांना सुरूवातीलाच जर रीतसर स्कूलचं प्राथमिक शिक्षण मिळालं असतं तर आपण या क्षेत्रात खूपच पुढे गेलो असतो.

सिनेमाला वर काढायचे प्रयत्न नव्या पिढीची आधुनिक तंत्र शिकलेली मुलं करतायत. या मुलांचे प्रयत्न चांगले चालले आहेत. पण त्यांना आज कोणी बजेट देत नाहीत.

बजेटबाबतचा एखादा अनुभव सांगण्याचा आग्रह केल्यावर ते म्हणाले की, अगदी श्याम बेनेगल यांनी मला एकदा बोलावलं आणि म्हणाले की, मी साधा सिनेमा बनवतोय. त्यासाठी माझ्याकडे बजेट नाहीये. त्यामुळे मी तुला अमुक रक्कम देईन, पण तुला मेकअपसाठी जे आणि जेवढं सामान लागेल त्यात कोणतंही कॉम्प्रमाईज करणार नाही. असं हवं. त्यामुळे कमी पैसे मिळाल्याचं दु:ख न वाटता काम केल्याचं समाधान तरी नक्कीच मिळतं.

आजच्या सिनेमाबद्दल काय वाटतं, या प्रश्नाला उत्तर देताना गायकवाड म्हणाले की, आपल्याकडचे संत ज्ञानेश्वर, तुकाराम, शेजारी, कुंकू, मराठा तितुका मेळवावा असे मराठीतले कोणतेही क्लासिक सिनेमा घ्या. त्याच्या आसपासही आजच्या मराठी सिनेमाचा मेकअप फिरकू शकत नाही.

रंगीत सिनेमाला शोभणार नाहीत असे रंग तोंडाला फासायला कलाकारांनी मधल्या काळात सुरुवात केली. हा रंग मला लाव असं नट किवा नटीच सांगायला लागले. त्यामुळे त्या मेकअपमनची किंमतही त्यांनी घसरवली. इतकंच नाही तर त्यांनी मेकअपमनला त्याचं कामही विसरायला लावलं. त्याचबरोबर आणखी एक गोष्ट अशी झाली की, रंगीत फिल्म आल्यानंतर १९६५ ते १९७० चा जो काळ आहे त्या काळात मेकअप पाहिल्यावर त्यातले गोंधळ दिसतात. पांढरे पडलेले चेहरे, गुलाबी लिपस्टिक वगैरे. . . असं घडण्यामागचं मुख्य कारण म्हणजे वैचारिक गोंधळ असं सांगून विक्रम गायकवाड पुढं असंही म्हणाले की, कलर

फिल्मसाठी मेकअपचे टोन काय असतात, स्कीनच्या किती जवळ काम केलं पाहिजे हे समजणं गरजेचं असतं. खरंतर मराठीत अनेक उत्तम मेकअपमन झाले, पण त्यांची काही व्हावी तशी कदर झाली नाही. सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा असा की, जेव्हा सिनेमा रंगीत झाला तेव्हा अनेक कॅमेरामन परदेशात पाठवून त्यांना नवीन आधुनिक तंत्राचं शिक्षण दिलं गेलं, ते योग्यच होतं, पण तेव्हा मेकअप आर्टिस्टकडे दुर्लक्षच केलं गेलं. मेकअप करणाऱ्यांना मात्र कोणीही परदेशात पाठवून मेकअपच्या आधुनिक तंत्राचं शिक्षण दिलं नाही. वास्तविक कॅमेरामध्ये क्लोजअपला कलाकाराचा फक्त चेहराच दिसतो, शिवाय प्रेक्षक सिनेमा पाहताना कॅमेरा विसरतो आणि चेहरा लक्षात ठेवतो. मग अशा चेहऱ्याची काळजी घेणाऱ्या तंत्रज्ञाला नवं शिक्षण नको का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. अलीकडच्या काळात व्यक्तिरेखेला साजेसा कलाकार दिसावा असा विचार जाणीवपूर्वक केला जायला लागलाय. नारबाची वाडी, काकस्पर्श, या सिनेमातल्या सगळ्याच कलाकारांकडे पाहिल्यावर त्या खऱ्या व्यक्तिरेखा असल्याचं जाणवतं. नारबाची वाडीमधल्या प्रभावळकरांची दाढी अगदी अस्सल वाटली. मनोज जोशींची वयाची ऐंशी वर्ष उलटलेली, चेहऱ्यावर वयानुसार सुरकुत्या पडलेली, जमीनदार ही व्यक्तिरेखा खरी आणि नेमकी वाटण्यामागे मेकअपचा मोठा वाटा होता; सुबोध भावे हा कलाकार लोकमान्य वाटला तो प्रामुख्यानं मेकअपच्या मदतीनंच, हे विसरून चालायचं नाही.

लोकमान्य या सिनेमाच्या वेळी तर काम सुरू असल्यानं आमीरखानचं आलेलं काम विक्रम गायकवाड यांनी सोडलं होतं, त्याबद्दल विचारल्यावर ते म्हणाले की, कमिटमेंटच महत्त्वाची असते. ओम राऊतला शब्द दिलेला असल्यानं आमीरचं काम करायला मी गेलो नाही हे ओम राऊतला माहिती आहे. आपण प्रोफेशनल झालं पाहिजे.

आजचे कॅमेरा डिजिटल आहेत. इमेज अधिक शार्प दिसते, त्यामुळे मेकअपच्या फक्त मॅन्युअल स्कीलनं काम करून भागणार नाही, त्यासाठी कॉम्प्युटर ग्राफिकची मदत घ्यावी लागते. शेवटी मॅनमेड आणि मशीनचं स्कील वेगळं आहे याचा तुम्ही विचार करता की नाही हे महत्त्वाचं आहे.

मध्यंतरी सुंदरतेची व्याख्या बदलली होती. ती आभासी होती. वरवरच्या दिसण्यालाच सुंदर म्हणायला लागले. वास्तविक हे बरोबर नाही. जेवढं गरजेचं आहे तेवढंच दुरूस्त करणं म्हणजे सुंदर. तेच सौंदर्य. आपल्याकडे मधुबाला, नूतन, नर्गिस या किती सुंदर होत्या, त्यांना फक्त प्रकाशाच्या दिव्यांपासून संरक्षण म्हणून मेकअपची गरज होती. तेवढा केला की त्या सुंदर दिसायच्या. त्यांच्या नंतरच्या काळात मात्र मेकअपची व्याख्याच बदलली. वेडेपणाचा कळस झाला. रंग जेवढा जास्त तेवढं सुंदर असं समीकरण तयार झालं. त्यालाही कारण आहे. परदेशातल्या सिनेमात जो मेकअप होता तो दोन-तीन वर्षांनी आपल्याकडे यायला लागला. तिथे व्यक्तिरेखेला शोभेल असा मेकअप असायचा, मात्र आपल्याकडे तीच गोष्ट फॅशन म्हणून केली जायला लागली. याचा परिणाम असा झाला की, हिरॉईनची विधवा आई- पांढरी साडी नेसलेली नटी - केसांना हेअर डू, ओठांना लिपस्टिक आणि डोळ्यांसाठी आय-लाईनर वापरताना दिसली. असं सांगून ते पुढे म्हणाले की, आपण सुंदर दिसायचं की, नेमकी व्यक्तिरेखा म्हणून दिसायचं, हे ठरवता आलं पाहिजे, नाही तर असं घडतं. हे टाळण्यासाठी नट-नट्यांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

विक्रम गायकवाड यांनी असं म्हणण्यामागची कारणं समजून घ्यायला हवीत. एखाद्या व्यक्तिरेखेला पाहिल्यावर याला मेकअप केला आहे का असा प्रश्न पडलाच पाहिजे, तरच तो उत्तम मेकअप. मुळात रिअलिटी आणि आभास यातला फरक कळायला हवा. आपण जो आभास असं म्हणतो, तो सत्यतेच्या खूप जवळचा असायला हवा. शेवटी मेकअप इज आर्ट ऑफ इल्यूजन हे विसरून चालायचं नाही.

**- श्रीराम खाडिलकर**
भ्रमणध्वनी : ९९६००००८१४
shriram1@rediffmail.com



**सिनेमा रंगीत झाला तेव्हा अनेक कॅमेरामन परदेशात पाठवून त्यांना नवीन आधुनिक तंत्राचं शिक्षण दिलं गेलं, ते योग्यच होतं, पण तेव्हा मेकअप आर्टिस्टकडे दुर्लक्षच केलं गेलं. मेकअप करणाऱ्यांना मात्र कोणीही परदेशात पाठवून मेकअपच्या आधुनिक तंत्राचं शिक्षण दिलं नाही.**



# सुंदर दिसण्याची व्याख्या बदलली

**श्रीराम खाडिलकर**



पौर्णिमा ओक

**कॉस्च्युम्स (वेषभूषा) हा एक स्वतंत्र विषय आहे. एखाद्या व्यक्तिरेखेला नेमकं रूप लाभावं यासाठी वेषभूषा महत्त्वाची असते. परंपरा, संस्कृती आणि प्रगतीच्या प्रवाहांचा भरपूर अभ्यास असणं गरजेचं असतं, शिवाय बारीक-सारीक तपशीलच व्यक्तिरेखेला हुबेहूबपणा देण्यात मोलाची कामगिरी बजावत असतात. तेच व्यक्तिरेखेच्या लुकमध्ये मोलाची भर घालत असतात. आजवरचा मराठी सिनेमा पाहिला तर हे नकळत जाणवेल.**

**सु**मारे पंचवीसेक वर्षे कॉस्च्युम्स डिझाईनर म्हणून पौणिमा ओक उत्तम काम करत आहेत. ताऱ्यांचं बेट, रमा माधव , तुकाराम, साहेब, अशा अगदी अलीकडच्या सिनेमांसाठी त्यांनी जसं काम केलं आहे तसंच नागरिक या सिनेमासाठी त्यांनी ऑस्करविजेत्या भानू अथय्या यांच्यासोबत काम केलं आहे.  एप्रिक फेरी आणि नीता लुल्ला यांच्याबरोबरच मोहेंजोदाडो या आगामी भव्य हिंदी सिनेमासाठीही पौणिमा ओक कॉस्च्युम्स करतायत. अशा या पौणिमा ओक यांचा कॉस्च्युम्स आणि त्या अनुषंगानं मराठी सिनेमा याबद्दल अभ्यास आहे. त्यांच्या या संदर्भातल्या निरीक्षणातून मराठी सिनेमातले बदलते कॉस्च्युम्स या दृष्टीनं काही महत्त्वाच्या गोष्टी जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

पूर्वीच्या मराठी सिनेमाची कॉस्च्युम्सच्या अंगानं खास अशी कोणती गोष्ट होती ते सांगताना त्या म्हणाल्या की, पूर्वीच्या मराठी सिनेमात रिअलिस्टिक असं खूप होतं. त्यात कॉस्च्यूम्स इंपॉर्टन्ट होते, शिवाय ते त्यातल्या प्रत्येक कॅरेक्टरच्या बरोबर जेल व्हायचे. म्हणजेच त्याला शोभतील असेच ते दिसायचे. हिरो म्हणून तो किंवा हिरॉईन म्हणून ती वेगळे दिसतील असं काही पूर्वी नव्हतं. त्यांच्या ॲक्टिंग आणि बॉडी लँग्वेजमुळे ते तसे वेगळे दिसायचे. सिनेमा कृष्ण-धवल असतानाच्या काळात कॉस्च्यूमवाईज त्यांना वेगळं महत्त्व दिलं जात नव्हतं.

मग यात बदल नेमके कधी होत गेले याबद्दल त्यांनी सांगितलं की सिनेमा जेव्हा रंगीत झाला तेव्हा लोकांना ते आवडायला लागलं, मग चांगलं काय आणि कसं दिसेल त्यानुसार त्यात बदल केले जायला लागले. सत्तरच्या आधी आपल्या हिरॉईन्स प्रॉपर ड्रेस्ड असायच्या. चांगले आणि मॉडर्न कपडे त्या घालत होत्या, पण खूप तोकडे, लांडे कपडे त्यांनी घातले नाहीत. आपल्याकडे हिंदी आणि मराठीची एक लाईन आहे, डिव्हिजन आहे. हिंदी सिनेमा कृष्ण-धवल होता तेव्हा एक सोज्ज्वळपणा होता. ७०-८० चा काळ आला होता तेव्हा आपल्याकडे सोज्ज्वळपणा तसाच राहिला होता, पण हिंदीमध्ये तो राहिला नव्हता. तेव्हा हिंदीत ग्लॅमर यायला लागलं होतं. म्हणजे मोठ्या गळ्याचे ब्लाऊज, नाभीखाली नेसायची साडी, छोटे कपडे हे सगळं आलं होतं, मात्र आपल्याकडे म्हणजे मराठीत त्याची लाट आली नव्हती.

आजचं चित्र तर फारच वेगळं आहे; ते कसं, याबद्दल त्यांनी सांगितलं की, आताची पिढी तर खूपच स्मार्ट आहे. बऱ्याच गोष्टी त्यांच्यात इन-बॉर्नच आहेत. ते लहान असताना आपल्याच पिढीनं त्यांना लहान कपडे घातले, त्याची त्यांना सवयही झाली, इतकंच नाही तर अवती-भवतीच्या गोष्टी त्यांना खूप दिसतात. तसंच त्यांना कपडे कॅरी करता येतात, छोटे कपडे घातले तरी त्या चांगल्या दिसतात. कॉस्च्युम्स ही एक फॅशन आहे, जी तुम्ही कॅरी करू शकता, ती चांगली आहे.

आपल्या मराठी इंडस्ट्रीतही छान दिसणाऱ्या मुली एकेकाळी होत्या. पण, फक्त त्या मॉडर्न कपडे घालू शकत नाहीत म्हणून त्या मागे पडल्याचं दिसलं, तेव्हा खूप वाईट वाटलं. आज मिस इंडिया, मिस युनिव्हर्स असलेल्या ज्या ॲक्ट्रेस बनतात त्यांची गोष्ट वेगळी असते कारण त्या सगळ्या प्रोसेसमधून जातात. पण ज्या ॲक्टिंग कोर्स वगैरे करून येतात, त्यांच्यासाठी तिथे एक फॅकल्टी कॉस्च्युम्सचीही असायला

हवी असं वाटत असल्याचं निरीक्षणही त्यांनी बोलण्याच्या ओघात नोंदवलं. सर्वसामान्य लोक नेहमी आपल्या हिरॉईनला इमिटेट करतात, तिच्यासारखी साडी नेसावी, तिच्यासारखं ब्लाऊज आपण घालावं असं सर्वसामान्य लोकांना सतत वाटत असतं. आजवरचा आपला हा प्रवास खूप मोठा आहे, पण त्याचं सूत्र मात्र स्टाईलचं अनुकरण असंच राहिलं आहे.

पूर्वीच्या कृष्ण-धवल फिल्मस पाहताना त्यातल्या हिरॉईन्स आजही तेवढ्याच सुंदर दिसतात. फिल्म कृष्ण-धवल असूनही त्या सुंदर कशा काय दिसतायत याचा विचार आपण का करत नाही? त्यांच्या चेहऱ्यावर सोज्ज्वळपणा होताच, पण त्याचबरोबर त्यांची ज्वेलरी, त्यांचे कपडे यामुळेही खूप फरक पडायचा.

आजच्या तुलनेत पूर्वीच्या परिस्थितीचा विचार करताना पौर्णिमा ओक यांनी काही निरीक्षणं नोंदवली. त्याबद्दल बोलताना त्या म्हणाल्या की, बदल येत जाण्यामागे दोन महत्वाच्या गोष्टी आहेत. एकतर आपल्याकडच्या पूर्वीच्या बऱ्याच जणींची शिक्षणं फारशी झालेली नव्हती, प्राथमिक शाळेतलं शिक्षण जेमतेम झालेली अभिनेत्री डॉक्टरची भूमिका सहज करायची, पण नंतरची कलाकारांची पिढी शिक्षण घेतलेली आहे. आजचा सिनेमा तांत्रिकदृष्ट्या खूपच प्रगत झालेला आहे. पूर्वी असं होतं की, ही जरा बरी दिसते, मग हिला अभिनय शिकवू या. हिरॉईन करू या. पूर्वी यासाठी वेगळे ट्रेनिंग नव्हतं, मात्र आज ते आहे. व्हिसलिंग वूडस् सारख्या सिनेमाचं शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. पूर्वी घरची गरज म्हणून मुली सिनेमात काम करायच्या, आज मात्र अनेक मुली व्यवसाय म्हणून, आयटम साँग गर्ल्स म्हणून काम करतात, या स्टेजला आज आपण आहोत.

डॉक्टर, इंजिनियर व्हायचे तसे आज डिझाईनर व्हायचंय असं आज सांगतात. पूर्वी या प्रकारचं शिक्षणच नव्हतं. या विषयातलं शिक्षण घेताना आलेला अनुभव सांगताना पौर्णिमा ओक म्हणाल्या की, १९९०च्या सुमाराला मला फॅशन डिझाइनिंग करायचं होतं, तेव्हा माझ्या आईला तो महागडा ड्रॉइंग क्लास वाटत होता. पुढल्या पिढीला तशी अडचण आली नाही, कारण आज तो डिग्री कोर्स आहे. माझ्या आणि आईच्या जनरेशनमधला फरक सिनेमातल्या बदलांचा विचार करतानाही आपण लक्षात घेतला पाहिजे. नवीन आणि जुन्याची सांगड उत्तम घालता आली तर काहीतरी चांगलं नक्कीच होऊ शकतं. रिअलॅस्टिक स्टाईल, कंटेंपररी स्टाईल, मॉडर्न स्टाईल, पिरिएड फिल्मसाठी वेगळी स्टाईल अशा खूप गोष्टी यात करता येतात. पूर्वीच्या फिल्म्स सेपिया टोनच्या असायच्या. आज आपण सेपिया मुद्दाम करतो.

पूर्वीच्या म्हणजे शांता आपटे, सुलोचनाबाई, हंसाबाई, लीला गांधी, जयश्री गडकर, उषाकिरण, सीमा, उमा अशा हिरॉईन्सच्या ब्लाऊजचे दिसायला साधे असले तरीही वेगवेगळे पॅटर्न्स लक्षात घेण्याजोगे होते. त्याच्याकडे प्रेक्षकाचं लक्ष जात होतं. ट्राऊझर आणि शर्ट घातला तर इस्त्रीची रेघही चुकता कामा नये इतके ते लोक परफेक्शनिस्ट होते. आताही असे काही लोक आहेत. पण तेव्हा ब्लॅक ॲण्ड व्हाईट दिसणं हेच महत्त्वाचं होतं. ब्लॅक ॲण्ड व्हाईटमध्ये जेवढं छान दिसेल, ते पाहायला जेवढी मजा येईल तेवढी कलरमध्ये मजा आलेली तुम्हाला जाणवणार नाही, कलरची मजा असते, पण ब्लॅक ॲण्ड व्हाईटची मजा काही वेगळीच, हे कोणीही मान्य करेल.

टेलिव्हिजनचाही मोठा परिणाम सिनेमावर झालाय, असं सांगताना त्या म्हणाल्या की, आज रोज नवीन आर्टिस्ट येतायत, सिनेमाही खूप येतायत. पूर्वीचे सिनेमा लक्षात राहायचे, आज तसं होत नाही. पूर्वी सिनेमा जास्त आणि माणसं कमी होती, आज माणसं जास्त आणि सिनेमा कमी आहेत असं निरीक्षणही त्यांनी नोंदवलं.

कॉस्च्युम्स डिझाईनर नेमका काम कसं



**आताही असे काही परफेक्शनिस्ट लोक आहेत. पण तेव्हा ब्लॅक ॲण्ड व्हाईट दिसणं हेच महत्त्वाचं होतं. ब्लॅक ॲण्ड व्हाईटमध्ये जेवढं छान दिसेल, ते पाहायला जेवढी मजा येईल तेवढी कलरमध्ये मजा आलेली तुम्हाला जाणवणार नाही. कलरची मजा असते, पण ब्लॅक ॲण्ड व्हाईटची मजा काही वेगळीच, हे कोणीही मान्य करेल.**





**आजचा सिनेमा तांत्रिकदृष्ट्या खूपच प्रगत झालेला आहे. पूर्वी असं होतं की, ही जरा बरी दिसते, मग हिला अभिनय शिकवू या. हिरॉईन करू या. पूर्वी यासाठी वेगळे ट्रेनिंग नव्हतं, मात्र आज ते आहे. काही जणींमधून हिरॉईनची निवड केली जाते. पूर्वी घरची गरज म्हणून त्या सिनेमात काम करायच्या, आज मात्र अनेक मुली व्यवसाय म्हणून, आयटम साँग गर्ल्स म्हणून काम करतात, या स्टेजला आज आपण आहोत.**



करतो त्याबद्दल थोडक्यात सांगण्याचा आग्रह केल्यावर पौर्णिमा ओक म्हणाल्या की, आधी आम्ही सिनेमाचं स्क्रिप्ट वाचतो, डिरेक्टरशी चर्चा होते, त्यानं ही फिल्म कशी बघितली आहे, इमॅजिन केली आहे हे आपल्याला कळणं आवश्यक असतं. प्रत्येकजण वेगळा विचार करत असल्यानं डिरेक्टरला ती कशी दिसते हे सगळ्यात महत्त्वाचं असतं. ती चर्चा झाली की मग ॲक्ट्रेस कोण आहे? ॲक्टर कोण आहे? ती बारीक आहे आणि तिला भारदस्त दाखवायची आहे किंवा काय करायचं आहे, त्यासाठी काय करावं लागेल? तिच्या त्या कॅरॅक्टरसाठी वाईट काय आहे असा विचार करून त्यातले मायनस पॉईंट शोधले की ते लपवायचे आहेत हे ठरतं. तसंच प्लस पॉईंटस् शोधून त्याचा फायदा कसा होईल असाही विचार ओघानंच होतो. रमा माधव सिनेमाचा अनुभव सांगताना त्या म्हणाल्या की, गोपिकाबाई भारदस्त होत्या असं त्यांचं वर्णन आहे. वाड्यावर त्यांचा दबदबा होता, त्यांचं कपाळ खूप मोठं होतं. जुन्या एक रुपयाच्या नाण्याएवढं ठसठशीत मोठं कुंकू त्या लावत असत. त्या कुंकवाच्या खाली तुळशीवृंदावन गोंदवलेलं होतं, असा सगळा तपशील असलेलं वर्णन वाचल्यानंतर गोपिकाबाईची भूमिका मृणाल कुलकर्णी करत असल्यानं वर्णनासारखी ती दिसायला हवी हे लक्षात आलं. पण गोपिकाबाईचं वर्णन आहे तसं आणि तेवढं सगळं मृणालच्या बाबतीत कसं दिसणार? मग त्यासाठी काय करावं लागेल? असा विचार केला आणि कपाळाच्या वरच्या भागाचे थोडेसे केस कापून ते अशा पध्दतीनं मागे वळवले की त्यामुळं तिचं कपाळ मोठं दिसेल. मग तिला ब्लाऊजवर एक जाकिट दिलं. त्यामुळं ती आपोआप हेल्दी दिसायला लागली. हे असे तपशील बारीसारीक असले तरीही व्यक्तिरेखेच्या जवळ जाण्यासाठी ते खूपच महत्त्वाचं असतं.

आता कॉस्च्युम्सच्या संदर्भातलंच उदाहरण सांगायचं तर एकदा जिजाबाईचा ग्राफ ठरवताना शिवबा लहान असतानाच्या प्रसंगापासून सुरुवात झाली. त्या प्रसंगात जिजाबाई सिल्कची साडी नेसलेली दिसली. त्यानंतर हळूहळू कॉटनच्या साड्या नेसलेली आणि मग एकदम पांढरी साडी नेसलेली दिसली. हा जो ग्राफ आहे तो ठरवावा लागतो. म्हणजे आधी आई होती, मग सासू झाली, मग आजी झाली असा तो क्रम आहे. त्यामुळेच तर ती व्यक्तिरेखा जशीच्या तशी दिसते.

फॅशनच्या बाबतीत काही उदाहरणं देऊन सांगण्याची विनंती केली तेव्हा त्या म्हणाल्या की, फॅशनच्या बाबतीत एक गोष्ट अशी आहे की, एकेकाळची असलेली फॅशन काही वर्षांनी परत येत असते, फक्त तिचा फॉर्म काहीसा वेगळा असतो. नऊवारी साडीच्या बाबतीत बोलायचं तर पूर्वी चापूनचोपून नेसलेली नऊवारी साडीही मराठी सिनेमाच्या हिरॉईनला शोभून दिसायची. त्यानंतर मग बरीच वर्षं गेली. आज नऊवारी साडीची फॅशन परत एकदा आली आहे. त्याच साडीचा मॉडिफाईड अवतार धोती पॅण्टस्‌च्या रूपात आलेला आपल्याला आज दिसतोय, आणि आपण ते पाहतोच आहोत. नऊवारीचंच ते प्रगत रूप आहे. फक्त धोती पॅण्टला नऊवारीसारखा काष्टा नाही. आधी बेलबॉटम पॅण्ट होत्या. आपल्या हिरॉईन्स त्या वापरताना फिशकट हिपस्टर्स आणि शर्ट आले. रूही बेर्डे काय, रंजना काय किंवा इतरही अनेक जणींनी अशा प्रकारचे कॉस्च्युम्स वापरले आहेत. आज लायक्राचं सुंदर कापड येतं, त्यामुळे त्यात फरक झालाय. पूर्वी शर्टची कॉलर मोठी होती, आज ती बारीक झाली आहे इतकंच. ब्लाऊजचं उदाहरण घ्या. पूर्वी ब्लाऊज बंद गळ्याचा होता. मग गळा मोठा व्हायला लागला. बंद पाठ असलेल्या ब्लाऊजची पाठ फॅशनच्या ओघात उघडी झाली. पूर्वी स्लीव्हलेस ब्लाऊजची फॅशन होती. आता थेट ब्रा ब्लाऊज आलेत.

एक गोष्ट स्पष्ट आहे. फॅशन रोजच बदलत असते. आपण ती कधी स्वीकारायची आणि कशी हा आपला प्रश्न आहे. समाजाचं प्रतिबिंब सिनेमात पाहायला मिळत असल्यानं त्या –त्या काळाचं प्रतिनिधित्व तेव्हाच्या सिनेमात होतं गेलंय. आजची कलाकारांची तरूण पिढी हुषार आहे. ब्राईट कलर्स, काहीवेळा निऑन शेडस्‌चे कॉस्च्युम्सही ते उत्तम कॅरी करू शकतात. काळानुसार फॅशन बदलतच जात असते आणि बदलतच राहणार.

**– श्रीराम खाडिलकर**
भ्रमणध्वनी : ९१ ९९६००००८१४
ShriramK1@rediffmail.com

# ...नाचतो आम्ही तालात

प्रभा कुकडे



सुबल सरकार यांनी मराठी चित्रपटातील नृत्यामध्ये वाखाणण्याजोगे बदल केले यात काहीच दुमत नाही. परंतु काळ बदलला, त्याप्रमाणे रसिकांची आवडही बदलली. याच बदलांना सामोरे जाताना मराठीमध्ये आजच्या घडीला ख्यातनाम नृत्यदिग्दर्शकांची एक फळी तयार होताना आपल्याला दिसून येत आहे. यातील काही नृत्यदिग्दर्शकांशी साधलेला हा संवाद.

**दिपाली विचारे**

दिपालीने वयाच्या आठव्या वर्षापासून शास्त्रीय नृत्याचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली होती. एम. ए. कथ्थक करून दिपालीचा प्रवास केवळ इथेच थांबला नाही, तर तिने वडिलांच्या सांगण्यावरुन एल एल बीचे शिक्षणही पूर्ण केलेले आहे. संदीप सोपारकर यांच्याकडे जाऊन शिकूनही घेतेलेलं आहे. दिपालीच्या मते आपलं शिक्षण हे सदैव सुरुच राहायला हवे. तर आपण काळाच्या मागे राहणार नाही.

शाळेपासून दिपालीच्या नृत्याचा प्रवास सुरु झालेला होता. हाच प्रवास आणि तिचे अभिनयाचे नाते अधिक दृढ झाले महाविद्यालयामध्ये. 'केतन दातारच्या ग्रुपसमवेत काम करताना मी अधिक घडत गेले. मला काय करायचे आहे हे तिथेच स्पष्ट झाले होते' असे मत दिपाली व्यक्त करते.

शाळेपासून नृत्याचे अनेक कार्यक्रम दिपालीने सादर केले होते. त्यामुळे स्टेजशी नाते खूप जवळचे होते. असे असले तरी दिपालीची खरी चुणूक दिसली ती 'ढगाला लागली कळं पाणी थेंब थेंब गळं' या आल्बमच्या माध्यमातून. या आल्बमसंदर्भात बोलताना ती म्हणते, एमटीव्हीतर्फे करण्यात आलेला हा पहिला मराठी आल्बम होता. या आल्बमसाठी नृत्य बसवायचे आहे असे समजल्यावर मी त्या दिग्दर्शकाला जरा घाबरतच म्हटले, की या गाण्याचा अर्थ काय आहे ते तरी माहीत आहे का... त्यावर दिग्दर्शक रॉड्रीक्स केवळ इतकंच म्हणाला की, गाणं पाहताना लोकांना धम्माल यायला हवी हाच हेतू डोळ्यांसमोर ठेव आणि तुला हवे तसे गाणे बसवं.

दिपालीने तिचे काम करण्यास सुरुवात केली. हा आल्बम रिलीज झाला आणि आजही हा आल्बम पब आणि लोकांमध्ये तितकाच हिट आहे हे सिद्धच झालेले आहे. त्यानंतर मात्र दिपालीने मागे वळून पाहिले नाही. 'एक होती वादी' या चित्रपटापासून दिपालीच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. त्यानंतर मग 'देवकी' हा चित्रपट केला. या चित्रपटाकरता महाराष्ट्र राज्याचा पुरस्कारही मिळाला. या चित्रपटासंदर्भात आठवण सांगताना दिपाली म्हणते, त्यातले एक दहीहंडीचे गाणे शूट करण्यासाठी तब्बल तीन दिवस लागले होते. मिलिंद उके या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. त्यांच्या कामाची पद्धत अतिशय उत्तम असल्यामुळे चित्रपटातील गाण्याचे महत्त्व काय असते यावरुनच त्यांनी एका गाण्यावर तीन दिवस काम करण्याची परवानगीसुद्धा दिली. नाहीतर आपल्याकडे आजही केवळ गाण्याच्या शुटींगसाठी एक दिवस राखला जातो.

नव्वदपेक्षा जास्त फिल्म्स केलेल्या दिपालीची आता या क्षेत्रात चांगलीच घडी बसलेली आहे. गेली सतरा वर्षे या क्षेत्रात काम करणारी दिपाली म्हणते की, आपल्याकडे अजूनही गाण्याचे लाड पुरवले जात नाहीत.

**एखादा चित्रपट हिट कसा ठरतो याची अनेक समीकरणे असतात. चित्रपटातील कलाकार यांच्या सोबतीनेच कथा, पटकथा, त्यातील संवाद, गाणी, नृत्य आणि मुख्य म्हणजे कॅमेराचे तंत्र अशा अनेक गोष्टींचा उत्तम संगम झाला तर चित्रपट हिट ठरतो. मराठी चित्रपटांकडे गेल्या काही वर्षांत नजर टाकल्यास आपल्याला एक जाणवेल की, आता आपला मराठी चित्रपटही नृत्याच्या बाबतीत कात टाकू लागलेला आहे. पूर्वी केवळ झाडांच्या भोवती आणि शेतातील नृत्यामध्ये चित्रपट गुरफटलेला दिसायचा. परंतु गेल्या काही वर्षांत मात्र हे चित्र पूर्णपणे बदललेले पाहायला मिळाले. आता मराठीच्या कथेबरोबरीने नृत्याचाही चेहरा–मोहरा बदलू लागलाय.**



दिपाली विचारे

गाण्यासाठी का पैसा खर्च करायचा असा दृष्टिकोन निर्माता-दिग्दर्शकांमध्ये असल्याचे ती म्हणते. तिच्या मते गाण्याचे लाड पुरवा, मग बघा गाणं कसं लोकांच्या लक्षात राहते.

**उमेश जाधव**

उमेशच्या करिअरची सुरुवात हिंदीपासून झाली. त्यानंतर त्याने मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. गेली पंधरा वर्षे तो मराठीमध्ये नृत्यदिग्दर्शक म्हणून काम करत आहे. मराठी चित्रपट क्षेत्रात प्रवेश करताना उमेशच्या नावावर हिंदीमधील नावाजलेले चित्रपट होते. यामध्ये 'यस बॉस', 'परदेस' यासह इतर अनेक चित्रपट आहेत. अभिनयाची आवड होती, त्यामुळे चित्रपटात काम करायचे हे ठरवूनच उमेशने अभिनय क्षेत्रात प्रवेश केला. परंतु 'ओह डार्लिंग ये हे इंडिया' या सिनेमात एक छोटा रोल करताना त्याच्या असे लक्षात आले की, मी स्क्रीनवर चांगला दिसत नाही. मग अभिनयात वेळ घालवण्यापेक्षा आपण आपल्याला जे येतेय त्याकरता काम करावे असा विचार त्याने केला.



अहमद खानशी एका सेटवर परिचय झाला आणि तिथून उमेशचा हिंदीतील प्रवास सुरू झाला. १९९६ ते २००० पर्यंत अहमद खान यांना असिस्ट करून नंतर उमेशने मराठीकडे मोर्चा वळवला. जवळपास पस्तीस हिंदी सिनेमांच्या अनुभवाची शिदोरी उमेशकडे होती. मराठीकडे वळण्याचे नेमके कारण काय यासंदर्भात बोलताना उमेश म्हणतो, हिंदीमध्ये खूप कंपूशाही आहे. तुम्ही ठराविक कंपूतले असाल तरच तुम्हाला काम मिळते. नाहीतर मिळत नाही. हाजी हाजी फार करावे लागते. ते मला जमत नसल्यामुळेच मी मराठी क्षेत्राकडे वळण्याचा निर्णय घेतला.

उमेश जाधव



मराठी आणि हिंदीत काम करताना काय फरक पडतो, यासंदर्भात बोलताना उमेश म्हणतो, स्काय इज द लिमिट अशी परिस्थिती हिंदीमध्ये असते. तिथे एका गाण्यावर जेवढा खर्च केला जातो त्या बजेटमध्ये आपल्याकडे एक मराठी चित्रपट तयार होऊ शकतो इतका फरक पडतो. हिंदीमध्ये केवळ एका गाण्याच्या शुटींगसाठी काही लाखोंचा सेट लागतो. पण आपल्याकडे मात्र तसे होत नाही. अर्थात नवीन फळीचे दिग्दर्शक आणि निर्मात्यांमुळे सध्या मराठीमध्ये खूपच चांगले बदल दिसू लागले आहेत. गाण्यांचं सिनेमातील महत्त्व आता मराठीसृष्टीत कळू लागलेलं आहे. पूर्वी गाण्याचं शुट करण्यासाठी सर्वचजण कोल्हापुर एके कोल्हापुर अशी धाव घ्यायचे. आता मात्र तसे होताना दिसत नाही.

आता गाण्याचं बजेटही चांगलेच झालेले आहे. चित्रपटांना मार्केटिंगचे तंत्रही चांगलेच अवगत झालेलं आहे. असे बदल आता मराठीत होऊ लागलेले आहेत. परंतु एक खंत मात्र इथे कायम वाटते की, आपल्याकडे अजूनही कलाकार (खासकरून पुरुष) नृत्यावर तितकी मेहनत घेताना दिसत नाहीत. आपल्याकडे अजूनही स्वप्रतिमा जपण्यासाठी फार मेहनत घेतली जात नाही. ज्यावेळी कलाकार स्वप्रतिमा जपण्यासाठी मेहनत घेईल त्यावेळी नक्कीच आपल्या मराठी सिनेसृष्टीचे चित्र बदलेल. मराठीत काम करताना एक आपलेपणा वाटतो. इथे कुठलाही कलाकार कंपू करण्यात मग्न नसतो. हिंदीमध्ये कंपूशाही खुप मोठ्या प्रमाणावर आहे. कारण तिथे स्पर्धाही तितकीच मोठी आहे.

**सुभाष नकाशे**

स्टेजचा वापर करून एखादे नृत्य बसविणे हे प्रत्येकालाच जमते असे नाही. परंतु सुभाष नकाशे हे नाव मात्र याला अपवाद आहे. स्टेजचा योग्य तो वापर करून जास्तीत जास्त नृत्य कलाकारांच्या समवेत एखादे नृत्य कसे होऊ शकेल हे  करण्यात सुभाष नकाशे यांचा हातखंडा आहे असे म्हटल्यास वावगं ठरू नये. सुभाष नकाशे या नावाला ओळख मिळाली ती 'मराठी बाणा' या अशोक हांडे यांच्या कार्यक्रमातूनच. त्याआधी अनेक नृत्यांचे दिग्दर्शन त्यांनी केले होते. परंतु घराघरात आणि लोकांच्या मनात हे नाव पोहोचले ते मराठी बाणाच्या माध्यमातून. त्याचबरोबर छोट्या पडद्यावरील 'जय मल्हार' या मालिकेतील गाण्याने तर त्यांनी अवघ्या महाराष्ट्राला ठेका धरायला लावला.

इव्हेंटस् करताना स्टेजचा वापर कसा करावा याचा उत्तम अंदाज आल्यामुळे स्टेजचा वापर नृत्यासाठी करताना तो कसा करावा आणि लोकांना ते बघताना आनंद कसा देता येईल हाच विचार कायम केला जातो असं नकाशे म्हणतात.

यासंदर्भात अधिक बोलताना ते म्हणतात, चित्रपटासाठी नृत्य बसवणे हा एक वेगळा भाग आहे. परंतु स्टेजवर नृत्य बसवताना एकच बॅकग्राऊंड फ्रेम तुमच्या डोळ्यासमोर असणार आहे. या गोष्टीचा विचार करावा लागतो. प्रेक्षकांना खिळवून ठेवायचे असेल तर तुमच्याकडे त्यांना देण्यासाठी भव्यदिव्यच काहीतरी करावे लागते तरच प्रेक्षकांची नजर स्थिर राहते. अन्यथा प्रेक्षक कंटाळतात, मराठी बाणा मध्ये नृत्य बसवताना याच गोष्टी प्रामुख्याने नजरेसमोर ठेवूनच त्यातील प्रत्येक नृत्य बसविले गेले.

आज रिॲलिटी शोमधून अनेक नवीन मुले येत आहेत. नृत्याचे केवळ ढोबळमानाने प्रशिक्षण घेऊन आम्ही नृत्य बसवू शकतो असे अनेक आपल्याला आजुबाजूला दिसतील. परंतु एखादे नृत्य बसवणे म्हणजे काही स्टेप्स बसविणे असे अजिबात नाही. तर त्यामागेही एक अभ्यास आहे. हा अभ्यास असणे महत्त्वाचे आहे असे मत सुभाष व्यक्त करतात. सुभाष यांचे वडील उत्तम भजन गायक असल्यामुळे लहानपणापासून उत्तम भजनांची कानाला सवय झाली होती. त्यामुळे ताल कसा पकडायचा आणि कुठे सोडायचा याचे ज्ञान उपजतच सुभाष यांना होते.

नृत्याचे कुठलेही शास्त्रशुद्ध प्रशिक्षण न घेतलेल्या सुभाष यांच्या कामाची किर्ती हिंदीतही सर्वांना ज्ञात आहे. म्हणूनच कोण होईल मराठी करोडपती या कार्यक्रमासाठी त्यांनी बसवलेले नृत्य पाहून, हिंदीच्या 'कौन बनेगा करोडपती-सीझन सात'साठी त्यांना पाचारण करण्यात आले. मराठीतले काम पाहून त्या दिग्दर्शकाने त्यांना बोलावले होते. त्या सीझनसाठी त्यांनी अमिताभ बच्चन आणि सोनू निगम यांच्यासमवेत चारशे कलाकार घेऊन त्यांची कला सादर केली होती.

सध्या या क्षेत्रात काय नवीन घडामोडी घडताहेत या संदर्भात बोलताना ते म्हणाले, आता या क्षेत्रात तंत्राच्या बरोबरीने खूप गोष्टी बदलत आहेत. त्यामुळे चित्रपटासाठी काम करताना केवळ तंत्राचे ज्ञान अवगत असून उपयोगाचे नाही. तर ढोबळमानाने खूप छोट्या गोष्टींकडे लक्ष देणेही गरजेचे आहे. मराठीत आता अनेक नवीन बदल होऊ लागलेले आहेत. हे बदल प्रेक्षकांनाही पाहायला नक्कीच आवडतील असेही मत त्यांनी व्यक्त केले.

**फुलवा खामकर**

'बुगी वुगी'मधील विजेत्या फुलवा खामकरच्या नावाला अल्पावधीत मराठी चित्रपटसृष्टीनेही आपलेसे केले. 'नटरंग'च्या लावणीने अवघ्या महाराष्ट्राला फुलवाने ठेका धरायला लावला. नटरंग हा सिनेमा फुलवाच्या आयुष्यातील एक सोनेरी क्षण असल्याचे फुलवा म्हणते.

नृत्यासंदर्भात अधिक बोलताना ती म्हणते, नृत्यामध्ये खूप सारे प्रकार आहेत, तसेच नृत्य बसविणे हीसुद्धा एक कला आहे. स्टेज कोरिओग्राफी, डान्स शोज्, चित्रपटासाठी बसविण्यात येणारे नृत्य.. असे खूप सारे प्रकार आहेत. या सर्व माध्यमांची एकदा का माहिती झाली, की काम करणं खूप सोप्पं होतं. कुठे प्रॉप वापरायचा आणि कुठे नाही, कुठे संयत रंगसंगतीचा वापर करायचा अशा छोट्या गोष्टीसुद्धा तुमच्या नृत्याला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवतात. तुम्ही बसवलेले नृत्य टीव्हीवर किंवा मोठ्या पडद्यावर कसे दिसेल हे तंत्र एकदा लक्षात आले म्हणजे तुमचे अर्धेअधिक काम झाले असं म्हणायला हरकत नाही.

एखादं गाणं करताना त्या गाण्यातील कथाही त्या नृत्याच्या माध्यमातून उलगडायला हवी. प्रत्येक कथानकाच्या गरजेनुसार नृत्यात बदल करावे लागतात. आजही या सर्व गोष्टींचा अभ्यास करून ती सेटवर जाते. माध्यम माहीत असणे खूप गरजेचं आहे. माध्यम एकदा माहीत झाले की, त्या माध्यमाची नेमकी गरज काय आहे हे समजणे सोपे होते असे मत फुलवा व्यक्त करते. वयाच्या विसाव्या वर्षी नृत्याचे शास्त्रोक्त प्रशिक्षण घेतलेल्या फुलवाने हिंदीमध्ये काम केले नसले तरी तिने काही हिंदीतील अभिनेत्रींना नृत्याचे प्रशिक्षण दिलेले आहे. यामध्ये ऐश्वर्या राय-बच्चन हिच्या नावाचा समावेश प्रामुख्याने करावा लागेल.


फुलवा खामकर



सुभाष नकाशे


**- मुलाखती : प्रभा कुकडे**

भ्रमणध्वनी : ८६५५५ १७१११
prabhakudke@gmail.com




# वेगळ्या वाटेवरचा मराठी चित्रपट

**दिलीप ठाकूर**

**वेगळ्या वळणाचे चित्रपट निर्माण करणे ही बऱ्याचदा व्यावसायिक जोखीम ठरते. पण तरीदेखील मराठीत वेगळ्या वळणाच्या चित्रपटाच्या निर्मितीचे प्रमाण खूप चांगले आहे. असे चित्रपट 'टाइमपास' करून कोटी कोटी रुपयांच्या उत्पन्नाच्या विक्रीचे विक्रम करीत नसतात. पण हे चित्रपट बौद्धिक आनंद मात्र देतात. मराठी चित्रपट रसिकांची तीच तर मोठी भूक आहे. पण अशा चित्रपटाच्या वाटेवरून जाणाऱ्या निर्माता-दिग्दर्शक व कलाकाराला काय बरे वाटते? काही प्रातिनिधिक स्वरूपाच्या प्रतिक्रिया...**



**स**चिन चव्हाणनिर्मित व जयप्रद देसाई दिग्दर्शित 'नागरिक' हा खूपच वेगळ्या पठडीतील चित्रपट आहे. सचिन खेडेकर, डॉ. श्रीराम लागू, दिलीप प्रभावळकर, सुलभा देशपांडे, नीना कुलकर्णी, देविका दप्तरदार अशी वजनदार कलाकार मंडळी एकाच चित्रपटातून साकारणे खूप कसोटीचे असते. एकीकडे अशा कलाकारांना एकत्र आणणे व दुसरीकडे चित्रपटाचे वेगळेपण टिकवणे ही कसरत व कसोटी वाटते तितकी सोपी नाही. शिवाय 'गल्लापेटी'वरच्या निर्मितीचा खर्च आणि वसुलीची शक्यता याचाही ताळमेळ असतोच.

दिग्दर्शक जयप्रद देसाई 'नागरिक'च्या फर्स्ट लूकच्या वेळी सांगत होता, ''एका दिवाळी अंकामध्ये महेश केळुसकर यांची कादंबरी वाचली तेव्हाच मला त्यात चित्रपट दिसू लागला. अर्थात, माध्यमांतर करणे तसे सोपे कधीच नसते. कादंबरीचा मुख्य गाभा कायम ठेवतच दृश्यमाध्यमाचा विचार करत करत पटकथा रचावी लागते. ही प्रोसेस सुरू असतानाच सचिन खेडेकर यामधील राजकीय पत्रकार श्याम जगपाल ही व्यक्तिरेखा साकारणार हे निश्चित झाले. बऱ्याच दिवसांत डॉ. श्रीराम लागू यांनी चित्रपटात भूमिका साकारली नव्हती, पण त्यांनी या चित्रपटातील नाना चिटणीस ही व्यक्तिरेखा साकारावी असे वाटत होते. त्यांच्याकडे पटकथा दिली आणि कळत-नकळत ते त्यात असे गुंतून गेले की, त्यांनी लगेचच होकार दिला. काही दिवसांनी त्यांच्यावर चित्रित झालेला भाग बघून दिलीप प्रभावळकर आणि काही दिवसांनी नीना कुलकर्णींनीही होकार दिला.

''चित्रपट आकार घेताना दृश्यमाध्यम व संवाद यांना खूप महत्त्व असते, यावर मी व केळुसकर यांनी विशेष लक्ष दिले. वेगळे काही करायचे आहे असे ठरवून ते होत नसते. आपल्याला जो विषय भिडतो त्यावर आपण चित्रपट निर्माण करावा म्हणजे तो प्रेक्षकांनाही भिडतो यावर माझा पूर्ण विश्वास आहे. 'नागरिक' फक्त वेगळाच ठरावा असे नाही तर वजनदारदेखील ठरावा याकडेही आमचे लक्ष होते. त्यामुळे चित्रपटाच्या अन्य बाजूही बळकट करण्यावर आम्ही लक्ष दिले. ऑस्करविजेत्या भानू अथय्या यांना वेशभूषाकार म्हणून निवडले. ऑस्करविजेते रसूल पोकुशी व अमृता प्रीतम हे साउंड डिझानयर म्हणून निवडले. विक्रम गायकवाड हे रंगभूषाकार, सुकांत पाणिग्रही कला-दिग्दर्शक तर गोरक्षनाथ खांडे हे संकलक अशी उत्तम दर्जाची तंत्रज्ञटीम तयार केली. उत्तम विषय दर्जेदार तंत्रज्ञांच्या माध्यमातून रसिकांपर्यंत पोचणे गरजेचे असते, याचे भान आम्ही कायम ठेवले आणि त्यामुळेच हा चित्रपट राज्य शासनाच्या 'सर्वोत्तम सामाजिक चित्रपट' पुरस्कारासह एकूण पाच मानाचे पुरस्कार पटकावण्यात यशस्वी ठरला.

''गेल्या काही वर्षांत मराठीत वेगळ्या वाटांवरचे चित्रपट रसिकांसमोर येत असताना त्यांची एक वेगळी 'दृष्टी' तयार झाली आहे. त्याचे हे भान कायम राहील असाच चित्रपट त्यांच्यासमोर नेणे गरजेचे असते. 'नागरिक'ची एकूण निर्मितीप्रक्रिया दोन वर्षे सुरू राहिली, खूप खूप संयम ठेवून हा प्रवास केला. पण असे वेगळे चित्रपट निर्माण करताना निर्माताही तसा दमदार हवा. आम्ही पटकथेवर काम करत असतानाच निर्मात्याच्याही शोधात होतो. आमच्या व या

विषयाच्या नशिबाने सचिन चव्हाण यांच्याशी संबंध आला व त्यांनीही या चित्रपटाच्या निर्मितीमध्ये विशेष रस दाखवला. तात्पर्य, वेगळ्या विषयावर चित्रपट निर्माण करण्याची खूप इच्छा आहे असे फक्त म्हणून उपयोग नसतो, तर तसा वेगळा चित्रपट निर्माण करण्यासाठी निर्माताही लागतो,'' दिग्दर्शक जयप्रद देसाईने अतिशय महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधले.

निर्माती-दिग्दर्शिका समृद्धी पोरे हिने 'डॉ. प्रकाश बाबा आमटे द रियल हिरो' या अगदी वेगळ्या संदर्भातील वास्तव चित्रपटनिर्मितीचे धाडस केले. खरे तर हेमलकसा येथे दुर्गम अशा आदिवासी वसाहतींमध्ये राहून आरोग्यसेवा करणाऱ्या आमटे परिवाराची धडपड हे चित्रपटासारख्या दूरवर पोचणाऱ्या माध्यम व व्यवसायातून येणे अत्यंत गरजेचे होतेच. पण हे शिवधनुष्य पेलणार कोण आणि कसे? हयात व्यक्तींवर चित्रपट साकारताना पुन्हा त्या व्यक्तींनुसार भूमिका साकारणे आणि त्यांचे अलौकिक कार्य अडीच तासांच्या चित्रपटातून मांडणे हे तर केवढेतरी अवघड. अशी आव्हाने पेलतानाच अशा चित्रपटाचा माहितीपट होऊ न देणे आणि त्याचा चित्रपट करताना मूळ आशयाला धक्का न लागणे हेही केवढे अवघड!

ही सारी आव्हाने समृद्धी पोरेने पेलली. समृद्धीशी संवाद साधला असता तिने सांगितले, ''असा चित्रपट निर्माण करणे खूपच आव्हानात्मक होते, पण आपली ही सगळी मेहनत चित्रपट पुरस्कारप्राप्त होण्यापुरती राहू नये तर त्याला प्रेक्षकांकडून पसंती मिळावी असेही मला वाटत होते. आपण काही वेगळे करायला हवे, वेगळे दाखवायला हवे असे नुसते बोलून उपयोग नसतो, तर त्याच वेगळेपणाला रसिकांकडून चांगला प्रतिसादही मिळायला हवा, तरच अशा चित्रपटाच्या निर्माता-दिग्दर्शकाला मानसिक व भावनिक समाधान मिळू शकते. सगळेच चित्रपट 'गल्ला पेटी'वर काही कोटींचा विक्रम करण्यासाठी निर्माण होत नसतात. अथवा ते मिळाल्यास सगळ्यांनाच समाधान हवे असते असे नव्हे. 'डॉ. प्रकाश बाबा आमटे' हा चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हा तो पहिले चार-पाच दिवस तरी तग धरू शकेल का अथवा त्याला खरंच प्रेक्षक येतील का अशी शंका काहींना होती. पण मराठी चित्रपटरसिक नेहमीच अर्थपूर्ण व कसदार चित्रपटाचे स्वागत करतो. त्यासाठी सर्वप्रथम त्या चित्रपटाची चांगली समीक्षा येणे गरजेचे असते आणि मग सुरुवातीला येणाऱ्या प्रेक्षकांच्या 'माऊथ पब्लिसिटी'वर चित्रपटाची गर्दी वाढते. या चित्रपटाच्या बाबतीत अगदी तसेच झाले आणि हा चित्रपट इंग्रजी सबटायटल्ससह विदेशातही झळकावण्याचा माझाही उत्साह वाढीला लागला. युरोप-अमेरिका-आखाती देश-मॉरिशस-ऑस्ट्रेलिया अशा बऱ्याच देशांत या चित्रपटाचे विशेष खेळ आयोजित केले गेले. सर्वत्र या चित्रपटाला रसिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला ही माझी या चित्रपटाने मला दिलेली खरी मिळकत आहे. पाकिस्तानमध्येही हा चित्रपट प्रदर्शित करण्यासंदर्भात मी पत्रव्यवहार केला. या चित्रपटाच्या माध्यमातून बाबा आमटे, प्रकाश आमटे यांची जनसेवा मी जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न केला हे मला जास्त महत्त्वाचे वाटते. हे यश, मला वाटते, पैशात मोजता येणारे नाही.'' ॲड. समृद्धी पोरेने आपला मुद्दा स्पष्ट केला.

'कांकण' हा व्यावसायिकता व कलात्मकता यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न केलेला चित्रपट आहे. नेहमीच्या फिल्मी वळणाच्या प्रेमकथांपेक्षा ही प्रेमकथा थोडी वेगळी होती. दिग्दर्शिका म्हणून पहिले पाऊल टाकताना क्रांती रेडकरने वेगळेपणाकडे असे काय खरे लक्ष दिले?

क्रांती रेडकर अगदी भरभरून बोलू लागली, ''मला ही प्रेमकथा सुचली. त्याला कमला हसन व रति अग्निहोत्री यांची भूमिका असलेल्या 'एक दुजे के लिए' या यशस्वी प्रेमकथेची पार्श्वभूमी आहे. खूप लहानपणी मी तो चित्रपट पाहिला, तेव्हा खरं तर मला प्रेम वगैरे असे काहीही माहीत नव्हते, पण त्या चित्रपटाने मनात कायमचे घर मात्र करून ठेवले होते. मोठे झाल्यावर इकडेतिकडे काही प्रेमप्रकरणे अथवा प्रेमप्रताप पाहताना हे प्रेमिक प्रेमात इतके काय आकंठ बुडालेले असतात असा मला प्रश्न पडे. आणि त्यातूनच मला कोकणच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर 'कांकण'ची प्रेमकथा साकारावी असे




**वेगळे काही करायचे आहे असे ठरवून ते होत नसते. आपल्याला जो विषय भिडतो त्यावर आपण चित्रपट निर्माण करावा म्हणजे तो प्रेक्षकांनाही भिडतो यावर माझा पूर्ण विश्वास आहे. 'नागरिक' फक्त वेगळाच ठरावा असे नाही तर वजनदारदेखील ठरावा याकडेही आमचे लक्ष होते. त्यामुळे चित्रपटाच्या अन्य बाजूही बळकट करण्यावर आम्ही लक्ष दिले.**






**चित्रपट साकारताना तो पूर्णपणे आपल्या बुद्धीला पटावा असा व आपल्याला जसा साकारावासा वाटतो तसाच तो असावा असे मी पहिल्यापासूनच ठरवले होते. त्यासाठी मला निर्मात्यांची योग्य साथ लाभली. त्यांनी चित्रीकरणाचे दिवस वाढले आणि म्हणूनच खर्चदेखील वाढला याचा काही त्रागा केला नाही. असे निर्माते लाभले तरच, चित्रपटाची व्यावसायिक चौकट कायम ठेवून काही वेगळेपण साध्य करता येईल असे मला वाटते. काहीतरी वेगळे करायचे म्हणूनच त्या वेगळेपणाला घट्ट धरून बसण्याला काहीच अर्थ नाही.**




वाटते. कथेवरून मग मी पटकथा लिहिली. या प्रवासात ही प्रेमकथा माझ्यात पूर्णपणे मुरली असल्याने त्या व्यक्तिरेखांचे संवादही मी लिहायचे ठरवले. मग एक गीत लिहिले, एका गाण्याचे नृत्यदिग्दर्शनही केले, म्हणजेच दिग्दर्शनासह चित्रपटाच्या एकूण सहा जबाबदाऱ्या मी सांभाळल्या व तेच मला वेगळेपण वाटते. आणि या सगळ्या जबाबदाऱ्या सांभाळण्याचे भान राहावे यासाठी व सुधाच्या भूमिकेला उर्मिला कानेटकर-कोठारे योग्य न्याय देईल असा विश्वास असल्याने मी तिची निवड केली. चित्रपट साकारताना तो पूर्णपणे आपल्या बुद्धीला पटावा असा व आपल्याला जसा साकारावासा वाटतो तसाच तो असावा असे मी पहिल्यापासूनच ठरवले होते. त्यासाठी मला निर्मात्यांची योग्य साथ लाभली. त्यांनी चित्रीकरणाचे दिवस वाढले आणि म्हणूनच खर्चदेखील वाढला याचा काही त्रागा केला नाही. असे निर्माते लाभले तरच, चित्रपटाची व्यावसायिक चौकट कायम ठेवून काही वेगळेपण साध्य करता येईल असे मला वाटते. काहीतरी वेगळे करायचे म्हणूनच त्या वेगळेपणाला घट्ट धरून बसण्याला काहीच अर्थ नाही. आपण बनवलेला चित्रपट रसिकांपर्यंत पोचायला हवा याचे भान असायला हवे. कारण,
त्या चित्रपटात फक्त आर्थिक गुंतवणूक नसते तर भावनिक गुंतवणूकदेखील असते.''
क्रांती रेडकरनेही एका वेगळ्याच मुद्याकडे लक्ष वेधले.

सचिन खेडेकरने 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय', 'ताऱ्यांचे बेट', 'प्रेम म्हणजे प्रेम असते', 'गुणाजी', 'नागरिक', 'शटर' अशा विविध स्वरूपाच्या चित्रपटांतून भूमिका साकारात वेगळेपण राखले आहे. वेगळ्या प्रकारच्या चित्रपटाच्या यशाचा विचार करताना एखादा आघाडीचा कलाकार या साऱ्याकडे कशा दृष्टीने पाहतो हे जाणून घेणे योग्य ठरते. 'नागरिक'च्या निमित्ताने सचिन भेटला असता सांगत होता, ''सत्तावीस-अठ्ठावीस वर्षांच्या अभिनय वाटचालीनंतर आता या टप्प्यावर मला वाटते, तेच ते पुन्हा पुन्हा करणे योग्य नाही. तसे केल्यास त्याचा मला व प्रेक्षकांनाही लवकरच कंटाळा येईल. आता मला काही वेगळे करून दाखवण्यात रस आहे. असे वेगळे, की प्रत्यक्ष व्यक्ती म्हणून मला जे काही सांगावेसे वाटते, ते त्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून सांगता आले पाहिजे. माझ्या मनात जे काही विविध विषयांवर बोलायचे वा सांगायचे आहे ते सांगण्यासाठी अभिनय हेच माझे 'माध्यम' आहे. माझ्यासाठी आता वेगळेपण काय असेल तर ते हेच.'' सचिन खेडेकर म्हणाला.

'ऋण' ही अगदी वेगळी धाडसी प्रेमकथा आहे. मराठीमध्ये अशा कथानकावरचा चित्रपट पहिल्यांदाच पडद्यावर आला, एक हिजडा (एक स्त्री तशी आहे हे यात दाखवले हेही वेगळेपण) एका युवकाच्या सरळपणा व प्रामाणिकपणा यावर प्रभावित होऊन त्याच्या शिक्षण व अन्य गोष्टींचा खर्च करतो. आणि एक दिवस हाच हिजडा त्या मुलाला सांगतो, मी स्त्री असल्याचा एकदा मला आनंद दे... कथा अतिशय नाट्यमय वळणावर येते. इतकी की, त्या युवकाची हिजड्याशी मैत्री वाढते. आणि मग तो युवक स्वत: हिजडा बनण्यास पसंती देतो. अतिशय धक्कादायक अशा प्रेमकथेला प्रेक्षकांची पसंती कशी अपेक्षित असेल? दिग्दर्शक विशाल गायकवाड याला विचारले असता तो म्हणाला, ''पुणे शहरात काही वर्षांपूर्वी झालेल्या सत्य घटनेवर आधारित हा चित्रपट आहे. अर्थात चित्रपटासाठी काही तडजोडी केल्या आहेत. अशा प्रकारचा वेगळ्या कथानकावरचा चित्रपट देण्याचे धाडस आम्ही केले. पण प्रसारमाध्यमांनी असे चित्रपट प्रेक्षकांपर्यंत नेण्यासाठी थोडासा पुढाकार घ्यावा असे वाटते. अशा चित्रपटात कथा स्टार असते, पण असे चित्रपट प्रदर्शित झाल्याचेही प्रेक्षकांना समजायला हवे.''

**– दिलीप ठाकूर**
glam.thakurdilip@gmail.com

# प्लॅनिंग फिट तर सिनेमा हिट




**श्रीराम खाडिलकर**

**को**णताही सिनेमा नुसता तयार करून भागत नाही. मग तो फार पूर्वीचा संतपट असो, त्यानंतरचा सामाजिक विषयावरचा असो, कौटुंबिक असो, तमाशाप्रधान असो, कॉमेडीच्या लाटेतला असो  नाहीतर आजच्या समाजाचं दर्पण असलेला असो, तो लोकांनी पाहावा यासाठी प्रदर्शितही व्हावा लागतो. म्हणजेच तो थिएटरमध्ये लागणं गरजेचं असतं. पूर्वी सिनेमाची प्रिंट असायची. त्या प्रिंटची रिळं असलेल्या पेट्या डोक्यावरून जिथं तो दाखवायचा असतो तिथं घेऊन जाव्या लागत होत्या आणि मग सिनेमा दाखवावा लागत होता. आज सिनेमा दाखवण्यापासून तिकीट विक्रीपर्यंत सगळंच डिजिटल झालंय. इतकंच नाही तर प्रसिद्धीचं तंत्रही बदललंय. पूर्वी म्हणजे प्रभातच्या 'संत तुकाराम' या सिनेमाच्यावेळी पुण्यातल्या प्रभात सिनेमागृहाच्या पायरीलगतच्या चौथऱ्यावर तुकाराम महाराजांच्या गेटअपमध्ये खुद्द विष्णूपंत पागनीस काही वेळा उभे राहिल्याचं सांगणारी मंडळी आपल्यातल्या अनेकांना भेटली आहेत. तेव्हाचं कशाला अगदी काल-परवापर्यंत टुरिंग थिएटरमध्ये सिनेमा लावल्यावर अलका कुबलसारखे स्टार तिकिटबारीवर उभे राहिल्याचं आपण पाहिलं आहे. आज मात्र प्रसिद्धीच्या या तंत्रात खूप बदल झाला आहे. १९९६-९७ च्या सुमाराला वर्षाला अवघे सहा-सात सिनेमा मराठीत तयार होत होते, पण आज तब्बल सव्वाशेच्या आसपास मराठी चित्रपट दरवर्षी तयार होतायत. या पार्श्वभूमीवर वितरणाच्या क्षेत्रात दोन दशकांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या सादिक चितळकर आणि समीर दीक्षित अशा दोघांशी साधलेल्या संवादाचा हा निवडक अंश.

शेवटी आपल्या सिनेमाची प्रसिद्धी आपल्यालाच करायची असते. अनेक मराठी सिनेमा आधी महाराष्ट्रात मोजक्याच गावांमध्ये आधी प्रदर्शित व्हायचे आणि टप्प्या-टप्प्याने मुंबई-पुण्यात प्रदर्शित व्हायचे असे समीर दीक्षित म्हणाले. तर सादिक चितळकर असे म्हणाले की, पब्लिसिटीचे कॅम्पेन सिटीवाईज टार्गेट केले जायचे. म्हणजे असे की, लहान गाव असेल तर गावात गाडी फिरायची, हॅण्डबिले वाटली जायची वगैरे वगैरे.

पूर्वी निर्मात्याला स्वत: सिनेमा प्रदर्शित करण्यासाठी मेहनत करावी लागत होती. दादा कोंडके यांनी तर स्वत:चीच वेगळी यंत्रणा उभी केली होती. दादांची माणसं ठरलेल्या गावात प्रिण्ट घेऊन जायची. सिनेमा लावून पैसे घेऊन परत यायची. लहान आणि नव्या निर्मात्याला तर पूर्वी फारच त्रास होता.

अगदी अलीकडच्या काळात युएफओ हे नवं तंत्रज्ञान आलं आणि सिनेमाच्या दुनियेत मोठी क्रांती झाली असे प्रदीप दीक्षित म्हणाले तर युएफओप्रमाणेच स्क्रॅबल, डीसिटी, रिअल इमेज, युएमडब्ल्यू के सेरासेरा असेही अन्य डिजिटल पर्याय आल्याचे सादिक चितळकर म्हणाले.

डिजिटल तंत्रज्ञानामुळे सिनेमाचा फिल्मच्या रूपातला प्रिण्ट कालबाह्य झाला. त्यामुळे आज एकाचवेळी कोणत्याही शहरात कितीही ठिकाणी एकच सिनेमा प्रदर्शित करणे शक्य झाले आणि तेही फिल्म रूपातल्या प्रिण्टशिवाय. हा फायदाच म्हणायला हवा, असेही समीर दीक्षित यांनी सांगितले.

आज असे चित्र आहे की, ऐंशी ते नव्वद टक्के सिनेमानिर्माते हे नवीन आहेत. एका आशेने आणि प्रलोभनाने ते मराठी सिनेमामध्ये

**मराठी सिनेमात विषयांची विविधता तर दिसतेच आहे, तांत्रिक अंगानंही हा सिनेमा समृद्ध होतोय. त्याच्या जोडीला एक्झिबिशनसाठी अनेक डिजिटल पर्यायही आलेत. मराठी सिनेमा ग्लोबल होईल त्या दिवशी एका सिनेमाची उलाढाल काहीशे कोटीच्या घरात गेल्याचं चित्र दिसलं तर आश्चर्य वाटायला नको.**

**आज असे चित्र आहे की, ऐंशी ते नव्वद टक्के सिनेमानिर्माते हे नवीन आहेत. एका आशेने आणि प्रलोभनाने ते मराठी सिनेमामध्ये पैसे घालतात. कारण त्यांच्यासमोर मराठी सिनेमाच्या उत्पन्नाचे खोटे चित्र उभे केले जाते. त्या चित्राकडे पाहून ते फसतात. मात्र, त्यांच्यामुळे अनेकांची पोटं भरतायत ही चांगलीच गोष्ट आहे. पण ही सूज आहे. मराठी सिनेमाचे भले यातून होईल असे वाटत नाही.**

पैसे घालतात. कारण त्यांच्यासमोर मराठी सिनेमाच्या उत्पन्नाचे खोटे चित्र उभे केले जाते. त्या चित्राकडे पाहून ते फसतात. मात्र, त्यांच्यामुळे अनेकांची पोटं भरतायत ही चांगलीच गोष्ट आहे. पण ही सूज आहे. मराठी सिनेमाचे भले यातून होईल असे वाटत नाही. आपल्याकडे अनेकजण ग्रॉस कलेक्शनची अमाऊंट दाखवतात आणि सांगतातही. पण त्यात थिएटरचा हिस्सासुद्धा असतो हे वेगळे सांगायचे टाळतात, त्यामुळे कोणालाही सिनेमाचं कलेक्शन छानच झालं आहे असं भासवलं जातं असं समीर दीक्षित यांनी सांगितलं. सिनेमानिर्मिती करणाऱ्या काही संस्था तर आपल्या सिनेमाचे प्रमोशन कसं करायचं हे ठरवताना सिनेमा झळकला की सिंगल स्क्रीन असो किंवा मल्टिप्लेक्स असोत, सगळी तिकिटे विकली गेली नसूनही उर्वरित तिकिटाचे पैसे आपणच भरून हाऊसफुल्लचे बोर्ड लावायचे उद्योग करतात. यामुळे सिनेमा हाऊसफुल्ल गर्दीत सुरू असल्याचे दिसते. गर्दी खेचण्याचे असे प्रयत्न होत असतात. तसे ऐकायला मिळाले तर आश्चर्य वाटून घ्यायचे कारण नाही.

मुळात आपल्याकडे पूर्वी प्रसिद्धीसाठी पैसेच बाजूला काढून ठेवले जात नव्हते. आज सिनेमानिर्मितीच्या खर्चातली ३० ते ४० टक्के रक्कम प्रसिद्धीसाठी बाजूला ठेवली जाते. त्यामुळे त्याचा अपेक्षित परिणामही दिसतोय असे सादिक चितळकर म्हणाले. प्रसिद्धीच्या बदलत्या तंत्राबद्दल ते म्हणाले की, आधी सिनेमा पाहिला जातो आणि काही जाणकार मंडळी त्यावर विचार करतात. कोणत्या क्लासचा सिनेमा आहे हे ठरवले जाते. त्यानुसार कुठल्या थिएटर्समध्ये आधी, कुठे नंतर, किती शोज् लावायचे, याचा विचार केला जातो, इतकंच नाही तर आपला सिनेमा जेव्हा लावायचा असेल त्याच्या आधी, त्याच्या नंतर आणि त्याच दिवशी कोणते सिनेमा असणार आहेत, याचा अभ्यास करूनच सिनेमाच्या प्रदर्शनाची तारीख ठरते असेही चितळकरांनी सांगितलं. चितळकरांच्या म्हणण्याचा अर्थ प्लॅनिंगवर जबरदस्त मेहनत घेऊनच प्रत्येक निर्मात्याने सिनेमा प्रदर्शित केला पाहिजे. आज मराठी सिनेमा काढणं हे हौशा-गौशाचं काम नाही. बिझिनेस मॅनेजमेंट करणारी मंडळी याचा रीतसर अभ्यास करतायत. यशाचा फॉर्म्युला कोणाहीकडे नसला तरी यशाच्या जवळ जाण्याचा मार्ग जर या अभ्यासकांना सापडत असला तर इतरांनी त्याच मार्गावरून जायला काय हरकत आहे?

प्रत्येक सिनेमा शंभर टक्के चालेलच असं नसतं, त्याची कारणं वेगवेगळी असतात असं सांगून दीक्षित म्हणाले की, जगभरात कुठंही चाललेल्या आणि उत्तम कमाई केलेल्या सिनेमांचं प्रमाण हे बारा ते पंधरा टक्के इतकंच आहे. त्यामुळं ऐंशी ते पंच्याऐंशी टक्के सिनेमा फक्त तोट्यातच जात असतात, हॉलीवूडही याला अपवाद नाही. फक्त ते लोकांच्या लक्षातही येत नाही इतकंच, असंही समीर दीक्षित यांनी सांगितलं.





'साडे माडे तीन' या सिनेमाने मार्केटिंग स्ट्रॅटेजी बदलली असे सांगून चितळकर म्हणाले की, या सिनेमाचे प्रोमोज् सगळ्या माध्यमात चालवून थिएटरमध्ये तो दिसण्याच्या आधी 'सिनेमा येतोय' असं घराघरात सांगितलं जाईल अशी योजना केली आणि एकावेळी ५०-६० ठिकाणी तो सिनेमा दाखवला. याचा अपेक्षित परिणाम झाला आणि त्यानंतर 'दे धक्का', 'नटरंग', 'दुनियादारी', 'टाइमपास' अशा सिनेमांना प्रेक्षकांनी मोठा प्रतिसाद दिला. फक्त याच नाही तर 'हरिश्चंद्राची फॅक्टरी', 'बालक-पालक', 'क्लासमेटस्' असेही सिनेमा व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी व्हायला लागले असे चितळीकर म्हणाले. व्यावसायिक यशाबद्दल बोलताना ते म्हणाले की, दुनियादारी या सिनेमाचे प्रमोशन असं केलं गेलं, की गर्दीतले पन्नास टक्के प्रेक्षक तरूण होते. 'लय भारी' आणि 'टाईमपास' असे सिनेमा पाहायला सकाळी साडेसातच्या शोला गर्दी व्हायला लागली असे सांगून चितळकरांनी सोशल मीडियाचाही सिनेमाच्या प्रसिद्धीसाठी फायदा होत असल्याचं सांगितलं. आज स्मार्ट फोन ही गरज झाली असून बहुतेक सगळ्यांकडे ते आहेत. वृत्तपत्र आणि चॅनलपेक्षा हे साधे सोपे आणि सुटसुटीत माध्यम अत्यंत प्रभावी ठरले आहे.

माध्यमांच्या साह्यानं प्रसिद्धी करणं महत्त्वाचं तर असतंच पण तशी इच्छा असलेला प्रेक्षक आपल्याला मिळाला पाहिजे असं सांगून समीर दीक्षित म्हणाले की, तमिळ-तेलुगु भाषांमधले सिनेमा चालतात कारण तिथे दिवसाला तीस-चाळीस रुपये कमावणारा मजूरसुद्धा महिन्याला पन्नास रुपयांचं तिकिट काढून त्याच्या भाषेतला एखादा सिनेमा नक्कीच पाहत असतो. त्या प्रेक्षकाला सिनेमाचं वेड आहे असं म्हटलं जातं, ते याचसाठी, असंही दीक्षित यांनी आवर्जून सांगितलं. महाराष्ट्रात सुमारे पाचशे सिंगल स्क्रीन थिएटर्स आहेत तर केरळमध्ये अकराशे आहेत. महाराष्ट्रात थिएटरचा पर पर्सन रेशो खूप कमी आहे, पण आपल्याकडे थिएटर केलेले आणि करणारे उत्तमोत्तम कलाकार आहेत असंही दीक्षित म्हणाले. 'कोर्ट', 'ख्वाडा', 'किल्ला', 'एलिझाबेथ एकादशी' आणि 'आरण्यक' (नॉन फीचर) अशा एकूण पाच मराठी सिनेमांचा गौरव यंदाच्या राष्ट्रीय



पुरस्कारांमध्ये झालाय ही मराठी सिनेमाच्या प्रगतीचीच लक्षणं आहेत असं सादिक चितळकरांनी सांगितलं.

पुढल्या काळात मराठी सिनेमाचे चित्र कसे असेल याबद्दल बोलताना सादिक चितळकर म्हणाले की, हिंदीप्रमाणे मराठी चित्रपट एकाचवेळी देशभरातल्या सगळ्याच राज्यांमधल्या थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला दिसेल, कारण आजच मराठी चित्रपट सबटायटलसह मुंबईतच काही ठिकाणी प्रदर्शित केला जातोय. मुद्दा हाच की अन्य भाषिकही मराठी सिनेमाला आजच यायला लागलाय. पूर्वी सिनेमची पोस्टर्स हाताने काढून रंगवली जायची. आज विनाएल प्रिण्ट या फॉर्मेटमध्ये ती आहेत, याच्या पुढली पायरी म्हणजे डिजिटल पोस्टर्स हीच बहुधा असेल. म्हणजे थेट इलेक्ट्रॉनिक स्क्रीन्सवरच ती पोस्टर्स दिसतील. पूर्वी काही हजारांत होणाऱ्या सिनेमाचा खर्च लाखात गेला होता, आता तो कोटीच्या वर गेलाच आहे. यापुढे तो काहीशे कोटींवर जाईल असं चितळकर म्हणाले. मराठीत विषयांची विविधता तर दिसतेच आहे, तांत्रिक अंगानंही हा सिनेमा समृद्ध होतोच आहे, त्याच जोडीला मराठी सिनेमा ग्लोबल होईल त्या दिवशी एका सिनेमाची उलाढाल काहीशे कोटीच्या घरात गेल्याचं चित्र दिसलं तर आश्चर्य वाटायला नको, कारण प्लॅनिंग फिट तर सिनेमा हिट हाच उद्याच्या मराठी सिनेमाच्या यशाचा फॉर्म्युला आहे असं दिसतंय.

**महाराष्ट्रात सुमारे पाचशे सिंगल स्क्रीन थिएटर्स आहेत तर केरळमध्ये अकराशे आहेत. महाराष्ट्रात थिएटरचा पर पर्सन रेशो खूप कमी आहे, पण आपल्याकडे थिएटर केलेले आणि करणारे उत्तमोत्तम कलाकार आहेत. 'कोर्ट', 'ख्वाडा', 'किल्ला', 'एलिझाबेथ एकादशी' आणि 'आरण्यक' (नॉन फीचर) अशा एकूण पाच मराठी सिनेमांचा गौरव यंदाच्या राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये झालाय ही मराठी सिनेमाच्या प्रगतीचीच लक्षणं आहेत.**

**– श्रीराम खाडिलकर**
भ्रमणध्वनी : ९९६००००८१४
shriram1@rediffmail.com




# जनसंपर्क, वितरण, जाहिरात

**अश्विनी सहस्रबुद्धे**

हिंदी चित्रपटसृष्टीत जिथे १०० करोड क्लब व्हायला लागले आहेत, तिथेच आपले मराठी चित्रपटही दर्जेदार बनत आहेत आणि नफाही कमवत आहेत. आधीच्या तुलनेत मराठी चित्रपटांच्या बजेटमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. एखाद्या छोट्या सिनेमासाठी जिथे २-३ करोड रुपये खर्च होतात तिथेच बिग बजेट सिनेमांसाठी हेच बजेट ४-५ पर्यंत जातं. रितेश देशमुखच्या 'लय भारी' आणि मराठीतल्या पहिल्या सुपरहिरो फिल्मचं (बाजी) बजेट १० ते १५ कोटीच्या घरात होतं.फिल्ममेकिंगबरोबरच पब्लिसिटी आणि मार्केटिंगचं बजेटही वाढलं आहे. मराठीत दर्जेदार चित्रपट नेहमीच बनत होते पण तो सिनेमा जास्तीतजास्त लोकांपर्यंत कसा पोचवावा हे लक्षात आलेलं नव्हतं. आता मात्र प्रमोशन्स, प्रसिद्धी योग्य प्रकारे वितरण या बाबींचं महत्त्व लक्षात आलंय आणि त्यावर पुरेसा पैसाही खर्च होतोय.

**फिल्ममेकिंगबरोबरच पब्लिसिटी आणि मार्केटिंगचं बजेटही वाढलं आहे. मराठीत दर्जेदार चित्रपट नेहमीच बनत होते पण तो सिनेमा जास्तीतजास्त लोकांपर्यंत कसा पोचवावा हे लक्षात आलेलं नव्हतं. आता मात्र प्रमोशन्स, प्रसिद्धी योग्य प्रकारे वितरण या बाबींचं महत्त्व लक्षात आलंय आणि त्यावर पुरेसा पैसाही खर्च होतोय.**

'टाईमपास, 'फ्रॅन्ड्री', 'एलिझाबेथ एकादशी'सारख्या सिनेमांच्या cost of production पेक्षा cost of promotion जास्त होती आणि याचा या चित्रपटांना फायदा नक्कीच झाला. पब्लिसिटीच्या या बदलत्या ट्रेंडविषयी बोलताना 'मिडिया वन'चे गणेश गारगोटे म्हणाले, ''आपल्याकडे २००२-२००३ पर्यंत वर्षाला साधारण २० ते २५ चित्रपटच बनायचे. त्यातही मुंबईत त्यातले मोजकेच चित्रपट प्रदर्शित होत होते. २००४ मध्ये आलेल्या 'श्वास'ने हे चित्र बदललं. 'श्वास'च्या ऑस्कर वारीनंतर त्याचं कलेक्शन सुधारलं. त्या 'कलेक्शन'साठी त्या सिनेमाचं झालेलं मार्केटिंग, मीडियातून येणाऱ्या बातम्या कारणीभूत ठरल्या. २००५ मध्ये 'नवरा माझा नवसाचा', 'डोंबिवली फास्ट', 'खबरदार' अशा अनेक चित्रपटांच्या प्रसिद्धीचं आम्ही काम पाहिलं. पण त्यावेळी मार्केटिंगची माध्यमं कमी होती. प्रिण्ट मिडिया म्हणजेच वर्तमानपत्रे आणि काही प्रमाणात होर्डिंग्ज लावली जायची. हळूहळू टीव्ही चॅनेल्स, रेडिओ चॅनेल्स वाढले. ट्रेलर्स, सोशल मिडिया, बस पॅनेल्स, डिजिटल मिडिया अशी अनेक प्रसारमाध्यमं उपलब्ध झाली. अनेक ब्रॅण्डबरोबर टायअप केलं जातं. मोबाईल नेटवर्क, ज्वेलरी, ट्रॅव्हल अॅण्ड टुरिझम ब्रॅण्ड मराठी चित्रपटांबरोबर टायअप करायला लागले आहेत. पूर्वी चित्रपट पोस्ट प्रॉडक्शनमध्ये गेला की मग पब्लिसिटी कशी करायची, कोणाकडून करून घ्यायची याचा शोध घेतला जायचा. आता मात्र चित्रपट फ्लोअरवर गेला की, पब्लिसिटी स्ट्रेटेजी रेडी असते. आमचे विचार लक्षात घेतले जातात. कलाकारही पूर्ण सहकार्य देतात.''

मराठी चित्रपटसृष्टीत हळूहळू 'सिलिब्रेटी मॅनेजर' ही संकल्पनाही रुजायला लागली आहे. चित्रपटांबरोबरचं स्वत:चंही मार्केटिंग करायला हवं हे त्यांच्या लक्षात येतंय. सिलिब्रेटी मॅनेजर म्हणजे काय, त्याचं काम नक्की काय असतं, याबद्दल 'ड्रिमस PR अॅण्ड मार्केटिंग'चे दिपक राणे म्हणाले, ''मराठीत सेलिब्रेटी मॅनेजमेंट ही संकल्पना तशी नवीनच आहे. मी आणि संजय जाधव यांनी मिळून डिसेंबर २०१३ मध्ये 'ड्रिमस PR अॅण्ड मार्केटिंग' ही फर्म सुरू केली. ब्रॅण्डसना सेलिब्रेटींशी कनेक्ट करायचं आणि सेलिब्रेटीला ब्रॅण्ड बनवायचं काम आम्ही करतो. मराठीत सिनेमा नेहमी content वर चालतो. हॉलीवूड, बॉलीवूड किंवा टॉलीवूडसारखी star system आपल्याकडे नाहीय. कारण आपल्या कलाकारांची ही face value तयार झाली

नाहीयं तेच करण्याचं काम आम्ही करतोय. त्यांच्या डेट्स् आणि त्यांचे पर्सनल संबंध सांभाळून प्रोजेक्टस मॅनेज करण्यास मदत करण्यासाठी आम्ही मदत करतो. मानधन मागणं, ते वेळेवर मिळतंय का ते बघणं, कलाकाराची लोकांसमोर इमेज क्रिएट करणं, त्यांनी कोणत्या कार्यक्रमांना हजेरी लावावी (ज्याला आपण सुपारी घेणं म्हणतो), तिकडे त्यांची व्यवस्था कशी असेल, कोणत्या ब्रॅण्डशी असोसिएट व्हावं, त्यांचा लुक, अपिअरन्स कसा असावा इथपासून ते त्यांचे बँकेचे व्यवहार, टॅक्स भरणं हे सगळं आम्ही करतो. त्यांच्याशी संबंधित काही बातम्या, फुटेज प्रसारमाध्यमांना पुरवणं, सोशल नेटवर्किंग साईटसवर अपडेटस् अशा तऱ्हेने कलाकार लोकांच्या नजरेत राहील याची काळजी आम्ही घेतो. त्यामुळे प्रत्येक कलाकारांचा स्वत:चा प्रेक्षकवर्ग, चाहतावर्ग निर्माण होईल आणि त्याचा फायदा चित्रपटांनाच होईल.''

पब्लिसिटीइतकाच वितरण हा एक महत्त्वाचा भाग असतो. चित्रपट जास्तीत जास्त ठिकाणी वितरित करण्याचं काम करतात ते वितरक 'पिकल एन्टरटेन्मेन्ट'द्वारे आजवर सुमारे १०० चित्रपट वितरित करणारे समीर दिक्षित म्हणाले, ''वितरक म्हणून आम्ही नेहमीच चित्रपट महाराष्ट्रभर प्रदर्शित करण्याचा प्रयत्न करतो. एखादा निर्माता आमच्याकडे आला की, तो चित्रपट बघून त्याच्या जॉनरवर तो चित्रपट किती थिएटरमध्ये कुठल्या सर्किटमध्ये जास्त लावायचा हे ठरतं. महाराष्ट्राचे वितरणाच्या दृष्टीने तीन भाग पडतात; ज्याला आम्ही सर्किट असं म्हणतो. मुंबई, निझाम, CP बेरार ही तीन सर्किटस् आहेत. यातल्या मुंबईत मुंबई, पुणे, नाशिक, गुजरात, निझाममध्ये औरंगाबाद, मराठवाडा तर CP बेरार मध्ये नागपुर, यवतमाळ, बुलढाणा भाग येतात. सुरुवातीला चित्रपटांच्या प्रिण्ट निघायच्या आणि त्या थिएटर्सवर पोचवायला माणसं ठेवावी लागायची. त्यामुळे कित्येक चित्रपट कोल्हापूर, सांगली वरून मुंबई, पुणेसारख्या शहरांमध्ये वेळेत पोचतही नव्हते. पण 'माहेरची साडी' प्रदर्शित झाला आणि सगळचं चित्र पालटलं. हा सिनेमा धो-धो चालला तेव्हा मराठी चित्रपटांची व्यावसायिक गुणवत्ता विजय कोंडकेंच्या लक्षात आली. दरम्यान ते चित्रपट महामंडळाचे अध्यक्षही झाले. त्यांनी मुंबईतले एक्झिबिटर्स आणि थिएटर्स यांची चेन निर्माण केली. त्यामुळे मुंबईत प्रदर्शित होणाऱ्या सिनेमांची संख्या वाढली. हळूहळू कॉर्पोरेट कंपन्या आल्या. आताच्या घडीला ही तिन्ही सर्किटस् मिळून २००-३०० च्या आसपास थिएटर्स होतात. 'टाईमपास २' साठी तर ५०० थिएटर्स बुक आहेत. इतकी वर्षे या क्षेत्रात काम केल्यानंतर माझ्या असं लक्षात आलं की, बऱ्याच नवख्या निर्मात्यांना पब्लिसिटीची बरीचशी माध्यमं अजूनही लक्षात आलेली नाहीयेत. गेल्या दोन-एक वर्षात मी माझ्या पिकल एन्टरटेन्मेन्ट या कंपनीद्वारे अनेक मिडिया हाऊसेसबरोबर टायअप करून मराठी चित्रपटांसाठी स्पेशल दर काढले आहेत. त्यामुळे कमी पैशात निर्मात्यांना पब्लिसिटी मिळते. शिवाय glamsham.com या आघाडीच्या वेबसाईटबरोबरही आमचं टायअप आहे. यावरही चित्रपटांचे ट्रेलर्स, कलाकारांच्या मुलाखती दाखवल्या जातात.''




कॉर्पोरेट कंपन्या वितरणाच्या क्षेत्रात उतरल्यावर यात आमूलाग्र बदल झाला. या कॉर्पोरेट कंपन्यांनी अॅग्रेसिव्ह प्रसिद्धी करत प्रेक्षकांना थिएटरपर्यंत खेचून आणलं. चांगलं मार्केटिंग करून चित्रपट लोकांपर्यंत पोचवला की ते चित्रपटगृहांकडे वळतात, हे 'मुक्ता आर्टस्'च्या 'सनई चौघडे' आणि 'झी टॉकीज'च्या 'साडे माडे तीन'ने दाखवून दिलं. या संदर्भातला नेमका विचार काय आहे, यावर झी एस्सेल व्हिजनचे सगळे सिनेमे वितरित करणारे सदिक चितळीकर म्हणाले, ''मी जेव्हा वितरक म्हणून या क्षेत्रात काम करायला लागलो तेव्हा माझ्या लक्षात आलं की वितरक हा वितरक राहिला नसून 'वितरण व्यवस्थापक' झाला आहे. तो एक्झिबिटर्स आणि डिस्ट्रिब्युटर्स यांच्यातला दुवा बनलेला आहे. खरंतर माझ्या मते वितरक म्हणजे जो यशाची हमी (minimum guarentee) देतो आणि चित्रपटाला अॅडव्हान्स मिळवून देतो. मी सुरुवात केली तेव्हा वर्षाकाठी ३-४ चित्रपट प्रदर्शित व्हायचे. तेही फार कमी ठिकाणी लागायचे. महेश मांजरेकर, स्मिता तळवळकर यांसारख्या लोकांनी माझ्यावर विश्वास ठेवून 'आई', 'तू तिथे मी'सारखे चित्रपट दिले. त्यानंतर चंद्रकांत कुलकर्णीचा 'बिनधास्त'






चित्रपट केला. तो खूप चालला. हळूहळू मराठी सिनेमा contentwise strong व्हायला लागला. तांत्रिक बाबतीतही सुधारणा व्हायला लागल्या. आधी सिनेमास्कोप, मग डॉल्बी झाला. 'साडे माडे तीन'पासून मी 'झी टॉकीज बरोबर काम करायला लागलो. या चित्रपटाची स्टारकास्ट तगडी होती. हा चित्रपट व्यवस्थित मार्केटिंग करून लोकांपर्यंत पोचवला. आपल्याकडे चांगले आशयघन चित्रपट नेहमीच बनत होते. पण अडचण त्यांच्या मार्केटिंगची होती. तिथेच आम्ही लक्ष पुरवलं. एस्सेल व्हिजनची टीम आणि माझी टीम मिळून आम्ही अनेक लोकांना भेटलो. त्यांच्या अडचणी, गरजा समजून घेऊन व्यवस्थित मार्केटिंगचा प्लॅन केला. बऱ्याचदा मराठी चित्रपट कुठे लागलाय हेच कळत नाही. मग ते चित्रपट बघायला येणार कसे? आम्ही चित्रपटाची माहिती लोकांपर्यंत पोचवली. चित्रपट प्रदर्शनाचा एक रूढ पॅटर्न होता तो मोडला. चित्रपट जो एकेक सेंटर करत महाराष्ट्रभर लागायचा, आम्ही तो सगळीकडे एकाच वेळी प्रदर्शित केला. आता महाराष्ट्रभर सगळीकडे १००-२०० ठिकाणी चित्रपट लावतो. पण अर्थातच सिनेमा बघितल्यावर तो कमर्शियल आहे का नॉन कमर्शियल, ग्रामीण बाजाचा का शहरी यावर तो कुठे आणि कुठल्या टायमिंगला लावायचा हे ठरते. त्या सुमारास प्रदर्शित होणारे हिंदी, इंग्रजी चित्रपट कोणते आहेत हे सुद्धा बघावे लागते. 'फ्रॅन्ड्री', 'एलिझाबेथ एकादशी'सारख्या थोड्या ऑफबीट सिनेमांचे शोज सुरुवातीला आम्ही कमी लावले. त्यावेळी लोकांकडे ऑप्शन्स जास्त नव्हते. त्यामुळे persantagewise collection वाढलं. मग चांगला रिस्पॉन्स बघून आम्ही शो वाढवले. माऊथ पब्लिसिटीचा त्यामुळे खूप फायदा झाला. 'दुनियादारी'चा जॉनरही थोडा वेगळा होता. तो चित्रपट आम्ही उपनगरवाईज लावला. म्हणजे दादर, मग सायन वा चेंबुर असा. पण पहिल्या दिवशीचे सकाळी ७ चे शोही हाऊसफुल झाल्यावर आम्ही स्ट्रेटेजीत बदल करून शोज वाढवले. त्या चित्रपटाने सिल्व्हर ज्युबिली साजरी केली. नुकताच प्रदर्शित झालेला 'टाईमपास २' आम्ही ४०० थिएटरर्समध्ये लावला. 'दुनियादारी', 'टाईमपास' 'लय भारी', 'टाईमपास २' या चित्रपटांना सकाळी ७.०० पासून गर्दी होती. आम्ही प्रत्येक सेंटरवरच्या चित्रपटगृहांचा एक डेटा मेंटेन केलाय म्हणजे कुठे किती बुकिंग झालंय वगैरे. जर काही कारणाने ते कमी असेल तर त्या भागात प्रमोशन कसं वाढवायचं याचा विचार केला जातो. सध्या तर पब्लिसिटीची अनेक माध्यमं उपलब्ध आहेत. रेडिओ, प्रिण्ट्स, होर्डिंग्ज, पोस्टर्स, ट्रेलर्स, सोशल नेटवर्किंग साईटस्, कलाकारांना वेगवेगळ्या ठिकाणी नेणं, त्यांच्या मुलाखती अशा अनेक माध्यमातून ॲग्रेसिव्ह पब्लिसिटी करता येते पण शेवटी चित्रपट वाईट असेल तर त्याला कोणीच तारू शकत नाही.''




मराठी चित्रपट ओपनिंग विकएण्डचे नवनवीन रेकॉर्ड बनवत आहेत. तरीही मल्टिप्लेक्सेसमध्ये मराठी सिनेमांना प्राईम टाईम शोज मिळत नाहीत. अनेक वेळा मराठी चित्रपटांचे शोज सकाळी ७, ११ किंवा दुपारी १.३० वाजता वगैरे असतात. त्यामुळे नोकरदारवर्गांना ते बघता येत नाहीत. मराठी शो प्राईम टाईमला न दाखवण्याची कारणेही थिएटर मालक खूप विचित्र देतात. याबद्दल वितरक समीर दिक्षित म्हणाले, ''मराठी चित्रपटांना family audience आहे. त्यामुळे प्राईम टाईममध्ये थिएटरला नसणं हे खूप निराशाजनक होतं. त्याची कारणे देताना मल्टिप्लेक्स ओनर्स म्हणायचे की मराठी माणसं पॉपकॉर्न, कोल्ड्रिंक्स यावर फारसा खर्च करत नाहीत. आमचा ४०% नफा हा आमच्या कॅटरिंगमधून येतो. त्यामुळे गर्दीच्या वेळेस मराठी चित्रपट दाखवून आमचं नुकसान होतं. बरीच वर्षं मल्टिप्लेक्सेसमध्ये प्राईम टाईम मिळावा म्हणून आमचे प्रयत्न सुरू होते. आता अथक प्रयत्नानंतर सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांनी मल्टिप्लेक्समधील किमान एका स्क्रिनवर मराठी सिनेमा प्राईम टाईमला दाखवण्याचे आदेश दिले आहेत. याचा फायदा नक्कीच होईल पण हिंदी वा इंग्रजी सिनेमा सोडून प्रेक्षक मराठीकडे वळतील इतक्या उच्च दर्जाचे चित्रपट बनवण्याची आपली जबाबदारी नक्कीच वाढली आहे.''

**– अश्विनी सहस्रबुद्धे**
भ्रमणध्वनी : ९९८७०६३७६६
sahasrabuddhe.ashwini@gmail.com



## कथा युगभानाची –
अरुण साधू यांच्या निवडक कथा
संपदान : मीना गोखले
मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.



## बॉम्बे स्कूल : आठवणीतले, अनुभवलेले
सुहास बहुळकर
मूल्य ६०० रु. सवलतीत ४०० रु.



## काळा तुकतुकीत उजेड
किशोर पाठक
मूल्य १२० रु. सवलतीत ७५ रु.



## थांबवू शकत नाही कविता लिहिणं
सायनम मार्टिन
मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.



## भाषाग्रहण आणिभाषाशिक्षण
रमेश पानसे
मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.



## दीपदान
चंद्रशेखर सानेकर
मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.



## चंदेरी सृष्टी, सोनेरी गोष्टी
प्रकाश चांदे
मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.



## वांझुठाव
भाऊ गावंडे
मूल्य ५०० रु. सवलतीत ३०० रु.



## आनंदनक्षत्र
प्रल्हाद जाधव
मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.



## लांबा उगवे आगरीं
म.सु. पाटील
मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.



## अमीरबाई कर्नाटकी
प्रशांत कुलकर्णी
मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.



## चाला, पळा, धावा
डॉ. पी.एस. रामाणी
मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.



## माझे अंतरंग
डॉ. दाऊद दळवी
मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.



## भारतातील मुस्लिम स्थापत्यकला
डॉ. दाऊद दळवी
मूल्य ६०० रु. सवलतीत ४०० रु.



## नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१४
नंदिनी/सुधीर थत्ते
मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.

नाशिक, सोलापूर आणि मुंबई येथे ग्रंथाली वाचकदिनी
प्रकाशित झालेल्या १५ पुस्तकांचा संच
मूळ किंमत ४१०० रु. सवलतीत २५०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १५० रुपये



# ‘श्वास’ नंतर चित्र बदललंय

## सुबोध भावे

**आता वेगळ्या विषयावरील चित्रपट येत आहेत. सामाजिक भान ठेवणारे चित्रपट, तरुणांना आवडतील असे चित्रपट, प्रेमकथा, ‘कोर्ट’सारखा प्रायोगिक विषयावरील चित्रपट अशा रीतीने चित्रपट आशयाच्या दृष्टीने समृद्ध होत आहे. आज प्रत्येक चांगल्या कलाकाराला काम मिळू लागले आहे, चित्रपटातील प्रत्येक व्यक्तिरेखेला महत्त्व आहे, मुख्य म्हणजे तंत्रज्ञान बदलत आहे, चांगले सिनेमे बघणारी पिढी निर्माण होत आहे. चित्रपट या माध्यमाचे रीतसर प्रशिक्षण देणाऱ्या संस्था पण निर्माण होत आहेत आणि त्यातून प्रशिक्षण घेऊन या क्षेत्रात येणारे तरुणसुद्धा या संस्कारात घडत आहेत. पडद्यामागच्या कलाकारांना पण चांगला स्कोप निर्माण झाला आहे.**

*__मराठी__ चित्रपटांच्या बाबतीत बोलायचे तर ‘श्वास’ चित्रपटानंतर हे चित्र बदलले आहे. ‘श्वास’ला राष्ट्रीय सुवर्णकमळ मिळाल्यावर अनेक विषयावरील मराठी चित्रपट येऊ लागले आहेत. एक काळ असा होता की, मराठी चित्रपट हा तमाशाप्रधान होता, तर एका काळात मराठी चित्रपटात कॉमेडीची लाट आली होती. आता मात्र वेगळ्या विषयावरील चित्रपट येत आहेत. मुख्य म्हणजे मराठी कलाकारांना चांगले मार्केट निर्माण झाले आहे. चांगले रोल्स लिहिले जात आहेत, सामाजिक भान ठेवणारे चित्रपट, तरुणांना आवडतील असे चित्रपट, प्रेमकथा, ‘कोर्ट’सारखा प्रायोगिक विषयावरील चित्रपट अशा रीतीने चित्रपट आशयाच्या दृष्टीने समृद्ध होत आहे. आज प्रत्येक चांगल्या कलाकाराला काम मिळू लागले आहे, चित्रपटातील प्रत्येक व्यक्तिरेखेला महत्त्व आहे, ‘७२ मैल’सारखा चित्रपट आणि त्यातील स्मिता तांबे हिची भूमिकासुद्धा लक्षात राहणारी आहे. ‘काकण’सारखा चित्रपटही लक्षात राहण्यासारखा आहे. मुख्य म्हणजे तंत्रज्ञान बदलत आहे, चांगले सिनेमे बघणारी पिढी निर्माण होत आहे. चित्रपट या माध्यमाचे रीतसर प्रशिक्षण देणाऱ्या संस्था पण निर्माण होत आहेत आणि त्यातून प्रशिक्षण घेऊन या क्षेत्रात येणारे तरुणसुद्धा या संस्कारात घडत आहेत. पडद्यामागच्या कलाकारांना पण चांगला स्कोप निर्माण झाला आहे.*

*मी ज्यावेळी ‘बालगंधर्व’ केला तेव्हा नवी आणि जुनी पिढी जोडली गेली. कारण आजोबांच्या पिढीने बालगंधर्वांना पाहिले होते, तर नातवंडांना ‘बालगंधर्व’ कोण याची उत्सुकता होती. मला ‘बालगंधर्व’ या विषयावर चित्रपट करायचाच होता आणि ते स्वप्न मी पूर्ण केले. ‘लोकमान्य’ चित्रपटाला सुद्धा कॉलेज आणि शाळांमधील विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. लोकमान्य हे व्यक्तिमत्त्व नेमके कसे होते याचा अनेक विद्यार्थ्यांनी अभ्यास सुरू केल्याचेही ऐकू येत आहे. डॉक्टर प्रकाश बाबा आमटे हा चित्रपट पाहून अनेक तरुण सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य करू लागले आहेत, हा एक चांगला परिणाम लक्षात घेण्याजोगा आहे.*

*सध्या मराठी चित्रपटातील ग्रामीण बाज कमी होऊन त्यातला शहरी बाज वाढत आहे, मुळात शहरीकरणाचे प्रमाण देखील वाढत आहे. आज प्रत्येक गोष्टीला इथे मार्केट उपलब्ध झाले आहे. मार्केटिंगच्या या दुनियेत चित्रपटातील कलाकारसुद्धा चित्रपटाच्या प्रमोशनसाठी वेळ देत आहेत ही खूप स्वागतार्ह बाब आहे. ‘एलिझाबेथ एकादशी’सारखा चित्रपट लहान मुलांच्या निरागसतेचे उत्तम चित्रण करतो, तर ‘फ्रॅन्ड्री’ आणखी एक वेगळा विषय मांडतो. ‘क्लासमेट्स’, ‘दुनियादारी’ हे चित्रपट कॉलेज विश्वाचे चित्रण करतात. ‘कॉफी आणि बरंच काही’ हा चित्रपट तरुणांची गर्दी खेचतो.*

*आता आमची टीम दिवाळीपर्यंत ‘कट्यार काळजात घुसली’ हा चित्रपट आपल्यासमोर आणत आहे. या नाटकाने मला झपाटले होते आणि एका चांगल्या चित्रपटाचा विषय नाटकात अडकला आहे असे मला वाटत होते, या विषयावर चित्रपट झालाच पाहिजे असे माझ्या मनात आले. आणि आमची संपूर्ण टीम त्या प्रोजेक्टवर काम करू लागली. यात आम्ही एकवीस गाणी घेतली आहेत. सर्वांना हा चित्रपट आवडेल अशी खात्री मला वाटते.*

*एकंदरीत नवा मराठी चित्रपट प्रवाह खूप आशावादी आहे हे नक्की.*

***शब्दांकन : गणेश आचवल***

atharvabharadhwaj@gmail.com

# आशय नेहमीच संपन्न

**मुक्ता बर्वे**



***मराठी*** *चित्रपटातील आशय हा कायमच संपन्न राहिला आहे, जेव्हा कृष्णधवल चित्रपटांचा किंवा 'प्रभात'निर्मित चित्रपटांचा काळ होता, तेव्हापासून मराठी चित्रपट हे कथानक, आशय या बाबतीत समृद्धच आहेत. मध्यंतरीच्या काळात मात्र थोडे चित्र बदलले होते, विनोदी चित्रपट आणि करमणूक प्रधान चित्रपट आले होते. त्याही काळात 'वजीर'सारखा एखादा चित्रपट लोकांना वेगळा वाटलाच की. गेल्या काही वर्षात मात्र मराठी चित्रपटात अधिक चांगला सकारात्मक बदल झाला आहे. मुख्य म्हणजे चित्रपटांचे अर्थकारण बदलले आहे. आता आशय तर समृद्ध आहेच पण त्या चित्रपटाची मांडणीसुद्धा आकर्षक पद्धतीने केली गेल्याने मराठी चित्रपट हा देखणा झाला आहे.*

*मी स्वतःला भाग्यवान समजते की 'आघात', 'जोगवा'सारख्या सामाजिक चित्रपटात मला भूमिका मिळाली आणि 'लग्न पहावे करून'सारख्या करमणूकप्रधान चित्रपटात किंवा तरुण पिढीला आवडणाऱ्या 'मुंबई पुणे मुंबई' किंवा 'मंगलाष्टक वन्स मोअर'मध्ये काम करण्याची संधी मला मिळाली. एक काळ असा होता की, मराठी चित्रपट उत्तम असायचा पण त्याला प्रेक्षक मिळत नव्हता, त्यामुळे प्रत्येकाची खंत हीच होती की मराठी चित्रपटाला प्रेक्षक नाही, पण गेली काही वर्षं हे चित्र बदलत चालले आहे. आयटी किंवा कॉर्पोरेट क्षेत्रातील लोकसुद्धा मराठी सिनेमे बघू लागले आहेत. याच्या मागचे एक कारण म्हणजे सध्या मराठी चित्रपट उत्तम प्रकारच्या प्रसिद्धी तंत्राने प्रेक्षकांपर्यंत पोचतो. प्रेक्षक तयार करण्याची किंवा युवा पिढीला आकर्षित करण्याची गरज निर्मात्यांनीसुद्धा ओळखली आहे. त्या दृष्टीने चित्रपटाचे प्रमोशन होते. गेल्या पाच वर्षात उत्तम प्रेमकथा पण मराठीत आल्या, त्यामुळे टिनेजर्सचे प्रमाणसुद्धा प्रेक्षक म्हणून वाढले. कॉलेज जीवनावर आधारित चित्रपट बॉक्स ऑफिसवर खूप हिट झाले. मराठी चित्रपटांच्या बाबतीत एक चांगला मुद्दा हा की, मराठी चित्रपट आपली मर्यादा न सोडता, संस्कृती न सोडता आपल्याला जे मांडायचे आहे ते उत्तम प्रकारे मांडतात.*

*आज मराठी चित्रपटसृष्टीकडे एक 'इंडस्ट्री' म्हणून पाहिले जाते. या क्षेत्रात सगळ्यांचे टीम वर्क वाढले आहे. सोशल मिडियाचा वापर खूप चांगल्या रीतीने केला जातोय. एखाद्या चित्रपटाचे पोस्टर कसे असावे याकडेसुद्धा नीट लक्ष दिले जात आहे. परिणामी अनेक लोकांना आर्थिक व्यवसाय किंवा करिअरचे नवीन दालन सुद्धा खुले झाले आहे.*

*येत्या काही महिन्यात माझी आणि स्वप्निलची भूमिका असणाऱ्या 'मुंबई पुणे मुंबई'चा सिक्वल येतोय. तसेच 'डबल सीट' आणि 'गणवेश' या चित्रपटात सुद्धा माझी भूमिका आहे.*

***शब्दांकन : गणेश आचवल***

*atharvabharadhwaj@gmail.com*

**चित्रपटांचे अर्थकारण बदलले आहे. आता आशय तर समृद्ध आहेच पण त्या चित्रपटाची मांडणीसुद्धा आकर्षक पद्धतीने केली गेल्याने मराठी चित्रपट हा देखणा झाला आहे. एक काळ असा होता की, मराठी चित्रपट उत्तम असायचा पण त्याला प्रेक्षक मिळत नव्हता, त्यामुळे प्रत्येकाची खंत हीच होती की मराठी चित्रपटाला प्रेक्षक नाही. पण गेली काही वर्षं हे चित्र बदलत चालले आहे. आज मराठी चित्रपटसृष्टीकडे एक 'इंडस्ट्री' म्हणून पाहिले जाते. परिणामी अनेक लोकांना आर्थिक व्यवसाय किंवा करिअरचे नवीन दालन सुद्धा खुले झाले आहे.**



# मराठीत सिक्कलचा ट्रेंड

## स्वप्निल जोशी

***मराठी*** *चित्रपटांचा हल्लीचा ट्रेंड बघता नक्कीच मराठी चित्रपटाला चांगले दिवस आले आहेत. मुख्य म्हणजे गेल्या काही वर्षात वर्षभरात प्रदर्शित होणाऱ्या मराठी चित्रपटांची संख्या वाढत आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. मराठी चित्रपटांनी गेल्या काही वर्षात बॉक्स ऑफिसवर करोडो रुपयांचा व्यवसाय केलाय. अवघ्या महाराष्ट्रात हे करोडोचे आकडे बॉक्स ऑफिसवर दिसणे म्हणजे एक वेगळा रेकॉर्ड म्हणायला हवा. सध्या मराठी चित्रपटांचे विषय खूप वेगळे आहेत, तंत्रज्ञानसुद्धा प्रगत झाले आहे.*

*मराठी चित्रपटांच्या यशाचे श्रेय कोणा एकट्या व्यक्तीला देणे कठीण आहे, हे श्रेय अनेक खांबी तंबूचे आहे. मुळात गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील तरुणांच्या मानसिकतेत बदल झाला आहे. मी काम केलेल्या 'मुंबई पुणे मुंबई ' चित्रपटाने मराठी चित्रपटात एक रोमँटिक कथेचा पॅटर्न सेट केला आहे असे मला वाटते. या चित्रपटाला युवा पिढीची खूप चांगली दाद मिळाली. मी स्वतःला भाग्यवान समजतो कारण मी आतापर्यंत  ६ ते ८ चित्रपट केले असतील, पण प्रत्येक चित्रपटाने मला काहीतरी वेगळे दिले आहे,  ते सगळे चित्रपट हिट झालेत. सतीश राजवाडे काय किंवा संजय जाधव काय, अशा उत्तम दिग्दर्शकांबरोबर माझी केमिस्ट्री उत्तम जुळली आहे. स्वप्ना जोशी यांच्यासारखी व्यक्तिमत्व वेगळे विषय मराठी चित्रपटासाठी घेऊन येत आहेत.*

*हल्ली प्रमोशन या गोष्टीसाठी वेगळे बजेट प्लान केले जाते. 'मुंबई पुणे मुंबई'च्या प्रसिद्धीसाठी तर मी आणि मुक्ता बर्वे आम्ही दोघे पुण्यापर्यंत ट्रेनने प्रवास करून चाहत्यांशी संवाद साधला होता, 'दुनियादारी'चे प्रमोशन तर वेगवेगळ्या प्रकारे महाराष्ट्रभर सुरू होते. तर 'मितवा' चित्रपट जेव्हा सुरू झाला, तेव्हा एक स्पर्धा घेण्यात आली आणि 'मितवा'चे प्रमोशनसुद्धा वर्षभर सुरू होते. हल्ली पब्लिसिटीकरिता वेगळ्या योजना आखल्या जातात. अभिनेता आणि अभिनेत्री प्रमोशनसाठी निर्मात्याला वेगळ्या तारखा देतात. यावरून हे सिद्ध होते की, त्या कलाकारांचा त्या सिनेमावर विश्वास आहे. प्रमोशन करताना नुसते क्रिएटिव्ह असून चालत नाही तर इनोव्हेटिव्ह पण असावे लागते आणि आजची पिढी या बाबतीत हुशार आहे.*

*हे वर्ष मराठी चित्रपटांच्या सिक्कलचे वर्ष आहे, कारण मुळात हॉलीवूडमध्ये असणारा हा ट्रेंड मराठीत येतोय, 'टाइमपास'चा सिक्कल हिट झाला. 'अगबाई अरेच्चा' या चित्रपटाचा सुद्धा सिक्कल लोकप्रिय झाला आणि आता आमच्या 'मुंबई पुणे मुंबई' याचा सिक्कल दिवाळीत येतोय. तेव्हा मराठी चित्रपटांनी भरारी घेतली आहे हे निश्चित.*

**शब्दांकन : गणेश आचवल**
*atharvabharadhwaj@gmail.com*

**मराठी चित्रपटांची संख्या वाढत आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. मराठी चित्रपटांनी गेल्या काही वर्षात बॉक्स ऑफिसवर करोडो रुपयांचा व्यवसाय केलाय. अवघ्या महाराष्ट्रात हे करोडोचे आकडे बॉक्स ऑफिसवर दिसणे म्हणजे एक वेगळा रेकॉर्ड म्हणायला हवा. सध्या मराठी चित्रपटांचे विषय खूप वेगळे आहेत, तंत्रज्ञानसुद्धा प्रगत झाले आहे. मराठी चित्रपटांच्या यशाचे श्रेय कोणा एकट्या व्यक्तीला देणे कठीण आहे, हे श्रेय अनेक खांबी तंबूचे आहे.**

# मराठी चित्रपटांचे पण रिमेक बनत आहेत



**केतकी माटेगावकर**

**आपण** *अभिनेत्री होऊ असे मला कधीच वाटले नव्हते. माझे आजोबा किशोर माटेगावकर हे नाटकात काम करायचे. लहानपणापासून मला चित्रपटांची आवड नक्कीच होती पण या क्षेत्रात आपण करिअर करू असे मात्र वाटले नव्हते. माझा ओढा संगीताकडे अधिक होता. शाळेत असताना सचिन कुंडलकर यांच्या एका लघुपटात मी काम केले होते, इतकंच. 'सा रे ग म प' नंतर मला प्रभाकर पणशीकर यांनी 'अवघा रंग' नाटकासाठी विचारले पण आपल्याला अभिनय करता येईल का याबाबत मी साशंक होते. पण सर्वांच्या प्रोत्साहनाने मी नाटकात काम केले, या नाटकात गायिका आणि अभिनेत्री अशा दोन्ही प्रकारे मी स्वतःला अजमावून बघू शकले, लोकांनी माझे कौतुक केले. मला आता अभिनय आवडू लागला होता.*

*मी लहानपणी स्मिता पाटील यांचे पाहिलेले 'उंबरठा आणि 'जैत रे जैत' हे चित्रपट मला अजून आठवतात. तेव्हासुद्धा मराठी चित्रपटांचे कथानक ताकदीचे होते आणि जेव्हा मला 'आरोही', 'शाळा'सारखे चित्रपट मिळाले, तेव्हा सुद्धा जाणवले की, मराठी चित्रपट हे उत्तम विषयावर आधारित असतात. मराठीत अधिक वास्तववादी चित्रपट येतात असे मला वाटते. 'शाळा' चित्रपट करताना मला जाणवले की, या चित्रपटासाठी हॉलीवूडमधील तंत्रज्ञ आले होते. त्यामुळे चित्रपट चित्रित होतानासुद्धा एक नवीन दृष्टी मिळाली होती.*

*जुन्या रूढी, परंपरा या वर भाष्य करणाऱ्या 'काकस्पर्श'ने सुद्धा लोकप्रियता मिळवली. महेश मांजरेकर यांच्यासारखे दिग्दर्शक नेहमीच काहीतरी वेगळे आणि चांगले देण्याचा प्रयत्न करतात. त्या प्रकल्पाचा मी एक भाग असल्याचा मला अभिमान आहे. आता 'काकस्पर्श'चा हिंदी आणि तमिळ रिमेक होतोय. महेश मांजरेकर यांनी जेव्हा माझे 'टाइमपास'मधील काम पाहिले, तेव्हा त्यांनी मला फोन केला आणि म्हणाले, अगं, तू अजून लहानच दिसतेस. तू कर हिंदी आणि तमिळ 'काकस्पर्श'मध्ये काम. मला या दोन्ही भाषातील 'काकस्पर्श'च्या रिमेकमध्ये काम करण्याची संधी मिळाली. मला जाणवले की, पूर्वी हिंदी किंवा दाक्षिणात्य भाषांतील चित्रपटाचे मराठी किंवा इतर भाषात रिमेक होण्याचा प्रयत्न होई, आता मराठी कथानक दक्षिणेपर्यंत पोचले ही चांगली गोष्ट आहे. मराठीत खूप नवीन दिग्दर्शक पुढे येत आहेत आणि नवीन विषयसुद्धा. सुजय डहाकेसारखा दिग्दर्शक असो किंवा अजून कोणी, प्रत्येकजण इथे येताना खूप मेहनत करतोय. 'टाइमपास'ने मला प्रचंड लोकप्रियता दिली आणि आता तर त्याचा सिक्वल पण आला. या चित्रपटाच्या निमित्ताने मला चांगली गाणीसुद्धा गाता आली. आता एका विज्ञानकथेवर खूप वेगळा मराठी चित्रपट येतोय, त्यात माझी भूमिका आहे. मराठी चित्रपट दिवसेंदिवस खूप प्रगल्भ होत चालला आहे.*

***शब्दांकन : गणेश आचवल***

*atharvabharadhwaj@gmail.com*

**मराठी चित्रपट हे उत्तम विषयावर आधारित असतात. मराठीत अधिक वास्तववादी चित्रपट येतात असे मला वाटते. पूर्वी हिंदी किंवा दाक्षिणात्य भाषांतील चित्रपटाचे मराठी किंवा इतर भाषात रिमेक होण्याचा प्रयत्न होई, आता मराठी कथानक दक्षिणेपर्यंत पोचले ही चांगली गोष्ट आहे. मराठीत खूप नवीन दिग्दर्शक पुढे येत आहेत आणि नवीन विषयसुद्धा.**





# प्रयोगशील दिग्दर्शकांची नवी फळी

## मकरंद अनासपुरे

**माझ्या** मते मराठी चित्रपट दिवसेंदिवस अधिकाधिक समृद्ध होत आहे. एक काळ असा होता की, मराठी चित्रपट हा कुटुंब आणि दिवाणखाना यात अडकला होता, मग नंतर काही दिवस मराठी चित्रपट हा सरपंच, तमाशा अशा गोष्टींना प्राधान्य देत होता, पण नंतर हे चित्र बदलले. मी जेव्हा 'काय द्याचं बोला'सारखा चित्रपट केला होता, तेव्हा 'नायक' म्हणून मला लोकांनी स्वीकारले.

सुरुवातीच्या काळात मला जे चित्रपट मिळाले, ते स्वीकारणे मला भाग होते, कारण आर्थिक गणिते सुद्धा जुळावी लागतात. मी जेव्हा या क्षेत्रात आलो तेव्हाचे स्ट्रगल वेगळे होते. आतासारखे भरपूर चित्रपट किंवा मालिका त्या काळात नव्हत्या. पण जेव्हा मी या क्षेत्रात हळूहळू स्थिरस्थावर झालो, तेव्हा भूमिका निवडतानासुद्धा मी जास्त विचार करू लागलो. 'गोष्ट छोटी डोंगराएवढी'सारख्या चित्रपटाने शेतकऱ्यांच्या जीवनावर भाष्य केले. तर 'जाऊ तिथं खाऊ'सारख्या चित्रपटाने 'भ्रष्टाचार' या समस्येवर टिपण्णी केली. या चित्रपटाचा हिंदी रिमेकसुद्धा झाला.

'सातच्या आत घरात'सारख्या चित्रपटाने पुण्याच्या एका सत्य घटनेवर प्रकाश टाकला. 'डांबिस' हा मी केलेला एक वेगळा चित्रपट आणि 'गल्लीत गोंधळ दिल्लीत मुजरा' या मी केलेल्या चित्रपटाने राजकारण हा विषय केंद्रस्थानी ठेवला.

आपण विनोदी भूमिकांमध्ये अडकायचे नाही असे मी ठरवले आणि 'भारतीय'सारखा वेगळा चित्रपट केला. गजेंद्र अहिरे हा मला भेटलेला एक उत्तम दिग्दर्शक. तो मराठी चित्रपटात सतत काहीतरी नवीन प्रयोग करणारा दिग्दर्शक आहे. 'अनवट' चित्रपटात मला एक वेगळा खलनायक करण्याची संधी त्याने दिली. 'पारध', 'चंदा', 'पिपाणी' यासारखे वेगळ्या विषयावरचे चित्रपट मी केले.

नागराज मंजुळे, मंगेश हाडवळे, चैतन्य ताम्हाणे ही नव्या दिग्दर्शकांची जी फळी तयार होत आहे, त्यांचे कौतुक करावेसे वाटते. 'कोर्ट'सारखा प्रयोगशील चित्रपट निर्माण करून तो रिलीज करण्याचे धाडस करणे हे कौतुकास्पद आहे. हल्ली दरवर्षी बनणाऱ्या मराठी चित्रपटांची संख्या वाढत आहे. तुलनेने सध्या आर्थिक स्थैर्यसुद्धा निर्माण होत आहे. आशयाच्या दृष्टीने मराठी चित्रपट नक्कीच संपन्न आणि समृद्ध आहेत.

हे चित्र जरी आशावादी असले, तरी आताची अभिनेत्यांची पिढी ही या क्षेत्राला जसा वेळ द्यायला पाहिजे तसा देत नाही हे माझे स्पष्ट मत आहे. हल्ली नाटकाचे महिन्याला होणारे प्रयोग, त्यांची संख्या पण कमी झाली आहे. त्यामुळे नव्या अभिनेत्यांच्या पिढीने योग्य वेळ मेहनतीला द्यायला हवा असे मला वाटते.

**नागराज मंजुळे, मंगेश हाडवळे, चैतन्य ताम्हाणे ही नव्या दिग्दर्शकांची जी फळी तयार होत आहे, त्यांचे कौतुक करावेसे वाटते. 'कोर्ट'सारखा प्रयोगशील चित्रपट निर्माण करून तो रिलीज करण्याचे धाडस करणे हे कौतुकास्पद आहे. हल्ली दरवर्षी बनणाऱ्या मराठी चित्रपटांची संख्या वाढत आहे. तुलनेने सध्या आर्थिक स्थैर्यसुद्धा निर्माण होत आहे. आशयाच्या दृष्टीने मराठी चित्रपट नक्कीच संपन्न आणि समृद्ध आहेत.**

**शब्दांकन : गणेश आचवल**
atharvabharadhwaj@gmail.com

# सिनेमाचा विषय हाच हिरो

**वीणा जामकर**



*‘‘**मी** अभिनयाच्या क्षेत्रात येण्याचे स्वप्न घेऊनच आले होते, रुपारेल कॉलेजमध्ये असताना सातत्याने एकांकिका स्पर्धा करत होते. पदवीधर झाल्यावर प्रायोगिक आणि व्यावसायिक नाटक करू लागले होते. पण माझा असा एक समज होता की, व्यावसायिक नाटकात काम मिळू लागले म्हणजे ती करिअरची शेवटची पायरी. पण हा समज बदलू लागला. त्या काळात मराठी व्यावसायिक नाटकांचे प्रयोग कमी होत होते. महिन्याकाठी सात आणि आठ प्रयोग होत असतील, तर मुंबईतला खर्च चालणार कसा? ‘लालबाग परळ’ चित्रपट केला, माझ्या भूमिकेचे कौतुकसुद्धा झाले, पण सिनेमा या संस्कृतीशी मी अजून पूर्णपणे परिचित झाले नव्हते. ‘वळू’सारखा चित्रपट मिळाला, हळूहळू लक्षात आले की, नाटकापेक्षा सिनेमात बरे पैसे मिळत आहेत आणि हळूहळू सिनेमा संस्कृती मी जाणून घेऊ लागले. मी चित्रपट रसास्वाद आणि अवलोकनाचा कोर्स पण पूर्ण केला आणि मग एकंदरीतच सिनेमाकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन बदलला. मराठी चित्रपटात कोणी एक विशिष्ट हिरो नसून चित्रपटाचा विषय हाच हिरो आहे असे मला जाणवले.*

*मराठी चित्रपट ‘श्वास’नंतर खूपच बदलला. त्यातली क्रिएटीव्हिटी मनाला भुरळ घालू लागली. अर्थात तो व्यावसायिकदृष्ट्या मोठा व्हायला अजून थोडा वेळ लागेल असे वाटते. मराठी सिनेमाचा पाया मजबूत करण्याचा काळ आमच्यासाठी जास्त आव्हानात्मक आहे आणि आनंदाचासुद्धा आहे. मराठी चित्रपट समृद्ध होण्यात लेखक, कलाकार, तंत्रज्ञ, दिग्दर्शक या सर्वांचे मोलाचे योगदान आहे आणि अर्थातच ठिकठिकाणी जे मराठी चित्रपट महोत्सव किंवा बहुभाषिक चित्रपट महोत्सव भरवले जातात, त्यांचेसुद्धा योगदान आहे. पूर्वी मराठी चित्रपटात काम करताना होणारा आनंद हा शुटींगपुरता मर्यादित असेल कदाचित, आता मात्र तो सिनेमा प्रेक्षकांपर्यंत पोचण्यासाठी एक कलाकार म्हणूनसुद्धा आम्हा सर्वांची धडपड असते. नुसते सिनेमा बनवून चालत नाही, तर तो प्रेक्षकांपर्यंत पोचायला हवा.*

*मराठी सिनेमाचा युएसपी असतो तो म्हणजे त्याचा विषय. सिनेमा बनवताना अर्थात हल्ली बॉक्स ऑफिसचा पण विचार करावा लागतो. पण गेल्या काही वर्षांतील मराठी चित्रपटसृष्टीकडे पाहिले तर लक्षात येईल की अनेक नवीन दिग्दर्शक, तंत्रज्ञ पुढे येत आहेत. मराठी सिनेमाचा दर्जा अर्थातच उत्तम आहे. मी केलेले ‘कुटुंब’ किंवा ‘तुकाराम’सारखे चित्रपटसुद्धा वेगळा विषय उत्तमपणे मांडणारे ठरले. या चित्रपटाला अधिक समृद्ध करण्यासाठी आमच्या पिढीने सातत्याने काम करत राहायला हवे. सतत फक्त फायद्याचा विचार करता कामा नये, तर सिनेमाच्या प्रत्येक अंगाचा विचार करायला हवा. व्यावसायिकता, सिनेमात काम करण्याची पद्धत आणि शिस्तसुद्धा अंगी जोपासली, वाढवली तर आमच्या पुढच्या पिढीला त्याचा खूप जास्त फायदा होईल, हे निश्चित. सिनेमा चालण्यासाठी ज्या प्रकारे सध्या प्रमोशनचा विचार केला जातो, ते स्वागतार्ह आहे. मराठी चित्रपटाकडे एक ‘इंडस्ट्री’ म्हणून बघितले जात आहे आणि त्या पर्वाची मी एक छोटासा भाग आहे, याचा मला आनंद वाटतो.’’*

**मराठी चित्रपट ‘श्वास’नंतर खूपच बदलला. त्यातली क्रिएटीव्हिटी मनाला भुरळ घालू लागली. अर्थात तो व्यावसायिकदृष्ट्या मोठा व्हायला अजून थोडा वेळ लागेल असे वाटते. मराठी सिनेमाचा पाया मजबूत करण्याचा काळ आमच्यासाठी जास्त आव्हानात्मक आहे आणि आनंदाचासुद्धा आहे. मराठी चित्रपट समृद्ध होण्यात लेखक, कलाकार, तंत्रज्ञ, दिग्दर्शक या सर्वांचे मोलाचे योगदान आहे आणि अर्थातच ठिकठिकाणी जे मराठी चित्रपट महोत्सव किंवा बहुभाषिक चित्रपट महोत्सव भरवले जातात, त्यांचेसुद्धा योगदान आहे.**

***शब्दांकन : गणेश आचवल***
*atharvabharadhwaj@gmail.com*



# मागणी तसा पुरवठा

**प्रथमेश परब**

मी जेव्हा शाळेत होतो, तेव्हा अनेक विनोदी चित्रपट पाहायचो. अशोक सराफ आणि लक्ष्मीकांत बेर्डे यांचे चित्रपट मला खूप आवडायचे. त्या काळात माहेर-सासर या संकल्पनेवर अनेक कौटुंबिक चित्रपट पण येत होते. मी ते चित्रपट फारसे पाहत नव्हतो, पण एक मात्र खरे की, त्यावेळी विनोदी आणि कौटुंबिक अशा दोन्ही चित्रपटांना एक ठराविक प्रेक्षकवर्ग होता. माणसाला भावेल अशा विषयांवर चित्रपट येत होते. स्त्रीप्रधान चित्रपट लोकप्रियता मिळवत होते. पण 'श्वास'नंतर हे चित्र बदलले. मुख्य म्हणजे सिनेमाला राजमान्यता मिळाल्यानंतर त्या सिनेमाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. कॉमेडीची लाट आता कमी होत चालली होती. नाटकातील कॉमेडी चित्रपटात येत होती, पण ते प्रमाणसुद्धा कमी झाले, चित्रपट जास्त वास्तववादी होऊ लागले. दिग्दर्शक, लेखक, तंत्रज्ञ प्रत्येकाला स्कोप मिळत गेला.

**आता सिनेमा बनवताना कमर्शिअली तो किती चालेल, बॉक्स ऑफिसवर काय गल्ला जमवेल याचासुद्धा विचार केला जातो आणि ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे प्रेक्षकांना काय हवे आहे, याचा विचार मराठी सिनेमात होऊ लागला आहे. आणखी एक गोष्ट म्हणजे हल्ली अमराठी माणसे सुद्धा मराठी चित्रपटात गुंतवणूक करू लागली आहेत.**

गेल्या काही वर्षांत तर मराठी सिनेमाचा व्यावसायिकदृष्ट्या विचार होऊ लागला. एखाद्याने जर दोन कोटी रुपये सिनेमात गुंतवले असतील, तर किमान तेवढे पैसे त्याला मिळायला हवेत तरच तो चित्रपट निर्माण करण्यात अर्थ आहे. आता सिनेमा बनवताना कमर्शिअली तो किती चालेल, बॉक्स ऑफिसवर काय गल्ला जमवेल याचासुद्धा विचार केला जातो आणि ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे प्रेक्षकांना काय हवे आहे, याचा विचार मराठी सिनेमात होऊ लागला आहे. 'टाइमपास'चा भाग एक आणि दोन दोन्ही लोकप्रिय झाले. त्या सिनेमाने माझ्या चेहऱ्याला ओळख दिली, पण मुख्य म्हणजे कॉलेजातील मुलांना सुद्धा थिएटरकडे वळवण्यात तो चित्रपट यशस्वी झाला. 'दुनियादारी'ने सुद्धा तेच केले. म्हणजे जे आज हवे आहे, तसे निर्माता, दिग्दर्शकाकडून पण दिले जाऊ लागले.

माझ्या मते मराठी चित्रपट दोन प्रकारचे आहेत. एक म्हणजे जे समाजाला हवे आहे ते कलाकृतीतून दाखवणारे आणि दुसरा गट म्हणजे जे मला दाखवायचे आहे ते स्पष्टपणे मांडणारे. हा दुसरा गट सुद्धा धाडसी असतो, तो बॉक्स ऑफिसचा विचार करत नाही. पण तो आपले वेगळे विषय धाडसाने समाजापुढे आणतो. आणखी एक गोष्ट म्हणजे हल्ली अमराठी माणसे सुद्धा मराठी चित्रपटात गुंतवणूक करू लागली आहेत. बॉलीवूडमध्ये जेव्हा 'टाइमपास' आणि 'दुनियादारी' चित्रपटांची चर्चा होते, तेव्हा आपल्याला अभिमानच वाटतो. थोडक्यात काय तर मराठी चित्रपटाचा ट्रेंड बदलतो आहे हे नक्की.

***शब्दांकन : गणेश आचवल***
atharvabharadhwaj@gmail.com



## 'ग्रंथाली'ची नवी प्रकाशने




### डॉक्टरांच्या जगात
**डॉ. वर्षा दंडवते**

काम करणाऱ्या स्त्रियांना आणि स्त्री डॉक्टरांना अनेक पातळ्यांवर लढा देत जगावे लागते. घरचे काम दोघांनी करायचे की एकटीने? स्त्रियांनी आर्थिक भार पेलायचा की नाही? आपण स्त्रीदुय्यमतेकडून स्त्री-पुरुष समानता आणि कधी कधी बेदरकारपणाच्या पुढच्या टप्प्यावर तर जात नाही ना? यासारखे प्रश्न मांडून सद्य परिस्थितीत स्त्रियांना स्व-परिक्षणाची गरज आहे आणि आत्मभान सावरणे गरजेचे आहे असा निष्कर्ष लेखिका काढते. अतिशय प्रांजळपणे पण तितक्याच तटस्थपणे लिहिलेले हे अनुभव आपल्याला वाचायला मिळतात.

- डॉ. माया तुळपुळे

**मूल्य १८० रुपये**
**सवलतीत ११० रुपये**




### आंदकोळ
**किसन चव्हाण**

किसन चव्हाण याचं हे आत्मकथन संक्रमित व कालक्रमिक असून भारदस्त व प्रसंगनिष्ठ आहे त्यासाठी वापरलेली सत्यनिष्ठ, वाचकप्रिय आणि परिवर्तनवादी भाषा समिक्षकांनाही अंतर्मुख करणारी ठरेल. तथागत गौतमबुद्ध, संत कबीर, महात्मा फुले, छत्रपती शाहु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदि महापुरूषांना अभिप्रेत असणाऱ्या पुरोगामी विचारालाही हे आत्मकथन निश्चितच प्रेरक ठरेल यात शंका नाही.

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**




### मादाम क्युरी – अनुवाद : अश्विनी भिडे-देशपांडे

कितीही मोठं आकर्षण समोर उभं राहिलं तरी क्युरी दांपत्यानं आपल्या मूल्यांवरची निष्ठा ढळू दिली नाही. श्रीमंती आणि काबाडकष्ट हे टोकाचे पर्याय नजरेसमोर स्पष्ट असूनही, आपल्या शास्त्रीय शोधाचं 'पेटंट' या दोघांनी घेतलं नाही. पतीसह नोबेल पारितोषिकाची मानकरी झाल्यावर जीवनाच्या समर्थ जोडीदाराला काळानं निर्घृणपणे ओढून नेलं. त्यानंतर ही एकाकी विधवा स्त्री आपल्या कुटुंबाला कसं सावरते, पतीबरोबरचं काम त्याच्या माघारी कसं पुढे नेते, त्यासाठी तिला कोणकोणती अग्निदिव्यं करावी लागतात त्याचा हा आलेख. 'मान्या'पासून सुप्रसिद्ध मादाम क्युरीपर्यंतच्या खडतर जीवनप्रवासाचा तिच्या मुलीनं रेखाटलेला हा परामर्श वाचणं एखाद्या परीकथेइतकं रंजक आहे, कवितेइतकं तरल आहे.

**मूल्य ४०० रु. सवलतीत २०० रु.**

### ओढ ईशान्येची
**ज्योती शेट्ये**

ज्योती शेट्ये या काही प्रशिक्षित शिक्षिका नव्हेत, परंतु त्यांना आपद्धर्म म्हणून तेथे नागा मुलामुलींना विज्ञानविषय शिकवावा लागला. त्यासाठी त्यांनी स्वत:ची तयारी केली व ते काम निभावून नेले. त्या ओघात तेथील जीवनाशी जशा एकरूप झाल्या तशा 'वनवासी कल्याणाश्रमा'च्या कार्याशीदेखील जोडल्या गेल्या. या पुस्तकामधून नागभूमीमधील एका खेड्यातील शाळेचे दैनंदिन जीवन उलगडत जाते. तशाच पद्धतीने तो प्रदेश समजत जातो. त्यांनी त्यांच्या डायरीस जोड म्हणून सार्वजनिक क्षेत्रातील पूरक माहिती दिली आहे, तीदेखील आपली त्या प्रदेशाची समजूत संपन्न करते.




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

### इये मराठीचिये नगरी संपादन : अशोक बेंडखळे
**डॉ. उज्ज्वला मेहेंदळे**




आता नऊ व्याख्यानांचा ग्रंथ 'इये मराठीचिये नगरी' या नावाने संघाच्या अष्टदशकपूर्तीच्या निमित्ताने प्रकाशित होत आहे. व्याख्यांनाचा विषय मराठी भाषा आणि तिची वैशिष्ट्ये असा आहे. या सर्व वैशिष्ट्यांचा आणि आयामांचा विचारपूर्वक धांडोळा व्याख्याते डॉ. सुधाकर देशपांडे, डॉ. अरुण टिकेकर, डॉ. यु.म. पठाण, डॉ. कुमुद गोसावी, प्रा. म.रा. जोशी, विद्यावाचस्पति शंकर अभ्यंकर, ज्योतिर्भास्कर जयंतराव साळगांवकर, डॉ. निशिकांत मिरजकर, डॉ. द.ता. भोसले यांनी आपापल्या व्याख्यानांतून घेऊन मराठी भाषेच्या अभ्यासकांना मोठे पाथेय पुरवले आहे.

**मूल्य १६० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

शर्वरी जाधव

## वाचनीय असं 'सहज स्वरांतून मनातलं'

सर्वसाधारणपणे संगीत क्षेत्रातले अतिरथी-महारथी, मग ते गायक असोत की वादक... लिहीण्याच्या फंदात पडत नाहीत. त्यामुळे आपण वाचक-संगीत रसिक एका मोठ्या ठेव्याला मुकतो. पण ही उणीव काही प्रमाणात, उत्कृष्टपणे भरून काढलीय ती ज्येष्ठ संतूरवादक पं. उल्हास बापट यांनी. त्यांच्या 'सहज स्वरांतून मनातलं' या आत्मचरित्रपर लेखांच्या पुस्तकाच्या माध्यमातून!

संतूरवादनाच्या क्षेत्रात दोनच तारे अढळपणे चमकत आहेत. एक म्हणजे पं. शिवकुमार शर्मा व दुसरे म्हणजे पं. उल्हास बापट. पं. उल्हास बापट यांचं संतूरच्या क्षेत्रातलं योगदान खूप मोठं आहे. कारण त्यांनी कोणत्याही शिकवण्या उपलब्ध नसताना, केवळ स्वयंअध्ययनाचा आधार घेऊन संतूर वादनातील क्रोमॅटिक ही नवीन वादन पद्धती शोधून काढली.



क्रोमॅटिक संतूर वादनाच्या क्षेत्रातील एकच नाव आजही आहे आणि ते म्हणजे पं. उल्हास बापट. या पद्धतीमुळे संतूर गायला शिकलं. भावगीतांपासून चित्रपट संगीतापर्यंतची गाणीही संतूरवर वाजवणं शक्य झालं.

शततंत्री वीणा ही संतूरची जननी मानली जाते. पण पं. बापट यांनी क्रोमॅटिक पद्धत शोधून काढेपर्यंत संतूरवर मींड वाजवणं शक्य होत नव्हतं. ती कलात्मक कमतरता पं. बापट यांनी ही पद्धत शोधून काढल्याने दूर झाली.

पण हा प्रवास अर्थातच सोपा नव्हता. या प्रवासात त्यांना अनेक बरे-वाईट अनुभव आले. त्यांच्या आयुष्याला आकार देणारी, दिशा देणारी अनेक माणसं भेटली. यशापयशाचे अनेक चढउतार सर करावे लागले. या साऱ्या प्रवासाचा त्यांनी मांडलेला सहज सुंदर, प्रांजळ आलेख म्हणजे 'सहज स्वरांतून मनातलं' हे पुस्तक. यात त्यांचं अनुभव कथन आहे, बहुपदरी विचारमंथन आहे आणि त्याचबरोबर ज्या मिश्कीलपणासाठी ते सुविख्यात आहेत त्या मिश्कीलपणाची झलक दाखवणारे किस्सेही आहेत. या पुस्तकातली त्यांनी शब्दबद्ध केलेली असंख्य दिग्गजांची व्यक्तिचित्रणं ही आवर्जून वाचावी इतकी सुंदर आहेत. त्यात संगीत दिग्दर्शक ओ. पी. नय्यर आणि आर. डी. बर्मन आहेत, पं. बापट ज्यांना गुरुस्थानी मानतात असे गुरुवर्य पं. के. जी. गिंडे, वामनराव सडोलीकर, पं. झरीना शर्मा आहेत, तबलानवाज निजामुद्दीन खाँ साहेब, तालवाद्य वादक कावस लॉर्ड, मारुती कीर, गायिका शोभा गुर्टू, सेक्सोफोनचे बादशहा मनोहारी सिंग असे असंख्य जण आहेत. जागेअभावी सगळ्यांचीच नावं वा पुस्तकातील सगळेच तपशील देता येणं शक्य नाही. त्यासाठी हे पुस्तकच आवर्जून वाचायला हवं..

**सहज स्वरांतून मनातलं**
**लेखक - पं. उल्हास बापट**
**मैत्रेय प्रकाशन,**
**पृष्ठे- १८०, मूल्य - २०० रु.**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत १६० रु.**

## संग्राह्य व देखणे 'बखर गीतकारांची'

हिंदी चित्रपट संगीत हा तुमच्या आमच्या सगळ्यांच्याच जिव्हाळ्याचा विषय. त्यातली अनेक सुमधुर गीतं आपल्या सर्वांच्याच ओठावर असतात. लता- आशा- किशोर- रफी हेही आपल्या सगळ्यांच्याच गळ्यातले ताईत असतात. पण त्यातल्या अनेक गीतांचे गीतकार मात्र आपल्याला माहीत नसतात. उदाहरणच द्यायचं झालं तर 'आएगा आनेवाला' हे गाणं आपल्या सगळ्यांच्या ओठावर आहे. ते कोणत्या सिनेमातलं, कोणावर चित्रित झालेलं, कोणी गायिलेलं आहे हेही आपण पटकन् सांगू शकतो. पण त्याचे गीतकार कोण हे आपल्याला सांगता येत नाही. ही अडचण बऱ्याच अंशी दूर केलीय ती नामवंत लेखक विजय पाडळकर यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक, संशोधनांती लिहीलेल्या आणि मैत्रेय प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'बखर गीतकारांची' या पुस्तकाने. या पुस्तकात त्यांनी, हिंदी चित्रपटसंगीतात ज्यांनी मोलाचं योगदान दिलंय अशा तब्बल ८९ गीतकारांच्या कार्यकर्तृत्त्वाचा सखोल आढावा घेतलाय.



स्वतः पाडळकर हे लता मंगेशकर यांचे फॅन आहेत. त्यांच्या मनाच्या सर्वात जवळ असलेल्या कलावंत म्हणजे लता मंगेशकर. त्यामुळे स्वेच्छानिवृत्तीनंतरचा त्यांचा संकल्प लतादीदींची मिळतील तेवढी गाणी जमवणं हाच होता. ते करताना त्यांची अनेक अनोखी, कधीही न ऐकलेली गाणी पाडळकरांना ऐकायला मिळाली. पण त्याचबरोबर त्यांना हेही जाणवलं की त्यांना त्यातल्या अनेक गाण्यांचे गीतकार माहीत नाहीत. अनेक गाण्यांच्या गीतकारांची तर कोणतीही माहिती, कुठेही उपलब्ध नव्हती. त्यामुळे मग पाडळकरांनी ती माहिती शोधायची, संकलित करायची असं ठरवलं आणि त्यातून साकारलं 'बखर गीतकारांची' हे अप्रतिम, संग्राह्य पुस्तक.

हा शोध घेता-घेता त्यांच्या असं लक्षात आलं की लतादीदींनी एकूण २२५ गीतकारांची गाणी गायली आहेत. पण शेवटी जागेच्या मर्यादा लक्षात घेता कुठे तरी चाळणी लवणं आवश्यक होतं. त्यामुळे त्यांनी प्रमुख ८९ गीतकार निवडले. लतादीदींनी ज्या कालानुक्रमाने त्यांची गाणी गायलीत त्याच क्रमाने त्यांना पुस्तकात स्थान दिलं आणि त्यातून एक संग्राह्य ठेवा आपल्यासारख्या रसिकांच्या हाती दिला.

हे पुस्तक वाचताना सिनेसंगीताचा जणु एक कारवाँच आपल्या पुढून जातो आहे असा भास होतो. पाडळकरांची वेधक लेखनशैली, देखणी सजावट यामुळे पुस्तक हातात घेतल्यावर खाली ठेवावंसंच वाटत नाही.

**बखर गीतकारांची**
**लेखक - विजय पाडळकर**
**मैत्रेय प्रकाशन,**
**पृष्ठे- ३२८, मूल्य - ४०० रु.**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत ३२० रु.**

# ग्रंथपान




संस्कृत कविवर्य शूद्रक ह्यांनी विरचिलेलं 'मृच्छकटिकम्' हे प्राचीन संस्कृत नाटक; त्यातल्या सार्वकालिक, सार्वस्थलिक आशयामुळं आणि आशयानुकूल नाट्यात्मकतेमुळं जगभरातल्या नाट्यप्रेमींना आणि नाट्यकलाकारांना सदैव भुरळ पाडत आलं आहे. विविध भारतीय भाषांत आणि परदेशांतही ह्या नाटकाची भाषांतरं आणि प्रयोगही होत आले आहेत.

मराठीतही परशुरामतात्या गोडबोल्यांनी ह्या नाटकाचं मुळाबरहुकूम आणि सरस भाषांतर बऱ्याच वर्षांपूर्वी केलं, पण अर्थातच ते त्या काळातल्या जुन्या ग्रांथिक भाषेत आणि मूळ नाटकाइतकंच विस्तृत असल्यामुळं आजच्या धावपळीच्या काळातल्या प्रेक्षकांसाठी ते सहजपणे आकलनीय नाही, म्हणून आविष्करणीयही नाही.

ज्येष्ठ आणि श्रेष्ठ मराठी नाटककार गो.ब.देवल ह्यांनीही तुलनेनं अलीकडच्या काळात (१९व्या शतकात) ह्या नाटकाची संगीत रंगावृत्ती तयार करून त्याचे प्रयोगही केले होते, पण त्यांनी ह्या नाटकातल्या प्रीतिकथाशयाला प्राधान्य देऊन त्यातल्या राजकीय क्रांतिकार्याला अल्प (केवळ त्रोटक उल्लेखांपुरतं) महत्त्व दिलं होतं. ही गोष्ट त्या काळातल्या संगीत नाटकांच्या पठडीला आणि प्रेक्षकांच्या प्राधान्यक्रमाला अनुसरूनच होती.

सर्व प्रकारची अभिजात आणि आधुनिक नाटकं करू पाहणाऱ्या 'आंतरनाट्य' ह्या प्रयोगशील संस्थेसाठी नाट्याभ्यासक व ज्येष्ठ नाटककार राजीव नाईक ह्यांनी 'मृच्छकटिकम्' ह्या नाटकाची कालसुसंगतपणे संक्षिप्त आणि प्रयोगक्षम अशी मराठी रंगावृत्ती तयार केली. ह्या आवृत्तीचं वैशिष्ट्य असं की ती मूळ नाटकाशी पूर्णपणे प्रामाणिक असून तिच्यातल्या आशयाचे सर्व पेड (प्रीती, क्रांती आणि सामाजिक स्थिती) आणि रूपाचे

विशेषही (महत्त्वाच्या घटना वा प्रसंग न वगळता नेपथ्य, अंकांची रचना ह्यांचा साधलेला तोल) अधोरेखित झाले होते. शिवाय त्यात आशयानुकूल आणि रूपानुकूल अशी स्वत:ची भर घालत नाटकाचा तोल आणि गती नाईकांनी बिघडू दिली नाही. उलट; त्यातलं नाट्य ह्या भरीमुळं अधिकच खुलून आलं आहे.

हे भाषांतर मूळ नाटकाच्या काळाला साजेश्या आणि आजच्या प्रेक्षकाच्या आकलनालाही सहजसोप्या अश्या भाषेत मोठ्या खुबीनं साकारलं आहे. त्यामुळं ते वाचकाला खिळवून ठेवतं आणि रंजनाबरोबरच विचारप्रवृत्तही करतं.

त्याचबरोबर त्यांनी ह्या नाटकाच्या परिशिष्टांमध्ये निर्माणप्रक्रियेबद्दल जी अभ्यासपूर्ण, मुद्देसूद भाष्यं केली आहेत, ती नाटकाइतकीच, किंबहुना अधिकच महत्त्वाची आहेत. मूळ संस्कृत नाटकाचं थोडक्यात कथानक, पात्रपरिचय, नाट्यांकांची रचना व शीर्षकं, पट–आवाका–अवधींचे उल्लेख, व्यक्ती–संस्था–बदलाची प्रक्रिया, प्रीती–क्रांतीचा पुरोगामी आशय, अशा अनेक मुद्द्यांबरोबरच, ह्या मराठी भाषांतराच्या झालेल्या प्रयोगाच्या तालमींची प्रक्रिया, त्यातले गीतसंगीताचे, नेपथ्याचे नवनवे कल्पक प्रयोग, ह्यांचेही इतके तपशील दिले आहेत, ते पुढच्या प्रयोगकर्त्यांना मार्गदर्शक ठरावेत. राजीव नाईकांच्या नाट्याभ्यासाच्या सखोलतेचा त्यातून प्रत्यय येत राहतो.

म्हणूनच हे पुस्तक नाट्यकर्मी, नाट्यधर्मी, समीक्षक आणि कलकारांसोबतच सामान्य नाट्यप्रेमींनाही नाटकाकडं पाहण्याचा एक समग्र, अर्थपूर्ण दृष्टिकोन देणारं ठरावं.

मुखपृष्ठावरची पारंपारिक भारतीय शैलीतली अभिसारिका (तिच्या समस्या अधोरेखित करणाऱ्या, भोवतीच्या सर्परूपातल्या विषयवासनांच्या चित्रणासह) ही आशयोचित आणि लोभस आहे.

मूल्य १२५ रु. ग्रंथाली येथे सवलतीत १०० रु.

लोकवाङ्मय प्रकाशन

# ग्रंथपान

## हिंदू–मुस्लिम जातीयवादांचा समग्र वेध

विविध विषयांवर चिकित्सापूर्ण लेखन करून महाराष्ट्राचे प्रबोधन करणाऱ्या ज्येष्ठ विचारवंत वसंत पळशीकर यांचा 'जिहाद, गुलाल आणि सारीपाट' हा हिंदू–मुस्लीम जातीयवादावरील लेखांचा संग्रह हल्लीच प्रकाशित झाला आहे. किशोर बेडकिहाळ यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. धार्मिक कट्टरता हा आपल्या देशाच्या प्रगतीतील सर्वात मोठा अडथळा ठरत आलेला आहे. वर्तमानकाळातही हा प्रश्न अधूनमधून डोके वर काढतच असतो. या प्रश्नाचा वेगवेगळ्या अंगाने वेध घेणारे लेख या ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहेत.




हमीद दलवाई, नरहर कुरुंदकर, अ. भि. शहा यांच्या हिंदू–मुस्लीम जातीयवादाविषयीच्या मांडणीची सखोल चिकित्सा वसंत पळशीकरांनी अतिशय मुद्देसूद आणि संयतपणे केलेली आहे. 'मुस्लीम जातीयवादा–विरुद्धचा लढा सुरू करून मुस्लीम समाजातील परिवर्तनाची प्रक्रिया सुरू करणे हाच हिंदू जातीयवादावर प्रहार करण्याचा प्रभावी मार्ग आहे', असा विचार हमीद दलवाईंनी मांडला होता. याचा वापर हिंदुत्ववाद्यांनी आपला अजेंडा पुढे सरकवण्यासाठी कसा केला आणि उदारमतवादी हिंदूमध्येही यामुळे अपराधी भावना कशी निर्माण झाली याची चर्चा पळशीकरांनी लेखात केली आहे. दलवाईंच्या समग्र विचारांची चिकित्सा केल्यानंतर पळशीकरांनी 'त्यांच्या (दलवाईंच्या) विश्लेषणात जोश, खोचकता, टोकदारपणा, आक्रमकता जरी भरपूर असली तरी खोली व परिपक्वता नव्हती,' असा निष्कर्ष काढलेला आहे. प्रा. कुरुंदकरांच्या मुस्लीम जातीयवादविषयक विचारांची मीमांसा केल्यानंतर पळशीकर म्हणतात, '...मुस्लीम जातीयवाद हा कसा 'स्वयंभू व स्वतंत्र' आहे हे दाखवून देण्याच्या प्रयत्नात, भारतीय समाजाच्या संदर्भात या देशातील सर्वच जातीयवादांच्या परस्पर संबंधांवर प्रकाश टाकण्याऐवजी, कुरुंदकर मुस्लीम जातीयवादाची अशी उकल करतात की, ज्यामुळे मुस्लीम समाज हा मुसलमान असल्यामुळेच सदैव जातीवादीच असतो हे हिंदूंच्या मनावर ठसविण्याचे हिंदू जातीयवाद्यांचे काम सोपे होते!' अशाच तऱ्हेने त्यांनी अ. भि. शहा यांच्या विचारांचीही चिकित्सा केली आहे. यावरून लक्षात येईल की पळशीकर त्या त्या विचारवंताचा निव्वळ उदोउदो करत नाहीत तर त्यांच्या विचारांतील आजच्या काळात गैरलागू, अप्रस्तुत ठरणाऱ्या मुद्द्यांची परखड मीमांसाही करतात. अशाच तऱ्हेने त्यांनी उजव्या विचारसरणीचा पुरस्कार करणाऱ्या प्रा. स. ह. देशपांडे यांच्या विचारांतील प्रतिगामी तसेच कुठेकुठे दिसणाऱ्या पुरोगामित्वाच्या लक्षणांचीही चिकित्सा केली आहे. पळशीकरांनी स. हं.साठी वापरलेले 'परंपरानिष्ठ लिबरल' हे नामाभिधान अधिक नेमके आहे, हे संपूर्ण लेख वाचल्यानंतर मान्य होण्यासारखे आहे.

उजव्या विचारसरणीचा धोका कोणता आहे, इतिहास–परंपरा यांमधील काही गोष्टींचे 'स्व'मत प्रचारार्थ कसे विकृतीकरण केले जाते याचे विवेचन पळशीकरांनी केले आहेच. पण या सगळ्या भयावह परिस्थितीचा सामना जर पुरोगाम्यांना करावयाचा असेल तर त्यांनी कोणती भूमिका घ्यायला हवी याचीही तपशीलवार मांडणी त्यांनी केली आहे. बहुसंख्याक हिंदू समूहाचे मन दुखावणारे, दुरावा उत्पन्न करणारे लेखन विद्रोही, बंडखोर म्हणून नावाजले जाते, ही असमंजस व आत्मघातकी गोष्ट आहे असे प्रतिपादन पळशीकर करतात. असे वागण्याऐवजी नव्या विचारांनुसार, नव्या गोष्टी स्वीकारायला हव्यात, स्वत:त बदल घडवायला हवेत हे उमजलेल्या समूहाचा विश्वास संपादन करण्यावर भर द्यायला हवा, हा त्यांचा विचार निश्चितच मननीय आहे.

'गोध्रा' या मिलिंद ओक यांच्या गोध्रा दंगलीनंतर लिहिलेल्या व संघाची पाठराखण करणाऱ्या पुस्तिकेवर एक लेख आहे. या लेखात पळशीकरांनी ओक यांनी मांडलेल्या विचारांतील निरर्थकता, असत्यता आणि अप्रामाणिकपणा उघड केलेला आहे.

बाबरी मशीद पाडली गेल्यानंतर मुंबईत उसळलेल्या दंगलींची यथायोग्य चौकशी करण्यासाठी न्या. श्रीकृष्ण आयोग नेमण्यात आला होता. या आयोगाने जो अहवाल सादर केला त्यात शिवसेनेचे बाळासाहेब ठाकरे आणि अन्य शिवसैनिकांवरही ठपका ठेवण्यात आला होता. अहवालातल्या या व अशा इतर अनेक बाबींची चिकित्सा पळशीकरांनी 'मुंबई दंगली आणि न्या. श्रीकृष्ण आयोगाचा अहवाल : शोध आणि बोध' या लेखात केली आहे. तसेच भविष्यात अशा दंगली घडू नयेत म्हणून तीन तोडगे सांगितले आहेत.

'मुस्लीम मानसकिता' या विभागातील दोन लेख म्हणजे ग्रंथपरीक्षणं आहेत, तर 'जिहाद–गुलालाचा सारीपाट' हा स्वतंत्र लेख आहे. या तिन्ही लेखांतून पळशीकरांनी एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्थ आणि विसाव्या शतकाच प्रथमार्ध या काळात घडलेल्या घटनांचा आधार घेत मुस्लीम मानसिकतेबाबत चर्चा केलेली आहे.

या ग्रंथाला लाभलेली किशोर बेडकिहाळ यांची प्रदीर्घ आणि अभ्यासपूर्ण प्रस्तावना विषयप्रवेश म्हणून अगदी यथोचित आहे. हा ग्रंथ सर्वसामान्यांनी तर वाचायला हवाच पण आजच्या राज्यकर्त्यांनीही त्याचे वाचन करून या प्रश्नावर काहीएक दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

केवळ मुसलमान आहे म्हणून शिक्षित तरुणाला नोकरी नाकारली जाण्याच्या आजच्या काळात असा ग्रंथ प्रकाशित होणे ही स्वागतार्ह बाब आहे. सुजाण वाचकांनी त्याला भरभरून प्रतिसाद द्यायला हवा.

**– विकास पालवे**

**पाने : ३३२, मूल्य : ३५० रु. 'ग्रंथाली' येथे सवलतीत २८० रु.**

रोहन प्रकाशन

# ग्रंथपान

**सर्वार्थाने समृद्ध करणारं संवेदनशील रत्नांचं झाड'**

पद्मजाने 'फिक्शन' लिहिलं नाही. तिने जे घडलं, ते आणि त्यावरची स्वत:ची मतं लिहिली. हे घडणं' बाहेरच्या भौतिक जगात असेल किंवा तिच्या मनात; पण कल्पित नक्की नव्हे. 'रत्नांचं झाड' हा तिचा शेवटचा संग्रह याला अपवाद नाही. तिच्या लिखाणाची सर्व वैशिष्ट्यं यात सापडतात. कागदावरचं चित्र आणि अवकाश व्यापणारं शिल्प, यांत जसा फरक आहे, जणू तसाच फरक पद्मजा अनुभव घेते तेव्हा होतो. या पुस्तकातल्या लेखांची चौकट घर, कुटुंब, नातेवाईक यांच्यापासून लांब जात नाही आणि युद्ध, सुनामी यांसारख्या अक्राळविक्राळ नैसर्गिक आपत्तीसुद्धा यांत येत नाहीत. पण अनुभव घेणारी पद्मजा असल्यामुळे प्रत्येक वर्णन लक्षवेधक, मूलगामी होऊन जातं. एक प्रकारे असंही म्हणता येईल की, पद्मजाच्या लिखाणात आशयापेक्षा तिच्या शैलीला जास्त महत्त्व आहे.

मनावर चटकन ठसा उमटवणारा ताजेपणा, हे पद्मजाच्या शैलीचं एक वैशिष्ट्य. तिची वर्णनं शिळी वाटत नाहीत. तिचं वाचताना कंटाळा अजिबात शिवत नाही. हे साधण्यासाठी ती शब्दांचे खेळ करते. म्हणजे काय करते, तर 'नमनाला घडाभर तेल' या वाक्प्रचाराला नमनाला कळशीभर पार्श्वभूमी' असं रूप देते. परिणामी वाक्प्रचाराला अतिपरिचियातून आलेला गुळगुळीतपणा नाहीसा होऊन आशय बरोब्बर आपल्यापर्यंत पोहोचतो. पुढच्याच पानावर 'सज्ञातून घरापुढच्या हिरवळीवर बैठा विहार' करण्यासाठी ती 'बाकीच्या रुखवतासह' खाली उतरते.

रत्नांचं झाड

पद्मजा फाटक (मजेत)




पद्मजा तिचे 'मेट्रो' संस्कार लपवत नाही. 'नोबडी फॉल्स इन्टू धिस फन्दा' असा अनुप्रास साधायला किंवा 'याखेरीज समाजातला एक गट मला स्लीव्हलेस स्तरात दिसला,' (पान ९८) असा 'ट्रान्सफर्ड एपिथेट' साकारायला ती संकोचत नाही. पद्मजाची शैली निरखण्यासाठी या संग्रहातला 'अथातो संस्कारजिज्ञासा' हा लेख उपयुक्त ठरतो. खास पद्मजा स्टाइलचे 'आइस्क्रीमेच्छू', 'रोडसाइड मार्गदर्शन' असले प्रकार त्यात आहेतच; शिवाय लेखन करणं हा साक्षर बायकांचा आपला रिकामटेकडेपणा जाहीर करण्याचा सोपा उपाय किंवा रिकामटेकडेपणा हा बायकांचा आपण साक्षर आहोत हे सिद्ध करण्याचा जाहीर उपाय किंवा सोप्या बायकांना आपण जाहीर आहोत हे दाखवून देण्याचा रिकामटेकडा उपाय' असला हायपरस्टायलिस्ट प्रकारही आहे.

भाषावैचित्र्यापलिकडे पद्मजाच्या शैलीला वैभव प्राप्त करून देणारा विशेष म्हणजे तिची संदर्भसमृद्धी. 'लक्ष्मीपूजन' या लेखात (मातोश्री'ला जोडून सासूश्री' यासारख्या भाषालंकारांबरोबर) मराठी अलंकारांची रेलचेल आहे. नथ, लफ्फा, सर, वाघनखं, तन्मणी, तोरड्या, कुड्या, पाटल्या, पिंजरा, साज, भिशी, मोहनमाळ यांची साग्रसंगीत वर्णनं आहेत. रत्नांचं झाड'मध्ये सेमीप्रेशस स्टोनचे प्रकार आहेत. कधी ती 'इदं न मम' किंवा 'सर्वे ऽ पि सुखिना सन्तु' म्हणून जाते आणि मध्येच कुशिष्या जायेत..' येतं आणि ही संस्कृत उध्दृतं पोपटपंचीचा भाग नाहीत, ही खात्री पटते. तो 'दयाघन, कामनापूर्ती, नियती, निसर्ग' म्हणून पुढे 'ऑम्नी'ची पुस्ती येते, तेव्हा ईश्वराचे किती पैलू मांडले जातात. तिच्या पद्धतीनुसार ती जे मनापासून पाहते, वाचते, ऐकते; ते तिचं होतं. नेमकेपणाने तिच्या पुढ्यात अवतरतं. पण 'खापरचाहती' असा शब्द घडवणारी आणि निसर्ग परिसराला 'समस्त मानवजातीचं माहेरपण' म्हणणारी पद्मजा कधीही दुसऱ्या कुणाचं स्वत:च्या नावावर खपवत नाही; ज्याचं श्रेय त्याला न चुकता देते.

या संदर्भसमृद्धीमुळे तिचं लिखाण 'सुंदर' होतं, असं म्हणणं अपुरं ठरेल. एकदा तिचं मनोविश्व, अनुभवविश्व किती विशाल आहे, हे लक्षात आलं आणि तिच्या जगण्याच्या प्रत्येक क्षणावर मृत्यूची गडद छाया आहे, याची जाणीव झाली, की तिच्या प्रत्येक विधानाला, निरीक्षणाला, मताला सखोल अर्थ प्राप्त होतो. तिच्या ठायी उत्तम विनोदबुद्धी आहे पण, त्यामुळे ती काही तरी गंमती सांगते आहे, असं वाटणार नाही; कारण ती नुसती शैलीबाज नाही. या पुस्तकात अमेरिकेतलं समाजजीवन, दागिन्यांकडे बघण्याचा बदलता दृष्टिकोन आणि त्यांमागची समाजशास्त्रीय कारणं, शिक्षणपद्धती, संगोपन-संस्कार, स्त्रियांकडे बघण्याचे विविध दृष्टिकोन, संवेदनशीलता, भाषाप्रेम आणि अभिनव शब्दनिर्मिती, असाध्य रोगाने लवकर गेलेले डॉ. अरुण लिमये यांचं शब्दचित्र असा अत्यंत वैविध्यपूर्ण मसाला आहे. आणि सतत मृत्यूला समोर ठेवून जगलेल्या या बाईने शेवटच्या 'आत्मलोप' या लेखात तिचं अध्यात्म सांगितलेलं आहे, जे मुळातून वाचायला हवं, असं आहे.

अतिशय तरल संवेदनशीलतेमधून जगण्यातल्या एकेका अनुभूतीचा उत्कटपणे घेतलेला अनुभव अंगभूत प्रेमभावनेतून समस्त वाचकवर्गाशी शेअर करण्याची ऊर्मी म्हणजे पद्मजा फाटक. तिने फिक्शन लिहिलं नाही आणि बहुतांश एका सुशिक्षित, सुस्थित समाजालाच संबोधलं, हे जेवढं खरं; तेवढंच हेसुद्धा खरं की, उद्या मराठीत पद्मजा फाटक हे नाव मुक्त लिखाणातला एक मानदंड म्हणून घेतलं जाईल.

एवढं सांगितल्यावर पुस्तकातला एक ढोबळ दोष सांगण्याचं कर्तव्यसुद्धा करायला हवं. आया पुस्तकात आर्ट्स'च्या ठिकाणी आर्टस्', फेम्स'च्या ऐवजी फेमस्', एलिमेंट्स्'च्या जागी एलिमेंटस्' असं लिहिलं आहे. हे इतकं निरपवाद आहे की, याला नजरचूक म्हणता येणार नाही, हा धोरणात्मक निर्णय आहे. मग आता वरदहस्त' हा शब्द वरदहसत्' असा लिहायला सुरुवात करावी.

**– हेमंत कर्णिक**

hemant.karnik@gmail.com

**पाने : २०८, मूल्य : २०० रु. 'ग्रंथाली' येथे सवलतीत १६० रु.**

पद्मगंधा प्रकाशन

# ग्रंथपान

भारत हा बहुभाषिक देश आहे, असे आपण म्हणतो. भारताच्या भाषिक आणि सांस्कृतिक वैविध्यतेबद्दल आपण बोलत असतो. पण भारतात किती भाषा अस्तित्वात आहेत, याची आकडेवारी मात्र उपलब्ध नव्हती. त्यामुळे, भारतीय भाषांचे सर्वेक्षण व्हावे अशी अपेक्षा सतत व्यक्त केली जात असे. या चर्चेला पूर्णविराम देण्यासाठी डॉ. गणेश देवी यांनी लोकसहकार्यातून संपूर्ण भारतभर एक भाषिक चळवळच उभी केली.

विविध राज्यांतील भाषांतील बुद्धिवंत, विचारवंत, लेखक, सामाजिक कार्यकर्ते यांच्या सहभागातून हा भाषिक प्रकल्प उभा राहिला. डॉ. गणेश देवी यांचे हे योगदान अमूल्य आहे.

शंभर वर्षांपूर्वी जॉन ॲब्राहम ग्रिअर्सन या आयरिश अधिकाऱ्याने ब्रिटिश काळात भारतीय भाषांचे सर्वेक्षण केले होते. ब्रिटिश सरकारचे त्यावेळचे हेतू वेगळे असावेत. आज डॉ. देवी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेले स्वातंत्र्योत्तर काळातील हे पहिले भाषिक सर्वेक्षण आहे मुख्य म्हणजे ते लोकसहभागातून झाले आहे. भारतीय भाषांच्या अशा एकत्रित माहितीचे ५२ खंड प्रकाशित होत आहेत. त्यांपैकी एक खंड महाराष्ट्रातील भाषांचा आहे. त्याचे संपादन श्री. अरुण जाखडे यांनी केले आहे. 'पद्मगंधा प्रकाशन'ने हा ग्रथ प्रकाशित केला आहे.

आजकाल महाराष्ट्रात मोठी कामे होत नाहीत म्हणणाऱ्यांना हा खंड एक चोख उत्तर आहे. मराठी ही महाराष्ट्राची अधिकृत राज्यभाषा आहे आणि येथे मराठी बोलणारे अधिक आहेत; परंतु याशिवाय आणखी साठ भाषा महाराष्ट्रात बोलल्या जातात, याची माहिती ह्या प्रकल्पामुळे एकत्रितपणे पुढे आली.

जवळजवळ ८०० पानांच्या डबल क्राऊन साइजमधील या खंडातून विविध भाषांचा परिचय अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने करून दिला आहे. अभ्यासकांच्या सोयीसाठी खंडात चार विभाग केले आहेत. पहिल्या विभागात मराठी आणि मराठीच्या १४ बोली आहेत. दुसऱ्या भागात आदिवासींच्या २३ भाषा तर तिसऱ्या भागात भटक्या विमुक्त समाजात बोलल्या जाणाऱ्या १९ भाषा आहेत, याशिवाय राज्य घटनेच्या आठव्या परिशिष्टात समाविष्ट आहेत, परंतु कोणत्याही राज्याच्या राज्यभाषा नाहीत, अशा उर्दू आणि सिंधीचाही समावेश यात केला आहे.

प्रत्येक भाषेची माहिती विशिष्ट पद्धतीने दिली आहे. त्या भाषेचे भौगोलिक क्षेत्र, भाषेचा इतिहास, लोककथा, लोकगीत, काही व्याकरण, म्हणी, वाक्प्रचार, रंगांची नावे, महिन्यांची नावे, शरीराच्या अवयवांची नावे, नातेसंबंध, ऋतू अशा विविध प्रकारे भाषेचा परिचय करून दिला आहे. डॉ. देवी आणि श्री. जाखडे यांनी प्रारंभीच स्पष्ट केले आहे की, हा भाषांचा अभ्यास किंवा भाषाशास्त्रीय (linguistic) खंड नाही, तर हे सर्वेक्षण आहे. आज अस्तित्वात असणाऱ्या भाषांची नोंद घेणाऱ्या या प्रकल्पाचे महत्त्व पुढे हजारो वर्षं राहणार आहे. कारण, यापूर्वी किती भाषा होत्या आणि त्यातल्या किती नष्ट झाल्या, याची नोंद आपल्याकडे नव्हती. आजच्या समकालीन स्थितीत अस्तित्वात असणाऱ्या वा बोलल्या जाणाऱ्या भाषांची नोंद या प्रकल्पामुळे झाली आहे. त्यामुळे, भविष्यात काही वर्षांनंतर पुन्हा भाषा सर्वेक्षण झाले तर सन २०१२ नंतर पुढील काळात काय झाले याचा आढावा घेता येईल.

**भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण**
संपादक : अरुण जाखडे
सर्वेक्षण मालिकेचे मुख्य संपादक
गणेश देवी




हा जसा भाषिक सर्वेक्षणाचा ग्रंथ आहे, तसाच तो मानव समूहाचा अभ्यास आहे. हे सर्वेक्षण आजचे आहे. मूळ परंपरा आणि तिच्यात वेळोवेळी होत असलेले बदल व त्यातून संक्रमित झालेली आजच्या पिढीची बोली किंवा रूपे दिली आहेत. त्या दृष्टीने हा मोलाचा सांस्कृतिक अभ्यास आहे.

महाराष्ट्र शासनाने श्री. जाखडे यांना उत्तम संपादित ग्रंथासाठीचा पुरस्कार याच ग्रंथासाठी दिला आहे. डॉ. देवी यांनाही त्यांच्या कामाची नोंद घेऊन भारत सरकारने 'पद्मश्री' देऊन गौरव केला. 'युनेस्कोने'ही या प्रकल्पाची नोंद घेतली आहे. या प्रकल्पाची नोंद भारताबाहेरीलही अनेक महत्त्वाच्या वृत्तपत्रांनी घेतली आहे. असा हा मौलिक ग्रंथ प्रत्येकाच्या संग्रही असावा असाच आहे. ज्यांना भाषिक आणि सांस्कृतिक अंगाने महाराष्ट्र जाणून घ्यायचा आहे किंवा मानववंशशास्त्र व समाजशास्त्राचा अभ्यास करायचा आहे, त्यांच्यासाठी तर हा ग्रंथ अतिशय उपयुक्त आहे.

**पाने : ८०० , मूल्य : १२०० रु.**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत ८०० रु.**

*With Best Compliments From*

# M/S VIJAYALAKSHMI ROLLING MILLS PVT LTD.

A/P Khupari, Tal. Wada, Dist. Palghar

Manufacturing of quality M.S. Sections
M.S. Flats M.S. Rounds
M.S. Squares M.s Angles

**We undertake orders as per specifications too**
Contact : Yogesh - 9225639930
Santosh - 9975804013
Bhagawan Singh - 8108156342

# M/S VIJAYA ENTERPRISES

**Resellers of Quality Petroleum Products**

Dronagiri - Uran - Dist. Raigad
Prop : Milind Chandurkar
9322956077

# ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

स्थलांतर ही काही पक्षी किंवा प्राण्याची मक्तेदारी राहिलेली नाही. माणूसही स्थलांतर करतो. या स्थलांतराच्या निमित्ताने भेटीला येतो तो नवा भूप्रदेश, नवी संस्कृती, नवे रीतीरिवाज, अपरिचित कायदेकानू. माणसे म्हणायला जरी इथून तिथून सारखी, तरी त्यांच्याही नाना तऱ्हा. त्यातर अपरिहार्यच असतात. शासन व्यवस्था ते समाजमन यांच्याशी जुळवून घेताना सुरुवातीचा काळ जणू कसोटी पाहत असतो. पण एकदा स्थिरावला की माणूस त्या व्यवस्थेचा भाग होऊन जातो.परंतु या विषयी कुणी फारसे बोलत नाही. जाहीर तर नाहीच. लिहिणे तर दूरच राहिले. परंतु काही संवेदनशील मनाची माणसे याला अपवाद असतात. दिसलेले जग आपल्यानजरेतून पाहताना अंतर जाणवतेच. हे अंतर किती आणि कसे आहे, याची नोंद ही माणसे करत जातात. हा छंद असू शकेल, हौस असू शकेल, कदाचित वेळ घालवण्याचे साधन म्हणूनही त्याकडे ती पाहत असतील. परंतु ही नोंद महत्त्वाची असते. माहिती, ज्ञान, उत्सुकता, मनोरंजन या दृष्टीने. याची प्रचिती देणारे पुस्तक आहे, 'सौदीच्या अंतरंगात'.

**सौदीच्या अंतरंगात**

पद्मा कऱ्हाडे




या पुस्तकाच्या लेखिका आहेत पद्मा कऱ्हाडे. पती नोकरीच्या निमित्ताने सौदी मध्ये गेले. लेखिका त्यांच्यासोबत तिकडे गेल्या. आणि जे जे नवीन जाणवले, दिसले, अनुभवास आले, त्यांच्या त्यांनी नोंदी करायला सुरुवात केली. अतिशय नेटकेपणाने आणि तितकेच तरलपणे. त्याविषयी लेखिका नमूद करतात,' ज्यावेळी तुम्ही आपला देश सोडून परदेशी जाता तेव्हा प्रांत, भाषा, धर्म, हे सर्व बंध गळून पडतात. उरतो तो केवळ 'माणुसकीचा बंध'. मन खूप विशाल होतं, अशावेळी. तुमची प्रत्येक गोष्टीकडे, प्रत्येक व्यक्तीकडे पाहण्याची दृष्टी बदलते. ती सकारात्मक होते, विशाल होते.'

जे नमूद करायचे आहे त्यांची वर्गवारी केलेली आहे. हे लेखन अनुभवाच्या आणि निरीक्षणाच्या अंगाने जाणारे असले तरी ते काही लेखिकेचे आत्मचरित्र नाही. त्यामुळे कुठलेही प्रकरण काढून वाचायची सोय आपोआपच झालेली आहे. 'सौदी अरेबिया जीवनाची झलक' या प्रकरणात त्या या देशाची संपूर्ण भौगोलिक माहिती देतात. त्यांचा मुक्काम हा जेड्डा आणि रियाध या शहरांत असल्याने तिथले रस्ते, बिल्डिंग, विमानतळ, दवाखाने, वाहतूक, शॉपिंग मॉल्स, रमादान, कार्यालये, करमणूक, राजघराणे इ. चा तपशील त्यामुळे वाचायला मिळतो. 'सौदीतील भारतीय जीवन आपलीच नवी ओळख' या प्रकरणात तिथे असलेल्या भारतीयांचे वर्गीकरण केले असून त्यांच्या प्रश्नांना मुक्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एकटे भारतीय पुरूष आणि त्यांच्या तडजोडी यांची माहिती यात दिलेली आहे. तसाच तेथील रीतीरिवाज आणि भारतीय रीतीरिवाज यांची तुलना केलेली आहे. 'नोकरी–व्यवसाय अमाप संधी,चोख बंधनं' या प्रकरणात पासपोर्टसारख्या 'इकामा' या महत्वाच्या दस्तऐवजाची माहिती आहे. सौदी आणि परकीय असा भेद आहे, तसे कामगारांचे शोषण आहेच. गंमतीचा भाग म्हणजे डॉक्टर लोक हाताखालचा स्टाफ म्हणून भारतीयांना प्राधान्य देतात. भारतीय लोक इमानदारीने भरपूर मेहनत करतात, वेळ वा बोनसची अपेक्षा न ठेवता. हे निरीक्षण मानसिकता शोधणारे आहे.

सौदीमध्ये सार्वजनिक वाचनालय नाही. सिनेमा थिएटर नाही. साहित्य कला विषयी प्रेम आहे. एका कवयित्रीच्या कवितेचे पुस्तक लोक हौसेने घेत असल्याचे लेखिकेला आढळले. त्याचवेळी एक अभागी कवयित्री कौटुंबिक कलहातच गुदमरून गेलेली सापडली. सार्वजनिकरीत्या 'शिर धडावेगळं' करण्यात येते असे चौक सौदीत आहेत. या चौकात हे पवित्र काम करणाऱ्या 'आधुनिक काळातील यमा'चे काम आणि त्याची मानसिकताही लेखिकेने टिपलेली आहे. हा यम सांगतो,' पुरुषांप्रमाणे कित्येक स्त्रियानाही मी यमसदनाला पाठवले आहे. स्त्री काय किंवा पुरुष काय, मला काही वाटत नाही त्याचं. फरक एवढाच आहे, की स्त्रियांना मरण तलवारीने की बंदुकीनं हवं हे विचारलं जातं. पण बहुतेक वेळा स्त्रिया तलवारीनंच मरण यावं सांगतात.'

लेखिकेने जास्तीत जास्त सौदीचे अंतरंग उलगडून दाखविण्याचा मनापासून प्रयत्न केलेला आहे. जवळपास सगळ्याच विषयांना हात घातलेला आहे. जसे आढळले तसेच वाचकांच्या समोर मांडले आहे. परदेशी म्हणून वावरताना आजूबाजूला दिसणारे जग आपल्या नजरेतून पाहत असताना तेच कागदावर मांडले तर सुंदर माहितीचे पुस्तक तयार होते. परमुलखात गेलेल्या प्रत्येकासाठी जणू हा वस्तुपाठ ठरावा. खजूराचे झाड, तलवारींची मांडणी आणि चंद्राची कोर यांच्या संकल्पनेतून साकारलेले मुखपृष्टही उठावदार झाले आहे.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**




# ग्रंथपान

पुस्तकाच्या शीर्षकावरूनच आतील मजकुराविषयी कुतूहल निर्माण करण्याची एक कल्पकता असते. म्हणजेच नावात काय असते, हे म्हणणे इथे व्यर्थ ठरते. 'मराठीतील साहित्यलेणी' या पुस्तकाचे शीर्षक त्यापैकी एक. सार्थ ठरणारे. सुदैवाने मराठी भाषेत होणारी बरीचशी निर्मिती ही साहित्यलेणी म्हणूनच पाहिले जाते. निदान निर्मिती करणाऱ्या लेखकाला तरी ती तशी वाटत असते.




प्रत्येक साहित्य कृतीला 'साहित्यलेणी'चा मान देण्याचा अधिकार केवळ त्या लेखनाच्या लेखकाच्या हाती नाही, तर त्या शिवाय आणखी दोन घटक आहेत. ते म्हणजे समीक्षक आणि वाचक. समीक्षकांची मते नेहमीच वादात सापडणारी असतात असे नव्हे, तरी त्यावरून वाद होऊ शकतो. एकाची मिठाई दुसऱ्याला मिठाई वाटेलच असे नाही, या म्हणीचा उपयोग इथे होऊ शकतो. परंतु वाचक नावाच्या घटकाबाबत दुमत होण्याचे कारण नाही. किंबहुना तोच विश्वसनीय मतदार म्हणायला हवा. त्याला जे भावतं, पटतं त्याचीच तो मागणी करतो, जाहीर कबुली देतो, दिलखुलासपणे. आवड असेल तर स्वतःचा संग्रह देखील करतो. अशा वाचकांच्या विश्वासावर विश्वास ठेवण्याची कल्पना तर भन्नाटच. 'पत्र नव्हे मित्र'अशी धारणा ठेवणाऱ्या म.टा.ने या कल्पनेचे सोने करण्याचा प्रयत्न केला. मराठीतील साहित्याची लेणी ठरू शकतील अशा साहित्यकृतींची नावे पाठविण्याचे आवाहन वाचकांना करून त्याच्या रसिकतेलाच हात घातला. बौद्धिक,भावनिक आणि रसिकमान्यतेचे मानदंड ठरलेल्या पुस्तकांची यादी त्यातून निर्माण झाली. अशी वाचकमान्य यादी वादातीत नसला तरी अकारण वाद घालावा अशी ही निवड निश्चितच नाही. कुणीही या अस्सल मोत्यांच्या शुद्धतेविषयी शंका घेऊ शकणार नाही.

सन १९८६ साली हा प्रयोग करण्यात आला. निवडण्यात आलेल्या पुस्तकांची केवळ यादी करून थांबता आले असते. वाचकांना वाचनाचा छंद जोपासताना, नेमके काय वाचायला हवे, याचे मार्गदर्शन झाले तर त्याचे वाचन समृद्ध होण्यास मदत होते. काहीना स्वतःचा संग्रह करण्याची आवड असते, त्यानाही अशा मार्गदर्शनाचा उपयोग होऊ शकतो. त्या दृष्टीने ही यादी संदर्भ म्हणून नक्कीच उपयुक्त ठरणारी आहे. आतापर्यत या संदर्भाची उणीव जाणवत होती ती या पुस्तकाने भरून निघाली आहे. परंतु केवळ पुस्तकाचे शीर्षक आणि लेखकाचे नाव पुरेसे नाही, तर त्या यादीसोबत त्या पुस्तकाचा परिचय थोडक्यात देण्यात आला तर वाचकांना जास्त उपयुक्त ठरू शकेल, हा दृष्टिकोन जास्त महत्वाचा ठरला. अर्थात काम अवघड होते, संशोधनाचे होते. परंतु दीपक घारे यांनी ही जबाबदारी अतिशय समर्थपणे पेलली आहे. त्यामुळे यादी ही केवळ शीर्षकापुरती मर्यादित राहिली नाही. तिला संदर्भ मुल्य प्राप्त झाले. इतिहास, नाटक, कविता, कादबंरी, कथा, निबंध, चरित्र, संत साहित्य असा सर्वसमावेशक खजिना तिच्यात पाहायला मिळतो. हा खजिना एकूण १७७ पुस्तकांचा आहे. त्यातली काही नावे आपल्या परिचयाची आहेत. जसे लीळाचरित्र, नामदेव, तुकारामाचे अभंग,ज्ञानेश्वरी, एकनाथाचे भारूड, दासबोध, आज्ञापत्र, लोकहितवादींची शतपत्रे, संगीत सौभद्र, संगीत शारदा, भाऊसाहेबांची बखर, लावण्या, काजळमाया, श्रीमानयोगी, स्वामी, बलुतं,उपरा.

या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याची प्रस्तावना. ती आहे अरूण टिकेकरांची. अभ्यासू आणि परखड मत असलेली ही प्रस्तावना वाचकाना अंतर्मुख करणारी आहे. आनंदानुभव, अलंकारप्राप्ती आणि आत्मक्षमवृत्ती यांचा अनुभव आपणास येतो की नाही, याची प्रचिती वाचकांना तपासून पाहता येईल.

१९८६ नंतर २०१४ साली ही दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. त्यामुळे या यादीत आणखी भर पडू शकते. परंतु आहे ही यादी वाचकाना नक्कीच उपयोगी ठरेल. आपले काय वाचायचे राहिले आहे, आणि संग्रहात कोणती पुस्तके घ्यायची राहिली आहेत याचा शोध या यादीवरून घेता येईल. किंबहुना रसिक वाचक समजणाऱ्या प्रत्येकाच्या संग्रही असावे असेच हे पुस्तक आहे.

- **मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**




# ग्रंथपान

हमने तो जब कलियाँ माँगी,
काँटो का हार मिला

हे गाणे ज्यांना आठवत असेल त्यांना गुरूदत्त नावाचे गारूड काय होते, ते सांगण्याची गरज नाही. नुसती सुरावट कानावर पडली तरी नजरेसमोर गुरुदत्तची छबी उभी राहाते. ज्याने त्याचे प्यासा, काजग के फूल आणि साहिब, बीबी और गुलाम सारखे सिनेमे पाहिले, त्यांच्या रसिक काळजावरून कुणीच गुरुदत्तला खाली खेचू शकणार नाही. तो काळ ज्यानी पाहिला, त्यांच्यासारखे भाग्यवान रसिक तेच. गुरुदत्तला जाऊन आता पन्नास वर्षाचा काळ लोटला. हा काळ त्याच्या एकूण आयूष्यमानापेक्षा खूप मोठा आहे. तरीही त्याच्या आठवणी अजूनही ताज्या वाटतात. का वाटणार नाही? लखलखत्या चंदेरी दुनियेत आपले स्थान निर्माण करणे सोपे नाही. त्यावर आपला ठसा उमटविणे तर त्याहून कठीण. परंतु गुरुदत्तने या दुनियेवर आपली मोहर उमटविली. कायमची. तीही कारकीर्दीचे आयूष्य अपुरे वाट्याला आलेले असताना. जर अधिक आयूष्य....  या जर तरला तसा आता अर्थ नाही, नसतोही.




गुरुदत्तचा जन्म ९ जुलै १९२५ आणि मृत्यु १० ऑक्टोबर १९६४, म्हणजे वाट्याला आलेले आयुष्य ३९ वर्षांचे. त्याच्या जाण्याला आता पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. ग्रंथालीने नेमके हेच औचित्य साधले. दि.१३ ऑक्टोबर २०१४ रोजी त्याच्यावरील स्मृतींना उजाळा देणारा ग्रंथ प्रकाशित केला, त्याचे नाव 'गुरुदत्त'. हा ग्रंथ आहे गुरुदत्तवरील लेखांचा. त्याचे संपादन केले आहे सुधीर नांदगावकर यांनी.

गुरुदत्तविषयी अनेकांनी भरभरून लिहिले आहे. सुधीर नांदगावकर, अरुण खोपकर, अशोक राणे, डॉ सुमती क्षेत्रमाडे, विश्वास पाटील, रेखा देशपांडे, प्रा.विजय आपटे, देवीदत्त, लक्ष्मीकांत देशमुख, श्याम बेनेगल, सत्यजित राय, वहीदा रहमान, अबरार अल्वी ही त्यातली काही मान्यवर लेखक मंडळी. यांच्या नजरेतून गुरुदत्तच्या अनेक पैलूंचे दर्शन वाचकाला होते. गुरूदत्त हा अभिजात अभिनेता होता, तसा तो कुशल दिग्दर्शक होता, धाडसी निर्माता होता. कथा-पटकथाही त्याने लिहिल्या. श्याम बेनेगल त्याच्याविषयी उल्लेख करतात, 'तो कॅमेरामन नसूनही उत्तम तंत्रज्ञ होता. विलक्षण सौंदर्यदृष्टी त्याच्याकडे होती. कॅमेऱ्याची विशिष्ट नजर होती. प्रकाशयोजनेचा सुक्ष्म विचार होता.' अबरार अल्वी तर गुरुदत्तसोबत काम करणारे. त्यानी गुरूदत्तचा सिनेमाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्मरण करून दिला आहे,' केवळ बॉक्स ऑफिसवर यश मिळवून देणारे चित्रपट बनवणं कठीण नाही. अर्थपूर्ण चित्रपटांना बॉक्स ऑफिसवर यश मिळवून दाखवताना खरी कसोटी लागते.' गुरुदत्तच्या कला आणि खाजगी जीवनला कलाटणी देणारी दोन नावे. एक गीता रॉय. तिच्याशी त्याने विवाह केला. दुसरे नाव म्हणजे वहीदा रहमान. हे नेहमीच वादग्रस्त राहिलेले नाव. अनेकांच्या मते या दोघींच्या लाटांत गुरुदत्तची नौका हेलकावे खात बुडाली. त्यामुळे वहीदा रहमानचा गुरुदत्तवरील लेख औत्सुक्याचा ठरतो.'महान प्रेमिक होते ते. आपल्या कामावर त्यांचं प्रेम होतं, आपल्या सहकाऱ्यांवर त्यांचं प्रेम होतं, आपल्या सृजनावर त्यांचं प्रेम होतं आणि मृत्युवरही त्यांचं प्रेम होतं.' ही वहीदा रहमानची पारख.

'साहिब, बीबी और गुलाम' विषयी तर अनेकांनी मते नोंदविलेली आहेत. दोन स्वतंत्र लेखही आहेत. त्यातल्या सौंदर्य आणि कलावादी भूमिकेबाबत गुरूदत्तचा दृष्टिकोन किती आग्रही होता याचा उलगडा या लेखांमधून होतो. आणि तोच चित्रपट त्याच्या नजरेतून पाहण्याचा मोह अनावर होतो.

गुरुदत्तच्या जीवनाचा आलेख मांडताना, ग्रंथाची मांडणी तीन भागात करण्यात आली आहे. पहिल्या दोन भागात लेख आहेत. शेवटच्या भागात गुरुदत्तच्या चित्रपटांविषयी चार परिशिष्टे जोडली आहेत. त्यांच्यातून गुरुदत्तच्या कारकीर्दीची कल्पना स्पष्ट होते. लेखांमध्ये अनेक गाजलेल्या गाण्यांचे मुखडे आणि फोटो आहेत. त्यातून तो काळ पुन्हा नजरेसमोर उभा राहतो. मुखपृष्ठावरील गुरुदत्तची छबी तर रूपेरी पडद्यावरील जिवंत अभिनयाचे स्मरण करून देते. देखण्या स्वरूपात निर्मिती केलेला ग्रंथ तितकाच मजकुराने ठाशीव झाला आहे. ग्रंथालीची ही स्मरणयात्रा औचित्यपूर्ण म्हणायला हवी.

- **मूल्य १०० रु.  सवलतीत ६० रु.**

# ग्रंथपान

दिनकर गांगल या नावाचा परिचय म्हणजे 'ग्रंथाली'. १९७४ साली ग्रंथालीची स्थापना झाली तेव्हापासूनचा. ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या पुस्तकांच्या निमित्ताने तो वाढत गेला. वाचक चळवळीचा भाग म्हणून प्रकाशन, असा एकांगी उत्साह न ठेवता त्याचा प्रसार करण्याचे कसब त्यांनी दाखवले. 'ग्रंथमोहोळ', 'रुची', प्रदर्शने याद्वारे वाचकाच्या दारात पोहोचण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. अख्खा महाराष्ट्र पिंजून काढला. देशाबाहेर सुद्धा वाचक जागृत केला. हवे ते शोधून काढले. पाहिजे तसे लिहून घेतले. मराठी साहित्यात संपादकीय नियोजन आणले. जवळपास चारशे पुस्तकांवर त्यांचा संस्कार आहे. अनेक पुस्तके वाचकांच्या मनावर कायमचे अधिराज्य गाजवत आहेत. या सगळ्यातून जाणवलेले, भावलेले आणि प्रत्यक्ष दिसलेले गांगल सगळ्यांनाच परिचित आहेत. पण या पलीकडचेही व्यक्तिमत्त्व असू शकते, ते गांगलांनी जपले आहे. 'थिंकीग पॉवरचे.' जे घडते, जे दिसते त्यातला भाव त्यांना जो जाणवतो तो इतरांपेक्षा वेगळा असतो. त्यांची चिंतनाची दिशा काही वेगळे शोध घेत असते. हा अनुभव त्यांच्या संपादनात जसा जाणवतो, तसा लिहिण्यात, भाषणातही जाणवतो. माझा वैयक्तिक अनुभव आहे तो असा. त्यामुळेच त्यांचा एकप्रकारे आदरयुक्त धाक देखील वाटतो. मी म्हणतो आहे ते वरवरचे, वा व्यक्तिपूजक नव्हे. त्याचा प्रत्यय घ्यायचा तर हे पुस्तक वाचा,'स्क्रीन इज द वर्ल्ड'. गांगलांचे नवे पुस्तक. वेळोवेळी, प्रसंगोपात्त केलेल्या लेखनातून, भाषणातून मांडलेल्या चिंतनशील विचारांचे आलेख असलेले पुस्तक.




गांगल पत्रकार म्हणून जवळपास ३० वर्षे माध्यमात वावरत होते. त्यांच्याकाळी त्याना सांगण्यात येई, जर्नालिस्ट म्हणजे कम्युनिकेशनचे विद्यार्थी. मिडियम इज द मेसेज. परंतु, आजचे माध्यम आणि झालेले बदल पाहून गांगल म्हणतात, 'गेल्या पाच दहा वर्षात ते विधान मागे पडलं आणि 'स्क्रिन इज द वर्ल्ड' हे विधान आलं.' मल्टिमिडियाची जादू कशात आहे, तर स्क्रीन इज द वर्ल्ड! एक छोटा स्क्रीन आहे आणि त्या छोट्या स्क्रीनवर आपलं सगळं जग आहे. हा विचार त्यांनी व्यक्त केला आहे तो 'मल्टिमिडिया माहोलमधील मराठी' या लेखात. 'क्रांतिसदृश स्थित्यंतराच्या काळातील लेखन-वाचन' या लेखात ते १८५७ पासून सुरू झालेल्या प्रबोधनपर ज्ञानप्रकाश चळवळीचा शोध घेतात. या चळवळीतला शेवटचा महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यानंतर म्हणजेच १९५६ नंतर येथील वैचारिक परंपरा तेवढी जाज्वल्य राहिली नाही. त्याची जागा अनुभवांनी/अनुभूतींनी आणि स्वाभाविकच लालित्याने घेतली, या निष्कर्षावर येऊन पोहोचतात. याच लेखात समाजमनावर अधिराज्य गाजवणाऱ्या लेखकांचा ते उल्लेख करतात. त्यात अरुण साधूंचा उल्लेख उल्लेखनीय म्हणावा लागेल. त्यांच्या लेखनाचे कवाड उघडून दाखवत गांगल म्हण्तात,'त्याच्या काळातील तो सर्वात लोकप्रिय आणि अर्थपूर्ण लेखक ठरला आणि पुढे त्याला राज्य आणि देशपातळीवर तशी मान्यता मिळाली'. मातृभाषा या संकल्पनेबाबत तिहितात, 'मातृभाषा ही संकल्पनाच पेचात आली आहे. मराठी आई, बंगाली बाप; मुलगी वाढते आहे दिल्लीच्या वातावरणात आणि शिकते आहे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत. तिची मातृभाषा कोणती?'

महाराष्ट्राची भाषा, संस्कृती, लोक वसाहत आदिचा शोध घेतांना गांगल 'महाराष्ट्र हा तर मेल्टिंग पॉट 'या लेखात म्हणतात, भाषिकदृष्ट्या महाराष्ट्र हे जगातील चौदाव्या क्रमांकाचे राज्य असो, पण त्याची भाषा हाच त्या भूप्रदेशाचा दुबळा दुवा आहे. कारण मराठी भाषा घडलेली नाही- घडवलीही गेलेली नाही. दहा कोटी लोकांना एकात्म बांधू शकेल एवढी ताकत तिच्यात आलेली नाही. देशोदेशीचे लोक एकत्र येऊन घडवलेली संस्कृती म्हणून अमेरिकेला 'बॉइलिंग पॉट' असे म्हटले जाते. त्या उटल महाराष्ट्राला 'मेल्टिंग पॉट'. कार्यकत्यांनी एकत्र येऊन काम उभे केल्याची, तीस चाळीस वर्षापूर्वीची उदाहरणे आता तशा स्वरुपात दिसत नाहीत. अण्णा हजारे, प्रकाश आमटे, डॉ. अभय बंग, अविनाश धर्माधिकारी, अनिल शिंदे, विजय बोराडे यासारख्या एकेकट्या व्यक्ती नेटाने , तिच्या मर्जीने काही करताना दिसतात. महाराष्ट्रात इन्स्टिट्यूशन उभ्या राहण्याची शक्यता , जी गेल्या शतकाच्या शेवटच्या तीन दशकात जाणवत होती ती अस्तंगत पावली आहे, असाही निष्कर्ष त्यांनी काढला आहे.

वरील काही विवेचनावरून गांगलाच्या निरीक्षणाचे, शोधाचे आणि चिंतनाचे सार काय आहे याची कल्पना येईल. या लेखसंग्रहातील लेखांची शीर्षके वाचली तरी ती कल्पना अधिक विस्तृत होईल. ग्लोकल महाराष्ट्र, राष्ट्रवादाची पुनर्मांडणी अटळ, मराठी साहित्य-कला क्षेत्रातील मध्यमवर्गीय संवेदना!, वृत्तवाहिन्या म्हणजे बाजार गप्पाच की!, आजची संस्कृतीः स्क्रीन इज द वर्ल्ड.

जगाचा शोध घेण्यासाठी आता जहाज किंवा विमाने वापरण्याची गरज नाही. ते आता बोटाच्या टोकावर उभे आहे. ही कल्पना दाखविणारे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवले आहे. सुंदर!

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# 'ग्रंथाली'ची नवी प्रकाशने




## गुरुदत्त

**संपादन : सुधीर नांदगांवकर**

चित्रपटातील कलावंतांची लोकप्रियता क्षणभंगुर असते. पण कलावंत म्हणून गुरुदत्त यांच्यासंबंधी गेल्या ५० वर्षांत जेवढे लेखन झाले ते भाग्य अन्य कोणत्या सिनेकलावंताला क्वचितच लाभले आहे. ५० वर्षांनंतरही गुरुदत्त यांच्या चित्रपटांची रसिक मनावरील मोहिनी ओसरलेली नाही. सिनेमा माध्यमाचा अभ्यास करणाऱ्यांना आजही गुरुदत्त यांचा सिनेमा खुणावत असतो.

**मूल्य २२५ रुपये**
**सवलतीत १२५ रुपये**

## थोडी ओली पाने

**हेमन्त टकले**

माझे स्नेही हेमन्त टकले हे आमदार आहेत, उत्तम साहित्यिक आहेत. राजकारणी माणसाला लेखनासाठी केव्हा वेळ मिळतो? हा प्रश्न अनेकांच्या मनात येतो पण त्यांचा पिंड हाच मुळात लेखकाचा आहे. कला, साहित्य, संस्कृती, नाट्य या सर्वच क्षेत्रात त्यांचं मन रमतं. गोदावरी नदीकाठच्या संस्काराने आणि कुसुमाग्रजांच्या सहवासाने त्यांचे व्यक्तिमत्त्व संपन्न झालेले आहे. त्याचा प्रत्यय त्यांच्या लेखनातून येतो. 'थोडी ओली पाने' या पुस्तकाच्या शीर्षकापासून पानापानात त्यांचं सुसंस्कृत मन दिसते. **– अरुण शेवते**



**मूल्य १२५ रुपये**
**सवलतीत ७५ रुपये**




## X files केइएमच्या..

**डॉ. मालिनी नाडकर्णी**

केईएम हॉस्पिटलसारख्या महाकाय संस्थेतलं सध्याचं अद्ययावत रेडिऑलॉजी डिपार्टमेंट पाहतानाही तसंच होतं. तो विभाग घडवणाऱ्यांची दृष्टी, जिद्द आणि श्रम यांची जाणीव होत नाही. अंधाऱ्या खोलीतल्या पुरातन मशीनपासून सीटी, एमआरआय वगैरे आधुनिक यंत्रांपर्यंतचं आणि 'पाना आणि पाईप' या आयुधांपासून चुंबकी-संगणकी तंत्रांपर्यंतचं त्या विभागाचं स्थित्यंतर डॉ. मालिनी नाडकर्णींनी स्वतःच्या मेहनतीनं सुरू केलं, त्या धडपडीचा इतिहास.

**मूल्य १२० रुपये**
**सवलतीत ७५ रुपये**

**'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये प्रसिद्ध झालेली**

## मराठीतील साहित्यलेणी

**दीपक घारे**

'लीळाचरित्रापासून 'संवादा'पर्यंतच्या निवडक मराठी ग्रंथांचा तपशील व थोडक्यात परिचय. प्रत्येक ग्रंथप्रेमीच्या संग्रही असायलाच हवे असे संदर्भपुस्तक!




**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**




## तीव्र एकांतातल्या जीर्ण काळोखात

**मनोहर जाधव**

या संग्रहातील कवितांमधून व्यक्तिच्या सामाजिक आणि भावजीवनातील कल्लोळ रसरशीतपणे प्रकट झाला आहे. वेगवेगळ्या अनुभवांच्या बाह्य आणि अंत:स्तरावर व्यक्ती ज्या पद्धतीने प्रतिक्रिया देत असते ते पाहता या संग्रहातील कवितांचा पोत हा अनेकपदरी आहे. मानवी जीवनात एकच एक अनुभव प्रत्ययाला येत नसतो तर तो संमिश्र, विरोधाभासी तर कधी तर्कविरोधीही असतो. या अनुभवांचे आकलन आणि विश्लेषण.

**मूल्य १२० रुपये**
**सवलतीत ७५ रुपये**

## अनाहत

**ॲड. मंदाकिनी पाटील**

गेल्या दोन दशकात लिहिणाऱ्या कवयित्री त्यांच्या पूर्वासुरींच्या पावलावर पाऊल टाकून लिहित आहेत. मंदाकिनी पाटीलही या वाटेवर चालत आहेत. स्त्रीच्या जगण्याला समर्थपणे भिडताहेत. आणखी नवी आशयसुत्रे, नवी प्रतिमासृष्टी घेऊन त्या वाचकांपुढे पुढील काळात येतील अशी अपेक्षा करण्याइतकी त्यांची कविता परिपक्व होत आहे हे नमूद करायला हवे.

– नीरजा




**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**

WITH

BEST

COMPLIMENTS

FROM

A

WELL-WISHER

*****

***

*

RNI No. MAHMAR/2013/50137
Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.